# समुद्र, मासा आणि माणूस

राजा मंगळवेढेकर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0027172

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
गु-प्रवास
दा. क. ८५८
२६९६२
ग्रंथ : शाखा (स्थळ ...)

सं. प्रवास
गु-प्रवास
८५८
२६९६२
२८।११।८३

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

5 JAN 1994
12 JAN 1994
2 FEB 1994
16 FEB 1994
12 MAR 1994
7 MAY 1994
20 JUL 1994

22 FEB 1995
18 JAN 1997
22 JAN
१०।११।९८
४।१२।९८
14 FEB
28 F

# समुद्र, मासा आणि माणूस

लेखक

राजा मंगळवेढेकर

REFBK-0027172

प्रतिमा प्रकाशन

प्रकाशन क्र १०३

प्रकाशक
अरुण पारगावकर,
१३५९ सदाशिव पेठ
नवाविष्णू चौकाजवळ,
पुणे ४११ ०३०
फोन ४३७ ४४४

© राजा मंगळवेढेकर
९, अशोकवन मॉडेल कॉलनी
पुणे ४११ ०१६

मुद्रक डिलाईट प्रिंटर्स
16/A शिवाजीनगर,
हिमालय इंडस्ट्रिअल इस्टेट बिल्डिंग,
पुणे ४११ ००५

अक्षरजुळणी :
टाईपो-आर्टस्
१४८१ शुक्रवार पेठ
पुणे ४११ ००२

मुखपृष्ठ चित्रांकन, पुणे

प्रथमावृत्ती · १ ऑगस्ट १९९३

मूल्य : रुपये सत्तर

खरं म्हणजे मी जन्मान देशावरचा घाटी सोलापूर जिल्ह्यातला पढरपूरचा भूवैकुठ पढरीतच जन्मलेला विशीपर्यंत राहिलेला, वाढलेला शिकलेला देशस्थ-ऋग्वेदी, अगस्ती गोत्रोत्पन्न ब्राह्मण त्यातही विठ्ठलाच्या देवळात पुराण वाचणाऱ्या तीन पिढ्याच्या पुराणिकाचा मुलगा समुद्रापासून लाब, माशाच्यापासून तर आणखीनच लाब असलेला समुद्र पाहायलाच मिळाला तेव्हा बालपण सरलेल होतं चित्रातले मासे मत्स्यालयात काचेच्या कपाटात सुळकांड्या मारताना प्रथम दिसले होते

पण, का कुणास ठाऊक, समुद्र आणि मासा याच्याविषयी एक विलक्षण आकर्षण व कुतूहल माझ्या मनी नादत आलेल आहे केव्हापासून, तेही नक्की सागता येणार नाही, पण समुद्राची एकप्रकारची ओढ माझ्यात कुठतरी आहे, हेही मला पुढ भटकतीच्या वेळी कळून आल काहीतरी नातंगोत, ऋणानुबध जाणवला ! कुठला ? पूर्वजन्मातला ? तो आहे ? मग कसला ? काय म्हणायच ?

तर हे राहू दे घडल मात्र अस की, काही कल्पना नसताना मी समुद्र, मासा आणि मच्छीमार माणूस याच्या अगदी निकट सपर्कात आलो

या सागरी-विश्वात रत्नागिरी, सिधुदुर्ग, ठाणे, रायगड व मुबई अशा भागाला लाभलेल्या किनारपट्टीवर टप्प्या-टप्प्यान, जमेल तस, दशकभराच्या अवधीत फिरलो

एक आगळी-वेगळी सृष्टी व जीवन मला पाहायला, राहायला, ऐकायला, बोलायला, अनुभवायलाच मिळाल त्याचीच ही दैनदिनीच्या रूपातली कहाणी

ही कहाणी परिपूर्ण आहे, त्रुटिहीन नाही अस कस म्हणू ? जे आणि जस पदरी बांधता आलं ते तस शब्दाकित करण्याचा प्रयत्न केला आहे

या भ्रमतीत अनेकांचं साहाय्य लाभल त्यातल्या त्यात न्यायमूर्ती देसाई, तुळशीदासजी तांडेल व दोशी वकील याची विशेष मदत झाली मी सर्वांचाच आभारी आहे

— राजा मगळवेढेकर

अनुक्रम

रत्नागिरी आणि सिंधुदुर्गच्या सागरतीरी / ५

पुन श्च रत्नागिरी / ६४

ठाण्याच्या किनारपट्टीवर / ७४

रायगडच्या सागर-सान्निध्यात / १२०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
शाखा

# रत्नागिरी आणि सिंधुदुर्गच्या सागरतीरी

रत्नागिरी ९ जानेवारी १९८२

रत्नागिरीतला आजचा दुसरा दिवस 'विहार लॉज' मध्ये सकाळी सर्व आटोपून गणपतीपुळे येथे जाण्यासाठी म्हणून तयार झालो आणि ८॥ लाच बसस्टँडवर गेलो परंतु चौकशी करता कळले की, बस ९। ला सुटते पण ती गणपतीपुळ्यास फार वेळ थांबत नाही त्यामुळे सायकाळी ६ नंतरच परतावे लागणार माझा 'कथाकथना'चा पटवर्धन हायस्कूलमधील कार्यक्रम तर ५ वाजता तेव्हा पुळ्यास जाऊन येणे शक्य नाही, हे लक्षात आल्यावर जाणे रहीत करून लॉजवर परतलो पुळ्याला जाता आले नाही म्हणून मनाने अंमळ खट्टू बनलो होतो काल सकाळी पावसला जाऊन येणे कसे छान जमले! पुळे राहून जाणार की काय? तसा पुळ्याला मी दोनचार वेळा गेलो आहे पण म्हणूनच पुन्हा पुन्हा जाण्याची इच्छा होते पुळ्याचा मुक्त मोकळा समुद्र, लांबलचक किनारा-बीच, गणपतीचे मंदिर पोटात घेऊन कडेला उभी असलेली टेकडी, किनाऱ्यालगत नारळीची झाडे– सँड, सन ॲण्ड ग्रीनरी' असे इथे एकत्र भेटते मला त्याचा फार फार लोभ वाटतो दोनचारदा येऊन, पाहून हा लोभ वाढलाच आहे वाढतोच आहे!

लॉजवर परतलो तर थोड्या वेळाने रत्नागिरीतल्या विभागीय शासकीय ग्रंथालयाचे प्रमुख श्री साठे आले त्यांनी दुपारी ग्रंथालयाला भेट देण्यास बोलावले त्याप्रमाणे दुपारी ग्रंथालयात त्यांच्याबरोबरच गेलो लो टिळकांच्या स्मारकाची नवी कोरी, प्रशस्त, देखणी वास्तूच ग्रंथालयाला लाभलेली आहे संदर्भ-ग्रंथालय म्हणूनच या ग्रंथालयाचा प्रामुख्याने उपयोग

होतो आहे कर्मयोगी टिळकांची ज्ञानभक्ती लक्षात येता हे टिळक-स्मारक अधिक यथार्थ, सजीव वाटले।

बोलता बोलता साठे म्हणाले, "राजाभाऊ, वेळ असेल तर एके ठिकाणी चलता का?"

मी म्हणालो, "वेळ तर पाचपर्यंत रिकामाच आहे, तेव्हा जरूर येतो पण कुठे जायचे आहे?" साठ्यांनी सांगितले, "देसाईंकडे देसाई म्हणून इथे एक चीफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट आहेत त्यांनी तुम्हाला चहालाच बोलावले आहे "चला" मी म्हणालो, आणि नजिकच्याच कोर्टआवारातल्या एका बैठ्या बगलीकडे वळलो

दारात पोचतो तोच देसाई नामक मध्यमवयीन गृहस्थांनी येऊन वाकून नमस्कार केला मी अवघडलो म्हणालो, "हे काय साहेब!"

तर म्हणाले, "प्रत्यक्ष आत्ता भेटतो आहोत पण भेट पूर्वीच झालेली आहे तुमचं पुष्कळ वाचलं आहे ऐकलं आहे 'हिरवे सोबती' फार छान पुस्तक आहे पण एका झाडावर न लिहून तुम्ही त्याच्यावर अन्याय केलेला आहे, साहेब! ते झाड आहे आमच्याकडे दाखवतो नंतर तुम्हाला"

"तसं असेल तर तुमची नि त्या झाडाचीही मी आधीच माफी मागतो" मी सांगून मोकळा झालो नंतर देसाईसाहेब म्हणाले, "दीपावलीच्या दिवाळी अंकातली कविता फार आवडली फारच आवडली सोसण्यास नाही आता अंत राहिलेला। सोसणेच सोशित आलो, खंत सोबतीला।" देसाई ओळींमागून ओळी म्हणू लागले मी चाट झालो माझीच कविता मला पाठ नव्हती तेवढ्यात सौ देसाई बगलीतून बाहेर येत मला म्हणाल्या, "अहो, तुमच्या या कवितेची पारायणं चालतात यांची!" मला फार फार नवल वाटलं! आपला हा एवढा उच्चपदस्थ, तरीही रसिक वाचक, चाहता मी भारावलो कुठे काय रुजते, कसे तरारते, आणि असे अचानक भेटते!

देसाईसाहेबांशी खूपच गप्पागोष्टी झाल्या त्यात अनेक विषय होते याच गप्पाष्टकामध्ये सागरी कामगारांच्या व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या सोयी-गैरसोयींचा विषय निघाला हा देसाईसाहेबांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा, आस्थेचा आणि कळकळीचा विषय देसाई म्हणाले, 'राजाभाऊ, अहो, ही एक वेगळी दुनियाच आहे अत्यंत कष्ट करणारांची, पण पिढ्यान् पिढ्या गरिबी, दारिद्र्य यात पिचणाऱ्यांची याच्या कष्टाला

ना मोजमाप, ना फळाची शाश्वती, ना बाजारात किंमत, ना पोटभर घासाची हमी, ना सुटी, ना विश्राती, ना कायदे नि कानू. हे उपेक्षित कष्टकऱ्याचे वेगळे जग आहे!

"आमच्या तथाकथित सास्कृतिक जगाला कोळी माहिती आहे तो नृत्य करणारा, गाणारा, आनदी कोळीगीत हा तर आमच्या सांस्कृतिक महोत्सवाचा महत्त्वाचा भाग झालेला आहे विशेषत घाटावर साखरकारखान्यांतून किंवा वायदेबाजारातून साचलेल्या पैशाचा निचरा करण्यासाठी काढलेल्या महाविद्यालयाच्या समेलनातून कोळीनृत्ये हवीतच 'फॅशन-शो' मध्ये कोळीवेष हवाच राजकपूरलादेखील 'बॉबी'चा बाप कोळीच करावा लागला राजकपूरला का, कालिदासालासुध्दा शकुतलेच्या अभिज्ञानाकरता कोळ्याचाच आश्रय घ्यावा लागला कोळ्यांना हल्ली पदनामकोशातील प्रतिशब्द आहे, मच्छिमार!

"पण तो बिचारा किती बेजार आहे, किती आजाराने तो पीडलेला आहे याची या सास्कृतिक जगाला दाद ना फिर्याद! हे आपले 'डोलकर, डोलकर दर्याचा राजा—' म्हणत नाच करणार! राजानं वाऱ्या-वादळाशी झुजून नि समुद्राचा तळ रात्रंदिवस नागरून आणलेली कोळबी, पॉपलेट, रावस, सुरमयी, शेंगाळा, कर्ली हे चापणार मधला दलाल गबर होणार, आणि राजा थंडीवाऱ्याबरोबरच आजची, उद्याची, परवाची चिंता करीत राबराब राबणार! बाप समुद्रावर, आई बाजारात पोराना कुठले शिक्षण नि कुठले संस्कार खर अस आहे की, या सागरकामगारांचा साकल्याने असा विचारच झालेला नाही वैदिक वाङ्मय, रामायण, महाभारत यांतून भले धीवराबद्दलचे उल्लेख आहेत पण औद्योगिकदृष्ट्या त्यांच्याकडे कोणीही पाहिलेले नाही कौटिल्याचे अर्थशास्त्र काय, अकबरची ऐन-ई-अकबरी काय, किंवा छत्रपतींची आज्ञापत्रे काय, सागरी कामगाराचा विचारच नाही हे जुन सोडा, पण कार्ल मार्क्स हा एवढा मोठा आधुनिक विचारवंत, कामगार क्रातीचा प्रणेता, द्रष्टा त्याला हातोडा-कोयता दिसला, पण कोळ्याचं जाळ नि होडग दिसल नाही ॲडम स्मिथ, रिकार्डो, मालथस, मोठमोठे अर्थशास्त्रज्ञ, पण त्यानी गरीब मच्छीमारांचे नाव घेतलेले नाही वास्तविक, इंग्लंडमधली बहुतेक सगळी संपत्ती ही 'wealth of other nations'- अशीच आहे तीही बहुतेक सगळीच्या सगळी सागरी मार्गानेच लुबाडून आणलेली तिच्यावर बकिंगहॅम पॅलेस उठले राजेशाही-लोकशाही-कायदा-सुव्यवस्था

हे विचार-आचार सुचले पण बिचारा समुद्री कामगार अस्पृश्यच राहिला त्याच्यासाठी कायदा सुव्यवस्था आदींची जणू कसली गरजच नाही

"हां आहे सागरी कामगाराबद्दल त्यावेळी जरी कोणी कायदे केले नाहीत, तरी त्याच्यातच एक नादत आलेला आहे तो ब्रिटनच्या राज्य-घटनेप्रमाणेच अलिखित स्वरूपात आहे

"बोट-तारू-गलबत समद्रावर दिवसेंदिवस मालाची वाहतूक करीत असते शिडाची गलबते, वाऱ्यावर चालणारी वारा अनुकूल असेल तर भरभर धावणारी, नसेल तर रेंगाळणारी एखादे गलबत असे रेंगाळले, तर किती दिवस रेंगाळेल हे सागता येत नाही मग भरून घेतलेल्या अन्नपाण्याचा साठा सपतो भुकेने जीव व्याकुळतो किनारा तर अजून दृष्टिपथातही नसतो वारा प्रतिकूलच असतो भुकेची भुतं पोटात थैमान घालू लागतात अशा वेळी त्या गलबतावरले शहाणे खलाशी विचार करतात गलबत लहानमोठ जसं असेल तस, सात-आठ किंवा दहा-बारा खलाशी असतात ते एकेकाच्या नावाच्या चिठ्ठ्या करून टाकतात त्यातून एक चिठ्ठी उचलली जाते उघडून पाहतात ज्याचे नाव निघाले असेल त्याला कापून खातात "

"बापरे!" मी शहारून गेलो

"भयानक आहे!' देसाई म्हणाले, "माणूस नि बेडूक सारखेच "

कार्यक्रमाची वेळ होत आली म्हणून उठलो

देसाई म्हणाले, "उद्या जेवायलाच या आणखी बोलू "

"ठीक आहे," म्हणून मी त्याचा निरोप घेतला

**रत्नागिरी १० जानेवारी १९८२**

श्री देसाईंनीच केलेल्या व्यवस्थेनुसार जीपने सकाळीच गणपतीपुळ्याला गेलो समुद्रकिनाऱ्यावर भटकलो खूप बरे वाटले तिथून परतताना जयगड किल्ला व बंदर पाहिले किल्ला उद्ध्वस्त-ओसाड, तर बंदरही सध्या बंदच, त्यामुळे वर्दळ नव्हती

रत्नागिरीस दुपारी १-२ पर्यंत परतलो तो देसाईंच्याकडेच गेलो देसाईंचे आज मौन रविवारी देसाई मौन पाळतात नवल! जेवायला पुरणपोळीचा खास बेत होता मी मूळचा पंढरपुरी पुरणपोळीच्या गावचा पंढरीच्या विठोबाला पुरणपोळी आवडीची, म्हणून तिचाच मुख्य नैवेद्य

देसाई मौनामुळे खुणेने सांगत होते आग्रह करत होते देसाई वहिनी आणि मुलं यांना सवयीने खुणाची भाषा उमगायला लागली आहे त्याच्यामार्फत मी देसाईंशी बोलले पण मला देसाईंचे ऐकायचे होते सागरी जीवनाविषयी विशेषतः ! म्हणून त्यांच्या मौनामुळे थोडासा खट्टूच बनलो होतो पण देसाई चतुर ! त्यांना आज मौनामुळे बोलता येणार नाही म्हणून काल रात्रीच लिहून एक टिपण तयार केले होते भोजनोत्तर ते त्यांनी माझ्या हाती ठेवले पडल्या पडल्या मी ते वाचले देसाईंनी लिहिले होते –

"जंगलच्या कायद्यासारखाच सागरी कायदा आहे सागरी कामगारांना तर साध्या माणसासारखी माणूस म्हणूनही वागणूक मिळत नाही मग हक्क वगैरे सोडाच किमान वेतन, कामाचे तास सुट्ट्या, कल्याण योजना, इत्यादींसबंधी असलेले सारे कायदे आणि सारे अधिकार व त्याची दसरे बासनात जमिनीवरच वेठबिगारी कायदा, वृद्धवेतन कायदा - सगळे भूमीवरच आता अंतरिक्षातही दिसतात-दिसतील पण सागरावर

"कम्युनिस्ट, सोशालिस्ट, ह्युमॅनिस्ट हे डावे काय, किंवा काँग्रेसवाले, संघवाले, भांडवलवाले हे उजवे काय, यांना सागरावरला कामगार दिसलाच नाही "

मला आठवले, ८ ऑगस्टच्या सुप्रसिध्द ठरावात उल्लेख आहे तो Tillers of the fields and factories असाच पुढे लिहिले होते,

"समुद्रात मचव्यावर किंवा गलबतावर काम करण्यासाठी दहा-बारा वर्षांच्या कोवळ्या पोरांपासून कोणीही चालतो न कुरकुरता मरेस्तोवर कष्ट करण्याची तयारी हीच पात्रता-क्वालिफिकेशन ! पोरट्याच्या आई-बापाच्या हातावर काही दिडक्या टिकवल्या की पोराची रवानगी गलबतावर झाडण्या-पुसण्यापासून बारीकसारीक सगळी त्याचीच कामे गलबतावरल्या तांडेलापासून खलाशापर्यंत सगळ्यांचेच जेवणखाण, आंघोळ, झोप, मलमूत्रविसर्जन वगैरे गलबतावरच

"जेवण्या जेवण राधतो, वाऱ्याला कसाबसा आडोसा करून काय राधतो तर भाताची पेज, भात, आणि ताजे, परसातून भाजी खुडून आणावी तसे जाळे टाकून पकडलेले मासे थोड मीठ, हळद लावायची आणि उकडायचे भात-पेजेबरोबर पोटात ढकलायचे पोराटोरांना उरलेले टाकलेले मिळायचे झोप नाहीच झोपलाच तर लाथ पेकाटात बसलीच कुरकूर व विरोध करण्याची हिंमत फुटकळाची नसतेच यातून गाजून जर कोणी विरोध केलाच,

म्हणजे उलटून बोललाच किंवा असेच काही केले तर त्याच्यासाठी समुद्र आहेच! तो विशाल सागर आपल्या अपार उदरात त्याला सामावून टाकतो।

"किनाऱ्यापासून बारा मैलांच्या आत काय ते देशाचे राज्य पूर्वी तीन ते चार मैल किंवा बंदुकीची गोळी पोचेल एवढ्या सागरी प्रदेशावर त्या देशाचे, राज्य असे होते कर्तबगार व दक्ष पोलिसांना तेथवर लक्ष ठेवणे, असे गुन्हे शोधणे अवघड असले तरी शक्य होते पण बारा मैलाच्या पुढे —'

माझ्या मनी आले अशक्यच आहे आजकाल मोठमोठ्या गजबजलेल्या शहरामधील भरवस्तीत दिवसाढवळ्या घडलेल्या गुन्ह्याचा तपास पोलीसखात्याला लावता येत नाही जमिनीवरच्या गुन्हेगारांची ही कथा, तर मग समुद्रात बारा मैलाच्या पुढे सगळा आनंदच! खरं तर पोलिसांच्या बदनाम कार्यपद्धतीबद्दल बोलायलाच नको पण तो या स्टेशनच्या हद्दीतला गुन्हा नाही, ही सबब किनारी पोलिसाच्या दृष्टीने फारच सोयीस्कर कोचीनहून निघालेले गलबत कांडला बंदराला लागेतोपर्यंत गुन्हा कोणत्या ठिकाणी, कोणत्या हद्दीत घडला, हे कोण ठरविणार? कोण सांगणार? मुळात गुन्ह्याची खबरच कशी लागणार? त्यासाठी पोलीसठाण्यापर्यंत जाणार कोण? आणि कोणी खबऱ्या गेलाच, तर त्याचे खोबरे व्हायला किती वेळ!

अशी विलक्षण दहशत असते! आणि अशा भयंकर दहशतीमध्ये मारहाण सहन करत अर्ध्यापोटी आयुष्यभर राबावे लागते

मी स्वत शीच पुटपुटलो, "गुलामगिरीचा बाजार नसला तरी तसलीच ही गुलामगिरी"

तेवढ्यात देसाईंचे एक मित्र आले त्यांच्याशी बोलतानाही ह्या गुलामी जिण्याची आणखी कल्पना आली ते सांगत होते, 'सागरी कामगारांना त्यांच्या वैयक्तिक सुखसोयी, हक्क जाऊ द्या, पण देशाच्या सार्वत्रिक निवडणुकीत एक मतदार म्हणून मत तरी देता येते काय? मतदार म्हणून नोंद झालेली नसते चुकूनमाकून झालेली असलीच तर मतदानाच्या दिवशी तरी त्यांचा पाय जमिनीवर असतो थोडाच! किती तरी सागरी कामगार आपल्या या नागरिक हक्कापासून वंचित झालेले आहेत'

बोलता बोलता त्याचा ओघ धर्मान्तराकडे वळला मित्र म्हणाले, गलबतावर पशूप्रमाण राबणाऱ्या मनुष्य नामक प्राण्याला कुठला आला

आहे धर्म? आता हे खरं आहे की किनारपट्टीवरील काही मडळी पूर्वी मुसलमान बनली गोवा-कालिकतकडील मडळी खिश्चन झाली हिंदू आक्रमणाच्या वेळी हिंदू, मुसलमानी आक्रणाच्या वेळी मुसलमान इग्रज पोर्तुगीज-फ्रेच राजवटीत खिश्चन, अशी धर्मान्तरे आढळतात राजकीय वर्चस्व, दारिंद्र्यापोटी आमिपाना बळी पडण्याची वृत्ती, ही जशी धर्मान्तराची काही प्रमुख कारणे आहेत, तसेच त्याला हिंदुधर्मातील विपमता, जातीयता, चातुर्वर्ण्य, अस्पृश्यता ह्याही गोष्टी कारणीभूत आहेत शिवाय, पूर्वी धर्मान्तरिताला हिंदुधर्मांत प्रवेश नसे त्यामुळेही हिंदुधर्माचे अत्यत नुकसान झाले आहे या धर्माला जाण्याचाच मार्ग ( Exit ) फक्त आहे, आत येण्याचा रस्ताच ( Entrance ) नाही एखादा परधर्मी माणूस नुसता हिंदू होऊ शकत नाही कारण हिंदू हाही केवळ हिंदू नाहीच, तो हिंदू ब्राम्हण, मराठा, साळी, माळी, कोळी, वाणी, महार, माग, चाभार-असा कोणीतरी असतो बरं, त्याचीही जात जन्मानेच फक्त मिळते धर्मान्तराप्रमाणे जात्यंतर करता येत नाही खर सागायच तर यांना एकच धर्म ठाऊक आहे, तो म्हणजे पोट भरण्याचा! कसेबसे पोट भरणे, मिळेल ती आणि तशी दारू पिणे, स्मगलरांच्या धद्यात स्वत ला विकून राबणे, घरदार, ससार आज आहे तर उद्या नाही, अशा स्थितीत अर्थहीन व्यर्थ जगणे! '

हे ऐकून, वाचून खूपच अस्वस्थ बनलो

देसाईनी लिहून विचारले,

" पुन्हा केव्हा येणार? "

" बोलवाल तेव्हा " मी म्हणून गेलो

मच्छीमाराचा व्यवसाय, त्यांचे आर्थिक व सास्कृतिक जीवन, राहणी याकडेदेखील कोणीच द्यावे तेवढे लक्ष दिलेले नाही कोणी फारसे लिहिलेलेही नाही तुम्ही का लिहीत नाही? "

मी म्हणालो, " मी देशावरचा माणूस इकडल्या भापेत घाटी मला काहीच ठाऊक नाही तशी माहिती करून घेण्याची सधीही कधी आली नाही "

" उपलब्ध करून दिली तर? "

" अवश्य येईन राहीन, पाहीन, पण लिहीनच असे मात्र नाही कारण ते आधीच ठरवून होत नसते नंतर घडले तर घडून जाते "

" हरकत नाही मुलांसाठी गोष्टींचा, कथाकथनाचा कार्यक्रम ठेवू

हे देखील त्या मुलासाठी होत नाही पण आवश्यक आहे

"मुलांना गोष्टी सागायला मात्र जरूर येईन या सास्कृतिक कामात जरूर मदत करीन " मी जवळजवळ आश्वासन देऊन टाकले

देसाईंचा निरोप घेऊन फाटक हायस्कूलमधील कार्यक्रमाला गेलो चिकार मुले आली होती गोष्ट सागितली बालगीतेही म्हटली सायकाळी ७। च्या बसने रत्नागिरीचा तीन दिवसाचा मुक्काम सपवून पुण्याकडे निघालो

या वेळच्या रत्नागिरीच्या मुक्कामात नवीन काही पाहिले, ऐकले, ह्याचा आनंद आणि बेचैनी–दोन्हीही चित्तात घेऊन परतलो

**पुणे २४ फेब्रुवारी १९८२**

श्री देसाईंचे रत्नागिरीकडे येण्याविषयी पत्र आले १० जानेवारीला जे बोललो त्याचे स्मरण त्यांनी दिले आहे मीही ते विसरलेलो नाही उलट जे ऐकले त्याने अस्वस्थच होऊन गेलो काही मित्राना त्यातील गोषवारा सागितला, तर त्यांनीही नवल व्यक्त केल!

श्री देसाईंना मी १३ मार्चला रत्नागिरीस येईन, असे कळविले

**रत्नागिरी, साखरतर, मिरकरवाडा १३ मार्च १९८२**

मुबईहून आरामगाडीने काल रात्री ९ ला निघालो तो रत्नागिरीला आज सकाळी ६। ला पोचलो बसस्टॅंडवरच समाजवादी पक्षाचा जुना कार्यकर्ता वैद्य भेटला कितीतरी वर्षांनी उभ्याउभ्याच थोडे बोललो नि श्री देसाईंकडे गेलो तिथे पोचलो तर कळले, मला घ्यायला गाडी स्टॅंडवर गेली आहे चुकामूक झाली पाठोपाठ गाडीही आली रेस्टहाऊसवर मुक्कामाला गेलो काही मित्र आले होते त्यांच्याशी बोलून स्थूलमानाने हिंडण्या-फिरण्याचा कार्यक्रम ठरला

दुपारी जेवणानतर झकास झोप काढली रात्री नाही म्हटले तरी जागरणच घडल होत बसमध्ये रेल्वेसारखी झोपण्याची सोय नसल्यामुळे बसूनच रात्र काढावी लागते

तीन वाजता श्री पुराणिक याच्याबरोबर साखरतरला गेलो येथे मच्छिमारांची बरीच वस्ती आहे सुमारे दोनतीनशे तरी घरे असतील घरे ठेंगणी, खापरी खपरेलाची, झापाच्या छपराची एकमेकाजवळ, पण वेडीवाकडी कशीही वसलेली साडपाण्याचे ओहोळ ओलांडीतच चालावे

लागते थोडी मोकळी जागा असली की, माशाचे वाळवण पसरलेले दिसले माशाच्या वासाने ही वस्तीच नव्हे तर तो परिसरच परिमळून गेलेला होता घरात ठिकठिकाणी मासे पकडण्याची जाळी टांगलेली होती काहीजण बसल्या बसल्या त्याची डागडुजीही करीत होते

वस्तीतून चक्कर मारल्यावर समुद्राच्या काठी गेलो अजून किनारा झोपल्यासारखा शांत होता काठावर झापाच्या, दोन्ही बाजूंनी पत्त्याच्या बंगल्यासारख्या, उतरत्या छपराखाली काही ठिकाणी होड्याची डागडुजी चाललेली होती ही उतरती छपरे म्हणजे होड्याचे गराजच!

कुठे होड्याना पडलेल्या फटीतून पाणी आत येऊ नये म्हणून विशिष्ट पध्दतीने रुई दाबून बसवली जात होती, तर कुठे कुजलेले लाकूड काढून टाकून नवीन लाकडाचे ठिगळ देण्याचे काम चालले होते एके ठिकाणी नवीन होडीच बांधली जात होती गलबते, लहान होड्या किंवा आता मोठ्या तांत्रिक होड्या– ट्रॉलर्स' बांधण्याचे काम सुतार करतात पिढ्यान्‌पिढ्या हेच काम करणारी सुताराची जमात आहे हे फक्त होड्याच बांधतात त्यामुळे ही मंडळी या धंद्यात अनुभवी, वाकबगार असतात होडीसाठी प्रामुख्याने ऐनाचे लाकूड वापरतात

छपराच्या बाहेर कडेला एक म्हातारबुवा एकटेच बसलेले दिसले, त्याच्या पुढ्यात जाऊन बसलो, "रामराम बाबा"

"रामराम"

"बाबा, तुम्ही या गावातलेच का?"

"हां"

"काय धंदा?"

"धंदा ह्योच की, मासे धरायचा"

म्हणजे तुम्ही मच्छीमारच '

हा आम्ही मच्छीमार, पण खारवी"

"खारवी म्हणजे काय, ही जमात आहे?"

"तर! खारवी, भंडारी, गाबीत- जातीच ह्या"

"खारवी म्हणजे-"

"खारवी म्हणजे खाऱ्या पाण्यातली शेती करणारे म्हणा की! नाही तर खलाशी म्हणा खाऱ्या पाण्याशी संबंध आमचा"

"अरे वा! म्हणून तुम्हाला खारवी म्हणतात तर!"

हां '

म्हाताऱ्या बाबानं खारवी शब्दाची व्युत्पत्ती आपल्यापरीनं नीट सांगितली होती

मी विचारलं, "बाबा, वय किती आता ?"

"ते कुनाला ठाव हो पन आसल सत्तरच्या पुढच "

' आता समुद्रावर जाता का ?"

"न्हाई अलीकडच सोडलं डोल्यानं नीट दिसना झालं हो डाक्तर म्हन्तोय मोतिबिंदू झालाय त्याचं आपरेशन कराय पायजे "

म्हणून जायचं सोडलं ?"

व्हय काय करनार ? नाइलाज झाला "

पण समुद्रावर या मच्छीमारीच्या उद्योगात किती वर्षं काढली ?"

म्या ?"

"हा "

"आता काय सागू, सायेब, धा वर्साचा आसल तवापासून यातच हाय की '

"म्हणजे साठ-पासष्ट वर्षं काढली की !"

"ते बगा आता हिशेबाचा मेळ बसवा तुमीच "

'तुमचं नाव काय, बाबा ?"

"तुकाराम साधुसंताचं नाव ठिवलय '

साधुसंताचं नाव ठेवलय, तर भजनबिजन काही करता का नाही ? '

"करतो तर ! भजनीमंडळच हाय हिथं भजन करतो एकादस करतो पंढरीला जातो आल्यावर गंगापूजन होतं चंद्रभागेचं तीरथ म्हंजे गंगाच !"

"असं का ? आषाढीला यात्रेला जाता ?"

"हा गावातली बरीच लोकं आमी दरसाल जातो आल्यावर गावकरी सत्कार करात्यात "

म्हाताऱ्या बाबाशी असा संवाद चालला होता, तोवर आणखी दोघंतिघं तिथं येऊन बसले वयस्करच होते पण अजून अधूनमधून समुद्रावर जात होते त्यांच्यापैकी एकाला मी विचारलं,

"इतकी वर्षं रात्रंदिवस तुम्ही समुद्रावर काढली आहेत कधी कंटाळा नाही का येत जायचा ?"

"छ्या ! छ्या ! अवो सायेब, परवा शिमग्याच्या टायमाला दोन

दीस खाडं पडलं का, तर घरात झोप न्हाई आली नीट

"झोप नाही आली?

"न्हाई ना अवो, समिंदराच्याच अगारखाद्यावर खेळलो, वाढलो आमी, आमाला कसा कटाला ईल त्याचा। कटाला हिथ घरात-खुराड्यात येतो तरी बर, हिथ त्याची गाज तरी कानावर पडती त्याच्यावरला वारा तरी हुगाया मिळतोय"

"मग समुद्र नसेल अशा ठिकाणी गेलात तर चैन पडत नसेल तुम्हाला?"

"तर काय! गुदमरल्यागतच जीव व्हतो तित"

"मग पंढरीच्या वारीला जाता तेव्हा कस होत?"

मी मुद्दामच थोड्या खोडसाळपणानच प्रश्न विचारला तर म्हातारबाबा खमक्या निघाला म्हणाला,

"अवो, ते गोष्ट वायली असती भूवैकुठ म्हनलय सतांनी पढरीला"

"अरे वा!" मी भाव पाहून चकित झालो

म्हातारा पुढं सागू लागला,

"पढरीचा पांडुरग म्हजे कोण? विश्नू! आन् विश्नूचा पहिला अवतार कोण? तर मच्छ म्हणजे मासाच की हो सायेब आन् मासा म्हंजे आम्हा लोकाचा जीव की प्राण! त्याच्याशिवाय आमची धडगत हाय का? तर आसं ते सूतगूत हाय"

म्हाताऱ्यान उलगडलेल ते सूत ऐकून मी आणखीनच थक्क झालो समुद्र, मासा याना यांच्या जीवनात किती मोठ स्थान आहे स्थानच नव्हे, तर त्यानी त्याचं सर्व जीवनच व्यापून टाकलेल आहे! समुद्रच त्यांचा बाप, आजा पजा आणि आजी, मायसुद्धा देवदैवतदेखील

तिसऱ्या एकाला मी विचारल,

"तुम्ही रोज समुद्रावर जाता का?"

"तर! जायलाच पायजे त्याबिगर खानार काय? मासळी आनली तर पुढचं सगळ मीठ-मिरची त्याच्यावरच आमच पोट आन सायेब, आस हाय की, आमच्यात म्हनत्यात- 'एक रात आन् खडीभर भात!' म्हनच हाय ही!'

"एक रात आन् खडीभर भात, काय अर्थ आहे बर या म्हणीचा?"

त्यानं सागितल, "म्हंजे समिंदरावर आमी मासं धरायला गेलो का

की एखाद्या राती जाळ्यात एवढी बरब्बल मासळी घावली की इच्यारू नगा! अवो, चार-पाच गड्याला जाळ व्हडीवर वढून उचलून घेता घेता जीव दमतो, यवड वजं तर यवडी मासळी घावली म्हजे खंडीभर भात पिकवल्यावानीच की आमाला!''

''खर आहे!'' मी म्हणालो आणि विचारल ''सण-समारभ असतील जोरदार?''

''हायेत तर! गणपती, शिमगा, नारळीपुनव हे आमचे मोठे सण''

''आणि दिवाळी?''

''दिवाळी त्या मानान कमी कारण का? तर त्या टायमाला मच्छीमारीचा हगाम जोराचा असतो आमी कुणी घरी नसतोच एखादी आंघोळ झाली तर व्हती, न्हाई तर समिंदरावरच फटाकेबिटाके गणपतीच्या येळलाच थाट असतो''

पाच वाजायला आले होते आणि झोपलेल्या किनाऱ्याला जाग यायला लागली होती समुद्रावर परतू लागलेल्या होड्या, ट्रॉलर्स दिसायला लागले होते पहाटे चार-पाचच्या सुमारास गेलेली मंडळी काय आणि किती ऐवज घेऊन येताहेत याची किनाऱ्यावर ह्या मडळींना उत्सुकता भल्या मोठ्या टोपल्या घेऊन खारविणी जमू लागल्या होत्या लिलाव बोलणारे येऊ लागले होते नशीब समुद्रावरच होते एक खारवी म्हणाला, ''नशीबच असत, सायेब नाही तर एकाला हे ढीगभर मासळी घावते आन् दुसऱ्याला चिरीमिरीसारखी भेटते, याला दुसर काय म्हनायच? समुद्र तोच जाळी तशीच मासळी तीच धरणारे तेच मग एकाला आस न् दुसऱ्याला तस, अस का? नशीबच की ज्याचं त्याचं''

साखरतरहून निघालो आणि मिरकरवाड्याकड आलो ट्रॉलर्स, होड्या किनाऱ्याला लागल्या होत्या मासळी उतरवून ती किनाऱ्यावर नेली जात होती किनारा माणसांनी गजबजून, फुलून गेला होता लगबग, धांदल घाई मासळींच्या ढाऱ्याभोवती सगळीकडे गर्दीच दिसत होती लिलाव बोलले जात होते सौदे ठरले जात होते मालाची निवडानिवड, 'सॉर्टिंग' चालले होते नाना तऱ्हेचे आवाज, बोलण, गजबज, गडबड मासळी-बाजारच! आणि ह्या बाजारात अधिराज्य होतं बायकाच त्याच बोलणार, त्याच ठरवणार, त्याच विकणार पुरुषाचं काम सपल होतं समुद्रावर भल्या पहाटे जायचे दहा-बारा तास राबायचे प्रसगी वाऱ्या-वादळाशी झुजायचे आणि

नशिबाने मिळेल ते घेऊन यायचे याला ' कॅच ' म्हणायचे आणलेला कॅच घरवालीच्या स्वाधीन केला की हा आपला ताडी-माडी, दवादारू झोकून पडणार, आराम करणार दुसरे दिवशी पहाटेपर्यंत

बायकाची धांदल, गडबड, माशांच्या विविध जाती, प्रकार बघत बघत किनाऱ्यावरून फिरलो ताज्या मासळीच्या आणि मत्स्यगधाच्या गंधाने किनाराही सजग, सतेज झाला होता

पण मिरकरवाड्यातल्या या मत्स्यगधा साखरतरच्या मत्स्यगंधांपेक्षा निराळ्या दिसत होत्या त्या मुस्लिम हे तर उघड दिसत होते पण जशा त्या खारविणी तशा या म्हणे ' दाल्दी ! '

बरोबरच्या आडनावाच्या तांडेल नामक गृहस्थाला विचारल, " हे दाल्दी कोण ? " तर तो म्हणाला, " समुद्रावर दालद करणारे, दौलत मिळवणारे ते दाल्दी हे मुसलमान सुफी पथी आहेत "

" दाल्दी सगळे मच्छीमारच ? "

" हां बहुतेक सगळेच म्हणा की ! कारण मच्छीमारी आणि ' मर्चंट नेव्ही ' यावर यांचे जीवन आहे अस सागतात साहेब की, केव्हा तरी जुन्या काळी जे अरब हिंदुस्थानात आले आणि पश्चिम किनारपट्टीवर राहिले त्यांचीच ही प्रजा "

मिरकरवाड्यातली किनाऱ्याला लागून असलेली दाल्दी मडळींची घरे गिचमिडीनेच उभी होती, पण चागल्या बांधणीची, दोन-तीन मजल्याची, रंगी-बेरंगी नटलेली दिसत होती ही घरेच सागत होती की, आमच्या दाल्दी धन्यांची आर्थिक स्थिती खारवी-भडाऱ्यांपेक्षा पुष्कळच चागली आहे ताडेलना मी विचारले, " हेही मच्छीमार तेही मच्छीमारच, मग असे का असावे ? " तांडेलाने सांगितले, " साहेब, मच्छीमार धद्यासाठी लागणारे भांडवल या दाल्दी मडळींकडे असते चार भावांतले दोन मर्चंट नेव्हीत कामाला असतात त्यांना तिकडे बरे पैसे मिळतात आणखीही काहीबाही करतात पण घरी पैसा पाठवतात अलीकडे तर त्यांच्यापैकी पुष्कळजण आखाती देशात गेले आहेत तिकडूनही पैसा येतो पण इथले दोन भाऊ त्याचा भांडवल म्हणून उपयोग करू शकतात होडी बांधाची, ट्रॉलर बांधाचा, इजिन घ्यायचं, तर आता फार पैसे लागतात हजारो रुपये पडतात दाल्दी यासाठी तो पैसा वापरतात त्यामुळे सावकाराच्या व्याजानं ते मेटाकुटीला येत नाहीत खारवी-भडारी याची अवस्था तशी नाही. त्याना जाळ घ्यायचं

की एखाद्या रात्री जाळ्यात एवढी बख्खळ मासळी घावली की इच्यारू नगा! अवो, चार-पाच गड्याला जाळ व्हर्डीवर वढून उचलून घेता घेता जीव दमतो, यवडं वज तर यवडी मासळी घावली म्हंजे खंडीभर भात पिकवल्यावानीच की आमाला!''

"खरं आहे! मी म्हणालो आणि विचारलं, ' सण-समारंभ असतील जोरदार?''

"हायेत तर! गणपती, शिमगा, नारळीपुनव हे आमचे मोठे सण ''

'आणि दिवाळी?''

"दिवाळी त्या मानान कमी कारण का? तर त्या टायमाला मच्छीमारीचा हगाम जोराचा असतो आमी कुणी घरी नसतोच एखादी आयोळ झाली तर व्हती, न्हाई तर समिंदरावरच फटाकेबिटाके गणपतीच्या येळलाच थाट असतो '

पाच वाजायला आले होते आणि झोपलेल्या किनाऱ्याला जाग यायला लागली होती समुद्रावर परतू लागलेल्या होड्या, ट्रॉलर्स दिसायला लागले होते पहाटे चार-पाचच्या सुमारास गेलेली मंडळी काय आणि किती ऐवज घेऊन येताहेत याची किनाऱ्यावर ह्या मंडळींना उत्सुकता भल्या मोठ्या टोपल्या घेऊन खारविणी जमू लागल्या होत्या लिलाव बोलणारे येऊ लागले होते नशीब समुद्रावरच होते एक खारवी म्हणाला, नशीबच असतं, सायेब नाही तर एकाला हे ढीगभर मासळी घावते आन् दुसऱ्याला चिरीमिरीसारखी भेटते, याला दुसर काय म्हनायचं? समुद्र तोच जाळी तशीच मासळी तीच धरणारे तेच मग एकाला आसं न् दुसऱ्याला तसं, असं का? नशीबच की ज्याचं त्याचं ''

साखरतरहून निघालो आणि मिरकरवाड्याकडं आलो ट्रॉलर्स, होड्या किनाऱ्याला लागल्या होत्या मासळी उतरवून ती किनाऱ्यावर नेली जात होती किनारा माणसांनी गजबजून, फुलून गेला होता लगबग, धावपळ, घाई मासळीच्या हाऱ्याभोवती सगळीकडे गर्दीच दिसत होती. लिलाव बोलले जात होते सौदे ठरले जात होते मालाची निवडानिवड, ' सॉर्टिंग ' चालले होते नाना तऱ्हेचे आवाज, बोलणं, गजबज, गडबड मासळी-बाजारच! आणि ह्या बाजारात अधिराज्य होतं बायकांचं त्याच बोलणार, त्याच ठरवणार, त्याच विकणार पुरुषांचं काम संपलं होतं समुद्रावर भल्या पहाटे जायचे दहा-बारा तास राबायचे प्रसंगी वाऱ्या-वादळाशी झुंजायचे आणि

नशिबाने मिळेल ते घेऊन यायचे याला 'कॅच' म्हणायचे आणलेला कॅच घरवालीच्या स्वाधीन केला की हा आपला ताडी-माडी, दवादारू झोकून पडणार, आराम करणार दुसरे दिवशी पहाटेपर्यंत

बायकांची धांदल, गडबड, माशांच्या विविध जाती, प्रकार बघत बघत किनाऱ्यावरून फिरलो ताज्या मासळीच्या आणि मत्स्यगंधाच्या गंधाने किनाराही सजग, सतेज झाला होता

पण मिरकरवाड्यातल्या या मत्स्यगंधा साखरतरच्या मत्स्यगंधांपेक्षा निराळ्या दिसत होत्या त्या मुस्लिम हे तर उघड दिसत होते पण जशा त्या खारविणी तशा या म्हणे 'दाल्दी !'

बरोबरच्या आडनावाच्या तांडेल नामक गृहस्थाला विचारलं, ' हे दाल्दी कोण ? '' तर तो म्हणाला, ''समुद्रावर दालद करणारे, दौलत मिळवणारे ते दाल्दी हे मुसलमान सुफी पंथी आहेत ''

''दाल्दी सगळे मच्छीमारच ? ''

''हा बहुतेक सगळेच म्हणा की ! कारण मच्छीमारी आणि 'मर्चंट नेव्ही' यावर याचे जीवन आहे असं सांगतात साहेब की, केव्हा तरी जुन्या काळी जे अरब हिंदुस्थानात आले आणि पश्चिम किनारपट्टीवर राहिले त्याचीच ही प्रजा. ''

मिरकरवाड्यातली किनाऱ्याला लागून असलेली दाल्दी मंडळींची घरे गिचमिडीनेच उभी होती, पण चागल्या बांधणीची, दोन-तीन मजल्यांची, रंगी-बेरंगी नटलेली दिसत होती ही घरेच सागत होती की, आमच्या दाल्दी धन्यांची आर्थिक स्थिती खारवी-भंडाऱ्यापेक्षा पुष्कळच चांगली आहे तांडेलना मी विचारले, ''हेही मच्छीमार तेही मच्छीमारच, मग असे का असावे ? '' तांडेलाने सांगितले, ''साहेब, मच्छीमार धंद्यासाठी लागणारे भांडवल या दाल्दी मंडळींकडे असते चार भावांतले दोन मर्चंट नेव्हीत कामाला असतात त्यांना तिकडे बरे पैसे मिळतात आणखीही काहीबाही करतात पण घरी पैसा पाठवतात अलीकडे तर त्याच्यापैकी पुष्कळजण आखाती देशात गेले आहेत तिकडूनही पैसा येतो पण इथले दोन भाऊ त्याचा भांडवल म्हणून उपयोग करू शकतात होडी बांधाची, ट्रॉलर बाधाचा, इंजिन घ्यायचं, तर आता फार पैसे लागतात हजारो रुपये पडतात दाल्दी यासाठी तो पैसा वापरतात त्यामुळे सावकाराच्या व्याजानं ते मेटाकुटीला येत नाहीत खारवी-भंडारी याची अवस्था तशी नाही त्यांना जाळं घ्यायच

म्हटलं तर आज जाळ्याला लागणारे पधरा-वीस हजार रुपये सावकाराकडून, बँकेकडून कर्जाऊच काढावे लागतात या कर्जातच ते जन्मभर फसलेले राहतात दोन वेळ पोटभर जेवणाची जिथ पचाईत तिथ कसली घर बाधणार न् काय!"

तांडेलानी आर्थिक स्थितीच असं विश्लेषण केलं आणि पुढ असही म्हणाले, "खरं सांगू का साहेब, ही दाल्दी जमात तशी मोठी धाडसी अन् कामाला, कष्टाला ताठ! भरपूर मेहनत करणार हयगय नाय त्या मानान खारवी-भंडारी कष्टाला थोडे डावेच, अन् आहे त्यात राहाव, नशिबानं घ्याव अशा स्वभावाचे पापभीरू"

"तशात व्यसनही असणार!"

"त्यामुळच सगळे खलास झालेत या धद्यात शेकडा पचाणव, जास्तच म्हणा की, लोक दारूत-माडीत बुडालेले आहेत कर्ज आणि हे व्यसन यानं सत्यानाश झालाय बघा! हे जर येवढ नसत तर याच्यासारखे सुखी-समाधानी हेच "

"पण तांडेल, हे खर आहे का, की मच्छीमाराना ही अशी पाण्यात वाऱ्यात ढोरमेहनत करावी लागते, म्हणून दारू, माडी आवश्यक असते?"

तांडेल हसले आणि म्हणाले "कसलं खर न खोट, साहेब! घेणाराला सबबी लाख, न घेणाराला काहीसुद्धा लागत नाही याच्या बायकाच बघा की, किती काम करतात यांनी आणलेल्या मालाची सगळी उस्तवारी त्याच करतात शिवाय घर, ससार, मुलंबाळं, जाळी विणणं हे त्यानाच बघाव लागत त्या कुठ दारू पितात? व्यसन ते व्यसनच!"

"या बायका आता या मासळीच काय करतात?

"अहो, पुष्कळ कराव लागत ती निवडावी लागते सुरगा, बागडा, कर्ली, सुरमयी, मोरी, नाटवा, शिवड, पेडवा, घोलं, शेगाळा, कोळबी अशा पुष्कळशा माशाच्या जाती आहेत "

तांडेलानी मला तिथच काही जाती दाखवल्या त्याची वैशिष्ट्ये सागितली बाजारात कुणाला कशी मागणी असते आणि त्यांचा साधारणपणे भाव काय असतो, हेही सागितले

समुद्रावरचा सूर्यास्त या गडबडीतही पाहून घेतला सूर्य आणि मच्छीमार दोघंही एकमेकाना पाहून पाहून कटाळून गेले असतील म्हणून आपण आणि आपलं काम यातच ते मश्गुल

रत्नागिरी-वरवडे १४ मार्च १९८२

सकाळी ९॥ च्या सुमारास श्री पुराणिक आले त्यांच्याबरोबर श्री हेमचद्र कोपर्डेकर यांच्याकडे गेलो आणि त्यांच्यासह वरवडे नामक गावाकडे निघालो वाटेत गणपतीपुळे थोडा वेळ थाबलो समुद्रावर चक्कर मारली दोनच महिन्यानी पुन्हा आलो योग! पुळ्याहून मालगुड कविश्रेष्ठ केशवसुतांचे गाव पुढे वरवड्याला गेलो

वरवडे हे मच्छीमाराचे एक केंद्र ५००-६०० मच्छीमार येथे खाडीच्या काठी वस्तीला आहेत वस्ती तशीच चढ-उताराची ठेंगण्या खपरेलू लहान लहान घरांची बोळकडी, घाणपाण्याची डबकी, माशाचा परिमळ

दोन-चार बोळकाडी पार करून गेल्यावर एके ठिकाणी उचावर मामा पवारांच्या घरात पोचलो मामा घरीच होते घर बाधलेले, थोडे प्रशस्त होते सोप्यावर बसलो समोर खाडी, मागे समुद्र भरतीची वेळ होती पाणी फुगले होते लाटांनी पुढे पुढे सरकत होते मच्छीमाराची लहान लहान १०-१२ वर्षांची पोर लाकडाचे ओंडके फळकुटे घेऊन दिगबर अवस्थेत भरतीच्या लाटांबरोबर मजेत खेळत होती दगामस्ती करत होती खिदळत-नाचत होती

मी म्हणालो, "मामा, या पोराना भय नाही वाटत?" मामा हसून म्हणाले, ' अहो, ही तर मोठी पोर आहेत यांच्याहून लहान-लहानसुध्दा खेळतात समुद्राचं, पाण्याचं भय कसलं असत ते आमाला ठाऊकच पडत नाही जन्मल्यापासून त्याच्याशी संबंध माशासारखीच आमची पोरं समुद्रावरच वाढतात मोठी होतात पाच-सहा वर्षाची असल्यापासूनच पोर पोहायला लागतात आमच्या पोरांचे खेळच हे असले आमाला समुद्राचं भय वाटत नाही, तर मोठा आधार वाटतो "

मी उठलो आणि खाडीच्या काठाकाठान फिरून आलो काही मुल लाटावर तरगत तरगतच शिवाशिवीचा खेळ खेळत होती समुद्रच क्रीडागण!

परत येऊन मामांशी गप्पा मारल्या मामा तिथल्या मच्छीमार सोसायटीचे पदाधिकारी आहेत म्हणाले,

"आमच्या या गावात वर्षाकाठी चौदा-पधरा लाखाचा माशाचा खरेदी-विक्रीचा व्यवहार होतो, पण आमच्या कष्टाची बरीचशी कमाई दलालच खाऊन टाकतो "

"सोसायटी काय करते?"

' सोसायटी जाळ्यासाठी, लहानग्या होडीसाठी, ट्रॉलरच्या डिझेलसाठी, डागडुजीसाठी कर्ज देते "

" कर्जाची फेड वेळच्या वेळी होते ? "

" तोच तर वांधा आहे समुद्रातली-पाण्यातली ही शेती किती मिळल, केव्हा मिळल याचा भरवसा नाही त्यातून खर्च फार डिझेलच्या किंमती कुठल्या कुठ गेल्यात परवडत नाही "

गावात आल्यापासून पाहात होतो घरकाम कारणाऱ्या, जाळी विणणाऱ्या बायका आणि मुलच दिसत होती म्हातारे-कोतारेही दृष्टीस पडले पण तरणेताठे गडी नव्हतेच मामा म्हणाले, " पुरुषगडी पहाटेलाच होड्या, ट्रॉलर घेऊन समुद्रावर जातात दिवसभर तिकडंच सध्याकाळी पाच-सहाच्या सुमाराला परततील मग बायकांची काम सुरू होतील "

" मामा, तुम्ही खारवीच ? "

" हां, इथ सगळे खारवीच आहेत "

" खारव्यांची लग्नं कशी होतात ? म्हणजे हुडाबिडा ? "

" आहे तर ! पण आमच्यात नवरीला हुडा द्यावा लागतो "

" म्हणजे मुलान मुलीला हुडा द्यायचा ? "

" हा आमच्यात मुलीला फार भाव "

" का म्हणून ? "

" घरप्रपच चालवायला आणि मासळीचा धंदा करायला तीच उपयोगी पडते मासळी निवडणं, खारवणं, सुकवणं, बाजारात नेऊन विकण– सगळं, तीच करते "

" म्हणजे तीसुद्धा मिळवती असते Earning hand. "

" हां तिच्याच स्वाधीन सगळ असतं म्हणून तिला भाव असतो. चार चार, पाच पाच हजार रुपये द्यावे लागतात शिवाय कापडचोपड, जेवणखाण, दागदागिने मोठ्या खर्चाच काम असत लग्न म्हणजे "

" पण ही लग्नं एका जमीतीतच होतात, का अन्य मच्छीमारांशीही होतात ?

"नाही नाही खारव्यांचे सोयरसंबंध खारव्यांशीच जमतात भंडाऱ्याशी किंवा गाबिताशी नाही जमत त्यांच्या आमच्यात एकमेकांत रोटीव्यवहार होतो, पण बेटीव्यवहार नाही होत "

" बरं आता शिक्षणाच प्रमाण कस आहे ? मुलं-मुली शिकतात

का तुमची ? "

"हो सगळी शिकतात सगळीकड शाळा आहेत हायस्कुल आहेत आपली पोरं अडाणी ठेवून चालायच नाही ती शिकली-सवरली पाहिजेत शहाणी झाली पाहिजेत, अस प्रत्येक आई-बापाला वाटतच की हो ! "

"म्हणजे त्या दृष्टीन जागृती झाली आहे "

"हो तर ! आता मुलापेक्षा मुलींचं शिक्षण पुढं कमी होतं कॉलेजात घालण जमत नाही प्रत्येकाला शिवाय ती मोठी झाली की कामाला येते, लग्न जुळत– हे आहेच पण मुल पुष्कळ शिकली आहेत "

"अशी शिकलेली मुलं याच मच्छीमारीच्याच धद्यात राहतात, का दुसरीकड नोकरी वगैरे करतात ? "

"सगळ्यांनाच कुठ नोकऱ्या भेटतात आजकाल ? काही करतात मुबईला जातात बाकी याच आमच्या धंद्यात येतात अहो, समुद्राच्याच अगाखाद्यावर वाढलेली आमची पोर त्यांच्या रक्तालाही ओढ असते समुद्राचीच ! हे मोकळंढाकळ आभाळ आणि पाणी सोडून त्या नोकरीच्या बंदिस्त जागेत त्यांना चैन पडत नाही "

"खर आहे ! " मी म्हणालो आणि निरोप घेतला अडीचपर्यंत मालगुंडला परतलो सावकाशीने रत्नागिरीला आलो

**रत्नागिरी : १५ मार्च १९८२**

सकाळी रेस्टहाऊसवर श्री देसाई व त्याच्याबरोबर श्री पी के मयेकर आले मयेकर भंडारी आणि मच्छीमार धंद्याशी अगदी जवळून संबंधित गृहस्थ साठीच्या पुढचे तीन हार्ट-ॲटॅक येऊन गेलेले, पण विलक्षण तरतरीत, ताजे म्हणाले, "माझ्याकड चला, मी देतो हवी तेवढी माहिती तुम्हाला इथं काय राहताय ? माझ्याकड भरपूर जागा आहे सर्व सोय आहे चला " मी म्हणालो, "चला "

त्याच्याबरोबर त्याच्या 'गणेशकृपा' नामक बगल्यावर आलो मागाहून सामान आणवले मयेकरांकडेच मुक्काम ठोकला मयेकर इकडे प्रसिद्ध सर्वांना ते आणि त्याना सर्व माहितीचे सरकारी नोकरी काही काळ केली, पण अनेक प्रकारची सार्वजनिक कामे केलेली बँकाचे सचालक, कशाचे चेअरमन, तर कशाचे सेक्रेटरी नाना तऱ्हेचे व्याप मागे असलेला माणसातला माणूस बोलका कर्तबगार त्यामुळे त्याच्याकडे

येणारे-जाणारेही पुष्कळ मी त्यांच्याकडे गेलो आणि तासाभरानेच सुर्वे नामक गृहस्थ आले रावबहादुर सुर्व्यांचे हे चिरंजीव मयेकरांनी ओळख करून दिली माझे कामही कानी घातले सुर्वे म्हणाले, मीही भंडारीच सगळे भंडारी आम्ही मूळचे गोव्याकडले पण पोर्तुगीजाच्या राजवटीत छळाला आणि बाटवाबाटवीला भिऊन इकडे पळून आलेले आम्ही भंडारी तसे मूळचे धाडसी दर्यावर्दी नौकानयन हा व्यवसाय धाडसी, तशी हुशार जमात कितीतरी विद्वान, कलावंत भंडारी समाजात होऊन गेले आजही आहेत पण भंडारी म्हटला की त्याचा माडीशी संबंध लावून जे त्याला आज ओळखले जाते ते तितकेसे बरोबर नाही खरं म्हणजे इंग्रजाच्या कुटिल नीतीचा हा भाग आहे हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी पाहिल की, आपल्या राज्याला उपद्रव देणारी कोण कोण मंडळी आहेत, मग त्याचा बंदोबस्त आधी करायचा तसा त्यांनी केला भंडारी जमातीचे धाडस, हुशारी आणि मुख्य म्हणजे दर्यावर्दीपणा त्यांच्या लक्षात आला आणि समुद्रमार्गाने त्याच्यापासून आपल्याला दगाफटका किंवा उपद्रव होऊ शकतो, हे त्यांनी ओळखले आणि भंडाऱ्याच्या गरिबीचा गैरफायदा घ्यायचा ठरवून, पण वरकरणी मोठ्या कनवाळूपणाचा आव आणून भंडाऱ्यांना त्यांनी माडी काढण्याचे आणि विक्रीचे परवाने दिले अशा प्रकारे माडीच्या व्यवसायाबरोबरच माडीच्या व्यसनात भंडाऱ्याचा पराक्रम, शौर्य, दर्यावर्दीपणा—सगळं पार बुडवून टाकलं ,आणि आज आम्ही मच्छीमार बनलो सगळेच नाही पुष्कळ निरनिराळ्या व्यवसायात आहेत नोकरीत आहेत पण वस्तुस्थिती आहे ती अशी '' मला उत्तरेकडल्या कायस्थांची आणि दक्षिणेकडल्या ब्राह्मणाची आठवण झाली ह्या बोरूबहाद्दराच्या मुत्सद्दीपणाची आणि हुशारीचीही इंग्रजांनी त्यांना त्यांच्या पदरीचे कारकून बनवून अशीच वाट लावली होती!

सुर्व्यांनी ही वस्तुस्थिती सांगितली, तिच्यात तथ्य आहेच, पण भंडाऱ्यांचा दर्यावर्दीपणा व नौकानयन याबरोबरच माडाशी आणि म्हणून माडीशी संबंध कसा होता हे सांगणारी एक पौराणिक कथा उपलब्ध आहे, ती अशी

फार फार प्राचीन काळी तिलकासुर नावाचा दैत्य होऊन गेला तो फार मातला आणि लोकांना नानाप्रकारे छळू लागला त्याच्या छळाला कंटाळून, त्रासून लोकांनी शंकर-महादेवाची प्रार्थना केली महादेवानी त्याचे

गाऱ्हाणे ऐकले आणि तिलकासुर दैत्याला घाण्याला जुंपले तो घाणा फिरवून तिलकासुराला पिळून काढण्याची आज्ञा नंदीला दिली नंदीने घाणा फिरवण्यास सुरुवात केली तिलकासुर रगडला जाऊ लागला इकडे नंदीच्या कष्टाने महादेव दमला आणि त्याच्या कपाळावर घाम थबथबला त्यातील एक थेंब भुईवर टपकला त्याबरोबर त्यातून एक पुरुष उत्पन्न झाला त्याला महादेवांनी 'भावगुण' या नावाने संबोधिले कारण तो महादेवांचे स्तवन गात होता स्तुती करत होता महादेवाना दमल्यामुळे खूप तहानही लागलेली होती ते भावगुणाला म्हणाले, 'मला पाणी आणून दे ' भावगुणाने लगबगीने इकडे तिकडे शोधले! पण पाणी कुठेच दिसले नाही तेव्हा महादेवानी तिथे एक माड उत्पन्न केला माड उंचच उंच होता, पण त्याच्यावर तांब्याएवढी मोठाली फळे लटकलेली होती महादेव म्हणाले, त्यात पाणी आहे भावगुण चटकन माडावर चढला ती फळे काढली आणि खाली येऊन त्यातले मधुर, शीतल पाणी महादेवाना प्यायला दिले महादेवाची तहान शमली ते प्रसन्न झाले भावगुणाला वरदान देत म्हणाले, 'अलकावतीच्या भांडारावर तुझी सत्ता राहील!

भांडारावरचा अधिकारी म्हणून त्याला सगळेजण भंडारी' म्हणू लागले भावगुण भंडारी हाच भंडाऱ्याचा मूळ पुरुष

भंडाऱ्यांच्या आणि माडाच्याही उत्पत्तीची अशी ही कथा आहे संस्कृत 'मंधारक' म्हणजे दारू गाळणारा या अर्थाच्या शब्दावरून भंडारी हा शब्द बनला, असे एक मत कोशकार नमूद करतात भंडारी लोक मात्र स्वत ला खजिन्याचे, भांडाराचे अधिपती म्हणून भंडारी, असे मानतात असो

मयेकरानी सांगितले, "रत्नागिरीच्या किनारपट्टीवर पंधरावीस वर्षांपूर्वी एकही यांत्रिक बोट-ट्रॉलर नव्हता. एका फ्रेंच फिशरमनने तो आणला होता मी तो पाहिला आणि मला तो फार उपयुक्त वाटल्यावरून मी तसा बनवून घेतला पुढे माझे चौदा ट्रॉलर्स होते नंतर मी त्या धंद्यातून निवृत्त झालो पण इकडे यांत्रिक होडी, ट्रॉलर आणणारा मी पहिला भंडारी आहे त्या वेळी या ट्रॉलरलाही मच्छीमारांनी पुष्कळच विरोध केला होता ट्रॉलरच्या इंजिनाच्या आवाजाने मासे पळून जातील, जाळ्यात येणारच नाहीत अशी कल्पना, म्हणून विरोध " मला, खडकवासला धरण झाले त्या वेळी शेतकरी शेतीला पाटाचे पाणी घेईनात, याची आठवण झाली पाटाच्या पाण्याने

जमिनीचे फूल जाते जमिनी टकल्या बनतात अशीच समजूत होता पण ही समजूत बरोबर नाही जमिनीला व्यवस्थित ताली, बधारे घातले आणि पाणी घेतले तर उत्तम बागायत करता येते, हे दाखवण्यासाठी महात्मा फुल्यानी माजरीजवळ जमीन घेऊन, पाटाच्या पाण्यावर भाजीपाल्याचे पीक घेऊन दाखवले होते

सायकाळी मयेकराबरोबर बाहेर पडलो थोडे फिरून आलो गप्पा-गोष्टी झाल्या

**रत्नागिरी-काळबादेवी १६ मार्च १९८२**

सकाळी उठलो आणि सर्व आटोपून तयार झालो श्री देसाई आले त्याच्याबरोबर बाहेर पडलो फिरत फिरत थिबा पॅलेसच्या मागच्या बाजूने उतार उतरून राजिवडा नामक दाल्दींच्या वस्तीत आलो हा रत्नागिरीचाच एक भाग, खाडीच्या काठाने वसलेला राजिवडा, पेठ किल्ला, मिरकरवाडा हे रत्नागिरीतील मच्छीमाराचे वसतीविभाग मिरकरवाड्याप्रमाणे राजिवड्यातही दाल्दींचीच वस्ती आहे घरे अर्थातच बरी एकमेकांना खेटून वस्ती पार करून खाडीवर आलो तरीवरून पलीकडे भाट्ये, गोळप, पावसकडे जाणाऱ्यांची तुरळक वर्दळ सोडली तर सारा किनारा शात होता खाडीच्या कडेकडेने ओल्या रेतीतून चाललो होतो थोड्या अतरावर दोन-तीन बाया आणि एक पुरुष मोठाल्या टोपल्या खाडीच्या पाण्यात बुडवून त्यातील मासळी धुताना दिसले जवळ गेलो तर धुतलेल्या आणि न धुतलेल्या मासळीच्या बऱ्याच टोपल्या दिसल्या 'मासळी सुकत घालण्याच्या आधी अशी धुवून घेतो,' असे त्या माणसाने सागितले मी विचारले,

"नाव काय तुमच ?"

"हसन" त्यान सागितल

"हसनमिया, आज समुद्रावर मासे धरायला गेला नाही वाटतं ?"

"नाही साहेब, आज माझे दोन भाऊ गेलेत घरी हे काम होतं आणखीही काही कामं आहेत, म्हणून मी राहिलोय"

"तुमच्या घरात एकूण किती माणसं आहात तुम्ही ?"

'सोळा मुलंबाळं धरून"

"राहता कुठं ?"

"ते काय छप्पर दिसतय तिथ " हसनने वस्तीकडे हात दाखवून म्हटल

"घरी नेणार का मला ? "

"चला की साहेब गरिबाचं घर खोपट आहे थंडीवाऱ्याला निवारा चला साहेब " हातातले काम सोडून हसन मला घरी घेऊन गेला खपरेलाचे वर छप्पर असलेली १० x १५ ची ती एक चिंचोळी अधेरी मोडकीतोडकी जागा होती तिथच एका कोपऱ्यात मोरी, थोडा किनतानाचा आडोसा केलेली हसन हसत हसत म्हणाला, "साहेब, हे बघा आमच बाथरूम, ते तिकड किचन "

खोलीच्या दुसऱ्या टोकाला भली मोठी चूल चुलाणाच धडाडलेला होता एक पोक्तशी बाई रांधत होती एक पोरींचे केस विंचरीत होती बाहेर दोघीजणी सुकायला टाकलेल्या मासळीची उलटापालट करीत होत्या मासळीचा उग्र दर्प सगळीकडे दाटून राहिलेला होता धूर, ओल, साडपाण्याचे ओहोळ काय नव्हत ? न राहवून मी विचारले, "या एवढ्याशा जागेत तुम्ही सोळा माणसं राहता ? '

"साहेब, गुराढोरानाही गोठ्यात मोठी जागा मिळते पण हालत विचारू नका पावसाळ्यात कुत्रा हाल खात नाही साहेब "

हसनने चहा घ्यायचा आग्रह केला नको म्हटले असते तर त्याला वाईट वाटले असते म्हणून तिथंच त्यानं आथरलेल्या तरटावर बसलो त्यामुळं हसनच्या घराचं अधिक निरीक्षण करता आलं त्या जागेतच मच्छीमारीची जाळी टांगलेली होती काही जाळ्याचा ढिगारा होता चहा पिऊन बाहेर पडलो हसनच्या वस्तीतून, अरुद बोळातून चकरा मारत बाहेर पडलो खोपट सोडून जिथ जिथ थोडीफार रिकामी जागा मिळाली होती, तिथ तिथ मासळी उन्हात सुकायला टाकली होती त्यातली काही चालताना पायाखालीही येत होती एका खोपटाच्या बाहेर खोक्यावर एक म्हातारा बसला होता

हसन म्हणाला,

"ह्या बुढ्ढ्याच्या खोपटात तेवीस माणस आहेत, साहेब काय करणार ? जागाच नाही बरं आम्हाला जागा पाहिजे ती इथच खाडीच्या समुद्राच्या कडेला कारण सकाळी, पहाटे, रात्री-केव्हाही मासळी धरायला जाव लागतं पावसाळ[illegible] खाडीच पाणी ह्या इथ येऊन धडका

देतं '

बोलत बोलत खाडीवर आलो

हसन सागत होता, "ह्या धद्यात कष्ट फार आणि कमाई कमी, अशी परिस्थिती आहे साहेब आम्ही पाच भाऊ एवढ राबतो, पण धड पोटापुरतंही मिळत नाही कर्जपाणी ह्यातच सगळ जात "

हसन, ह्यात जर पोट भरत नाही तर मग दुसरा धदा किंवा नोकरी का नाही बघत ? "

'तोबा तोबा करीत हसन म्हणाला, "ते नाही जमायचं, साहेब आम्हाला आमचे किती हाल झाले, किती कष्ट पडले, किती सकटे आली तरी आम्ही समुद्रावरच जगणार आणि मरणार अहो, ही जगबणारी खाण आहे किती उपसली तरी ही सपणार नाही "

हसन सागत होता सांगता सागता त्यान उजव्या पायाच्या अंगठ्यानच खालच्या ओलसर रेतीवर एक वर्तुळ काढल त्यात एका बाजूला वक्र रेषा मारून एक लहानसा तुकडा दाखवला म्हणाला, "साहेब, ही आपली पृथ्वी आहे गोल त्यात हा लहानसा भाग म्हणजे जमीन आहे आणि उरलेल्या ह्या सगळ्या भागात पाणी आहे लोकसख्या फुगती आहे मग मला सांगा, ह्या वाढत्या खाणाऱ्या तोडाना ही एवढीशी जमीन कशी अन् किती दिवस पोसणार! तर एक ना एक दिवस सगळ्या लोकाना ह्या समुद्राकडच याव लागणार समुद्राच्या पोटात अमाप धन आहे ते कधी सपणार नाही कितीही काढा जन्मणार अन् वाढणार! आता एखादे वेळी कमी पडल सगळ्याला, पण अजिबात मिळणार नाही, अस होणार नाही "

हसनचा हा युक्तिवाद ऐकून मी चाटच झालो! पृथ्वीवर एक भाग जमीन तर तीन भाग पाणी आहे ही वस्तुस्थिती ओल्या रेतीवर वर्तुळ रेखून हसनने कशी दाखवून दिली होती! मला मोठी गमत वाटली

मी विचारले, "हसन, शिकलायस् किती ? '

"चौथीपर्यंत साहेब पुढं नाही शिकायला मिळाल धद्यात पडाव लागल पण शिकायची मला फार हौस होती " हसन हळहळत म्हणाला

"मग तुझ्या मुलांना शिकवतोस की नाही ? "

"शिकवतो तर! शाळेत घातलाय त्याला अजून लहान आहे पण शिकवणार त्याला पोटाला चिमटा बसला तरी चालल एकवेळ, पण मला

जे जमल नाही ते त्याच्या बाबतीत होऊ देणार नाही

"शिकवून काय मोठा अमलदार बनवणार त्याला ?

"छे छे! साहेब, शिकला तरी याच धद्यात राहा म्हणणार अहो, अडाण्यामुळच या धंद्याला अवकळा आलेली आहे कुणीही येतो आणि अडाणी, गरीब मच्छीमारांना लुटून नेतो शहाण्या शिकलेल्या माणसाची म्हणून फार गरज आहे नवीन नवीन यंत्रे निघतात, नवीन नवीन शोध लागतात त्याची माहिती घेऊन या धद्यातही क्राती करायला पाहिजे आहे

हसनचे विचार ऐकून मला नवल वाटले! कमरेला एक चड्डी, बाकी उघडाबंब हसन मला फारच प्रगल्भ बुद्धीचा वाटला! तो बोलतही होता कसा छान मी म्हणालो,

"हसन, तू तर मराठी चागल बोलतोस!

" हीच आमची भाषा, साहेब उर्दूच नीट येत नाही आम्हाला ज्या मुलखात राहतो, ज्या लोकात काम करतो, उठतो, बसतो, बाजारहाट चालतो, तिथली भाषा हीच आपली भाषा, साहेब "

थोड्या वेळानं तो म्हणाला, "होडी समुद्रावर नेलीय पहाटेच नाही तर समुद्रावरन फिरवून आणल असतं साहेब तुम्हाला "

"अच्छा! पुन्हा कधी तरी " मी म्हणालो आणि निघालो लांबपर्यंत हसन पोचवायला आला होता

मुक्कामावर परतलो तेव्हा दहा वाजायला आले होते, नाश्ता केला आणि चि रेखाबरोबर काळबादेवीला निघालो रेखा मयेकरांची धाकटी मुलगी ग्रॅज्युएट उत्तम चित्र काढते तासाभरात काळबादेवीला पोचलो हे मयेकराचे गाव इथे त्याचे घर आहे शेत आहे मयेकराची वृद्ध आई इथे असते मुलगा मनोहरही असतो

काळबादेवी हे भडारी लोकांचेच गाव बहुतेक सगळे भडारी मच्छिमार रामेश्वर हा इथला ग्रामदेव आणि कालीदेवी ही ग्रामदेवता समुद्राच्या काठी उंचावर जवळ जवळ अशी दोन मंदिरे आहेत रामेश्वराच्या मंदिरातून लाबवर पसरलेला, दुपारच्या उन्हात चमकत असलेला समुद्र किती सुरेख दिसतो बराच वेळ एका कट्ट्यावर बसून ते देखणे दृश्य पाहिले रामेश्वराचे मंदिर चागले दगडी, भक्कम बांधणीचे आहे मंदिरातला सभामंडप, बाहेरचे आवार प्रशस्त आहे मागेच कालीदेवीचे मदिर, रामेश्वरमंदिराच्या मानाने थोडेसे लहानसे पण काळबादेवीच्या मच्छीमाराच्या मनात कालीदेवीला मोठे स्थान

अडीअडचणी, संकट-आपत्तीला, अडल्या-नडल्याला ते इकडे धाव घेणार आणि देवी त्याना सुखरूप ठेवणार, अशी त्याची श्रध्दा-निष्ठा

मनोहर मयेकरांनी चार-पाच भंडारी मच्छीमाराना मुद्दाम बोलावून घेतले होते त्यात वासावे आडनावाचे म्हातारबुवा होते ऐशीच्या घरात असतील त्यातील पासष्टएक वर्षं समुद्रावरच गेली असतील हे गलबतावर काम करीत असत मंगलोरला कौले भरायची आणि मुंबईला न्यायची शिडाची जहाज मी विचारल,

मुंबईला पोचायला किती दिवस लागायचे? ''

''ते साहेब, वाऱ्यावर असत वारा अनुकूल असला तर सात-आठ दिवसांत सुद्धा पोचता येतं आन् वारा तसा नसला का तर मग ईस काय न पचीस काय, हिशोबच नाहीं म्हातारबुवांनी सांगितले

''गलबत शिडाची असायची, नाही का?''

''हा शिडाचीच तीन शिडाची, पाच शिडाची, सहा शिडाची, अशी असत्यात ''

''त्याला काय नाव असतात का हो?''

''तर! शीड, काठी, कलमी, परवान, लिजाम, बोम अशी नावं असत्यात ''

''बाबा, तुम्ही आयुष्यातली इतकी वर्षं गलबतावर काढली, तर कधी तरी वाऱ्या-वादळाच्या तडाख्यातही घावला असाल, नाही का?''

'अवो, एकदा का दोनदा, कितीदा तरी तुफानात घावलो होतो पण नशीब म्हणून आन् आमच्या कालीदेवीची किरपा म्हनूनच वाचलो '' सांगता सांगताच म्हतारबुवांनी देवीला दोनतीनदा कृतज्ञ भावाने हात जोडले

''वादळात सापडलात तेव्हाची एखादी आठवण सांगा की, बाबा!''

आता काय सांगायचं, सायेब अवो, एकदा अकस्मात डाकिन वारा लागला गलबत सुटून दोन रोज झालं होत बरं का समिंदर शांत व्हता वाऱ्या-वादळाची काईसुदीक हालचाल नव्हती पन अकस्मात तुफान उठलं, आन् ह्ये डोंगराएवढाल्या मौजा उठल्या एकेक मौजा अंगावर आला म्हंजे दैत चालून आल्यागत आमी एकमेकांना धरून धीर देत राह्यचं घमत करायचं म्हंजे गलबतात पाणी खाली साटतं का, ते चामड्याच्या बादलीनं उपसून टाकायच मातर जोमानं काम करायचं मरणाशीच गाठ हो देवाची प्रार्थना करायची इनवणी करायची ''आई-कालीदेवी, ह्या

तुफानातनं वाचव, वाचव किनारा दाखव तुला नारळ दील पूजा करील रामेसरा, धाव देवा ! '' असं नवस बोलायच जीव मुठीत धरून राह्यच

"एकदा का न्हाई सायेब, मबईवरन येत व्हतो तीन गलबत सगती सगती व्हती मंबईचा धक्का सोडला तवा समिंदर शात व्हता, पन पुढ गाठल की हो तुफानान आस आकस्मिकच गाठल, मोट्ट तुफान जोराचा वारा हे मोठमोठाल्या मौजा गलबत पार चेंडूवानी वरखाली व्हायाला लागली आन् पाणी भराया लागल घमत करून करून तरी किती करनार ? तुफानाचा जोर कमती व्हायाचं नावच न्हाई वाढताच परमाण राह्यला आन् अखेरीला तीनपैकी दोन गलबत बुडाली तिसर एक तेवढ वाचलं का वाचलं सायेब, म्हाईत हाय ?

"का वाचल ? ''

"अवो, त्या एका गलबतात एक गाय व्हती मंबयहूनच आणलेली व्हती 'ज्याचे घरी गाय। तिथ इठ्ठलाचं पाय' गोमाता ती ! तिच्या पुण्याईन ते एकटं गलबत वाचल बघा तसंच ती तुकाराम बोट बुडाली व्हती पुष्कळ पासिंजर मेली बघा त्यात एक गानंच त्या टायमाला केलत की —

"तुकाराम बोट बुडाली हरेश्वर बदराला।
त्याची माणसं ग कजेरी बंदराला॥ ''

म्हातारबुवा बोलता बोलता भूतकाळात लांबवर शिरले होते त्याच्या सुरकुतलेल्या, थकलेल्या डोळ्यापुढून तो काळ दृश्ये सरकत असावीत म्हातारबुवा म्हणाले, "म्हणून सायेब ! गलबतावर काय न् होडीवर काय, जागता ठेवावा लागतो कवा काय व्हईल याचा नेम नसतो म्हनत्यातच की, जो जागला तो जगला, निजला तो मेला ! ''

दुसरे गृहस्थ होते, त्याच्या गळ्यात माळ होती मी विचारले,

"पढरीची वारी करता वाटत ? ''

"हो दरसाल जातो ''

तुमच्या गावात कधी जत्रा भरते ? ''

"जत्रा अशी मोठी नाही पन श्रावणात नामसप्ता मात्र जोरदार व्हतो

"कुठ होतो ? ''

"रामेसराच्या देवळात सगळ गाव त्यासाठी झटत आणि त्या टायमाला पावसाळा असतो मच्छिमारी बंदच असते पन आमच्या गावात किनई साहेब, मासळी, मास, दारू कशालाच कुणी शिवत नाही ''

अडीअडचणी, सकट-आपत्तीला, अडल्या-नडल्याला ते इकडे धाव घेणार आणि देवी त्याना सुखरूप ठेवणार, अशी त्याची श्रध्दा-निष्ठा

मनोहर मयेकरानी चार-पाच भडारी मच्छीमाराना मुद्दाम बोलावून घेतले होते त्यात वासावे आडनावाचे म्हातारबुवा होते ऐंशीच्या घरात असतील त्यातील पासष्टएक वर्षं समुद्रावरच गेली असतील हे गलबतावर काम करीत अस्त मंगलोरला कौले भरायची आणि मुंबईला न्यायची शिडाची जहाज मी विचारल,

"मुबईला पोचायला किती दिवस लागायचे ?

"ते साहेब, वाऱ्यावर असत वारा अनुकूल असला तर सात-आठ दिवसात सुद्धा पोचता येत आन् वारा तसा नसला का तर मग ईस काय न पचीस काय, हिशोबच नाही ' म्हातारबुवानी सांगितले

"गलबतं शिडाची असायची, नाही का ?"

"हा शिडाचीच तीन शिडाची, पाच शिडाची, सहा शिडाची, अशी असल्यात '

'त्याला काय नाव असतात का हो ?"

"तर! शीड, काठी, कलमी, परवान, लिजाम, बोम अशी नाव असल्यात "

"बाबा, तुम्ही आयुष्यातली इतकी वर्षं गलबतावर काढली, तर कधी तरी वाऱ्या-वादळाच्या तडाख्यातही घावला असाल, नाही का ?"

"अवो, एकदा का दोनदा, कितीदा तरी तुफानात घावलो होतो पण नशीब म्हणून आन् आमच्या कालीदेवीची किरपा म्हनूनच वाचलो ' सांगता सांगताच म्हातारबुवांनी देवीला दोनतीनदा कृतज्ञ भावाने हात जोडले

वादळात सापडलात तेव्हाची एखादी आठवण सागा की, बाबा!"

"आता काय सागायच, सायेब अवो, एकदा अकस्मात डाकिन वारा लागला गलबत सुटून दोन रोज झाल होत बरं का समिंदर शात व्हता वाऱ्या-वादळाची काईसुदीक हालचाल नव्हती पन अकस्मात तुफान उठलं, आन् ह्ये डोंगराएवढाल्या मौजा उठल्या एकेक मौजा अंगावर आला म्हजे दैत चालून आल्यागत आमी एकमेकाना धरून धीर देत राहायचं घमत करायच म्हजे गलबतात पाणी खाली साटत का, ते चामड्याच्या बादलीनं उपसून टाकायच मातर जोमानं काम करायचं मरणाशीच गाठ हो देवाची प्रार्थना करायची इनवणी करायची "आई-कालीदेवी, ह्या

तुफानातनं बाचव, वाचव किनारा दाखव तुला नारळ देईल पूजा करील रामेसरा, धाव देवा!" असं नवस बोलायचं जीव मुठीत धरून राह्यचं

"एकदा का न्हाई सायेब, मबईवरन येत व्हतो तीन गलबत सगती सगती व्हती मबईचा धक्का सोडला तवा समिंदर शांत व्हता, पन पुढं गाठल की हो तुफानान आस आकस्मिकच गाठल, मोठ्ठ तुफान जोराचा वारा हे मोठमोठाल्या मौजा गलबत पार चेंडूवानी वरखाली व्हायाला लागली आन् पाणी भराया लागल यमत करून करून तरी किती करनार? तुफानाचा जोर कमती व्हायाच नावच न्हाई वाढताच परमाण राह्यला आन् अखेरीला तीनपैकी दोन गलबत बुडाली तिसर एक तेवढ वाचल का वाचलं सायेब, म्हाईत हाय?"

"का वाचल?"

"अवो, त्या एका गलबतात एक गाय व्हती मबयहूनच आणलेली व्हती 'ज्याचे घरी गाय। तिथ इठ्ठलाच पाय' गोमाता ती! तिच्या पुण्याईनं ते एकटं गलबत वाचल बघा तसच ती तुकाराम बोट बुडाली व्हती पुष्कळ पासिजरं मेली बघा त्यात एक गानच त्या टायमाला केलत की--

"तुकाराम बोट बुडाली हरेश्वर बदराला।
त्याची माणस ग कजेरी बंदराला॥"

म्हातारबुवा बोलता बोलता भूतकाळात लाबवर शिरले होते त्याच्या सुरकुतलेल्या, थकलेल्या डोळ्यापुढून तो काळ, दृश्ये सरकत असावीत म्हातारबुवा म्हणाले, "म्हणून सायेब! गलबतावर काय न् होडीवर काय, जागता ठेवावा लागतो कवा काय व्हईल याचा नेम नसतो म्हनत्यातच की, जो जागला तो जगला, निजला तो मेला!"

दुसरे गृहस्थ होते, त्याच्या गळ्यात माळ होती मी विचारले,

"पढरीची वारी करता वाटतं?"

"हो दरसाल जातो"

"तुमच्या गावात कधी जत्रा भरते?

"जत्रा अशी मोठी नाही पन श्रावणात नामसप्ता मात्र जोरदार व्हतो

"कुठ होतो?"

"रामेसराच्या देवळात सगळ गाव त्यासाठी झटत आणि त्या टायमाला पावसाळा असतो मच्छिमारी बंदच असते पन आमच्या गावात किनई साहेब, मासळी, मास, दारू कशालाच कुणी शिवत नाही"

" अजिबात नाही ? "

" अजिबात न्हाई कुनी चोरून तसलं कर्म त्या येळला केल तर लागलीच परचीती येती "

" म्हणजे काय होत ? "

" एकदा एकान खाल्लं का पिल्ल कुनाला ठावं, पन ते करून देवळाकडं आला तर फिट येऊन पडला तगडा गडी पन एकाएकी पडला तर अस होतं "

" त्या वेळेला काय, अखड नामसप्ता चलतो ? "

हां रात्रदिस त्यात खड पडू द्यायचा न्हाई "

अशाच गप्पागोष्टी केल्या नि सायकाळच्या एस् टी ने परतलो

**रत्नागिरी-भाटये १७ मार्च १९८२**

सकाळी श्री साठे ग्रथपाल आले त्याच्याबरोबर त्याच्याकडे चहाला जाऊन आलो नतर १० च्या सुमाराला श्री अनगळ आले त्याच्याबरोबर भगवती बदरावर गेलो बाधकाम चालले आहे, ते पाहिले केवढे अजस्र !

रत्नागिरीला सध्या पॅसेंजर-बोट थाबत नाही बदराचे हे काम पूर्ण झाल्यावर थांबेल

बदराच्या बंधाऱ्याजवळच आज पहाटे एक भला मोठा मासा मच्छीमारानी आणून टाकलेला पाहिला मासा ७-७॥ फूट तरी लाब असावा काळ्या रगाचे हे धूड गोव्याहून येणाऱ्या जहाजाच्या जाळ्यात कुठे तरी म्हणे सापडले जाळ्यातून सुटण्याची या महाशयानी बरीच खटपट केली या खटपटीत त्यांनी जहाजालाही खेचले, असे ऐकले केवढी ताकद ! आणि हे धूड नतर जहाजावर ओढून घेतानाही बिचाऱ्या खलाशांची त्रेधातिरपिट उडाली

संध्याकाळी श्री भाटकर वकील आले त्याच्याबरोबर भाटये गावी आलो परवा राहून गेलेला कार्यक्रम रत्नागिरीनजीक अगदी रत्नागिरीचे उपनगरच म्हणता येईल, असे हे खाडीच्या काठी वसलेले टुमदार हिरवे गाव !

श्री भाटकर वकिलानी दाल्दींच्या वस्तीत नेले हिंडलो, फिरलो, काही मडळींशी बोललो

श्री शकर भाटकराच्या घरी गेलो साठीच्या पुढचे हे गृहस्थ धर्मकर्म,

नित्यनेम, भजन वगैरे करणारे उमेदीचे सगळे आयुष्य गलबतावर गेलेले कोचीन, मगळूरकडून कौलांनी भरलेली गलबते इकडे मुंबईपर्यंत आणायची शंकर भाटकरानींही साताठ तुफान साहिली आहेत 'देवाची कृपा म्हणूनच दर वेळी वाचलो' अस ते म्हणाले

मी विचारल, "भाटकर, दरवेळी तुफान येतं हे अचानकच येत का? यायचं झाल तर त्याच्या काही खाणाखुणा, चिन्हं असतील की? इतक्या वर्षांच्या अनुभवानं याविषयीचे तुमचे काही आडाखेही बसलेले असतील?"

"आहेत की" भाटकर सागू लागले, "वाऱ्याची दिशा बदलते त्यावरून कळतं"

"या वाऱ्यानाही तुमची अशी काही नावं असतील, नाही का?"

"तर! आता उत्तरेकडल्या वाऱ्याला आम्ही 'उतराण म्हणतो, तर दक्षिणेकडल्या वाऱ्याला 'डाकिन म्हणतो हा वारा धोकादायक असतो तुफान करतो याच्यामुळं ज्या मौज्या उठतात, म्हणजे लाटा उसळतात त्या मौज्यांना वजन असतं पूर्वेकडून वारा वाहायला लागला म्हणजे आम्ही त्याला मतलई वारा किंवा 'तड'चा वारा म्हणतो हा वारा दिवाळीच्या सुमाराला वाहतो उत्तर आणि पूर्व यामधून जो वाहतो त्याला 'सात्रस' म्हणतो सात्रस सुटला की तुफान निवळायला लागत दक्षिण आणि पश्चिमेमधून वाहणारा जो वारा त्याला 'कागाड म्हणायच कागाडावरूनही तुफानाची चिन्हं कळतात पूर्व-दक्षिण यातून वाहतो त्याला 'चिलवान म्हणायचं, आणि पश्चिम-उत्तर यामधून जो वारा वाहतो त्याला 'धुर्वी' म्हणायच धुर्वी म्हणजे ध्रुवाकडचा वारा"

"भाटकर, हे वाऱ्याच, दिशांचं किंवा आभाळातल्या ताऱ्यांचं-नक्षत्रांच ज्ञान किंवा माहिती किंवा हे आडाखे तुम्हा मडळींना कसे काय समजत?"

"अहो, याची शाळा म्हणजे आमच गलबत, जहाज, होडी हीच की! अनुभवातून आणि वडीलधाऱ्यांकडून ऐकून, पाहून हे सगळ समजत डाकिन वारा आला की आमची म्हातारी माणस सागणार, 'डाकिन सुटला रं, व्हडी पाण्यात घालू नगा ' तुफानाचे इशारे देणारे बावटे बंदरात लावतात, त्यावरनंही हवामानाचा अदाज येतो खलाशी जहाजाच्या शिडाच्या काठीला वरती पाणी उपसायची चामड्याची पिशवी उलटी टागून ठेवतात म्हणजे

ती तुफानाचा अदाज सांगणारी खूणच !

' आणखी काही समजुती असतात बरचीं कप्पी वाजली की आम्ही लोक तो अपशकुन समजतो तुफान होणार अस समजून हुशारीत राहतो गलबताच्या तळातले उदीर धावायला लागतात वर येतात पळापळ चालते त्याच्यावरून देखील ध्यानात येतं की खालून समुद्राच पाणी गलबतात भरायला लागलंय धोका आहे खलाशी सावध होतात ''

'' गलबतात उदीर असतात ? ''

'' तर ! अहो, गलबत म्हणजे तरतं घरच असतं धान्यधुन्य भरलेलं असत वाहतुकीच्या वेळीही दाणादुणा साडलेला असतो उदराला काय, त्याच खाद्य मिळाल की झालं बर, किनाऱ्याला गलबत असतं तेव्हा मालाची वाहतूक चालते, त्याबरोबरच कधी तरी ते प्राणी गलबतात आलेले असतात ''

'' तुमचा मच्छीमारीचा सीझन-हंगाम केव्हा सुरू होतो, आणि केव्हा सपतो ? ''

'' जून महिन्यात मृग नक्षत्र निघाल की, म्हणजे ७ जूनच्या आसपास पावसाळा सुरू होतो त्या वेळी आमचा सीझन थांबतो गलबत, होड्या ट्रॉलर्स हे सगळ समुद्रावरून आम्ही काढून घेतो आणि वर किनाऱ्याला छपराच्या आडोशाला आणून ठेवतो मग श्रावणात नारळी-पौर्णिमेला समुद्राला नारळ दिला की समुद्र थोडा शात होतो आमचा सीझन सुरू होतो ''

'' म्हणजे २-२॥ महिनेच सीझन नसतो ''

'' ह ! त्या काळात दुसरी काम असतात

ती कसली ? ''

'' गलबताची, लहान-मोठ्या होड्याची, ट्रॉलर्सची दुरुस्तीची काम असतात मासळी धरायची जाळी कुठं कुठं तुटलेली असतात, ती विणून घ्यायची असतात नवीन जाळीसुद्धा कुणाकुणाला बनवायची असतात दोर तयार करायचे असतात आता हे दोर आयते नायलॉनचे मिळतात तसच जाळी विणायचा धागाही नायलॉनचा मिळतो, पण पूर्वी तागाचा धागा बनवावा लागायचा काथ्याचे दोर करावे लागायचे तेलपाणी, रगरंगोटी-सगळी काम याच वेळी उरकावी लागायची कारण पुढ एकदा सीझन सुरू झाला की मरायला देखील फुरसद नाही, अशी स्थिती होते याशिवाय घर-प्रपचाचं बघायचं तेही याच वेळी, पुढ वेळ नाही त्यामुळ

हे दोन महिने काम उरकण्याच्या दृष्टीनं कमीच पडतात "

भाटकर वकिलांबरोबर समुद्रावर गेलो प्रशस्त, लांब-रुंद रेती किनारा जवळ जवळ निर्मनुष्य, त्यामुळ विलक्षण शांत समोरचा अफाट समुद्र तोही या वेळी शांतच फक्त तो आणि आपण एवढा विशाल सागर जणू आपलाच! -एक वेगळेच आत्मौपम्य!

मुंबईची चौपाटी आठवली खरं तर अशा वेळी आठवू नये पण आठवली समुद्र तिथ माणसाच्या गर्दीत गुदमरल्यागत वाटतो मात्र आपल्याला हवा तितका आपल्या वाट्याला तो कुठून येणार! पण आज इथ तशी परिस्थिती नाही सगळाच्या सगळा लुटायचा ठरवल तरी आख्खा समुद्र लुटून घ्यायला तयार होता! पायावर लाटा घेत घेत या टोकापासून त्या टोकापर्यंत दक्षिणोत्तर फिरलो समुद्रात डुबकी घेणारा सूर्य पाहिला नि परतलो

भाटकर वकिलाचे घर गर्द माडाच्या दाटीत एका घराला दुसरे घर सहसा दिसत नाही लपडावाच्या खेळाप्रमाणे माडाच्या, आंब्याच्या, चिकूच्या गर्द झाडांमाग घर लपूनच बसलेली असतात गेल्या गेल्या भाटकरानी थंड, मधुर शहाळी प्यायला दिली अंगणात बसून प्यालो, आणि अंगणही किती सुरेख! कोकणातली ठोकूनठाकून केलेली आणि शेणानं सारवलेली ही अंगणं मला फार फार आवडतात तर तसच आवडावं असं हे अंगण आरामखुर्चीत अंग झोकून पडून राहिलो

**पूर्णगड-रत्नागिरी १८ मार्च १९८२**

सकाळी एस् टी ने पूर्णगडकडे निघालो वाटेत गाव लागले-गोळप पटकन लक्षात आल, हे तर अण्णाच-एसेम् जोशींचं गाव अण्णानी लिहिलेल्या बालपणीच्या आठवणीही त्यापाठोपाठ आठवल्या पुढे लागल स्वामी स्वरूपानदांचं पावस एकदा येऊन गेलो आहे आणि नंतर पूर्णगड

'एस् टी तून उतरलो आणि किनाऱ्यावरनं ओली रेती तुडवत निघालो ओहोटी होती एकदोघाजवळ भाटकरानी चौकशी केली आणि फारशी शोधाशोध न करताच श्री फडनाईक याच्या घरी पोहोचलो ते घरी होतेच वाटच पाहात होते म्हणजे काल धाडलेला सागावा त्याना अचूक मिळालेला होता

श्री फडनाईक, सांगितल म्हणूनच मुस्लिम आहेत, हे कळले नाहीतर

वेषभूषा, मराठी भाषा थेट हिंदूंचीच फडनाईक एकटेच असे भेटले किंवा दिसले असे नाही, तर अनेक दाल्दी या बाबतीत खारव्यासारखेच दिसतात, बोलतात, वागतात राजिवड्यातला हसन म्हणाला तेच खरे!

लहानपणी पंढरपूरकडे पाहिलेले हिंदू-मुस्लिम शेतकरी आठवले धोतर, पैरण, मुडासे असाच वेष तशीच मऱ्हाटी भाषा आणखी वर म्हणजे खेड्यापाड्यांतले शेख, सय्यद, महमद किंवा इब्राहिम हे पंढरीची वारी करून एकादशी करणार, तर ताबूत बसवायचा मान कुठे कुठे तात्याबा पाटलाच्या घराण्याकडे असणार! -त्या शहाण्या माणसानी देऊळ-मशीद सोयीसाठी वेगवेगळी असली तरी काळ्या आईच्या कुशीतली ज्वारी-बाजरी एकच असते आणि तिच्यावरच आपण जगतो, हे जसे जाणलेले होते, तसेच इकडच्या खारव्या-भंडाऱ्यांनी काय, किंवा दाल्द्यांनी काय, समुद्राच्या पोटातली, आपल्याला जगवणारी मासळी एकच आहे, तिला वेगवेगळा धर्म नाही हे ओळखलेले आहे

श्री फडनाईक रत्नागिरीत शिक्षक होते मागे कधी तरी शिर्के हायस्कूलमध्ये माझी गोष्ट ऐकल्याचे सांगत होते शिक्षकाची नोकरी सोडून ते या मच्छीमारीच्या वडिलार्जित धंद्यात परत आले

गुजरातकडे वेसाव्याला गलबतावर गेले असता तेथे एकदा वादळात सापडले होते भयाण वादळ! भयाण काळोख! आणि दिशाहीन भरकटलेलं गलबत! पर्वतप्राय लाटांचे तडाखे खात, मृत्यूच्या जबड्यात ती रात्र कशी काढली याची चित्तथरारक हकीकत त्यांनी सांगितली चहा-खारीचा समाचार घेऊन बाहेर पडलो गावातल्या दाल्दींच्या वस्तीत आलो इथे बहुतेक दाल्दीच आहे अब्दुल्लाच्या घरी गेलो अब्दुल्ला जाळे आवरीत होता अब्दुल्लाचे घर झक्क बांधणीचे कडेपाटाचे मोठे कारण अब्दुल्लाचे वडील मुंबईला पोर्टट्रस्टमध्ये कामाला होते पैसा बरा मिळाला बरे घर बांधले वृद्ध वडील खुर्चीवर दुसऱ्या एका वृद्ध दोस्ताशी हवापाण्याच्या गोष्टी करीत बसले होते

मी विचारले, अब्दुला, आपण दाल्दीच?

"हा साब समुद्रात दालन करायला तीस मैलाच्या पुढे जे जातात ते दाल्दी"

'मच्छीमारीच्या धंद्यातला तुमचा अनुभव काय आहे?"

"धंदा चांगला आहे, साहेब स्वतंत्र आहे, कुणाची ताबेदारी नाही

प्रामाणिकपणे भरपूर कष्ट केले तर कमी कधीच पडणार नाही निसर्गाची देणगी आहे ही कधीच संपणार नाही पण आजकाल महागाई चढाओढ, मार्केटमधले दलाल यामुळे धंद्याला शाश्वती राहिलेली नाही शासनाचेही इकडे पाहिजे तसे लक्ष नाही सोयीसवलती नाहीत फार त्रास आहे ''

"काय करायला पाहिजे असं वाटतं तुम्हाला?"

स्वस्त आणि वेळेवर डिझेल मिळण्याची सोय व्हायला पाहिजे इंजिन घ्यायला, नवीन ट्रॉलर बांधायला भरपूर आणि कमी दराच्या व्याजाचं कर्ज मिळण्याची सोय पाहिजे तसंच ही जाळीदेखील कमी, परवडेल अशा भावानं नायलॉनचा धागा मिळाला पाहिजे तसंच समुद्रात जे ब्लाईंड फिशिंग चालतं त्याला बंदी घातली पाहिजे, तसं करणाराला शिक्षा झाली पाहिजे शेतीला जसा पाऊस पडला नाही, पीक बुडालं तर दुष्काळ जाहीर होतो आणि फॅमिन कोडाप्रमाणं शेतकऱ्याला सूट-सवलती दिल्या जातात, तशीच सागरावरल्या या शेतीच्या बाबतीतही काही तरी तरतूद केली पाहिजे कारण एखादा सीझन कधी तरी साहेब असा येतो की, दिवसभर समुद्रावर जाळं टाकून खपूनसुद्धा कालवणापुरतीदेखील मासळी मिळत नाही दुष्काळच की हा! पण अशा वेळी मच्छीमारांना जगण्यासाठी कसलीच सोय-सवलत नाही अलीकडं यांत्रिक प्रगती पुष्कळच झाली आहे वर जपानमध्ये ट्रॉलर्सना, होड्यांना मार्गदर्शन करणारी जशी 'मदरलाँच किंवा शिप' असते, तशा काही सुसज्ज शिप्स आपल्या शासनानं ठेवल्या पाहिजेत त्यामुळं समुद्रातले प्रवाह-वॉटर करंटस्, वाऱ्यांची दिशा, हवामानाचा अंदाज, मासळीची उपलब्धता कुठे कशी आहे हे सर्व मच्छीमारांना कळू शकेल तुफानासारखी संकटं टाळता येतील व्यर्थ परिश्रम वाचतील अपघात टळतील आणि मच्छीमारांना पुष्कळच सोयीचं होईल ''

अब्दुल्ला शिकला सवरलेला आणि या धंद्याविषयी एकूणच बारकाईनं विचार केलेला दिसला

"तुमचा मुलगा काय करतो?"

"अजून तो शिकतोय साहेब"

शिकवून त्याला तुमच्याच या धंद्यात घेणार की नाही? की दुसऱ्या व्यवसाय-धंद्यात घालायचा विचार आहे?"

नाही साहेब, तसा विचार नाही

"का बरं? आता एवढा वेळ तुम्ही तुमच्या या धंद्याची एवढी हलाखी

सांगितलीत, तर मग त्यानं इथंच असं निरर्थक कष्ट उपसत राहावं असंच वाटतं तुम्हाला ? ''

अब्दुल्लानं सांगितलं, '' साहेब, पोटाकरता कष्ट हे केलेच पाहिजेत मग ते नोकरीत असतो की दुसऱ्या व्यवसायात असतो मग इथलं स्वातंत्र्य गमावण्यात काय हशील आहे ? ''

नको नको म्हटलं तरी पुन्हा अब्दुल्लाकडं चहा प्यावाच लागला चहा प्यालो आणि निघालो दूरवर किनारा दिसत होता फडनाईकांना विचारलं, '' तो दिसतोय तोच ना पूर्णगड ? '

' होय, तोच शिवाजीमहाराजांनी स्वराज्याच्या बंदोबस्ताच्या दृष्टीने जे किल्ले बांधले, ते सर्व बांधून झाल्यावर, शेवटी हा किल्ला बांधला म्हणून याचं नाव पूर्णगड, अशी आख्यायिका आहे किल्ला लहानच आहे ''

एस् टी ने भाटच्ये आणि तेथून तरीने खाडी पार करून रत्नागिरीस परतलो

रात्री समुद्रकाठच्या गेस्ट हाऊसवर मुक्कामाला आलो अंधारात समुद्र गुडुप झाला होता, पण गाज सोबतीला होतीच

**रत्नागिरी १९ मार्च १९८२**

सकाळी उठलो तर समोर समुद्र, माझ्या आधीच उठलेला !

नऊ वाजता श्री रामभाऊ आखाडे आले आखाडे हे एक मोठे उत्साही व तडफदार कार्यकर्ते आहेत मच्छीमारांच्या संघटनेसाठी त्यांनी पुष्कळच परिश्रम केलेले आहेत खरं तर ते खारवी भंडारी असे मच्छीमार जमातींपैकी कुणीच नव्हते पण बालपणापासून ते वाढले मच्छिमारांच्या खारवी मुलांबरोबर पोहणे, काजूच्या बियांचे खेळ खेळणे, होड्या चालविणे त्यामुळे संस्कार घडले ते सवंगड्यांचे त्यांच जीवनाविषयी जिव्हाळा जडला रामभाऊ म्हणाले, '' मी इतका त्यांच्यातलाच होऊन गेलो होतो, की माझ्या आजोबांकडे येणारे त्यांचे मित्र विचारायचे, ' तुमचा खारवी नातू कुठाय ? ' पुढं शिक्षण, नोकरीनिमित्त मुंबई, हे येणं-जाणं घडलं, व्यवसाय बदलले तरी त्यांचा लोभ, जिव्हाळा काही सुटला नाही कमी झाला नाही मुंबईत गेलो, तर मुंबईत असलेले खारवी, भंडारी मित्र जमा झाले तिकडं वरसोव्याशी संबंध आला ते मच्छीमारांचे मोठं केन्द्र या माझ्या बालपणापासूनच्या त्यांच्या सहवासामुळं माझ्या मनावर त्यांच्या अपार

श्रमाचा आणि घोर दारिद्र्याचा खोल असा परिणाम झालेला होता वरसोव्याकड नाखवाच्या मचव्यांवर, गलबतावर जे कोळी-खलाशी कामगार होते, त्याची दैना तर विचारू नका! नऊ महिने सीझन, त्याचे १५० रुपये जेवून मिळणार वर्षाकाठी दोन रुमाल, कमरेला लावायला, आणि दोन गर्जीफ्रॉक, बस्स सुट्टी वगैरे काही नाही काम किती तास, किती वेळ, दिवसा-रात्री कधीही, याला काही हिशोबच नाही भयकर प्रकारचे ते शोषण पाहून मी आणखीनच अस्वस्थ झालो हे आर्थिक शोषण आणि भयकर दहशत टेरर मारहाण गरीब खलाशी हे वर्षोन् वर्षे सोशीत आले होते त्याच्या दु खाला वाचा फोडण्याचे काम झालेच नव्हते कुणी तशी थोडी जरी हालचाल केली तरी जबरदस्त मार पडत होता

"मुबईत मी आलोय म्हटल्यावर एका बरोबर दोघे, चौघे, मग तिकडले ठाण्याकडले अशी मडळी जमायला लागली मी त्याच्याकडं जायला लागलो गवताच्या छपराची लहान लहान खुराड्यासारखी घर वस्तीत चुकून एखाद कौलारू छप्पर दिसायचं कौलारू छप्परवाला त्यातल्यात्यात सुखी म्हणायचा

"कष्टाला तर सीमा नाही काथ्याचे दोर ओढून ओढून हात-राकट झालेले घट्टे पडलेले अवजड ओझी आडवे बाबू वाहून वाहून खांदे गेलेले मन मेलेली कसलंच सरक्षण नाही साधे हक्क नाहीत अहो, १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीलादेखील सुट्टी नाही म्हणजे सगळा देश स्वातन्त्र्यदिन साजरा करीत असताना हे गुलामी जिण्यातच खितपत पडलेले मुबईला भारताच्या स्वातन्त्र्यलढ्यात केवढे स्थान आणि तिथले कोळी राष्ट्रीय वृत्तीचे पण खलाशी मात्र स्वातंत्र्यातही गुलाम!

' हे सगळं पाहून, ऐकून, अनुभवून ठरवल की यांची संघटना करावी सघटनेचाच हा काळ आहे हक्क मिळवायचे तर संघटना हवी त्याशिवाय कोण विचारतो एकट्यादुकट्याला? देशात शेतकऱ्यांची चळवळ होती, हरिजनांची होती, कामगाराची होती नव्हती मच्छीमाराची ती करणही अवघड होत तरी १९५२ साली मच्छीमार कामगार संघाची स्थापना केली संघाच्या वतीने शासनाकडे मागण्या माडल्या तर मच्छीमार हे कामगार नव्हेत म्हणूनच धुडकावले! कामगार नाहीत म्हणून कामगाराना कायद्याप्रमाणे मिळणाऱ्या सवलती नाहीत हक्क नाहीत कारण कामगार कोण, याचीही कायद्यानं काही व्याख्या केलेली आहे ती करताना गलबत, मचवे, जहाज,

होड्या इत्यादींवर राबणाऱ्या कामगाराचा विचारच केलेला नाही झगडा सुरू झाला दरम्यान स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन व शिवरात्र या सुट्ट्या मिळाल्याच पाहिजेत, दिल्या नाहीत तर त्या दिवशी खाडा झाला तरी हरकत नाही, पण काम बद ठेवणार, अशी घोषणा दिली त्याचा परिणाम असा झाला की, एकदा हॉटेलात चहा पीत बसलो असताना मालकाच्या गुंडानी मला घेराव टाकला मी कामगाराना भडकवतो म्हणून मला मारायचा प्रयत्न झाला सुरे, लाठ्या, दाडकी घेऊन आले होते पण ह्याची कुणकुण लागताच बरेचसे कामगार धावत पळत आले आणि तो प्रसग टळला

हा कामगार म्हणजे मेलेल्या मनाचा, आत्मविश्वास हरवलेला, दैन्यात पिचलेला, दहशतीन दुबळा झालेला माणूस होता चुकून काही याच्या हातात पडल तर घरी नेईपर्यंत घारी, गिधाड ते पळवून नेतील अशी त्याची अवस्था होती मी त्याना म्हणायचो, गड्यानो, तुम्ही मला श्रद्धा द्या, मी तुम्हाला हिंमत देतो असे अनेक लढे दिले, संघर्ष झाले

श्री आखाड्यांनी त्याची दीर्घ कहाणीच सांगितली त्यांच्याजवळ सागण्यासारखे पुष्कळ आहे, आणि ते सागण्याची आकर्षक निवेदनशैलीही आहे म्हणून पुनश्च बसण्याचे, बोलण्याचे ठरवून आम्ही उठलो

दुपारी श्री पागीर नावाचे गृहस्थ आले त्याच्याबरोबर भगवती बंदरावर गेलो एका गलबतातून कौले उतरून घेण्याचे काम चालले होते बायकाच ते काम करीत होत्या ७-८ रुपये रोजी त्याना मिळत पण कष्टाचे काम होते

बंदरावरच श्री वसतराव व त्याचे बधू पप्पू सुर्वे भेटले लॉंचमधून समुद्रात उभ्या असलेल्या एका जपानी बोटीवर गेलो किती सुसज्ज बोट होती। सुर्वे बधूचा मासळी निर्यात करण्याचा मोठा व्यवसाय आहे त्याच संदर्भात जपानी बोटीवर ते आलेले होते

पागीर यानी नतर एका ट्रॉलरवर नेले समुद्रावर लाबवर भटकून आलो खूप छान वाटलं समुद्री चहुकडे पाणी !

**रत्नागिरी : २० मार्च १९८२**

भल्या सकाळी उठलो आणि पाढऱ्या समुद्रावर लांबपर्यंत एकटाच फिरून आलो या भागातली किनाऱ्यावरची रेती श्वेतवर्णी आहे, म्हणून

रत्नागिरीकर याला इथ 'पांढरा समुद्र म्हणतात मला वाटल White Man ला आपण गोरा माणस म्हणतो, तर या समुद्राला गोरा सागर का म्हणू नये!

आज एका ट्रॉलरवरून समुद्री सफर योजलेली होती, पण ट्रॉलरच्या नादुरुस्तीमुळे ती तहकूब झाली श्री आरवाडे दहाच्या सुमाराला आले खर तर आज बराच वेळ देण्याचे ठरले होते, पण आरवाड्याना कुठल्याशा मोर्चाबरोबर जायचे होते म्हणून दीडएक तासच बसलो आखाड्यानी सांगितले, "गुलामगिरीच्या अर्थशास्त्रातून खलाशाना बाहेर काढून नव्या वाटा चालायला लावणं भाग होत यात प्रामुख्यान मानवी हक्काची आणि सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना करण्याचीच भावना होती पण खलाशी हे असंरक्षित कामगार म्हणून प्रस्थापित कायदेही त्याच्या बाजूने न्याय द्यायलाच नव्हे, तर त्याचे साधे गाऱ्हाणे ऐकून घ्यायला तयार नव्हते समर्थ नव्हते त्या वेळच्या काही मंत्रीमहाशयांनाही भेटलो आणि विचारले, की कुठल्या स्वातंत्र्यात आमच्या खलाशाना स्वातंत्र्य मिळणार आहे? न्याय मिळणार आहे? हक्क मिळणार आहे? '

"असे दरवाजे ठोठावीत होतो एकदा 'पेमेन्ट ऑफ लेबर ॲक्ट खाली बांद्रा इथल्या कोर्टात काही केसेस दाखल केल्या तिथल्या जज्जानी त्या लेबर कोर्टाकडे वर्ग केल्या चला, लेबर कोर्टापर्यंत तरी पोचलो मालक-नाखवा यांच्या वकिलांनी खलाशी हे कामगार नाहीतच असा युक्तिवाद आरंभला

मी कामगारांच्या बाजूने उभा राहिलो कामगाराचा वकील कामगारच तिथल्या नाखवाला म्हणालो,

"आपण नाखवा?"

"हे खपणार?"

तर म्हणाले, "हो"

"खपणार म्हणजे कामगार ना?"

हो"

खपणार-खलाशी-कामगार ठरले!

आमची पुढ घोषणाच होती- "खपेल तो खाईल!"

१९५८ सालची घटना कामगाराचीच आम्ही बोट तयार केली-खपणारांची बोट!

ही बोट पाहायला किनाऱ्यावर झुंडीच्या झुंडी उसळल्या मेलेल्या मनाचा खपणार आता जागा होत होता ही घटना धनी-मालकांना कशी आवडणार? त्याचा विरोध सुरू झाला ट्रॉलरलाही मतलबीपणातून विरोध झाला मासे पळून जातात, जाळ्याजवळ येत नाहीत, वगैरे पण ते सर्व खोटे होते

' १९६३ साली दुष्काळ पडला होता देवगड भागामध्ये मासळी मिळतच नव्हती शासकीय दरवाजे त्याही वेळी ठोठावले सरकारी अधिकारी आले त्यांनी पाहिले लोकांची दैना दिसत होती, पण दुष्काळ आहे याला पुरावा काय? मासळीचा दुष्काळ समुद्रातला! मी म्हणालो, मासळी खारवण्यासाठी मीठ लागते नेहमी किती पोती मीठ खपते आणि आता किती खपते हे पाहा त्याप्रमाणे पाहिल्यावर फारच कमी पोती मीठ खपते आहे हे लक्षात आले मीठ फारच कमी खपते याचा अर्थच असा की, मासळीही फारच कमी मिळते आहे मासळीचा दुष्काळ आहे असे किती तरी प्रश्न समस्या विकासाची लढाई गरीब, दलित लढतो त्यामुळे योजना येतात पण त्यातली मलई पुन्हा समर्थवर्गच मटकावून बसतो गरिबाचे एक पाऊल पुढे पडते त्या वेळी सबलाची दहा पावले पुढे पडलेली असतात म्हणजे विकास-योजना वगैरे होऊनही दोघातल अतर अस वाढतच जात '

मोर्चाची वेळ होत आली म्हणून श्री रामभाऊ उठले

श्री ताडेलांनी धरून तांदळाची आंबिल आणून दिली म्हणाले, "ही आबिल आम्हाला रोज पाहिजेच त्याशिवाय चालणार नाही डोक्याला थड असते तुम्ही घेऊन बघा साहेब!"

मी ती मुद्दाम घेतली चविष्ट लागली मागे एकदा वारणानगरला गेलो होतो त्या वेळी श्री तात्यासाहेब कोरे यानीदेखील आग्रह करून अशीच आबिल प्यायला दिली होती पण ती होती जोंधळ्याची नि ही होती तादळाची प्रदेश बदलला की धान्य बदलते, मग त्याचे पदार्थ-प्रकारही बदलतात

सायकाळी येईन म्हणाले होते, पण आखाडे काही आले नाहीत जमले नसावे श्री ताडेलांच्या बरोबर किनाऱ्यावर गेलो छोट्या छोट्या मचव्यांनी, होड्यांनी ट्रॉलरवरली मासळी-आजचा कॅच-किनाऱ्याकडे आणली जात होती परवा पाहिली तशीच गडबड, धादल, गोंगाट एकप्रकारची गती-वेग जाणवत होता मासळीचे सॉर्टिंग, मीठ घालणे, बर्फ

घालणे, पेट्या भरणे सर्व काहीं स्त्रियाच करीत होत्या स्त्रीसाम्राज्यच! तांडेलांना विचारले, "या पेट्या कशासाठी?" तर ते म्हणाले, इथं दाल्दी बायाची एक सोसायटी आहे १४५ बाया सभासद आहेत आठवड्यातून सोमवार, मंगळवार व बुधवार अशा तीन दिवसात ३०-३५ मैलांच्या अंतरातील १५ गावचे बाजार त्या करतात त्यासाठी त्यांनी आता एस् टी सारखी एक व्हॅनही घेतली आहे बर्फ घालून मासळी या पेट्यांतून ठेवली म्हणजे टिकते ताजी राहते तिकडे सांगली, कोल्हापूर, पुणे इत्यादी ठिकाणीही अशा पेट्यातून मासळी जाते" सांगता सांगता तांडेल थांबले त्यांचा आवाज किंचित जड झाला चष्म्याआडच्या डोळ्यातही दव चमकले म्हणाले, साहेब, माझी आई देखील अशीच बाजाराला जायची त्या वेळी सोसायटीकड व्हॅन नव्हती भाड्याची गाडी करून जायची दोन वर्षांपूर्वी येताना गाडीला ॲक्सिडेंट झाला आणि माझी आई त्यात सापडली गेली "

"अरेरे!"

"फार कर्तबगार होती साहेब ती माझ्यावर फार माया रात्री घरी जायला मला उशीर झाला तर टेंभा घेऊन बघायला इथ किनाऱ्यावर यायची " तांडेलांनी चष्मा काढून डोळे पुसले मीही गलबलून गेलो

रात्री तांडेलांच्या घरीच जेवायला गेलो दाट वस्तीतून गल्ल्याबोळ पार करीत एका दोन खोल्याच्या घरात पोचलो सगळी घरं बहुधा अशीच दिसत होती एकेका घरात ८-१० माणस राहात होती

तांडेलाच्या मुलींनी रुचकर मासळी बनवली होती किती तरी प्रकारची! थाळीत भाताचा केवढा तरी डोंगर! मी हबकूनच गेलो मोठ्या मिनतवारीने सगळे कमी करायला लावले तांडेल नाराज झाले

"साहेब, तुम्ही काहीच खात नाही" म्हणून कुरकुरायला लागले भक्कम जेवलो तांडेल आणि त्यांचा मुलगा-बापलेक एकाच थाळीत जेवत होते

जेवण झाल्यावर फिरत फिरत गेस्टहाऊसवर आलो समुद्रकिनारा काळोखात बुडालेला होता पण रस्त्याच्या कडेला टेंभे लावून मासळीच्या पेट्या भरण्याचे, खारवण्याचे काम दाल्दीणी करतच होत्या

**रत्नागिरी-देवगड २१ मार्च १९८२**

सकाळी श्री गद्रे यांच्या फॅक्टरीत गेलो या ठिकाणी मासळी विशिष्ट

हवाबंद डब्यात पॅक करून ती परदेशी पाठवण्यासाठी मोठाल्या बॉक्समध्ये भरून ठेवली जाते

दुपारी दोनच्या सुमारास श्री सुरेन्द नार्वेकर हे टॅक्सी घेऊन आले त्याची स्वत ची गाडी बिघडली, म्हणून विलब झाल्याचे सागितले टॅक्सीने देवगडला निघालो सायकाळी सहाला पोचलो देवगडला प्रथम मी १९४७ साली पू साने गुरुजींच्या मदिरप्रवेश-प्रचारदौऱ्याच्या वेळी आलो होतो, असे आठवते

देवगडला अलंकार लॉजवर मुक्काम

सायकाळी खाडीवर गेलो ट्रॉलर्स आले होते आणि मासळींची उस्तवार चाल्लेली होती एके ठिकाणी सातआठ शाळकरी मुली कोळबी मासळीचा शिरच्छेद करताना दिसल्या नार्वेकरानी सागितले, "या मासळीला परदेशात खूपच मागणी आहे ही अशी हेडलेस करून बर्फात पॅक करून पाठवली म्हणजे टिकते या मासळीचा लवकर नासणारा भाग म्हणजे तिचे डोके तेच काढण्याचे काम चालले आहे या मुलींना एक किलोभर मासळी हेडलेस करण्याबद्दल २५ पैसे साधारणत मिळतात"

श्री नार्वेकर हे तिशीतले तरुण आहेत फिशरीज आणि कमिशन एजण्ट, असा त्यांचा व्यवसाय आहे स्वत कर्तृत्वाने या तरुण मित्राने चागला पैसा कमावला आहे आणि व्यवसायाचा व्याप वाढविला आहे स्वभावही उमदा, साहसी, साहाय्यकारी आहे

## देवगड-विजयदुर्ग · २२ मार्च १९८२

देवगड ते विजयदुर्ग आणि विजयदुर्ग ते देवगड अशी छोटीशी समुद्रयात्रा आज घडली सकाळी नार्वेकराचा माणूस उशिरा आला त्यानतर ट्रॉलरची देखभाल, तेलपाणी वगैरे झाले. अकराच्या सुमाराला विजयदुर्गकडे निघालो खाडीतून मोकळ्या समुद्रा (Open Sea) मध्ये आल्यावर जाळे टाकण्यात आले ते कसे टाकतात वगैरे समजावून घेतले बघितले सुमारे एक तासाने जाळे वर ओढण्यात आले ते ओढणेही पाहिले बऱ्यापैकी मासळी-कॅच- मिळालेला होता जाळ्यात कित्येक माशाची तडफड फडफड चाललेली होती निरनिराळ्या प्रकारचे मासे होते त्याच्याबरोबर आणखीही काही समुद्री जीव आलेले होते ट्रॉलरवरच्या खलाशानी टोपल्यातून मासळी भरली जेवण्याने (जेवण करणारा तो जेवण्या) चुलाणावर कोळंबीची

हळद-मीठ लावून उकड घेतली आणि बरोबर आणलेल्या पावाबरोबर ती ताजी ताजी मासळी उदरस्थ केली. ही एक वेगळीच चव होती. वेगळाच खाद्यानुभव होता!

मी पडलो घाटी. मला शेतात तोडून आणलेल्या कणसाचा आगीच्या आरात भाजून काढलेल्या गरमागरम हुरड्याची आठवण झाली. सागरी हुरडाच की हा! मला आवडला. ट्रॉलरचा तांडेल म्हणाला, " असा उकडलेला मासा आणि भाताची खिमटी पेज हाच आमचा ट्रॉलरवरचा नाश्ता असतो. जेवायलाही भात-मासेच."

" ट्रॉलरवर तुम्ही किती लोक साधारपणे असता? " मी विचारले.

तांडेल म्हणाला, " आठनऊ लोक असतो आम्ही. त्यात एक तांडेल म्हणजे इथं मी हा प्रमुख. त्याच्या हातात सुकाणू. तांडेलाला मदत करणारे त्याच्या हाताखालचे दोघेजण. चार-पाच खलाशी आणि एक जेवणी."

" पगार वगैरे कसे असतात? "

" पगारी मजूर असे फारसे नसतात. असलेच तर त्याना सीझनचे आता चारपाचशे रुपये मिळतात. जेवण, नाश्ता, चहा दिला जातो. तेलपाणी, हजामत यालाही किरकोळ पैसे दिले जातात. पण पगारी मजूर नसले म्हणजे तीनचार घरचीच माणस असतात. मिळालेल्या मासळीचे, धंद्याला आवश्यक त्या खर्चासाठी म्हणजे डिझेल, दुरुस्ती वगैरेसाठी एक वाटा बाजूला ठेवतात आणि उरलेल्याचे सारखे वाटे घालतात. तीच ज्याची त्याची मिळकत. एकेका घरची दोन-तीन माणस असतात, म्हणजे त्याना दोन-तीन वाट्याची मासळी भेटते." विजयदुर्गला ट्रॉलरमधून एका अगदी लहानशा डुचमळत्या होडीत बसलो आणि धक्क्यावर आलो. विजयदुर्गच्या ओसाड, उद्ध्वस्त किल्ल्यातून चक्कर मारली. किल्ल्यातले उचावरले सागरोन्मुख रेस्टहाऊस मात्र खूपच आवडले. किती शांत, निवान्त! आणि दूरवर क्षितिज विरघळून पसरलेला समुद्र!

विजयदुर्गच्या किनाऱ्याला चारच्या सुमारालाच ट्रॉलर्स, होड्या मच्छीमारीहून परतल्या होत्या. केवढाले, दीड-दोन फुटी मासे किनाऱ्यावर आणून टाकलेले होते.

आजचा सूर्यास्त ट्रॉलरवरूनच पाहिला. सहा-सात तास खलाशी तांडेल याच्याबरोबर समुद्रावर काढले. त्यांच्या कामाची पद्धत पाहिली. समजावून घेतली. समुद्राची विविध दर्शन घडली.

रत्नागिरी-भाटचे-मिऱ्या ४ एप्रिल १९८२

बारा-तेरा दिवसांनी परत रत्नागिरीत आज सकाळी उतरलो श्री पी के मयेकरांच्या घरीच मुक्काम मयेकरांना आता त्याच्या घरात म्हणतात तसे मी 'आबा' म्हणायला लागलो आहे पाहुणेपण सपून घरगुती जवळपण निर्माण झाले आहे तसेच देसाईसाहेबांचेही केव्हाच बाळासाहेब झाले आहेत

बाळासाहेबानी आज दुसऱ्या एका एक्साइजकडल्या नार्वेकर नामक माणसाच्या ताब्यात दिले हे नार्वेकर भाटचे-मिऱ्यावर राहतात समुद्रकाठी नारळींच्या गर्दीत याचे छोटेसे घर घरात, पुढच्या बसायच्या खोलीत दारासमोरच मोठा ऐसपैस असा उंच ओटा स्टेज असावे तसा निम्मी खोली त्यानेच व्यापलेली तिन्ही बाजूच्या भिंतींवर तैल-रंगातली निसर्गदृश्ये मी विचारले "नार्वेकर, हा ओटा एवढा कशासाठी ?"

"गणपतीसाठी" नार्वेकरानी सांगितले, ' गणपती इथे बसवतो दहा-अकरा दिवस रोषणाई, आरास थाट करतो, सात-आठशे रुपये खर्चून टाकतो मागेपुढे पाहात नाही सगळ्या वाडीतले लोक बघायला लोटतात आरती, प्रसाद साहेब, मला हा नाद आहे"

"दुसऱ्या नादापेक्षा हा नाद वाईट नाही चांगला आहे

नार्वेकर हसले आणि दरवर्षी काढलेले गणपतीचे फोटो दाखवू लागले चिरंजिवानी शहाळी फोडून दिलीच होती कोवळे खोबरे आणि साखर आणून ठेवली होती .

वस्तीतून एक चक्कर मारली देवळात जाऊन आलो भोजनोत्तर एका मोठ्या नावेतून समुद्रावर फेरफटका मारून आलो ही नाव चौघेजण वल्हवीत होते वामाघूम झाले होते

सध्याकाळी राजिवडा वस्तीमधील दाल्दींच्या मुलांना ट्रालरवर समुद्रात फिरताना गोष्टी आणि गाणी सांगितली शभरावर मुले-मुली होत्या अशी गोष्ट ऐकण्याचा त्याचा व ज्याना दहा-पंधरा मिनिटे देखील एके जागी बसणे ठाऊक नाही अशाना गोष्टी सांगण्याचा माझा पहिलाच प्रसंग असावा ! मनातून मला थोडी धाकधुक वाटत होती पण गोष्ट सुरू होताच, मुले प्रतिसाद देऊ लागली आणि गोष्ट रंगत गेली गाणी तर मुलाना भलतीच आवडली

दापोली-हर्णै ५ एप्रिल १९८२

दुपारी हर्णैला गेलो बरोबर श्री आबा सिनकर होते हर्णैचे तरुण सरपचही होते हर्णैला पोचलो त्या वेळी किनारा ओकाबोका सुन्न होता बदरावर चक्कर मारून आलो साने गुरुजींचे चरित्र लिहिण्याच्या आधी १९७४ साली दापोलीच्या बाबा फाटकांबरोबर हर्णै, लाडघर वगैरे या परिसरात आलो होतो श्यामला हर्णै बदरावरल्या धर्मशाळेत त्याची मावशी भेटली आणि तिनेच श्यामची आई देवाघरी गेल्याचे श्यामला सांगितले आईच्या निधनाची वार्ता श्यामला प्रथम, इथेच कळली ती धर्मशाळा पुन्हा पाहून घेतली अत्यत घाणेरड्या स्थितीत ती सध्या आहे हर्णैला आता पॅसेंजर बोट थाबत नाही त्यामुळे रहदारी, वर्दळ नाही

हर्णै बदराचे पूर्वीचे नाव सुवर्णदुर्ग बदराजवळच समुद्रात किल्ला आहे बंदरावर दीपगृह आहे सध्या बदर-आवारात, आसपास सुकायला टाकलेली चादीसारखी मासळीच मासळी दिसली तिच्या उग्र दर्पाने बदर भणाणून गेले होते बदर, किल्ला पाहताच साने गुरुजींनी श्यामची आई' पुस्तकात इकडील स्त्रियाची एक ओवी दिली आहे, तिची आठवण आली

हर्णैच्या किल्ल्यावरी। तोफा मारिल्या दुहेरी।
चंद्र काढिला बाहेरी। इग्रजानी ॥

चंद्रसेन नाकम कोणी एक राजा, इथे राज्य करीत होता म्हणे!

आसपासच्या मच्छीमाराच्या वस्तीत जाऊन आलो इथे खारवी मडळी बहुसंख्य आहेत

सायकाळचे ५-५॥ झाले आणि सुस्तावलेली लाबलचक किनारपट्टी आळोखेपिळोखे देत आळस झटकू लागली एकेक ट्रॉलर येऊ लागला होड्याही येताना दिसू लागल्या त्याचा वेध घेत पाहात होतो, तेवढ्यात समुद्राच्या पाण्यातून उसळी मारून वर येणारे नि पटकन डुबकी घेणारे काळसर वर्णाचे जाडजूड अगाचे मासे दिसले सरपंचाना म्हटले, "ते काय हो? कसले मासे उसळी घेतायत? "

सरपच म्हणाले, "तो काळा सैतान"

"काळा सैतान?

"सैतानच म्हणतो आम्ही त्याला गाधा मासा म्हणतात त्याला, पण त्याची करणी आहे सैतानासारखी तो जाळ्यातले मासे पळवतो जाळही तोडून-कुरतडून टाकतो होडीला ठोकर देतो असला दाडगट मासा आहे

तो वाईट ''

'' माणसात, पक्षांत, पशूत जसे लुटारू असतात तसे मत्स्यजगतातही आहेतच म्हणायचे! ''

'' आहेत तर! कुरतडलेलं जाळं पुन्हा तुणून-विणून घ्यावं लागतं ''

बघता बघता सायकालीन सावल्या किनाऱ्यावर पसरल्या आणि अक्षरश मासळीबाजार गजबजला गोंधळ, गोंगाट, लगबग-सगळेच कसे गतिमान झाले! फुलांचे गजरे माळलेल्या, मुद्रा उजळून टाकलेल्या, चांगलं नेसणं नेसलेल्या तरण्या, प्रौढ, मध्यम, आणि काहीशा वृद्धही मत्स्यगंधा टोपल्या घेऊन मासोळीसारखीच लवलव हालचाल करू लागल्या लिलाव होऊ लागले भाव बोलले जाऊ लागले, सौदे पटू लागले पैसे सुटू लागले मासळीचे हारे इकडून तिकडे नि तिकडून इकडे जाऊ-येऊ लागले वर आभाळात बुभुक्षित कावळे घिरट्या घालू लागले संधी साधून झडप घालून एखादा मत्स्य-खड चोचीत पकडून उडू लागले आणि खारव्याची पोरं! ती देखील ढिगाऱ्यातले खाली सांडलेले मासे वेचून पलीकडच्या रेतीवर मांडलेल्या औट घटकेच्या बाजाराकडे पळू लागली पटकुरावर आयाबायांनी केळी, काजूची बोंड, ओले काजूगर, काकड्या फणसाचे गरे आपापल्या मालाचे खुत्ते घातलेले होते पोरं यायची, मासे द्यायची आणि त्याच्या बदल्यात हवा तो खुत्ता घ्यायची माशाच्या प्रमाणात बदली मालाची देवाणघेवाण व्हायची इथ नाणं नाही नोटा नाहीत मासळी हेच नाणं नि नोटा वस्तूच्या बदल्यात वस्तू. आदिम अर्थव्यवहार!

अंधार दाट होऊ लागला तसा बाजारही निवळू लागला थोड्याच वेळात किनारा पुन्हा सुनसान! उद्या सायकाळपर्यंत

**जुवे-शिरगाव: ८ एप्रिल १९८२**

रात्री बराच वेळ झोप नाही व्यर्थ जागरण सकाळी काही वेळ आजारल्यागत झाले सकाळी १० च्या सुमारास श्री आखाडे आले पण दुसऱ्याच गप्पा निघाल्या आणि तिसरी बैठक व्हायची ती झाली नाही

अकरा-साडेअकराला श्री कारे याच्याबरोबर जुवे येथे आलो जुवे हे रत्नागिरीजवळ उपनगरासारखेच, पण खाडीत एक रमणीय बेट आहे श्री कारे हे तिशीपस्तिशीतले सुस्वभावी तरुण रत्नागिरी कोर्टात कामाला आहेत जुवे बेटावर आलो आणि हरखून गेलो हरखून जावे अशीच ही

नारळीची बाग आहे गाव लहानसे पिटुकले गाव म्हणजे बागच किंवा बागेत गाव इथे-तिथे-पलीकडे अशी अंतरा-अतरावर लहान लहान घरे इकडे-तिकडे कुठल्याही दिशेला थोडे चालत गेले की खाडी खाडीच्या काठाला पाच-सहा लहानशा भट्ट्या पाहिल्या काऱ्यांनी एक भट्टीवाला तोवर भेटवला होताच त्याने सांगितले, "ह्या चुन्याच्या भट्ट्या आहेत खाडीतून शिपले काढतो आणि शिंपल्यातून या भट्टीत चुना तयार करतो"

"इतर ठिकाणी चुनखडीपासून तयार करतात तसा?"

"हो पण इथं शिंपल्यापासून करतात पण साहेब, धद्यात काही रया राहिलेली नाही पोटभर मिळायची मारामार"

श्री कारे याचे छोटेसेच पण टुमदार घर घराहून पुढच अगण आणि सभोवतालचे नारळीबन किती साजिरे!

पण काऱ्यांशी बोलताना कळून चुकले की, या देखण्या बनातही कलहाचा निखारा धुमसत आहे कोर्ट-कचेऱ्यापर्यंत प्रकरणे पोचली आहेत उदार, अनत हस्ताने देणाऱ्या निसर्गाचा माणसाच्या मनावर असा सकुचित, विपरीत परिणाम का व्हावा!

आज दुपारच्या पुडीला काऱ्याकडेच होतो बेटावर मनसोक्त भटकती करून परतलो

सध्याकाळी सुरेन्द्र नार्वेकरांच्या घरी गेलो मुक्कामालाच नार्वेकराचे घर आहे रत्नागिरीजवळच शिरगावला खाडीच्या काठी, रस्त्याला लागून, उचावर आब्या-नारळीच्या कुशीत जुनेच पण अद्ययावत साधने आणि फर्निचरने नटलेले सुबक सुंदर रात्रीचे अधारातल्या आब्याखाली खुर्च्या टाकून बसलो पौर्णिमेचे चांदणे होते समोर खाडी चकाकत होती

**रत्नागिरी · १० एप्रिल १९८२**

त्यातल्या त्यात एक बरे झाले जुवे-शिरगाव करून काल रत्नागिरीला आलो आज येथील खासदार श्री बापूसाहेब परुळेकर याची गाठभेट झाली बापूसाहेबाशी विविध विषयावर गप्पा झाल्याच त्यात मच्छीमाराचाही विषय आलाच बापूसाहेब प्रख्यात वकील किती तरी मच्छीमार त्याची अशीलेच बापूसाहेब तडफदार कार्यकर्ते त्यांना या विषयाची भक्कम माहिती गलबतावरील खलाशी कामगाराविषयी बोलताना त्याची गुलामी, शोषण, दैन्य याविषयी तर त्यानी सांगितलेच, पण तिथे सागरावर घडणाऱ्या अमानुष

गुन्ह्याच्या थरारक कथाही ऐकवल्या म्हणाले, ' राजाभाऊ, हे फार भयानक असं वेगळच जग आहे इथले गुन्हे सापडण सापडले तर कायद्याच्या दृष्टीनं ते सिद्ध करण आणि गुन्हेगाराला शिक्षा होण हा सगळाच मामला फार अवघड आहे या गलबत व्यवसायाशी म्हणजे कौल वगैरे मालाची वाहतूक जी चालते, तिच्याशी चोरट्या व्यापाराचा, स्मगलिंगचा फार मोठा सबध आहे आता स्मगलिंगच्या व्यवसायात फार मोठ्या उच्चपदस्थाचे हात गुंतलेले असतात संरक्षकही भक्षक बनून त्यांचे साक्षीदार बनलेले असतात आणि एकूणच दहशत जबरदस्त असते हे सर्व आपण ऐकतोच त्यामुळे गुन्ह्याचा शोध लागण, लावण फार कठीण असत साक्षीपुरावे मिळवणं अत्यत अवघड असत ' पण गुन्हे घडतात हे खरच अहो, पाण्यावर पुरावे मिळाले नाहीत, तरी काही काही वेळा पाण्यातून मिळालेले आहेत मोठमोठ्या माशांच्या पोटात माणसांच्या हाताचे, पायाचे तुकडे, सागाडे मिळाले आहेत । ''

" अस ? भयकरच आहे ! '

" बरं हे जे मच्छीमार लोक आहेत त्याचीही स्थिती काही फार चागली नसते तिथही भयंकर शोषण आहेच ही जी कोळंबी नावाची मासळी असते तिला परदेशात खूप मागणी आहे ती निर्यात होते म्हणून तिला डॉलर फिशच म्हणतात म्हणजे डॉलर मिळवून देणारी म्हणून तिला प्रॉंज म्हणतात तर ही प्रॉंज मासळी अगोदर अलीकडे कमीच मिळते दहाबारा पधरा तास समुद्रावर जीव सदैव धोक्यात घालून ती पकडायची ती आणल्यावर व्यापारी दलालाला द्यायची दलाल देणार एक किलो मासळीला ३५ ते ४० रुपये ती तो मुबईला नेऊन विकणार किलोला ८० रुपये घेऊन हॉटेल्समधून प्रॉंजची जी डिश मिळते तिचा भाव काढला तर तो किलोला १२५ रुपयेपर्यंत जातो, आणि जपान वगैरे परदेशात ती विकली जाते १८० ते २०० रुपये किलोप्रमाणे म्हणजे मूळ मच्छीमाराला एवढे कष्ट आणि धोका पत्करून फक्त ३५ रुपये मिळणार, आणि व्यापारी-दलाल त्याच्यावर पाचपट कमावणार ! '' मी विचारल, " का हो, घाटावर जसे सहकारी साखर कारखाने झालेत, आणि त्यामुळ उसाचा गूळ, किंवा साखर यावरची मलई एकेकाळी व्यापारी दलालच लाटत होता ते जसे सहकारी प्रयत्नामुळे बद पडले आहे, तसे इकडे या बाबतीत का होऊ नये ? ऊस या कच्च्या मालावर प्रक्रिया होऊन त्याचे साखरेत पक्क्या मालात रूपातर

आणि पुढे बाजार वगैरे जसे सहकारी प्रयत्नामुळे त्या शेतकऱ्यानी साधले तसे सहकारी प्रकल्प काढून मासळी समुद्रातून मिळवण्यापासून ते परदेशात निर्यात करण्यापर्यंत सगळी प्रक्रिया आणि व्यवस्था का होऊ नये? असे झाले तर हे भयकर शोपण थांबेल, आणि मच्छीमाराला चार पैसे जास्त मिळतील''

"हे तस अवघड आहे पण व्हायला पाहिजे हे खरच आहे''

"अवघड आहेच एक तर हा वर्ग, व्यवसाय विखुरलेला विस्कळीत आहे आणि अस काही होतंय म्हटल्यावर हितसबधी मडळी जोरदार विरोध करतील असा विरोध सहकारी साखर कारखान्यालाही पहिल्यादा झाला आहे लोणीच्या विखे पाटलाना वेडं ठरवून रस्त्यावर पोराकडून दगड मारायला लावण्यापर्यंत बेलापूरच्या व्यापाऱ्याची मजल गेलेली होती !''

"बरोबर आहे असे नेटाचे प्रयत्न व्हायला पाहिजेत'' बापूसाहेबांशी आणखीही काही दिलखुलास गप्पा झाल्यावर व खासदार म्हणून त्याना कसकसे अनुभव येताहेत त्याचे किस्से ऐकल्यावर मी त्यांचा निरोप घेतला

**दाभोळ १२ जून १९८२**

श्री अण्णा शिरगावकराकडेच मुक्काम भोजनोत्तर विश्रांती वगैरे झाल्यावर बदरावर आलो पाऊस उघडला होता जवळच खारव्याची वस्ती तिथे गेलो महादेवभाऊ खळदकर भेटले वृद्ध मच्छिमार त्याच्याशी गप्पा सुरू झाल्या बोलता बोलता त्यांच्या तोडून एकदोन म्हणी चटकन निसटल्या आळशी खलाशाला मासळी कशी भेटणार? त्यासाठी कष्टाव, राबाव लागत, हे सागताना ते म्हणाले, 'अवो, भिजंल आंड तर मिळल खाड' भावार्थ असा की, पाण्यात गेल्याशिवाय माशाचा तुकडा मिळायचा नाही बोलण्याच्या ओघात म्हणाले, 'दर्यात म्हशी आन किनाऱ्याला उठाबशी' बाजारात तुरीच्या चालीवरची ही म्हण चटकन कळते तिचीच जातकुळी सागणारी ही दुसरी म्हणही तिकडे प्रचलित आहे- 'किनारी फासा न् दर्यात मासा' म्हणीतून, वाक्प्रचारातून लोकजीवन प्रकटते ते असे दर्याला आणि माशाला केवढे तरी मोठे स्थान या मंडळींच्या जीवनात आहे

जसे ते म्हणीतून दिसते तसेच स्त्री-गीतातूनही डोकावते समुद्रावर मच्छीमारीला गेलेला पती कधी परत येईल या प्रतीक्षेत असणारी ही नवोढा मत्स्यगंधा म्हणते आहे —

"या गो सागरू लोटिलं तारू
कधी येतील भरतार, जाईन माहेराला।
"गुलाबाच फुल देवी वाहिन तुला
कधी येतिल भरतार, जाईन माहेराला
शेवतीचं फुल देवी वाहिन तुला। कधी येतिल "

चैत्र महिना हा कोळबी जास्त मिळण्याचा मोसम त्या वेळी या महिला जमतात सतीची पूजा करतात आणि निरनिराळ्या देवदेवताची नाव घेऊन त्याना आवाहन करतात की, 'हे देवी, हा हगाम चागला होऊ दे पुष्कळ पुष्कळ कोळबी जाळ्यात गवसू दे!'

छोट्याशा होडीतून अण्णा, चंदूभाई व मी असे तिघे जण खाडीकाठच्या ओणी नामक गावाला गेलो वारा अनुकूल नव्हता, म्हणून पावणेदोन तास लागले वल्ही मारून दोन खलाशी घामाघूम झाले होते

ओणीला बहुतेक सर्व मच्छीमार मडळीच राहतात सायकाळी देवळात मुले जमली होती त्यांना मी गोष्ट सांगितली नतर काही मंडळींबरोबर जेटीवर गेलो वातावरण पावसाळी, ओले ओले होते हगाम आता सपलेला आहे, म्हणून तशी धादल-गडबड सध्या दिसत नाही

रात्री मदिरात गाववाल्यांशी गप्पा मारल्या श्री मधु देवळेकर यांच्याकडे मुक्कामाला होतो ते ओणीचे सरपंच आहेत

**दाभोळ १३ जून १९८२**

सकाळी ओणीहून छोट्या शिडाच्या होडीने अर्ध्या तासात दाभोळला आलो वारा अनुकूल होता

अण्णांनी श्री तुकाराम नामक एका हरहुन्नर माणसाला बोलावले होते तुकाराम हे उत्तम नकलाकार, गायक, वक्ते वगैरे वगैरे आहेत त्याचे पाठातरही भरपूर आहे पडावावर काम तर भरपूर असतेच, पण त्यातूनही खलाशी करमणूक साधून घेत असतात विशेषत चादण्या रात्रीच्या समुद्रसफरीत ते 'चकवे म्हणतात लोकगीताच्याच हा प्रकार संस्कृतिकोशात चकव्याचे तीन प्रकार सागितले आहेत पहिल्या प्रकारच्या चकव्यात नाखवाचे आपल्या होडीवरचे प्रेम व खवळत्या समुद्रात होडी लोटूनही ती लीलया पैलतीराला नेण्याचे त्याचे धाडस या गोष्टी व्यक्त होतात नावाडी हा प्रियकर आणि होडी ही प्रिया असे रूपक या गीतात

वापरलेले असते चकव्याच्या दुसऱ्या प्रकारात ‘पागाऱ्याचे होडके, त्यात बसले बोडके’ अशासारखे उपहासात्मक चकवे येतात चकव्याचा तिसरा प्रकार म्हणजे तरुण-तरुणींची रानातली प्रेमगीते

तुकारामने काही चकवे गाऊन दाखवले त्यातील एक असा

दाळींत दाळ मसुऱ्याची दाळ
हात नाही लाविल तो पापी चंडाळ।
न्हाऊन धुवून अशी झाली तैयार
हात नाही लाविल तो पापी चंडाळ।
साडी चोळी लेवून झाली तैयार
हात नाही लाविल तो पापी चंडाळ।

दुसरा चकवा असा

रंगू रंगली गो टाकुनि जाऊ नको मजला।
रंगूच्या डोकीत शेवतीचं फूल
रंगूला पडली सहजच भूल
रगू रंगली गो

तिसरा चकवा मात्र सोज्वळ आहे.

सीताराणीला नेली लंकेला
रामाने जासूद पाठविला।
हनुमताने उडाण केला
रामाने जासूद पाठविला।
देवा रामानि बाण सोडिला
रामाने जासूद पाठविला।
तेव्हा रावण धरणी पडला
रामाने जासूद पाठविला!

तुकारामाने काही ‘जाखडी’ म्हणून दाखवल्या हा गीतप्रकार गणपतीपुढे हातातला रुमाल हलवीत वाटोळे नाचताना पुरुष म्हणतात

जल्मोनी काय केले
वाया आयुष्य गेले!
बाळपणी खेळ खेळे

आले तरुणपण आता मिशीला पीळ भरी
आले म्हातारपण मला शिंकरल्या भिंती
याच्या खोकल्याला नाहीं गणती
याच्या लेकीसुना नवस करती
कधी उचलल माती- या हो म्हाताऱ्याची
कधी उचलल माती
ऐशा जगाच्या रीती
सांगे केशवराव महिपती!

दुसरी जाखडी अशी
घडी घडी रे नाही तुजला
पुन्हा जन्म मिळणार
ईश्वरभक्तीविण जिण तुझ हे लाचार
नको नको रे वेळ करू तू
नाही भरवसा फार
येतील यमदूत करतील देह थंडगार!
बाळपणी तुजला खेळाची आवड आवड
तरुणपणी कामामुळे नाही सवड सवड
सर्वच म्हणशील माझे माझे, करत होईल उद्धार
येतील यमदूत!
म्हातारपणी खो खो करशिल घडी घडी
दुनिया तुजला पाहून म्हणतील हडी हडी
अंत काळच्या वेळी तुजला नाही कुणाचा आधार
येतील यमदूत !

**मालवण: २२ जुलै १९८२**

एस टी माऊलीच्या कुशीत अर्धवट जाग अर्धवट झोप, अशा अवघडलेल्या स्थितीत रात्र काढल्यावर सकाळी सकाळी मालवणला पोचलो

सिंधुदुर्ग हा विजयदुर्ग हा, ही अजनवेल।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल॥

श्रीमहाराष्ट्रगीतातल्या गोविंदाग्रजाच्या ओळी आठवल्या मालवण, महा-लवण अशी व्युत्पत्तीही आठवली कोणे एके काळी येथे पुष्कळ मिठागरे होती आणि विपुल मीठ-लवण पिकत असे म्हणून म्हणे मालवण तर मा 'ची म्हणजे मातेची म्हणजेच लक्ष्मीची कृपा लाभलेले गाव म्हणून म्हणे मालवण कुठे तरी वाचलेल्या ओव्यातील ओळी आठवल्या ·

समुद्राचे क्षार जीवन
यास्तव अन्ना न लागे लवण।
यथार्थ नाम मालवण।
अन्न शिजविता नको लवण।
म्हणून नाम मालवण!

बाळासाहेबांचे मेहुणे डॉ देसाई यांनी मथुरा लॉजमध्ये माझी सोय लावून दिली होती सकाळची पंचकर्मे आटोपली तेवढ्यात श्री देऊळकर, मधू वालावलकर ही सेवादलगोत्री मंडळी आली थोड्या वेळाने मधू वालावलकरानी बाहेर काढले हे गृहस्थ असेच आपण स्वस्थ बसणार नाहीत, दुसऱ्याला बसू देणार नाहीत

मधूंनी रस्त्याने जाताना दहा पावले काही नीट सरळ टाकू दिली नाहीत हा भेटला, तो भेटला, त्याची ओळख, याच्याशी परिचय करीत करीत निघालो मधू म्हणाले, "तिथ भाजी घेऊ, चहा पिऊ, ताजेतवाने होऊ आणि मग देऊळकराकडे जाऊ माडीवर सतरंजी पसरून देतो खुशाल झोपा एक वाजेपर्यंत रात्रभर जाग्रण झालं असेल एस्टीत एकला देऊळकर येतील शाळेतून मग जेवा तोवर येतोच"

त्याप्रमाणे सर्व घडले

सायकाळी मधू आले ते श्री पाडुरग पराडकर नामक गृहस्थाना घेऊन पराडकर असेच हरहुन्नरी पण सध्या आजारलेले दिसले तिघे मिळून धुरीवाडीत गेलो वाटेत मधूनी बॅ नाथ पै सेवांगणाची जागा दाखवली प्लॅन समजावून दिला समुद्रकाठी हे सेवागण होईल सुरेख, झकास जागा

धुरीवाडा म्हणजे समुद्रसंमुख माडाच्या राईत बसलेली गाबिताची वस्ती इकडे मालवण-वेंगुर्ल्याकडे मच्छीमार सगळे गाबित

पाडुरग पराडकरांनी सांगितलं, "गाबीत ही जात नसून पेशा आहे वृत्ती आहे ही मंडळी स्वत ला मूळचे मराठाच समजतात ते इकडे आलेही

घाटावरून शिवकाळात इथेच राहिले, वसले शिवाजीमहाराजाच्या आरमारात यांनी मर्दुमकी गाजवली आहे त्याकाळी तिर्कटी, तारू, मचवा, पगार, पडाव, गलबत, होडी, अशी निरनिराळ्या प्रकारची जलयाने होती आजही आहेत त्यातच एक ग्राब म्हणून होते 'ग्राब' म्हणजे पाण्यावरचा तोफगाडाच त्यावर तोफा ठेवलेल्या असत, आणि हे कोकणाळलेले मराठे त्यावर काम करीत असत ग्राबावर काम करणारे ते ग्राबती म्हणून ओळखले जाऊ लागले ग्राबतीचा अपभ्रंश पुढे गाबती, गाबीत असा झाला आहे ''

पराडकरांनी आणखीही एक उपपत्ती सांगितली ती अशी की, मराठ्यांचे आरमार लयाला गेल्यानंतर ग्राबती एकप्रकारे बेकारच बनले आणि ते मग मच्छीमारीचा उद्योग करू लागले समुद्राच्या पोटातला मासा, म्हणजे गाभाच बाहेर काढणारे ते गाभीत आणि त्याचेच पुढे गाबीत झाले असावेत पण ही उपपत्ती बरोबर वाटत नाही

दर्यावर्दीपणामुळ यांच्यात तांडेल, साततांडेल, पडतांडेल, फडतांडेल, मायनाक, नाईक, सारंग, मोठे सारंग अशी त्यांची त्या काळातल्या हुद्यावरून पडलेली आडनावे आहेत

धुरीवाडीतली गाबितांची घरे माडांच्या सावलीत सुटी सुटी मोकळ्या अंगाने बसलेली आहेत काही घराभोवती छोटीशीच बाग दिसली श्रीकृष्ण मंदिर छान, प्रशस्त आहे एकाने मंदिरातली घंटा वाजवली ती खुणेची घंटा थोड्याच वेळात काही मंडळी जमली एका लहानशा खोपटवजा होड्या वगैरे दुरुस्त करण्याच्या मागरात बसलो काही गाबीत तिथ जाळी विणत बसलेलेच होते

मी संवाद सुरू केला, पण नीटसा प्रतिसाद मिळाला नाही बरेच खोदून खोदून विचारल्यावर दोन-तीनजण बोलले तेही जुजबी मोकळे झाले नाहीत माझ्याविषयी हा कोणी सरकारी माणूस आहे की काय, माहिती घेऊन हा काय करणार, वगैरे प्रकारच्या शंका तर त्यांच्या मनी नसतील ? . की, असे बरेच कोणी येतात नि जातात म्हणून ते उदासीन असतील ? हे तर खरेच आहे की जे पाहिले, ऐकले, अनुभवले ते सांगण्याची, व्यक्त करण्याची हातोटी (expression) सगळ्यांजवळ नसते तथापि, धोंडू महादेव मोडकर हे त्यातल्या त्यात बोलके भेटले त्यांनी काही हामोण्या सांगितल्या हामोणी म्हणजे होडी पाण्यात ढकलताना किंवा पाण्यातून वर ओढताना श्रम वाटू नयेत आणि सगळ्याचा जोर

एकसमयावच्छेदेकरून लागावा म्हणून म्हणतात ते पहिल्यांदा हाक मारताना म्हणतात

"हे ऽऽऽ हलोम् है-है ऽऽऽल
हलोम् हे-है ऽऽऽ ल"

मग होडी ढकलताना म्हणतात -
' ओ ऽ धावाले-आय ले-तुज ले-
माय ले-राजवला-खाडी वल्ला
सायेब वल्ला- "

याला अर्थ असा काही नसतो तसे हे श्रमिकाचे बडबडगीतच याला एक लय मात्र असते आणि त्यावेळी तीच महत्त्वाची असते

यानतर मोंडकरानी गलबतावरची एक हामोणी सागितली

"भुल्लो तुज्या नखऱ्याला ग
फसिवल मला गरिबाला।
कानातली कुंडल देईन तुला गं
फसिवलं मला गरिबाला।
पायातला तोडा आणिन तुला गं
फसविल मला गरिबाला।"

अशा प्रकारे निरनिरारळे दागिने, वस्तू वगैरेंची नावे घेऊन हे गीत लाबच-लाबपर्यंत चालते

चकव्याचाच हा प्रकार आबोवणी, हमोणी अशी स्थलपरत्वे नावे

घाटावर जसे म्हणतात की, 'बारा कोसावर भापा बदलते', तसे इकडे कोकणात म्हणतात की 'खाडी बदलली की भापा बदलते'!

इकडे मालवणी बोली प्रचलित आहे मराठीचाच एक प्रकार कोकणी हेल काही शब्द वेगळे कोठे याला 'खय,' कोठे जातोस? 'खंय जातोस!' तुझ-माझं, 'तुका-माका' इत्यादी

दुसऱ्या एकानं जत्रेबद्दल सांगितल माघ-पौषाच्या सुमाराला अगणेवाडीच्या सात्रजदेवीची जत्रा भरते जत्रेची तीथ ठरवण्याच्या आधी अगणेवाडीतले लोक शिकारीला जातात डुक्कर मिळाला की मग तीथ

ठरवतात सगळ्या नात्यागोत्याला कळवतात लोकानाही सगळीकडे कळत मग त्या दिवशी लाबून लाबून लोक येतात मुबईहून पुष्कळच लोक येतात

मी मोंडकराला मुलांच्या शिकण्याबद्दल विचारल तर म्हणाला, "पोराला शिकवाव अशी आमची इच्छा आहे, पण परवडत नाही हो चार पोर न् आम्ही दोघं सहा माणस आम्ही रोज साधारण म्हटल तरी पंधरा-वीस रूपये खर्च होतो तेवढी आमची मिळकत कुठाय? पोराला शिकवायच तर पैसे हवेत मात्र पोरानी शिकून दुसरा धंदापाणी करावा असच मला वाटत कारण यात आम्ही कटाळलो हो"

रात्री डॉ देसाईकडे देऊळकरासह जेवायला गेलो तादळाच्या शेवया आणि नारळाचे मधुर दूध असा मस्त बेत होता मला हे पक्वान्न नवीनच होत दिवसभर अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत होत्या

**मालवण-सर्जेकोट २३ जुलै १९८२**

सकाळीच श्री पराडकर आले त्याच्यासह बसने सर्जेकोटला गेलो जवळच आहे मालवणचे उपनगर इथे बहुतेक सगळे मच्छीमार गाबीत समुद्रकाठी पडीक अवस्थेत लहानसा किल्ला आहे तोच सर्जेकोट सिधुदुर्गाचे रक्षण करण्यासाठी म्हणून असे लहान लहान कोट बाधले होते, असे मोहनराव म्हणाले ते मालवणला शिक्षक इथले ग्रामपचायतीचे उपाध्यक्ष

ग्रामपचायतीत गेलो बरीच मडळी जमली होती बऱ्याच गप्पागोष्टी झाल्या

श्री ज्ञानेश देऊळकरानी रापण म्हणजे काय वगैरेबद्दल बरीच माहिती सांगितली त्याचा या विषयाचा अभ्यास आहे मच्छीमार समाजाच्या उन्नतीसाठी ते प्रयत्नशील आहेत श्रमिक मच्छीमार सघाचे ते कार्यकर्ते आहेत आणि या व्यवसायातील अडीअडचणींविषयी वृत्तपत्रांतून अनेक लेखही त्यांनी लिहिलेले आहेत ते म्हणाले, "सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड, मालवण, व वेंगुर्ले हे तीन किनारपट्टीचे तालुके येतात विजयदुर्गपासून रेड्डीपर्यंत ९५ किलोमीटर लांबीची ही किनारपट्टी आहे मत्स्यव्यवसायाला पुष्कळच वाव आहे या उद्योगात गेल्या १०-१५ वर्षांत यंत्रांमुळे, शोधामुळे परिवर्तन घडून येत आहे या भागात अद्यापही पारपरिक पध्दतीनेच प्रामुख्याने मच्छीमार चालते 'रापण' ही इकडली पध्दत एक प्रचंड अर्धा किलोमीटर

लार्बीचे जाळे असते किनाऱ्यापासून एक किलोमीटरपर्यंतची मासळी या जाळ्याने पकडली जाते किनाऱ्याला येणारी खाडवी मासळी यात मिळते वर्षातील पावसाळ्यानंतरचे चार महिने व मृगापूर्वीचे दोन महिने, म्हणजे सप्टेंबर ते डिसेंबर व एप्रिल-मे, असे सहा महिने हे रापणीच्या हंगामाचे दिवस मानले जातात सुमारे दोनशे वर्षे तरी हा असा व्यवसाय या किनारपट्टीवर चालू आहे त्यातील तंत्रज्ञान पिढ्यान् पिढ्या चालत आलेले आहे त्यामुळे नवीन ज्ञानाची, तंत्राची गरज नाही, अशी भावना स्थानिक रापणकारात आढळते रापणपध्दतीत बदल करायला ही माणसे राजी नसायची, पण पूर्वीची मासळीची सुबत्ता व किफायत आता या धंद्यात राहिलेली नाही म्हणून तेही आता नव्या वाटा धुडाळू लागले आहेत

१९६६ पासून शासनाने यांत्रिक नौकांना अनुदान देण्याचे धोरण ठरवून यांत्रिकीकरणास फार मोठी चालना दिली आहे त्यामुळे सध्या रत्नागिरीच्या सबंध किनारपट्टीवर सुमारे ९०० ट्रॉलर्स या व्यवसायात गुंतलेले आहेत यंत्र आले, पण त्याबरोबर नवीन समस्याही आल्या रापणीची मच्छीमारी, गिलनेटने होणारी मच्छीमारी याच्यात संघर्ष सुरू झाला समुद्रावर मालकी सर्वांची, हे जरी खरे असले तरी मत्स्यव्यवसायाचे जे अनेक प्रकार आहेत, त्यातही अलिखित असे काही नियम आहेत त्यांना बाधा पोचली पारंपरिक मच्छीमारीविरूध्द यांत्रिक मच्छीमारी असे या संघर्षाचे स्वरूप आहे

ट्रालर्सची मच्छीमारी सागराच्या तळाशी होते एकदा टाकलेले जाळे ट्रॉलरने २-३ किलोमीटर ओढले जाते त्यामुळे त्या मार्गात दुसरे जाळे टाकून ठेवता येत नाही

"गिलनेटने होणारी मच्छीमारी दोन प्रकारची असते दर दिवशी रात्री सागराच्या पृष्ठभागावर तरंगती जाळी टाकून मिळणारी मासळी सकाळी गोळा करायची किंवा रात्रभर जाळे तळाशी ठेवून मासळी पकडतात

ट्रॉलर्सच्या अनिर्बंध संचारामुळे या धंद्याला मर्यादा पडू लागली ट्रॉलर्सच्या जाळ्याने तळच खरवडला जातो त्यामुळे बारीक, पुरती न वाढलेली कोळंबी-प्रॉंज-मासळी पकडली जाते शिवाय त्याची अंडीही नष्ट होतात व त्याचा परिणाम नवीन उत्पादनावर होतो पैदाशीलाच धोका उत्पन्न झाला आहे "

देऊळकरांनी तपशीलवार पुष्कळच सांगितले

वेंगुर्ले-शिरोडा · २५ जुलै १९८२

सकाळी श्री अंकुश देसाईच्या बरोबर बसस्टँडवर आलो वाटेतच पावसाची जोरदार सर भेटली श्री तात्या तारकर स्टँडवर आले त्यांच्याबरोवर बसने शिरोड्याला गेलो शिरोडा म्हटले म्हणजे मिठाचा सत्याग्रह आणि भाऊसाहेब खाडेकर याची आठवण होतेच

शिरोड्याला तात्यानी मच्छीमाराच्या केरवाडा वस्तीत नेले तशीच घरे, तसेच वातावरण फक्त आता ठिकठिकाणी माशांचे वाळवण दिसत नाही पावसाळा मासळीचा उग्र वास आता माझ्या ओळखीचा नि सवयीचा झाला आहे

मच्छीमाराची दोन-चार मुले भेटली ती खेळत होती मी विचारलं, "समुद्रावर नाही का खेळत ?" तर म्हणाली, " पाऊस आहे ना ! नाही तर तिकडंच पाण्यातच खेळतो "

"काय काय खेळता ?"

"काठी पुरण्याचा खेळ असतो "

"म्हणजे ?"

"म्हणजे एक काठी घ्यायची आणि एकानं ती कमरेइतक्या खाडीच्या पाण्यात पुरायची मग ती बाकीच्यांनी शोधायची ज्याला सापडेल तो जिकला "

"असं ! आणखी ?"

"आणखी बोंबी दाखवायचा एक खेळ असतो "

"तो कसा ?"

"कमरेएवढ्या पाण्यात गोल उभ राह्यच आणि वर उसळी मारून बोंबी दाखवायची चढाओढ चालते जो आधी बोंबी दाखवेल तो जिंतला "

"अरे वा !"

"आणखी शिवणापाणी, बॉल फेकाफेकी पण पाण्यातच चालते "

"छान !

एका घरात बसलो तात्यांचे स्नेहीच होते चारपाचजण जमले गप्पा सुरू झाल्या एकानं 'झुळकी' म्हणून दाखवल्या इकडं गीतांना झुळकी म्हणतात चकव्यासारख्याच

जिरेसाळीचा भात चातुरा देशील का, देशील का।
गजरा माळली तुझी सुदरा भोगशी का भोगशी का॥

गंधर्वांचा एकच प्याला
गोपु चल जाऊ ग बाजाराला।
गंधर्वांचा एकच प्याला
गोपु काढ पैसे तिकिटाला॥

तेवढ्यात काही स्त्रियाही गोळा झाल्या त्यांनाही एखादे गाणे म्हणायचा आग्रह केला सुरवातीला संकोचल्या पण मग टाळीचा ठेका देऊन म्हणू लागल्या –

गाईन गाईन एक मौजेचा।
गाईन गाईन एक मौजेचा।
पहिला अवतार सूर्याचा
सूर्य चाले ग दिवसाचा
दुसरा अवतार चद्राचा
चंद्र चाले ग रात्रीचा
तिसरा अवतार श्रीकृष्णाचा
पदर धरिला रुक्मिणीचा
चवथा अवतार रामाचा
पदर धरिला सीतेचा
पाचवा अवतार अर्जुनाचा
पदर धरिला सुभद्रेचा!

गणपतीपुढे स्त्रियाही फुगड्या घालताना, फेर धरताना विविध प्रकारची गाणी म्हणत असतात त्यातली ही एक झलक

नेसली कांचन साडी हो राया
चढली सुरंगी झाडावर राया
खुडिले सुरंगी कळे हो राया
गुंथिले उभ्या दोऱ्यात राया

घातिले दत्तात्रय देवा हो राया

आजचे फिरणे पावसाच्या सरी चुकवीत किंवा छत्रीवर झेलीतच चालले होते केरवाड्यातून शिरोड्याला आलो, आणि बसने वेंगुर्ल्याच्या वाटेवर मध्येच कुरळवाडी आणि मूठ या मच्छीमाराचा छोट्याशा गावातून गेलो कुरळवाडीला एकाच्या घरात बैठक मारली पाचसहा गाबीत जमा झाले पावसाळ्यामुळे ही मडळी सध्या घरी सापडतात जाळी विणण्याची वगैरे कामे चाललीच होती

गप्पा सुरू झाल्या तशी एकाने मी कोणी शासकीय माणूस आहे अशा समजुतीने त्याच्या तेथील गैरसोयींचा पाढा वाचायला सुरुवात केली पण मी खुलासा केला आणि मग वेगळ्या गप्पा सुरू झाल्या नारायण नामदेव तांडेलांनी, सात-आठ वर्षांपूर्वी ते वादळात सापडले होते, त्याचा अनुभव सागितला म्हणाले, "दिवसाचीच होडी ढकलून समुद्रावर गेलो होतो निघताना समुद्र शात होता पण दहा-बारा वाव गेलोन् जाळं टाकलं थोड्याच वेळात हवा परमाळली नि आम्ही समजलो आता वादळ होणार सगळ्यांनी जोर लावून जाळ वर होडीवर घेतल आणि किनाऱ्याकडं निघालो किनारा आता जवळच होता पधरा मिनिट लागली असती पण तेवढ्यात वाऱ्यान जोर केला इतका जोर इतका जोर की तेवढ्या अतरावरून किनाऱ्यावर यायला आम्हाला चार तास लागले! होडी नागरली आणि पोहतच वर आलो थडीन व्याकळून गेलो होतो सगळे पण वाचलो देवाच्या कृपेनं "

खिणकरानी एक झुळकी म्हटली सागरात परत येताना दोन होड्या कधी कधी जवळ जवळ येतात मग त्याच्यात एकीला पुढ जाऊ द्यायची नाही अशी ईर्षा उत्पन्न होते एक दुसरीवर मात करायला बघतात जोरजोराने वल्ही चालवतात स्पर्धा सुरू होते अशा वेळी ही झुळकी म्हणतात

सातशे खिडक्या नऊशे दार।
कोणा दरवाज्यान गेली एक नार।
पाताळ नेसलन फॅशनदार
कोणा दरवाज्यान गेली एक नार।
ब्लाऊज शिवल्यान् फॅशनदार
कोणा दरवाज्यान गेली एक नार।

चप्पल घातलीन् फॅशनदार
कोणा दरवाज्यान गेली एक नार।

आणखी एकानं गजाली सांगितली गजालीचं रूप विनोदी किश्श्यासारखे असतें गजाल्या सांगण्या-ऐकण्यात मंडळी भलतीच रंगून जातात कॅच चांगला मिळालेला असतो वारा अनुकूल असतो मूड चांगला असतो अशा वेळी गजाल्या रंगतात तर त्यातलीच ही एक

'गजालीन् घो खाल्लो' दोघं नवरा-बायकू होते नवरा गरीब स्वभावाचा, बायकू बोलभांड तर दोघं एकदा लाकडं तोडायला म्हणून जंगलात गेले लाकडं तोडता तोडता काय झालं एक भला मोठा अजगर तिथं आला त्याचं लक्षच नाय हा आपला लाकडं तोडतोय इकडं तिकडं बायकू काटक्याकुटक्या वेचती अजगरानं हुंगलं आणि त्याला पायाकडून गिळलं हा बोंबलला, 'अजगरानं गिळला, अजगरान गिळला' बायकू पळत आली बघती तर नवऱ्याला अजगरान मांड्यापर्यंत गिळलाय आन् हळूहळू तो त्याच्या तोंडातून पोटात चाललाय आता काय करावं? चाकू, सुरी घरी राहिली नाही तर अजगराचं पोट फाडलं असतं नवरा बरडला, 'अगं रांडे, पळत घरी जा आन् चाकू घेऊन ये'

बायकू पळत निघाली तिला पळताना बघून वाटेवरच्या लोकांनी विचारलं, काय झालं म्हणून तशी ती सांगत थांबली, असं असं झालंय म्हणून

पुढं गेली तिथं पुन्हा लोकं भेटली त्यांनी विचारलं, ही सांगत बसली बोलभांडच बायकू ती पुढं गेली तिथं पुन्हा लोक भेटली. त्यांनी विचारलं ती सांगत बसली

असं करता करता ही घरी पोचली चाकू घेऊन पळत निघाली तिला पळताना बघून दुसऱ्या लोकांनी विचारलं, काय झालं म्हणून ही बोलभांड बायकू बसली सांगत असं होता होता बराच वेळ गेला बायकू चाकू घेऊन पळत पळत जंगलात आली तोवर अजगरान नवऱ्याला केव्हाच पुरता गिळून टाकला होता!

याच चालीवरची 'फुरशान् बाईल खाल्ली' अशीही एक गजाली आहे म्हणाले

श्री तात्या तारकरांची ही प्रथम भेट, श्री शशिकान्त करपे यांनी

जुळवून दिलेली पण तात्याच्या साहाय्यकारी स्वभावामुळे आमचे छान जुळले दुपारी तात्याकडेच जेवलो शेतातच घर बांधले आहे रमणीय परिसर

आज नागपचमीचा सणाचा दिवस ठिकठिकाणी मातीचे रंगीत नागोबा विक्रीला माडलेले दिसले घाटावर या दिवसात खेड्यापाड्यातून दिसतात तसे झाडावर टागलेले झोके, वारुळाच्या पूजेला नटूनथटून जाणाऱ्या सुहासिनी, किंवा फेर, असले काही कुठे दिसले नाही तात्या म्हणाले, "कोकणात ती प्रथा नाही आज तळण तळायचे नाही, जमीन खणायची नाही उकडलेली पातोळी आज असते"

जेवायला बसलो तेव्हा पानात पातोळी आलीच

दुपारी करपे याच्या बधूच्या स्कूटरवरून वेंगुर्ल्याला आलो सायंकाळी ग्रथालयात करपे यानी काही मित्रासमवेत गप्पांचा कार्यक्रम योजिला होता त्यामुळे बऱ्याचजणांशी, ओझरत्या का होईना, ओळखी झाल्या

**वेंगुर्ले-पुणे प्रवास २६ जुलै १९८२**

श्री व सौ करपे याचा निरोप घेऊन सकाळी सव्वाआठच्या बसने पुण्याकडे निघालो, तो सावतवाडी, निपाणी, कोल्हापूर, सातारा करीत करीत रात्री १० ला पुण्यात पोचलो म्हणजे जवळ जवळ तेरा तास प्रवासात गेले पोचलो तेव्हा कंटाळून थकून गेलो होतो पण दिवस पावसाचे असल्यामुळे सगळीकडे हिरवे हिरवे होते अधूनमधून पाऊस भेटत होता आंबोलीच्या घाटात तर गर्द दुधाळ धुकेच धुके भेटले! इतके की, धुके आणि आम्ही बसवासी एवढेच एकमेकाना दिसत होतो भोवतालचे घनगर्द जंगल, डोंगर, दरी-सर्व सर्व धुक्यात हरवून गुडुप झाले होते

अधूनमधून हलक्याशा डुलक्या काढल्या पण बराच वेळ बाहेरचे हिरवे पाहताना, गेल्या चार-पाच महिन्यांत अधूनमधून हे जे समुद्र, मासळी, मच्छिमार, मत्स्त्यगधा आदींचे सान्निध्य लाभले त्यातली अनेक दृश्ये, माणसे, घटना आठवत होत्या समुद्राची कितीतरी विविध दर्शने याकाळात घडली सकाळचा शात पण हसरा, दुपारचा उन्हात चकाकता पण निवान्त, सूर्य पोटात घेताना दिसणारा लालसर, आभाळ उमटून घेतलेला निळसर, खडकांशी दगामस्ती करणारा खट्याळ, ओहोटीचा मवाळ, भरतीचा दुधाळ,

अंधेऱ्यारात्रींचा काळाकुट्ट, चादण्यातला लखलखता बिलोरी-किती त्याची रूपं नि किती मूड्स्

आणि ती मासळी! सागराच्या उदरात काय काय, कसे, नि किती असेल कुणास ठाऊक!

आणि ही माणसं-खारवी, भंडारी, दाल्दी, तशीच मला आसपणा देणारे बाळासाहेब, आबासाहेब पुराणिक, अनगळ, भाई, अण्णा देऊळकर, तात्या, -मधू, शशिकांत कितीजणांची नावं घेऊ? कशी ही सगळी जवळ आली? अचानक! मी देशस्थ देशावरचा ही सगळी सृष्टी माझ्यापासून किती लाब. किती दूर पण गेल्या काही दिवसात किती जवळ, किती निकट आलोत

हा कसला संकेत, योग की ऋणानुबध? काही असो मला मात्र, माझ्या दृष्टीन एका वेगळ्या सृष्टीची दारे खुली झाली होती!

■ ■ ■

# पुनश्च रत्नागिरी

**रत्नागिरी : ११ ऑक्टो १९९१**

जवळजवळ आठ-दहा वर्षांनी पुन्हा रत्नागिरीच्या सागरतीरावर येण घडल आहे हे येणहीं मागच्या येण्यासारख अचानक! आकस्मित!

अधूनमधून त्यावेळच्या किनारपट्टीवरच्या भ्रमंतीची आठवण यायची, नाही अस नाही सागराची गाज कानी पडायची खारा वारा लगट करायचा मासळींचा वास दरवळायचा मच्छीमाराची जाळी, रापण, सागरपुत्र व मत्स्यगंधा यांची लगबग दिसायची कधी कधीं तर वाटायचं, उठावं नि निघावं!

समुद्र-मासा हाक मारीत आहे!

पण घडलं नाही मनात असूनही घडलं नाही मनात नसताना घडून जात नि मनात असताना घडत नाहीं ही किती गमतीची गोष्ट!

एक-दोन वेळा शिरगावचा सुरेन्द्र नार्वेकर येतो म्हणाला, पण आला नाही त्याच्याबरोबर किनारपट्टीवर हिंडायचा विचार केला होता तो फिशरीजच्या धंद्यातला जाणकार तरुण मागच्या ओळखीने आपणहून आला बोलणं झालं ठरल पण गेला तो गेलाच चक्क झुकांडी

एकदा न्या एस व्ही देसाई यानी पोकडे नामक गृहस्थांची गाठ घालून दिली देसाई तोवर मुंबईला बदलून आले होते पोकडे रत्नागिरीचे मच्छीमारीच्या व्यवसायातले राहात होते मालाडला

एके दिवशी बिस्तरा घेऊन मालाडला गेलो त्यांच्याकडे राहिलो गृहस्थ कुटुबवत्सल चागले पोकडे यानी मला सातपाटी, मालवणी, मढ,

जुहू, कुलाबा डॉक, माहिमची खाडी आदी ठिकाणी नेल या दोन-तीन दिवसात फिरलो पुष्कळ, पाहिल थोड आणि मच्छीमाराशी बोललो, चाललो तर फारच थोडं

देसाईंच्या ओळखी पुष्कळ एकदा त्यानी नौदलातले मुकुद आजगावकर यांची गाठ घालून दिली मुकुदराव 'गोल्डमेडल' मिळवणारे 'डफरीन'या सुप्रसिध्द युध्दनौकेवरचे 'ट्रेंड कॅडेट'होते त्यानी मला मुबई डॉकमध्य नेले पूर्वीची 'अलेक्झाड्रिया' गोदी, आता नाव बदलून 'इदिरा' झाली आहे ही गोदी, भाऊचा धक्का हिंडून-फिरून पाहिला आजगावकरानी माझ्यासाठी प्रवेशपत्रिका मिळवून मला 'महावीर' नामक प्रचड युध्दनौकेवर नेले सगळी नौका फिरून दाखवली बारीकसारीक माहिती सागितली 'लोकसेवक' नामक नौकाही पाहिली आणि नौदलाचे शिक्षण देणारी 'राजेंद्र' नावाची अद्यावत साधनांनी सुसज्ज अशी अजस्त्र नौकाही त्यांनी दाखवली प्रत्येक विभागाची तपशीलवार माहिती समजावून सागितली

मला हे सगळेच नवनवीन होते पाहून-ऐकून स्तिमित झालो! समुद्रावरले हे तरते जग आणि जीवन किती निराळेच असते!

मागे एकदा 'विक्रांत' पाहताना असेच वाटले होते!

असेच एकदा रत्नगिरीतल्या 'गोमतक' लॉजचे भाऊ याची देसाईंनी गाठ घालून दिली भाऊ गोव्यातील पार्से गावचे स्वातत्र्यसैनिक भाऊंबरोबर पार्से येथील त्यांच्या बाजूच्या शेतात राहिलो पणजी, दोनॉ पॉवला, मीरामार्ग, वॉस्को, कलगूट, कोलबा, बागतूर आदी सागरतीरावरून फिरलो सृष्टीच्या वैभवाने मोहून गेलो कवीवर्य बा भ बोरकरांची आणि त्याच्या किती तरी कवितांची आठवण झाली 'माझ्या गोव्याच्या भूमीत' ह्या कवितेच्या ओळी ओठावर आल्या

चार दिवस गोव्यात समुद्रकाठी फिरून भाऊंनी दिलेला भलामोठा फणस घेऊन परतलो

त्यानंतर दोन वेळा गणपतीपुळे, अलिबाग, वेंगुर्ला, मद्रास, जगन्नाथपुरी आदी ठिकाणी समुद्राकाठी राहणे घडले अंदमान-निकोबारला तर समुद्राशी गट्टीच जमली पोर्ट-ब्लेअरला तर समुद्रतटीच निवासस्थान होते इद्रधनुपी रगछटा ल्यालेला देखणा समुद्र इथ भेटला निरनिराळ्या लहान बेटांवर आलो, गेलो समुद्राशी बातचीत करीतच आणि पोर्ट-ब्लेअर ते निकोबार व परत हा सात दिवसांचा जलप्रवास बोटीनंच केला चोवीस

तास रात्रदिवस खाली निळा समुद्र आणि वरती निळं आभाळ निळ्या शिंपल्यातच काढले! यावेळी समुद्राची किती रंग-रूपं पाहिली शब्द, स्पर्श जाणले

मध्यंतरी काही महिने एका कामानिमित्तानं मुंबईला मरीन ड्राईव्हवरच्या एका अलिशान फ्लॅटवर राहिलो होतो गॅलरीतून, खिडकीतून समोर समुद्र दिसायचा! पहाटे, सकाळी, दुपारी, सायंकाळी, रात्री केव्हाही उठून समुद्र पाहात असे कधी लाटांचा धांगडधिंगा-भांगडा, कधी संथ लयीतले भरतनाट्यम्, कधी कथकली, कधी कुचिपुडी, कधी मणिपुरी, कधी बिहू निरनिराळ्या नृत्यमुद्रा! पावसाळ्यातला अवखळपणा थंडीत ओसरलेला असायचा, उन्हाळ्यातल्या भर दुपारी झगझगाटानं डोळे दिपायचे चांदण्यातील सुरावट वेगळीच असायची काळोखातला गूढ दबदबा मनावर जाणवायचा!

असा समुद्र डोळ्यांनी पिता-पिता वाटायचं, मानवी जीवन किती थिटं किती लहान क्षुद्र नगण्य .

**जाकी मिऱ्या : दि १२ ऑक्टो १९९१**

रत्नागिरीत उतरल्यावर रिक्षा करून 'गीताभवनात ' गेलो श्री मुकुंदराव व सौ मालाताई सबनीस कालच मुंबईहून आलेले आहेत ती दोघेही श्री पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या ' स्वाध्याय ' मंडळाची कार्यकर्ती आहेत शास्त्रीबुवांचे मच्छीमार लोकांतले कार्य आजवर ऐकून-वाचून होतो दूरदर्शनवर एकदा अल्पशी झलकही पाहिली होती आणि गेल्या आठवड्यात पार्ल्याला एके ठिकाणी त्यांच्या कार्यावर आधारित ' व्हिजन ॲन्ड व्हिजनरी ' नावाची सुंदर फिल्म पाहिली होती तिथंच सबनीसांची ओळख झाली दोन दिवसांनी घरी गेलो ओळख आणखी वाढली बोलता-बोलता सबनीस म्हणाले, " आमच्या स्वाध्यायाचे इकडले ५०-५५ सागरपुत्र आणि मत्स्यगंधा रत्नागिरीतल्या सागरपुत्रांमध्ये स्वाध्यायजागृती कामासाठी जाणार आहेत सात-आठ दिवस त्यांचे गट निरनिराळ्या किनारपट्टीवरल्या गावातून वाड्यावस्त्यातून फिरणार आहेत चला आमच्याबरोबर "

सबनीसकाकांनी निमंत्रणच दिले!

मला त्यांचं हे निमंत्रण निमित्ताला पुरलं रत्नागिरीची किनारपट्टी खुणावू लागली आठ-दहा वर्षांपूर्वीची आठवण सांगू लागली समुद्र तर

दोन्ही भुजा उभारून ' विठो पालवीत आहे ' अशा पवित्र्यात साद घालू लागला रक्ताला ती जाणवली सबनीसकाकाना म्हणालो, ' पुण्याला जातो नि तयारीनं दोन दिवसानी रत्नागिरीतच भेटतो "

तर अशी सबनीसाची-माझी ओळख ताजीताजीच

गीताभवनात आघोळ, चहा, नास्ता आटोपला आणि श्री व सौ सबनीसांसह बसअड्ड्यावर आलो तिथून जाकीमिऱ्याला जाणारी बस पकडून दहा-बारा किलोमीटरवरील जाकीमिऱ्याला पोहोचलो इथं मुबईकडील सागरपुत्रांचा एक गट दोन दिवसापूर्वीच पोचला आहे

जाकीमिऱ्याला श्री प्रतापराव सावंत याचा भलामोठा जुनापुराणा पण चागल्या स्थितीतला बगला आहे. प्रतापराव वस्तीला रत्नागिरीत असतात म्हणून बगला रिकामाच त्यांनी या सागरपुत्रासाठी मोकळा करून दिला स्वाध्यायाचे काम म्हणजे गीतेचे काम प्रतापरावाना भावले, आपलेच काम. ते गीताभक्त

या बंगल्यात पहिल्या माळावरल्या एका प्रशस्त खोलीतला एक कोपरा मी गाठला पथारी पसरली. या गटात पाच मत्स्यगंधा आणि तीन-चार सागरपुत्र आहेत माहिम, ठाणे, दादा, सातपाटी, सांताक्रूझ येथून आलेले आहेत

दुपारी बाळू सावंत आला जाकीमिऱ्यात बहुतेक सगळे सावंत आणि भंडारी मराठे सावंत नोकरीचाकरीत, तर भंडारी मच्छीमार व्यवसायातले

बाळू सावंतबरोबर जाकीमिऱ्यातून चक्कर मारली त्याच्या घरही गेलो चहा प्यालो त्याची आई फार अगत्यशील वाटली

मिऱ्यातली घरं नि रस्ते मजेदार लहान, अरुद, झाडीझुडपात लपलेले कुठे कुठे तर अंगण आणि रस्ता इतके बिलगून की त्याच्यातले निराळेपण कळतच नाही चढउतार तर पुष्कळच. एकही रस्ता सरळ सपाट नाही गावाच्या पुढे पूर्वेला खाडी, तर मागे पश्चिमेला खुला समुद्र- ' ओपन सी '

गावची वस्ती दोन-अडीच हजाराची बहुतेक घरटी तरणाताठा माणूस चाकरीसाठी मुंबईत वडीलधारी वृध्द मडळी इथं गावात

बाळूबरोबर खाडीच्या अगान फिरलो. कुठ गलबतांची दुरुस्ती चाललेली, तर कुठ स्मगलिंगमध्ये पकडलेली गलबतं, पडाव पडलेले दिसले

सूर्यास्ताच्या वेळी समुद्रकाठी वाळूवर गप्पा मारीत बसलो डाव्या

बाजूला समुद्रात घुसलेल्या डोंगरावर भवानी मंदिर दिसत होतं त्याच्या अलीकडं पाढरा समुद्र तिथली वाळू पाढरीशुभ्र म्हणून हे नाव मागच्या वेळी तिथं असलेल्या गेस्टहोऊसमध्ये मी दोन-तीन दिवस राहिलो होतो उजव्या बाजूच्या टेकाडावर सड्या मिऱ्या मी बाळूला विचारलं, ' हे मिऱ्या म्हणजे काय?'' तर बाळू म्हणाला, '' मिऱ्या म्हणजे मिरी '' या डोंगराला मिऱ्या म्हणतात मिऱ्या डोंगर त्याची एक गोष्ट आहे ''

'' कसली? ''

'' असं सांगतात की, लक्ष्मणाला जेव्हा शक्ती लागली आणि तो बेशुध्द पडला तेव्हा संजीवनी वनस्पती आणण्याचं काम मारुतीनं घेतलं गेला द्रोणागिरी पर्वतावर, पण तिथं दाट अरण्य झाडीच झाडी संजीवनी वनस्पती ओळखायची कशी? मारुतीला प्रश्न पडला मारुतीनं आख्खा द्रोणागिरीच उचलला आणि उडत निघाला मारुतीच तो! त्याला काय? जाता जाता धक्क्यानं म्हणा की सोसाट्याच्या वाऱ्यानं म्हणा, द्रोणागिरी पर्वतावरला एक मिरीएवढा खडा इथं या भागात पडला त्या मिरीएवढ्या खड्याचा हा झाला डोंगर, म्हणून याचं नाव मिऱ्या ''

'' अस्सं! म्हणजे मिरीवरून मिऱ्या! ''

'' हं ''

'' पण हे झालं डोंगराच्या जवळची गावं म्हणून भाटी मिऱ्या, जाकी मिऱ्या, सड्या मिऱ्या आणि त्याच्या पायथ्याशी मिऱ्या बंदर ''

'' अस्सं! ''

'' आणखी एक बरं का भाऊ, मारुती होता वानर, माकड तर या आमच्या भागात वानरं-माकडं अजिबात नाहीत दिसायचीच नाहीत इथं ती जगतच नाहीत त्यामुळे नारळी, पोफळी, फणस, आंबा कशालाही माकडाचा त्रास नाही ''

रात्री डाळ-भाताचे जेवण मत्स्यगंधानी रांधलेले वाढलेले जेवलो नि गप्पागोष्टी करत झोपी गेलो

**जाकी मिऱ्या : दि. १३ ऑक्टो १९९१**

सकाळी चहा-नाश्ता झाल्यावर सागरपुत्र नि मत्स्यगंधा भक्तिफेरीसाठी गावात निघाल्या. मीही त्यांच्याबरोबर गेलो या मंडळीत तसे कुणी फारसे शिकले-सवरलेले नाहीत पण शास्त्रीबुवाच्या जागृती

कार्यान त्याना जाग आलेली आहे महाराष्ट्र-गुजरातची किनारपट्टी स्वाध्यायी बनलेली आहे ही मडळी मुबईच्या परिसरातली व्यवसायान मच्छीमार माहिमचा रमेश पाटील जाळी विणण्याच काम करतो हरेश मागेला त्याच जमातीतला पण असतो साताक्रूझला बँकेत कृष्णाजी वारगोडे ठाण्याचे, काशीबाई वैद्य व दर्शना वैद्य या माहिमच्या सासू-सुना काशीबाईचा मुलगा हायस्कूलमध्ये शिक्षक आहे दहावीला इग्रजी शिकवतो मुलाच्या परीक्षा चालू आहेत म्हणून ते गुरुजी आले नाहीत दोन दिवसानी येणार आहेत त्याचा पाच महिन्याचा मुलगा मात्र आई-आजीबरोबर आला आहे पाच महिन्याचा मुलगा घेऊन त्या भक्तिफेरीत असतात घरोघर जाऊन स्वाध्यायाचा विचार पोचवतात रात्री देवळात होणाऱ्या भजनाला बोलावतात वासती, निर्मलाही आहेत

पांडुरगशास्त्रींनी यांना ' त्रिकालसध्ये ' ची सथा दिली आहे सकाळी उठल्यावर पृथ्वीवदन आदी श्लोक, दुपारी व रात्री जेवणाच्या आधी अन्नब्रह्माला वदन करण्याचे श्लोक, सकाळ-संध्याकाळ प्रार्थना, अशी एक शिस्त आहे हे श्लोक, स्तोत्रे सस्कृतातील आहेत सर्व मडळींना ते तोंडपाठ आहेत किनाऱ्यावरील हजारो सागरपुत्र ही सस्कृत-देववाणी दररोज उच्चारीत असतात मोठ्या श्रध्देने, भक्तिभावाने

कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती।
करमूले तु गोविंद, प्रभाते करदर्शनम्॥
समुद्रवसने देवी पर्वतस्तनमण्डले।
विष्णुपत्नि नमस्तुभ्य पादस्पर्श क्षमस्व मे॥
अहं वैश्वानरो भूत्वा प्राणीना देहमश्रित ।
प्राणापान समायुक्त, पचाम्यन्नं चतुर्विधम्॥
ॐ पूर्णमद पूर्णमिद पूर्णात पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमिवावशिष्यते॥
अविनयमपनय विष्णो
दमय मन शमय विषयमृगतृष्णाम्।
भूतदया विस्तारय तारय ससारसागरात्॥

**साखरतर-काळवादेवी दि. १४ ऑक्टो १९९१**

सबनीसकाकाबरोबर दुपारी साखरतर-काळबादेवी या गावाकड आलो मागच्या वेळी इकडे आलो होतो, त्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला

स्वाध्याय मडळींचे दोन गट इथे काम करत आहेत त्याना भेटलो दत्ताच्या देवळात ही मडळी राहात आहेत या गटातही मुबई-ठाणे परिसरातले सागरपुत्र आहेत

या व्यवसायातल्या काही मडळींना शास्त्रीबुवानी ' ब्राह्मण ' बनविले आहे त्याचा त्यानी एक कोर्स तयार केला आहे ही ब्राह्मण मडळी वेदमंत्र म्हणतात खणखणीत अस्खलित वाणीनं पुरुपसूक्त म्हणतात, असं ऐकलं याविपयीची अधिक माहिती घेतली पाहिजे महादेवभाई या मडळींचा म्होरक्या आहे शास्त्रीबुवांचा हा उजवा हात आहे ही सगळी मडळी शास्त्रीबुवाना दादा म्हणतात, दादाविपयी त्याच्यात नितांत आदरभावना दिसली दादांनी त्यांचं जीवन बदलून टाकलं आहे प्रगतिकारक परिवर्तन त्यांच्या आयुष्यात दादांमुळे घडून आले आहे ' पंचरंगी ' क्रांती झाली आहे ही मंडळी शांत असतात

" चला वीरांनो, ध्वज हाती घ्या, पंचरग क्रांतीचा ॥ " ही पंचरगी क्रांती कोणती, तर ह्या गीतात पुढे म्हटलेल आहे -

वैचारिक, आध्यात्मिक आणि अर्थाची क्राती, राजकीय, सामाजिक क्रांतीविना नाही मानवगती पाडुरंग स्वाध्याय मार्ग हा पंचरंगी क्राती

यातली बरीच मंडळी मासेमारी करतात त्यासाठी समुद्रावर जातात मासे विकतात हे विक्रीकार्य स्त्रियाच प्रामुख्याने करतात पण मासळी खात नाहीत सोडून दिल आश्चर्यच !

**जाकी मिऱ्या . दि. १५ ऑक्टो ९१**

सकाळ-दुपार भक्तिफेरीत सामील झालो त्यामुळे घराघरांतून जाता आले इथले लोकजीवन न्याहाळता आले लोकांशी बोलता आले

समुद्रावर सकाळ-संध्याकाळ फेरी टाकतोच आज भल्या सकाळीच लावलेली रापण ओढायचे काम चालले होते तिथेच थाबलो. मोठ्या कष्टान जाळ ओढलं जात होतं किनाऱ्यावर दोन तरुण कमरेला जाळ्याची दोन टोकं बांधून समुद्राकडं पाठ करून ओढत होते दोन-चारजणं गुडघाभर

पाण्यात होती दोन-तीनजण त्याच्याही पुढ होते सगळ्यांच्या चेहऱ्यावर केवढी उत्सुकता! हा क्षण उत्सुकतेचाच असतो जाळ्यात काय काय गवसलंय, किती किती गावलय सगळ्या आशा जाळ्याशी बांधलेल्या जाळे खेचून झाले माकुल जातीचे मासे गावले होते मंडळी माकुलवर फारशी खूप दिसली नाहीत.

गावच्या रस्त्याकडेला काही महिलांनी मच्छीबाजार मांडलेला पाहिला निरनिराळे मासे होते खेकडे होते. कालवं होती माशात एक मोठा रंगीत मोरपिसाच्या रंगासारखा रंगीत मासा दिसला त्याचं नाव म्हणे 'करिग' सौंदडे, वाकस, वेकरू मासेही होते

**सड्या मिऱ्या दि. १६ ऑक्टो. ९१**

जाकी मिऱ्यापासून सड्या मिऱ्या पधरावीस मिनिटांच्या रस्त्यावर, पण चढणीवर चढण चढताना उजव्या बाजूला पसरलेला समुद्र दिसतो थोडं वर चढल म्हणजे चढणीच्या पायथ्याशी मिऱ्या बंदर दिसतं समुद्रावर काही गलबतं होती चढण सोडून उतारावरून पायवाटेने समुद्रतटी गेलो पाहात राहिलो निवांत, शात, छान वाटले

मग पुन्हा चढण चढून वर गेलो सड्या मिऱ्या गावात पोचलो गाव कसले वाडीच पण त्याहीपेक्षा मला झाडीतल्या तुरळक बैठ्या घराची निवृत्त पेन्शनर कॉलनीच वाटली एकदम शात जवळ जवळ निर्मनुष्य रस्ते, वळणावळणाचे, चढउताराचे गावात दुकान दिसले नाही की बसच्या थांब्याजवळ चहाचं हॉटेलही दृष्टीस पडलं नाही

'नवलाई-पावलाईचं' मंदिर मात्र जुळ्या बाधणीच छान आहे रंगवलं आहे स्वच्छ आहे शात शांत आहे इतकं शांत की नवलाई-पावलाई माणसांची वाट पाहात आहेत, पण माणूस फिरकतच नाही, असं वाटलं काही हवं असेल तेव्हा माणूस देवळात येणार, एरवी कशाला वळणार? गुरवाचं पोट त्यावर, म्हणून तोच तेवढा नियमानं येतो-जातो

सड्या मिऱ्या मला तिथल्या हिरव्यागर्द झाडीन आणि सथ शालीनतेन आवडलं

**जाकी मिऱ्या: दि. १७. ऑक्टो. १९९१**

सकाळी समुद्रावर गेलो तेव्हा 'भुऱ्या'नं चाललेली मत्स्यशिकार

दिसली भुऱ्या म्हणजे मासळी पकडण्याचाच एक प्रकार छोटी रापणच!

पेडणेकर भेटला तो सागत होता, "ही बघ पगार एक लहानस होडकं लाटांवर डुलत डुलत चाललेलं होतं एकजण उभा राहून बांबूच्या वल्ह्यानं त्यावर नियंत्रण ठेवत होता पेडणेकरान मग 'बोटला', 'लॉंच', 'कोटा' आदी मच्छीमारीसाठी वापरत असणाऱ्या जलवाहनाची माहिती सागितली

दुपारी आमच्या गटातल्या वासतीनं व निर्मलान मला त्याची काही गाणी म्हणून दाखवली त्यात काही होळीच्या वेळी तर काही गणपतीच्या वेळी म्हणायची होती

सोड सोड रावणा रामाची सीता
नाही सोडली तर लका जळेल
लंका जळेल, दौरवाई जळेल
चिंचेचा पाला चिंचेवरी
आणि रामाच लक्ष सीतेवरी
जोय जा, जोय जा!

पार्वतीनं अंगावरच्या मळाचा गणपती राखणीला बसवून ती आघोळीला गेली, ही कथा एका गाण्यात आहे, तर मृग नक्षत्राचा मान मिळवलेल्या हरिणीची गोष्ट एका गीतात गुंफलेली आहे

दुसऱ्या एका गाण्यात पोटासाठी लांब दूर गेलेल्याची खत, काळजी आहे.

आई म्हणे माझा पोसणार गेला
बापुस म्हणे माझा पोसणार गेला
भाकरी घेऊन डोंगरी गेला
डोंगरी गेला..
अर्धा मासा हसाला दिला
जोय जा जोय जा!
शेजारी म्हणे माझा वैरी गेला
गावकरी म्हणे माझा मित्र गेला

भाकरी घेऊन डोंगरी गेला
डोंगरी गेला
जोय जा, जोय जा !

लोकगीताची सरळ सोपी भाषा, तितकीच सरळ भावनांची अभिव्यक्ती आणि मंजुळ स्वर नि लय ! ही गीत ऐकताना गोड वाटली !

■ ■ ■

# ठाण्याच्या किनारपट्टीवर

पुनर्जन्म, त्याची भलीबुरी फळ, देवाघरचा निवाडा असल्या गोष्टी खऱ्या की खोट्या? माहीत नाही त्या प्रांतात गती नाही मती नाही त्याचीही क्षिती नाही

पण कधी कधी घडत मात्र अस की, बुध्दी 'नाही- नाही' म्हणत असतानासुध्दा पूर्वसंस्कार, भावना, श्रध्दा अशा कशामुळे तरी 'आहे-आहे' अस म्हणण्यापर्लीकडे मनाचा कल झुकू लागतो

सांगायचं कारण असं की, सात-आठ महिन्यापूर्वी असंच काहीस घडून आलं

ध्यानीमनी नसताना गोविंदराव शिंदे भेटले बऱ्याच दिवसानी गोविंदराव सेवादलातले, सर्वोदयातले जुने मित्र अलीकडे पनवेलजवळ नेरे गावानजीक 'शांतिवना'त कुष्ठरोग्याच्या सेवेत असतात बोलता-बोलता रत्नागिरीस, त्याआधी केलेल्या किनारपट्टीवरच्या भ्रमंतीच्या आठवणी जाग्या होतात, नि मी म्हणून जातो, "गोविंदराव, ठाण्याची किनारपट्टी पाहायची आहे भटकायच आहे"

जेमतेम आठच दिवसानी गोविंदरावाच पत्र हाती आलं होत ते लिहितात, "ठाण्याच्या किनारपट्टीवर हिंडण्याची, मच्छीमारांशी बोलण्याची वगैरे सगळी व्यवस्था झाली आहे श्री तुळशीराम तांडेल हे आमचे कथामालेचे एक चांगले कार्यकर्ते आहेत मुरब्याला असतात ते तुम्हाला सगळीकड घेऊन जातील अट एकच, ठिकठिकाणच्या शाळांमधून तुम्ही मुलाना गोष्टी सागायच्या तुमच्या कथाकथनाचे कार्यक्रम ते ठरवतील तर

केव्हा येता सागा काही दिवस मीही तुमच्याबरोबर राहीन "

छान। तर हे अस जमून आल समुद्र, मासे नि माणसं याची पुन्हा एकदा जवळीक लाभणार याचा आनद झाला

मी, प्रयाणाचा दिवस, सोयीसवडीन ठरवला बाधाबांध, फारशी नाहीच, पण गरजेपुरती केली मुबईला गेलो ठरल्याप्रमाणं तांडेलांची धाकटी बहीण छाया मला मुरब्याला घेऊन गेली दिवेलागणीला एस्टीतून उतरताच तुळशीदासजी भेटले उच, तगडा, काळा पण चकचकीत नजरेचा, सौम्य, हसरा तरूण म्हणाला, " आधी चहा घेऊ, चला! "

टपरीवजा हॉटेलच्या बाहेर बाकड्यावर बसून कढत कढत चहा प्यालो घुटके घेता घेताच सभाषण झालं त्यातून परिचयाचे धागे जुळू लागले मैत्रीचे जाळे पुढल्या काही दिवसातल्या सहवासात विणले गेले

**मुरबे १९ नोव्हेंबर १९९१**

दिवस मुरब्यात तांडेलाच्या घरात उजाडला रात्री आलो भात-कालवण जेवलो आणि पुढचा कार्यक्रम ठरवून, गप्पागोष्टी करीत, मासळीच्या परिमळात झोपून गेलो तसा हा मत्स्यगध मुरब्यात आलो तेव्हापासूनच घ्राणेंद्रियात घुसला होता

तांडेलाचे घर नवीन बाधणीचे, सोयीचे आहे त्याच्या घरी वृध्द वडील, आई, दोन धाकटे भाऊ व बहीण राहतात आणखी दोन भाऊ नोकरीनिमित्त अधेरीला राहतात तुळशीदासजी पचविशीतले बजरंगबली आहेत डाय, मोल्डिंग, फिटिग यात त्याना रस आहे एका खोलीत या व्यवसायाची मशिनरी, अवजारे दिसली हाच त्याचा व्यवसाय आहे, पण समाजसेवा, विधायक कार्य या, व्यवहारी जाणत्याच्या मते अव्यवहारी कार्यात, लष्करच्याच भाकरी भाजण्यात, त्यांना विशेष रस आहे

तुळशीदासजी 'तांडेल' खरे, पण आता आडनावापुरतेच वडील वृध्द झाले समुद्रावर जाण सोडल तांडेलाचं गलबत किनाऱ्यालाच थाबल मुलं शिकलीसवरली नोकरीचाकरीला लागली समुद्राकड वळली नाहीत मच्छीमारीत रमली नाहीत

गप्पागोष्टी करताना मी बाबा तांडेलांना विचारल, " मच्छीमाराची मुल-मुली आता शिकली आहेत ना? "

" पुष्कळ बहुतेक पोरं शाळेत जातात कॉलेजातही जातात बी ए

झालेत  वकील, डॉक्टरसुध्दा झालेत  एमआयडीसीत, कारखान्यातून, ऑफिसातून कामाला लागलेत ''

'' घरच्या मच्छीमारीच्या धद्यात राहिले नाहीत  पोशाखही साहेबी झालेत ? '' मी विचारल

'' तसही आहेच, पण मच्छीमारीत शाश्वती नाही  कधी डबोलभर मिळल, तर कधी नाही  कमाईच्या मानानं कष्ट फार  आणि धोका रोजचाच  वारा  वादळ  पाऊस  या त्रासापेक्षा नोकरी सुखाची, कायमची '' ताडेलबाबानी सागितल

मी मनाशी म्हणालो,  मग शिक्षण, मच्छीमारीच्या संदर्भात उपयोगी, फायदेशीर की तोटयाच ? '

तर तांडेलाच्या घरात कालवणाला मच्छी आहे, पण मच्छीमारी व्यवसाय म्हणून राहिलेला नाही  बद केलेल्या मच्छीमारीतल्या नायलॉनचं जाळ, धागे, दोर, टोपल्या अशा काही खाणाखुणा दिसताहेत

तांडिलांच्या घरापुढच राममदिर आहे  नवं, छान, मोठं आहे  मदिरातील मूर्तीही सुदर, देखण्या, प्रसन्न आहेत  मदिरापुढं प्रशस्त प्रांगण आहे  पहाटेपासूनच मंदिरातून भजनाची धून कानी येत होती  प्रागणाच्या एका कडेला, काही मच्छीमार मडळी, नव जाळं विणत बसली होती  काहीजण जुनी जाळी, तुटलेला भाग, सांधत होती  प्रांगणातही एकदोन जाळी पसरलेली होती  मासळी नव्हती, पण आजूबाजूला सुकत घातलेल्या मासळीचा उग्र दर्प होता  गमतीनं मनाशी म्हणालो, ' राम शाकाहारी की मत्स्याहारी ? सूर्यवंशी क्षत्रिय कुळातील हे राजघराण होत, तेव्हा सक्तीचा शाकाहार नसण्याचीच शक्यता !  तरी अस लक्षात आल की राम हा ज्या विष्णूचा सातवा अवतार त्या विष्णूचा प्रथमावतारच मुळी मत्स्य होता ! वैदिक वाङ्मयात अवतारकल्पना मानलेली असून दशावतारही सांगितलेले आहेत  त्याचा सभव केव्हा, कसा, कुठ, कशासाठी - याचीही माहिती पुराणांतून दिलेली आहे  प्रलयकारी मनूनं आपल्या नौकेचा दोर एका माशाच्या शिंगाला बाधला आणि त्या माशान मनूच प्रलयकालात संरक्षण केल, अशी कथा शतपथब्राह्मणात दिलेली आहे  या कथेवरून पुढ मत्स्यावताराची कल्पना सुचली असावी, अस अनुमान भारतीय सस्कृतिकोशात व्यक्त केलेलं आहे

झालेत वकील, डॉक्टरसुध्दा झालेत एमआयडीसीत, कारखान्यातून, ऑफिसातून कामाला लागलेत ''

'घरच्या मच्छीमारीच्या धंद्यात राहिले नाहीत पोशाखही साहेबी झालेत ? '' मी विचारल

''तसही आहेच, पण मच्छीमारीत शाश्वती नाही कधी डबोलभर मिळंल, तर कधी नाही कमाईच्या मानानं कष्ट फार आणि धोका रोजचाच वारा वादळ पाऊस या त्रासापेक्षा नोकरी सुखाची, कायमची ' तांडेलबाबानी सांगितल

मी मनाशी म्हणालो, मग शिक्षण, मच्छीमारीच्या संदर्भात उपयोगी फायदेशीर की तोटयाचं ? '

तर तांडेलांच्या घरात कालवणाला मच्छी आहे, पण मच्छीमारी व्यवसाय म्हणून राहिलेला नाही बंद केलेल्या मच्छीमारीतल्या नायलॉनच जाळं, धागे, दोर, टोपल्या अशा काही खाणाखुणा दिसताहेत

ताडेलाच्या घरापुढच राममदिर आहे नव, छान, मोठ आहे मदिरातील मूर्तीही सुदर, देखण्या, प्रसन्न आहेत मदिरापुढ प्रशस्त प्रांगण आहे पहाटेपासूनच मदिरातून भजनाची धून कानी येत होती प्रागणाच्या एका कडेला, काही मच्छीमार मंडळी, नव जाळं विणत बसली होती काहीजण जुनी जाळी, तुटलेला भाग, सांधत होती प्रागणातही एकदोन जाळी पसरलेली होती मासळी नव्हती, पण आजूबाजूला सुकत घातलेल्या मासळीचा उग्र दर्प होता गमतीनं मनाशी म्हणालो, 'राम शाकाहारी की मत्स्याहारी ? ' सूर्यवंशी क्षत्रिय कुळातील हे राजघराणं होत, तेव्हा सक्तीचा शाकाहार नसण्याचीच शक्यता ! तरी असं लक्षात आल की राम हा ज्या विष्णूचा सातवा अवतार त्या विष्णूचा प्रथमावतारच मुळी मत्स्य होता ! वैदिक वाङ्मयात अवतारकल्पना मानलेली असून दशावतारही सांगितलेले आहेत त्याचा सभव केव्हा, कसा, कुठ, कशासाठी - याचीही माहिती पुराणातून दिलेली आहे प्रलयकारी मनूनं आपल्या नौकेचा दोर एका माशाच्या शिंगाला बाधला आणि त्या माशानं मनूचं प्रलयकालात सरक्षण केल, अशी कथा शतपथब्राह्मणात दिलेली आहे या कथेवरून पुढं मत्स्यावताराची कल्पना सुचली असावी, असं अनुमान भारतीय सस्कृतिकोशात व्यक्त केलेल आहे

सकाळी सर्व आटोपून तुळशीदासजींबरोबर बाहेर पडलो मुरबे गाव पूर्वेस खाडीच्या काठी पसरट वसलेलं आहे पश्चिमेला जवळच अरबी समुद्र आहे जवळपास १०-१२ हजार लोकवस्ती आहे बहुसख्य मच्छीमार मच्छीमारांचच गाव खाडीच्या पलीकड आहे सातपाटी सातपाटी व मुरबे ही गावं म्हणजे ठाण्याच्या किनारपट्टीवरील मच्छीमार व्यवसायाची फार मोठी केन्द्रं मुरबे तिन्ही बाजूंनी पाण्यान वेढलेलं आहे

गावचे पूर्वीचे वृद्ध सरपच पाटील थकलेभागले आहेत त्यांच्या घरी गेलो विचारल, "तुमच्या या गावाला मुरबे हे नाव कसं पडल? याची काही आख्यायिका आहे का?"

पाटील म्हणाले, ' गावात आसपास मुरबाड जमीन जास्त, त्यावरून गावाला 'मुरबा' म्हणू लागले पुढं मुरबाच मुरबे झालं "

पण दुसऱ्या एकान सागितलं, "गावाला लागूनच 'मोरपाडा' नावाचा भाग आहे तिथं पूर्वी दाट झाडी होती झाडीत पुष्कळ मोर होते त्यावरूनही अपभ्रंश होत होत मुरबे नाव रूढ झालं "

पाटील म्हणाले, ' मुरब्याचा ग्रामदेव आहे 'मैल्यादेव' प्रत्येक वर्षी मैल्यादेवाला त्याचा मान द्यावा लागतो मैल्यादेव दूध पितो, पण त्याच्या बरोबरच्या भुतावळीसाठी बकरी, कोबडी द्यावी लागते मैल्यादेवाला नवस बोलणारे अशाच रीतीने नवस फेडतात मैल्यादेवाची स्वारी रात्रीच्या वेळी पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन मागपुढ मेंढरं आणि भुतावळ असा लवाजमा घेऊन फेरफटका मारीत असते गावाचं संरक्षण करते. मच्छीमारीला बरकत देते समुद्रावर साभाळते, अशी गाववाल्यांची श्रद्धा आहे

"बारसावीर, अर्जुनवीर, पांडूवीर अशी अन्य ग्रामदेवतंही आहेत. तीही आपला आपला मान घेतात गावचं रक्षण करतात कुणाकुणाच्या अगात त्यांचं वार येतं त्यावेळीही बोकड, कोंबडीचा मान द्यावा लागतो मान दिल्यावर गावकरी मोठ्यानं ओरडून बजावतात, 'तुमचा मान तुम्हाला दिला होऽऽऽ वीरानो, आता आमच रक्षण करा!' "

छूमंतरवाल्या अंधश्रद्धा तर या समाजात पुष्कळच मूळ धरून बसलेल्या त्यामुळ आजारपणात वैद्यापेक्षा वैदूंचीच चलती जास्त! पण आता वाढत्या शिक्षणाबरोबर अंधश्रद्धेची ही खुळ कमी व्हायला लागली आहेत

मच्छीमार समाजात या खुळांचं प्रस्थ माजल त्याला देखील कारण

आहे व्यवसायातील असुरक्षितपणाची जाणीव रात्रदिवस समुद्रावरच राहायचं, खपायच, केव्हा काय होईल सागता येत नाही गेल्याशिवाय तर तरणोपाय नाही समुद्रावर गेलेल्या पुरुपाचा सदैव जीव धोक्यात नि घरी राबणाऱ्या बाईचा जीव घोरात गेलेला पुरुप सुखरूप परत येईल की नाही ?

एकान सांगितल, "या काळजीन, कष्टानं व घोरान वैतागलेल्या, त्रासलेल्या बाया कधी कधी या धद्याला लाखोलीही वाहतात स्त्रियाच जीवन फार फार कष्टाच पुरुष मासळी आणून टाकतो ती किनाऱ्यावरून वाहून आणायची, विकायची, राहिलेली सुकवायची, आणि तीही वेळच्या वेळी कारण वेळ गेला, उशीर झाला तर नासण्याची, सडण्याची भीती माल नाशवंत, खराब होणारा "

एकदा रात्रीच उठलो, तर समुद्राच्या बाजून अधारात जळते टेंभेच टेंभे दिसले ! काय आहे कळेचना तसाच पुढे घुसलो, तर दिसले, मच्छीमार बाया मालानं भरलेल्या जड जड टोपल्या चिखलपाणी तुडवीत अंधारातून टेंभ्यांचा उजेड करून वाहून आणताहेत आणलेला माल निवडताहेत सुकवण्यासाठी वलाडणावर लावताहेत दिवस, ऊन, थंडी, पाऊस, रात्र, अपरात्र-काहीच धरबध नाही काळवेळ नाही गलबत किनाऱ्याला केव्हा लागेल निश्चिती नाही पुन्हा घर, मुल, स्वैपाकपाणी सगळी कामं आहेतच जीव वैतागणारच कातावणारच

अशा वेळी ज्या कुणा एकान 'निवटी' खाल्ल्यामुळ हा कष्टाचा, धोक्याचा धदा कपाळी आला, म्हणून त्या कुणा एकाला त्राग्यानं बोल लावतात

त्याची कथा अशी सांगतात की, फार पूर्वी आजच्या मच्छीमारांचे पूर्वज राजेशाही जीवन जगत होते पूर्ण शाकाहारी होते अभक्ष्य भक्षण करीत नव्हते, पण त्या कुणाएकानं एकदा निवटी मासा खाल्ला आणि चवीन सोकावला त्याच्यामुळ दुसरा, तिसरा काही दिवसांनी सगळा समाज सोकावला मग नशिबात मच्छीमारीचा धंदा आला !

हे झालं वैतागाचं, त्रासलेल्या वेळचं बोलण पण खर निराळच आहे आईच्या मायेसारख, रागावलेल्या वेळी, सतापाच्या भरात आई जशी पोटच्या पोराला मेल्या, कारट्या म्हणते, पण मन निवल्यावर पोटाशी

घेऊन प्रेमवात्सल्यान मुके घेते, कुरवाळते, तसंच ! समुद्रावर त्याचं अपरपार प्रेम, जिव्हाळा, आस्था, आदर, आधारदैवतच !

मुरबे गाव लहान लहान रस्त्याच बोळकडींच बैठ्या, लहानसर घरांच अलीकड मात्र आधुनिक पद्धतीची कॉंक्रीटची मोठी मोठी घरं उभी ठाकलेली आहेत अशा काही घरात गेलो, बसलो, बोललो, एकदोन ठिकाणी जेवलोही घर आतूनही आधुनिक साजानी सजविलेलं कोच, दिवाण खुर्च्या, छान छान कपाट, टी व्हीं, फ्रीज व्यवस्थित काही ठिकाणी फोनसुद्धा उगवत्या पिढीतली तरुण माणसंही वेशभूषेन आधुनिक बनलेली तरुण आता पँट व बुशशर्टात, तर तरुणी गोल साडीत नि पजाबी ड्रेसात दिसतात मावळत्या पिढीतली पिकली माणस मात्र त्याच्या पारपरिक वेपात आढळतात पुरुप मडळी कमरेला त्रिकोणी रुमाल बाधलेली, उघडी किंवा सदरा घातलेली, तर स्त्रिया गुडघ्यापावेतो घट्ट कासोटयाची लुगडी नेसलेल्या एका पोक्त महिलेला मी विचारल, "अशा नेसणपद्धतीला काय म्हणता तुम्ही ? " तर ती म्हणाली, "खास नाव नाही, पण 'चड्डी-साडी' म्हणता येईल " आणि तिनच पुढं स्पष्टीकरण दिल, "आम्हा बायाना रात्रदिवस चिखलापाण्यात राबावं लागत माड्याइतक्या पाण्यातून जाव-याव लागत तर अशा साड्या नेसण बरं पडतं " पुरुपाच्या कमरेला रुमाल लावण्यातला उद्देशदेखील हाच व्यवसायानुकूल अशी ही वेपभूपा, सोयीची, सुटसुटीत पण ती व्यवसायापुरतीच, कामाच्या वेळेपुरतीच राहिली नाही, तर ती कायमचीच झाली घरात, गावात, बाजारात, देवळात, प्रवासात सगळीकडचीच पुढ रुमाल लावलेल्या पुरुपाचे मागे उघडे कुल्ले दिसले तरी त्याचे त्याना काही वाटत नाही इथं पाहाव तर नग्न-लज्जेची भावनाच नाही जाणीवही नाही

काही समाजात जुन्या रूढीनुसार जुन्या स्त्रिया चोळ्या घालतच नाहीत माडिया गोंडाच्या स्त्रिया कमरेला फक्त फडक गुंडाळतात तथाकथित शहरी सस्कृतीवाल पोशाखी मन ते पाहून चरकत, पण त्यांच्या गावीही त्यांचं उघडेपण नसत धरतीची लेकर खरीच !

दुपारी शाळेत त्या परिसरातल्या शिक्षकाचा मेळावा होता मला बोलावलं गेलो भापण ठोकल मुलांना गोष्ट सांगितली गाणी म्हटली मजाच मजा !

तिथंच सातपाटी-नवापूरचे एक शिक्षक भेटले तिकड तर उद्याच

जायच आहे तुळशीदासजींनी त्यांच्याशी बोलून घेतलं निरोप धाडले शाळेतील कार्यक्रम नक्की केले

**सातपाटी २० नोव्हेंबर १९९१**

सकाळी लौकरच मुरबेहून सातपाटीकड निघालो सातपाटी खाडीच्या पलीकडं गाव ओलाडून खाडीच्या पात्रात आलो रेती तुडवीत निघालो ओहोटीची वेळ होती भरलेली खाडी ओसरत होती तरीही पुढ बरच पाणी होतं मुरबे-सातपाटी खाडी ओलांडण्यासाठी मोठी इंजिनची होडी-लॉंच आहे तिचे हेलपाटे चालूच असतात ओहोटीमुळं होडी पाण्यात थोड्या अंतरावर थांबली होती गुडघ्या-मांड्याइतक्या पाण्यातून जाव लागल होडीतून निघालो काही अंतरावरच सातपाटीचा धक्का होता धक्क्यावर किती तरी गलबत तरंगत होती त्यावर लावलेली हिरवी, पिवळी, निळी तांबडी अनेक रंगीत निशाण, बावटे वाऱ्यावर फडफडत होते येणाऱ्या-जाणाऱ्या माल वाहून नेणाऱ्या माणसाची वर्दळ बरीच होती धक्का गजबजून गेलेला होता

सातपाटीचा धक्का, धक्क्यावरून होणारा मत्स्यव्यवसाय नि गाव मोठ आहे सात पाट वाहतात किंवा वाहात होते, म्हणून गावाला नाव मिळालं ' सातपाटी '

बाजारपेठेतून, मंडईतून जाताना जत्रेसारखी गर्दी भेटली बाजार फुलून गेलेला होता गमत अशी की, बाजारात देवघेव करणारांत महिलाच सख्येन फार दिसल्या पुरुप त्यामानान कमी याच कारण असं की, भल्या पहाटेलाच किंवा त्याआधी उत्तररात्रीसुद्धा पुरुषमंडळी मच्छीमारीसाठी गलबतातून समुद्रावर गेलेली असतात ती कधीतरी दुपारी, बहुधा सध्याकाळी परततात परतल की, आणलेली मासळी, याला ' कॅच ' म्हणतात, स्त्रियांच्या ताब्यात देऊन मोकळी होतात थकूनभागून गेलेली असतात गारठ्यात, पाण्यात, वाऱ्यात राबलेली असतात ताडीमाडी रिचवून पडून जातात पुन्हा रात्री-अपरात्री उठून कष्टायला चालू लागतात घर, ससार, प्रपंच, त्यातल्या उस्तवारी उपसायला त्यांच्याकडं वेळच नसतो घर-संसार थाटूनही तो घराबाहेरच बहुतेक वेळ असतो मग मांडलेल्या घराची, प्रपंचाची उस्तवारी स्त्रियानाच करावी लागते त्यामुळ मच्छीमार गावातून, मोहल्ल्यातून स्त्री-राज्यच दृष्टीस पडतं अगावर पडलेल्या जबाबदारीमुळं उघड्या जगाचा

अनुभव जो तिला मिळतो, त्यातून बरचस व्यवहारी शहाणपण तिच्या गाठी जमलेलं असत ती धीटनीटही असते स्त्रीचं अबला हे रूप इथ दिसत नाही, ती प्रबला दिसते इतकच नाही, तर तिरक्या नजरेन पाहणाऱ्याच्या वाट्याला ती बला होऊन येते! ती हुशार, वस्ताद असते, व्यवसाय नि जबाबदारी यामुळ तिलाही घराबाहेर पडावंच लागतं

एकदा एके ठिकाणी मला एक स्त्रीमुक्तीच कार्य करणाऱ्या स्त्री-कार्यकर्त्या भेटल्या मी म्हणालो, "अहो, इथ तर स्त्री मुक्तच दिसते घराबाहेर तर तिला सक्तीनच पडाव लागत आर्थिक व्यवहार बव्हशी तिच्याच हातात दिसतो"

अस जरी दिसलं, असल तरी मच्छीमार स्त्रीदेखील अज्ञान, रूढी, रीतिरिवाज, धर्म, कर्म व अधश्रद्धा, अशा कितीतरी प्रकारच्या बंधनात अडकलेलीच आहे

सातपाटी हे मच्छीमारीचं मोठं केन्द्र असल्यान व्यवसायाला साहाय्यभूत अशा दोन मोठ्या सहकारी सोसायट्या इथं आहेत एक आहे 'सातपाटी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित' - ही आहे १९४४ साली स्थापन झालेली, तर दुसरी आहे 'धी सातपाटी फिशरमेन्स सर्वोदय सहकारी सोसायटी लिमिटेड' हिची स्थापना १९४७ साली झालेली आहे दोन्ही सोसायट्या मोठ्या आहेत त्याच्या इमारती आहेत व्यवहारही मोठा आहे दोन्ही ठिकाणी गेलो पदाधिकाऱ्यांना भेटलो बोललो त्याच्या कार्याची माहिती करून घेतली पहिल्या सस्थेच्या १९९०-९१ सालच्या सत्तेचाळीसाव्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे "अहवाल-सालची सभासद संख्या एकूण १८६२ झालेली आहे एकूण सभासद भाग भाडवल रु ५,५०,०८०/- चे झालेले आहे अहवाल-वर्षात सस्थेने मच्छीमार सभासद बाधवाना धंद्योपयोगी अशा साहित्याची- उदाहरणार्थ, डिझेल, तेल, मोबाईल, रंग, नायलॉन, गारफील दरी, मोनोफिलामेंट जाळी, डाबर, चंद्रुस, थर्माकोल, पत्रा, केरोसीन इत्यादी- नियंत्रित दरात विक्री केली आहे अहवाल-सालात औद्योगिक मालाची खरेदी एकूण रुपये ४३,६९,०९८/- ची होऊन, विक्री रु ४५,६०,९२३/- ची झालेली आहे सस्थेचे स्वस्त धान्य दुकान, बर्फ कारखाना, शीतगृह, ट्रक व टँकर, बोट कारखाना आदी विभागही कार्यरत आहेत"

दुसऱ्या 'धी फिशरमेन सोसायटी' च्या सन १९९०-९१ सालच्या ४४व्या वार्षिक अहवालात नमूद केलेल आहे "अहवाल-सालात एकूण २७६२ सभासद झाले एकूण भाग भाडवल रु ७,६३,९६०/- झाले आहे याही संस्थेचे स्वस्त धान्य दुकान, लाकूड विभाग, औद्योगिक साहित्य विभाग, मीठ प्रकल्प, ताजी मासळी विभाग, डिझेल विक्री, आदी विभाग कार्यरत आहेत गरजू गरीब व विकासशील प्रयत्नवादी मच्छीमाराना सोसायट्यांच्या मार्फत अर्थसाहाय्य मिळवून दिले जाते आपत्काळी, मदतीसाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी, मच्छीमार अभ्यासासाठी, स्वतंत्र निधीची व्यवस्था आहे दोन्ही संस्थांचा बर्फनिर्मितीचा कारखाना आहे मासळी नाशवंत माल असल्यामुळे त्याच्या टिकाऊपणासाठी बर्फाची आवश्यकता असते शीतगृहाचीही असते पुष्कळशी मासळी परदेशीही जाऊ लागली आहे प्रॉंज, लॉफ्टर, पॉम्फ्रेटस्, आदी जातींच्या माशाना निरनिराळ्या देशांतून बरीच मागणी आहे ही मासळी बर्फात गोठवून निर्यात केली जाते"

शासनाचे मत्स्यव्यवसाय शिक्षण केंद्र सातपाटीत आहे या केंद्रात जाऊन आलो प्रमुखांना भेटून माहिती घेतली या व्यवसायात नव्यान येणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना मच्छीमारीच्या सदर्भात सर्व प्रकारचं शिक्षण इथ दिल जात यासाठी शासनान एक अभ्यासक्रमही तयार केलेला आहे

सातपाटीहून जवळच असलेल्या शिरगावलाही जाऊन आलो सातपाटीची गजबज शिरगावात नाही समुद्रकाठी शात, टुमदार वसलेल गाव मला आवडल हायस्कूलमध्ये गेलो गोष्ट सांगितली शाळाही समुद्रकाठी मस्त मोकळी खारी हवा सुरूची झाड, मऊ मऊ रेती, अथांग निळा समुद्र शाळा अशाच निसर्गरम्य ठिकाणी असाव्यात, मुलाच शिक्षण निसर्गाच्या सान्निध्यात व्हायला हव मोठमोठाल्या शहरातल्या गिचमिड गर्दीच्या शाळाहून अशा शाळा किती छान! किती सुदर!

समुद्रावर गेलो चक्कर मारली ताजातवाना बनलो!

मुरब्याला परतलो तेव्हा भरती होती सकाळी तुडवलेलं वाळवट पाण्याखाली होत

रात्री तुळशीदासजी म्हणाले, "उद्या पहाटेलाच ट्रॉलर निघणार आहे चौकशी करून आलो आपल्याला समुद्रावर जायचं आहे?"

" सुमद्रावर ? दिवसभर ? "

" दिवस जाणारच सध्याकाळपर्यंत परत येऊ "

" वा ! मग मज्जाच आहे की ! "

रात्री खुपीत झोपलो

**समुद्रावर : दि २१ नोव्हेंबर १९९१ ·**

पहाटेपूर्वीच्या काळोखातून निघालो मुरब्याच्या धक्क्यावर आलो गलबत पाण्यात लाब नागरलेलं होतं म्हणून एका छोट्याशा होडक्यातून तिथवर गेलो अधारातच मिणमिणत्या दिव्यात समुद्रावर मच्छीमारीसाठी निघण्याच्या तयारीत असलेल्या गलबतावरची हालचाल वाढलेली होती मी इजिन केबिनवर चढून बैठक मारली दूरवर नजर टाकली, तर पहाटेचा समुद्र जागा होत होता पाणी काळसर, पण धावच्या लाटांचा पाढरा फेसाळ धिंगाणा, गर्जत चाललेलाच होता बोटींबोटीवर निघण्याची तयारी चाललेली होती बोलण्याचे हाकाऱ्याचे आवाज अंधारातूनच येत होते

मच्छीमारीसाठी निघायचे तर ' जाळी, दोर, बाबू, ह्या अवजारांपासून ते इजिनासाठी डिझेल व माणसासाठी पिण्याच्या पाण्यापर्यंत सर्व घ्यावे लागते ' समुद्री चहूकडे पाणी, पिण्याला थेंबही नाही ' अशी अवस्था

निघता निघता फडफटले निघण्याची वेळ झाली समुद्रावर निघण्याच्या नि परतण्याच्या वेळा समुद्रच ठरवीत असतो समुद्रच घड्याळ ! भरती-ओहोटीवर सारे अवलबून भरती-ओहोटीच्या वेळा त्या त्या तिथीनुसार ठरलेल्या मच्छीमारांना अनुभवातून हे सगळ कळलेल, पाठ झालेल

इजिन धडधडू लागलं नि आमची ' हिरण्य ' नामक नौका निघाली पाणी कापत नौका पुढं पुढ चालली तसा मुरब्याचा धक्का माग मागं पडत होता किनारा आता हळूहळू उजळत होता आकाशाच्या पूर्वकडा ताबड्या दिसू लागल्या होत्या त्याचा लालसर प्रकाश समुद्राच्या पाण्यावर उमटू लागला होता

समुद्र तसा बराच शांत शात होता साखरझोपेतून जागा होत होता लाटाचा धिंगाणा म्हणावा तसा, तेवढा नव्हता खळखळाट होता, तो आमच्या हिरण्य नौकेच्या पाणी कापणीचाच नौका पुढं जात होती समुद्रात घुसत होती, आणि दोन्ही बाजूना, मागं पाण्याचा खळखळाट चाललेला होता. .

नौका पुढं पुढं जात होती दिवस हळूहळू वर येत होता किनारा पुसट होत होत माग पडत होता झाडाच्या छायाच दिसत होत्या आणखी काही वेळान धूसर शेंडेच दिसू लागले होता होता क्षितिजाआड झाले काहीच दिसेनासे झाले भूमी दृष्टीआड गेली नाही म्हणायला दूरवरच्या डोंगरकडांची पुसट रेषा आणखी काही वेळ सोबतीला राहिली पण मग आणखी काही काळानं तीही अदृश्य झाली

पूर्वेला काही वेळ लाल क्षितिज नि लाल पाणी! लाललाल पाण्यातूनच सूर्यबिंब वर वर आभाळात चढल केवढ मोठं सूर्यबिंब! 'तेजोनिधी लोहगोल'! आणखी थोड्याच वेळान अभाळाच भाळ लखलखून गेल लाल लाल सूर्यबिंब केशरी होत होत सुवर्णरंगी झाल! क्षितिजाचे रग बदलले, तसे समुद्राचेही बदलत गेले, सूर्यबिंब नि सारं क्षितिज हलत्या, डुलत्या, सळसळत्या पाण्यावर, लाटांवर प्रतिबिंबित होत होतं समुद्र विशाल आरसाच बनला होता!

'समुद्र सृष्टीचा ऐना! सृष्टीला सहावा म्हैना!' कविवर्य बोरकरांची कविता आठवली खरोखरच समुद्र सृष्टीचा ऐना बनला!

ऐन्यात आणखी थोड्या वेळानं पूर्वेचा लखलखीत उजेड भरून आला

पुढ दूरवर निळसर नवलाई! एकाच वेळी समुद्राची दोन तीन रूपं दिसू लागली! प्रत्येक रूप अपूप! किती सुंदर, विशाल, अफाट! दोन डोळ्यानी किती बघणार! किती साठवणार! मला माझ अपुरेपण, क्षुद्रपण जाणवलं, पण हा दुर्लभ सोहळा पाहण्याचं, अनुभवण्याच भाग्य लाभलं हे काय कमी आहे? तृप्त तृप्त झालो!

इंजिनच्या केबिनवर बसलो होतो पुढं, माग, आजूबाजूला अथाग अफाट सागर, वरती विशाल असीम आकाश आणि या निळ्या शिंपल्यात आमची नौका! विलक्षण प्रसन्न, भव्य अनुभव।

लखलखीत उजाडलं, गलबतावरच्या 'जेवण्यानं' कोऱ्या चहाचा ग्लास आणून दिला सगळेच खलाशी चहापानात आणि गप्पागोष्टींत रंगलेले होते जे मला नवीन होते, ते त्यांना जुने, रोजचेच होते

मोठ्या दोन सिलिंडरच्या यांत्रिक गलबतावर दहा ते पधराजण असतात त्यातला एक तांडेलकसान असतो एक जेवण्या असतो भात-कालवणाच जेवण, नास्ता, चहा बनवायचं काम जेवण्याचं त्याला खण्याही

म्हणतात 'खप्या' म्हणजे खपणारा, राबणारा तसे सगळेच खपे असतात एक सुकाणूवाला असतो जाळं टाकण, ओढणं, मासळी काढणं हे सगळं करणारे खलाशी मिळणाऱ्या मासळींची दौलत ठराविक विभागणीनुसार करतात दौलतीचे दोन समान वाटे, त्यातील एक वाटा गलबतवाल्या धन्याचा, आणि दुसऱ्या वाट्यात बाकीच्याचे वाटे काही वार्षिक खंडान राबणारेही मजूर खलाशी असतात ही वाटापद्धत सर्वत्र बहुताशी स्थूलमानान अशीच असते पण त्या त्या ठिकाणी स्थानिक परिस्थिती, परपरा यानुसार थोडाफार फरकही असू शकतो धन्याच्या वाट्यात गलबताची डागडुजी, इजिनची दुरुस्ती, डिझेल, जाळं, इत्यादी गोष्टीही धरलेल्या असतात

आमच्या 'हिरण्य' नौकेचा तांडेल होता तरणाबाड विलास वैती मोठा साहसी, कष्टाळू, सर्वांशी जमवून घेणारा मिळत्याजुळत्या स्वभावाचा आमच्या नौकेवर चौदाजण होते मी आणि तुळशीदासजी दोन पाहुणे वेगळे बिनदुधाचा कडक, काळपट-तांबूस चहा आला तोवर नौका समुद्रात बरीच आत घुसली होती आजूबाजूला दुसऱ्या नौकाही बावटे फडकावीत चाललेल्या होत्या आपापल्या घरात पोचण्याच्या घाईत होत्या धक्क्यापासून बारा वाव आत आल्यावर आमच्या तांडेलाच घर आल मच्छीमाराची, मच्छीमारीच्या विशिष्ट पद्धतीनुसार अशी समुद्रात १२ ते १५ वाव अंतरापर्यंत घर असतात या पद्धतीच्या मासेमारीला 'डोल' म्हणतात बॅगनेटस् प्रकारच जाळ यासाठी वापरलं जातं

मच्छीमारीत अनेक प्रकार आहेत, आणि त्या त्या प्रकारच्या मच्छीमारीसाठी वेगवेगळ्या तऱ्हेची जाळी वापरली जातात. 'मत्स्यव्यवसाय' नामक आपल्या पुस्तकात श्री श्रीपाद श्रीराम देसाई, माजी उपसंचालक, मत्स्यव्यवसाय, हे त्यासबधी अशी माहिती देतात

भारतात अनेक प्रकारची मासेमारीची अवजारे वापरात असली तरी त्यांपैकी ट्रॉल, शोअर सीन (रापण), बॅगनेटस् (डोल), गिल्नेटस्, पर्ससीन ही जाळी मुख्य आहेत महाराष्ट्रातील एकूण सागरी उत्पादनाच्या सुमारे ६२ टक्के उत्पन्न बॅगनेटस्चे, २१ टक्के ट्रॉलर्सचे, ९ टक्के गिल्नेटस्चे व ३ टक्के रापणीचे असते '

'बॅगनेटस्' (डोल) जाळ्याची माहिती ते अशी देतात 'ही जाळी नरसाळ्यासारखी तोंडाजवळ रुद व मागे निमुळती होत गेलेली असतात जाळ्याचे तोंड उघडे राहावे म्हणून मेढे वापरतात हे मेढे समुद्रात ३०

मीटरपर्यंत पुरले जातात दोन मेढ्यांमध्ये जाळे बाधतात जाळ्याच्या तोंडाजवळचा व्यास २५ मीटरपर्यंत असून शेपटाकडे ० ५ मीटरपर्यंत असतो भरतीच्या प्रवाहाबरोबर मासे जाळ्यात शिरताल व शेवटच्या निमुळत्या भागात (खोलात) सापडतात २ मेढ्यात १ याप्रमाणे अनेक डोलजाळी रांगेने बाधलेली असतात कित्येक ठिकाणी मेढ्याऐवजी जाळ्याच्या खालची बाजू समुद्रतळाशी पुरलेल्या खुंटास बाधतात खुटाना सस' म्हणतात जाळ्याच्या वरच्या बाजूस तरगण्यासाठी पिंपाचा वापर करतात काही ठिकाणी ससऐवजी नागरही वापरतात

" वरील प्रकारची 'डोल' जाळी गुजराथ व महाराष्ट्रातील हर्णैपर्यंत वापरतात. या भागात भरती-ओहोटीचा प्रवाह जोरदार असतो जाळी स्थिर असल्यामुळे प्रवाह असणे आवश्यक असते

" महाराष्ट्रात ठाणे, मुबई व रायगड या जिल्ह्यांत डोल-जाळ्यांचा वापर जास्त होतो सरगे, मांदेली, कोळबी, जवळा, करंदी, बोंबील, वाकट, मुशी यांची मासेमारी या अवजारानी केली जाते "

आमची 'हिरण्य' नौका अतराअतरावर डोल टाकल्यावर स्थिरावली ज्याची त्याची ही अशी घरं ठरलेली असतात बहुधा एकमेकाच्या घरात कुणी घुसत नाही परंतु कधी कधी परस्थ, रात्री-अपरात्री येऊन, घरातल्या मालाची लूट करतात जाळीही तोडून नेतात. समुद्रावरच्या चाचेगिरीचा हा एक प्रकार आहे

मुरबा-सातपाटीपासून आलेली कितीतरी गलबत जाता जाता दिसत होती 'गीताजली', 'वरुण', 'मीनाक्षी अशी काहींची नावं

नौका स्थिरावली, ती दोन तासांनी कामाला लागली, तोवर जेवण्यानं भाताची हडी शिजवली होती मासळीचं कालवण बनवलं होतं थाळ्या वाढल्या. भाताची रास व कालवणाचा वास!

खानपान आटोपल, मग एकेकजण आपापल्या तयारीत राहिला टाकलेला डोल आला दोन तासानंतर ओढून वर घ्यायचा होता पद्धतशीर ओढणं सुरू झाल त्याबरोबर गाणही सगळ्याच्या तोंडी उतरलं या गाण्याला आबवली' म्हणतात ओढणं, जाळ खेचण हे काम अती कष्टाचं, फार श्रमाच हे श्रम सुसह्य करावेत व सगळ्याची ताकद एकवटून या कामी लागावी यासाठी आबवल्या असतात काही देवादिकांच्या, संतमहंताच्या,

काही गमतीच्या तर काही चावटसुद्धा असतात जाळ खेचता खेचता घामाघूम झालेले खलाशी गडी म्हणत असतात

शंकरा देवलात गेला रे कान्हा,
बत्ती लावून आला रे कान्हा!
शकरा डोंगरात गेला रे कान्हा,
बत्ती लावून आला रे कान्हा!
शकरा वनात गेला रे कान्हा,
बत्ती लावून आला रे कान्हा!

एक आबवली सपली की दुसरी सुरू होते—

ही माझी संतोषी माय ग
दर्यावर डुलत जाय गं!
ही माझी एकवीरा माय गं
दर्यावर डुलत जाय गं!

गमती-जमतीच्या आबवल्या असतात म्हणता म्हणता जाळ खेचलं जातं नौकेत घेतल जातं जाळ्यात आलेले मासे काढून घेण्याच, वेचण्याचं काम दुसरे दोघे करीत असतात जाळे व्यवस्थित लावीत असतात जाळ्याला येणारी मासळी तऱ्हेतऱ्हेची असते फडफडत, उडत असते 'पाण्याविना मासोळी'ची अतकाळची तडफड, माझ्यासारख्या नवख्याच मन कळवळून टाकते हळहळून उठते पण रोज मरे त्याला कोण रडे, अशी अवस्था मच्छीमारांची असते ते मजेशीर आबवली म्हणत असतात

लाल पागोटे गुलाबी शेला
टी सी दादा आला रे!
जीव झाला वेडा
टी सी दादा आला रे!
लाल पागोटे गुलाबी शेला
मास्तर दादा आला रे!
जीव झाला वेडा -
मास्तर दादा आला रे!

बडबडगीतासारख्या अर्थहीन आबवल्या असतात

बम् चिकि बम्
बोंब मारा बोंब!
नंदीबैल आला
नदीबैल आला

काही आंबवल्या प्रेमगीतासारख्याही असतात

पंपू सोनारा, पैंजण बनवून दे रे
पैंजण बनवून दे रे!
ती पैंजणा पायात घालील
मैना रे, माझी मैना रे!
पपू सोनारा, साखळ्या बनवून दे रे
साखळ्या बनवून दे रे!
त्या साखळ्या पायात घालील
मैना रे, माझी मैना रे!
पंपू सोनारा, कंठी बनवून दे रे
कंठी बनवून दे रे!
ती कठी गळ्यात घालील
मैना रे, माझी मैना रे!

थोडी चावट आंबवली अशी ·

सोमवारी वायदा केला
बुधवारी आली ग, बुधवारी आली
किती तुझी वाट पाहिली
जीव मासळी ग जीव मासळी

आबवल्यावर आबवल्या झडत असतात जाळं खेचलं जात असतं तालावर, ठेक्यावर काम चाललेलं असतं अगात एक लय भरलेली असते पण मन मात्र आतुर, उत्सुक असत, जाळ्यात काय काय नि किती किती गावलय हे पाहण्यासाठी मन जाळ्यातच गुतलेलं असतं या वेळची मच्छीमाराची मन.स्थिती मोठी नाजूक, हळवी, कुतूहलान, औत्सुक्यानं ओसंडलेली असते आशा-निराशेच्या झुल्यावर झुलत असते पदरात काय

पडणार? काय मिळणार? किती मिळणार? कमालीची उन्कठा! आणि साहजिकच आहे, कारण ज्यासाठी हा सगळा कष्टाचा अट्टाहास मांडलेला असतो, त्या कष्टाच फळ काय, किती, कस - जाळ्याच्या एकेका हिसक्याबरोबर, खेचण्याबरोबर आपल नशीबच ते न्याहाळत असतात

जाळ भरून भरून आल मासळीचा ढीगच्या ढीग लागला तर अगभर घामाची फुल फुलून येतात नाहीतर जाळं रितं रिकामं, तुरळक तुरळक मछली घेऊनच आलं तर निराशेनं मन काळवंडून जात, कष्ट जाणवू लागतात

"बापा समिंदरा, पाव रे पाव! बख्खळ मासळीचा ढीग लाव रे लाव! " अशीच त्यांची, त्याच्या कुटुंबियाची प्रार्थना असते

जमिनीवरल्या शेतकऱ्यांचे डोळे जसे पावसासाठी आभाळाकड, तशीच नजर मच्छीमाराची समुद्राकड!

पाऊस आणि जमीन ही जशी भूमिपुत्राची आधारदेवता, तशीच समुद्र आणि मच्छी ही सागरपुत्राची वत्सल माता!

'हिरण्य नौकेवर त्या दिवशी बऱ्यापैकी 'कॅच' जमा झाला होता नौकेच्या मधल्या खालच्या भागात पसरलेला होता तांडेल, खलाशी खुपीत होते

सध्याकाळी परतलो ताडेलानं मला एक भला मोठा मासा भेट म्हणून दिला मी तो तुळशीदासर्जीकडे सोपवून दिला नाहीतरी मी त्याचं काय करणार? ताडेलाची देण्यातली भावना माशापेक्षा मोठी होती, ती मी जाणली मला ती भावली मी तीच तेवढी घेतली कायमसाठी अजूनही त्या आठवणीन मी सुखावतो, हेलावतो

सकाळी समुद्रात घुसताना, तुरळक दिसणारे पाढरेशुभ्र करकोच्यासारखे 'कागय' पक्षी, दुपारी मात्र मोठ्या थव्याथव्यानं आणि गलबतांच्या बाजूबाजून उडताना, पाण्यावर बसताना, तरगताना दिसू लागले पक्षी देखील किती शहाणे असतात, की प्रत्येक प्राण्याच्या ठायीच भुकेसाठी भक्ष्य मिळविण्यासाठीचं शहाणपण उपजत असतं? असतच नाही तर मुंगी-कीटकापासून ते हत्ती-वाघ-सिंहापर्यंत, माणसापर्यंतदेखील ही बुद्धी कशी दिसली असती! तर कागय पक्ष्यांना ठाऊक झालय की मध्यान्ही आता खलाशी जाळं वर खेचणार आणि खेचता खेचता बाहेर सटकणारे किंवा जाळ्याला चोच टोचून मटकावता येणारे मासे मिळण्याची हीच वेळ

आहे, ती साधली पाहिजे

निळ्याशार संथ पाण्यावर शुभ्र कागय पक्ष्यांचे थवे विलोभनीय दिसत होते!

**आगरवाडी-माहिम केळवे दि २२ नोव्हेंबर १९९१**

सकाळी सकाळीच मुरब्याहून निघालो दहा-साडेदहाच्या सुमारास आगरवाडीला पोचलो शाळेत गोष्ट सांगितली मच्छीमारांच्या कोळीवाड्यात गेलो मुरबे-सातपाटीच्या मानान हे लहानसं गाव मच्छीमारीचा व्यवसायही बेताचा कोळीवाडा देखील तसा लहानच

कोळीवाडा म्हणालो, पण तसे इकडे कोळी फारसे नाहीत रत्नागिरीत जसे खारवी, दाल्दी, गाबीत, भंडारी आहेत, तसेच ठाण्याच्या किनारपट्टीवरही प्रामुख्याने आहेत मांगेला, वैती आणि काही मितणी, बारी, कोळी, भंडारी वगैरे. देशावर व इतरत्रही मच्छीमाराना सर्वसामान्यपणे कोळी म्हटले जाते देशावरची मच्छीमारी नद्या, तळी, ओढे, नाले याच्या गोड्या पाण्यातली कोकणातली खाडी, समुद्रावरली मच्छीमारी खाऱ्या पाण्यातली गोड्या पाण्यातली मच्छीमारी करणारे देशावर जे आहेत, त्यात प्रामुख्यान भुईकोळी आहेत कोकणात जे कोळी आहेत ते आधीचे देशावरले रहिवासी सोनकोळी, महादेव कोळी

ठाणे जिल्ह्यात बहुसंख्येन आहेत मांगेले मांगेले गुजराथमधून आले गुजरातीत एका जाळ्याचं नावच माग ते जाळं मच्छीमारीसाठी वापरणारे ते मांगेले म्हणून ओळखले जाऊ लागले

मागेल्यांना 'छप्पनगावी' असही म्हणतात याचं कारण अस सागतात की, महाराष्ट्र, गुजराथच्या सरहद्दीजवळील छप्पन गावातून ही मडळी ठाण्याच्या किनारपट्टीवर उतरली म्हणून ती छप्पनगावी वैती व मांगेला यांच्यात तसा काही फरक नाही पूर्वी त्याच्यात रोटी-बेटीव्यवहार होत नसे आता अलीकडे तो निर्बंध राहिलेला नाही

माहिम हे ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातले गाव मुंबईतले माहीम निराळे तिथेही मच्छीमाराची वस्ती आणि आता तर मोठी कॉलनीच झालेली आहे ठाण्यातल माहिम म्हणजे महिकावतीचं स्थान ही महिकावती शिवकालपूर्वी होऊन गेलेली असून इतिहासाचार्य राजवाडे यानी

'माहिकावतीची बखर' या ग्रंथावर संशोधित भाष्य केलं आहे त्यात त्यांनी तत्कालीन समाज-स्थितीचं वर्णन, विश्लेषण केलेलं असून कोळी जमतीचा उल्लेख त्यात आलेला आहे महिकावतीच्या ऐतिहासिक वास्तूचे भग्नावशेष आजही तिथं आढळतात या महिकावतीवरूनच माहिम हे नाव या गावास मिळालं

माहिमच्या कोळीवाड्यात गेलो समुद्रकाठी मच्छीमारांच्या वस्तीत एक गोष्ट लक्षात आली ती अशी की, दिवसा पुरुष मंडळी कोणी भेटत नाहीत कारण ती सकाळी पहाटेच समुद्रावर गेलेली असतात गावात म्हातारीकोतारी, स्त्रिया, मुलंच भेटतात काही आजोबा मंडळींशी गप्पागोष्टी केल्या

कोळीवाड्यातल्या मच्छीमारांची बहुतेक घरं कौंबळी, कच्च्या बांधणीची, बैठी, छोटी असली तरी ती स्वच्छ, निर्मळ असतात सारवलेल्या छान जमिनी, चकचकीत तांब्यापितळेची व स्टीलची भांडी, काही घरातून रेडिओ, टी व्ही आणि कामापुरतं फर्निचरही असतं घरापुढंच अंगण छान त्यात तुळशीवृंदावन, फुलझाड असतात फुलझाडाच्या वाफ्याला घराच्या खिडक्यांवर निरुपयोगी जाळ्यांचे निळे तुकडे आडोसा म्हणून वापरलेले सर्रास दिसतात

काही कोळीवाड्यांतली घरं एकमेकांना चिकटून उभी असतात वळणा- वाकणाचा रस्ता, नव्हेच, थोडी रुंद पाऊलवाट अशी बोळकांडी तर कुठंकुठं घरात घुसल्यासारखीच असते घर आणि वाट, अनेक ठिकाणी कळतच नाही, इतकी ती एकमेकांच्या गळ्यातगळा घालून नांदत असतात त्यातच अधूनमधून माशाचं वाळवण, सांडपाण्याचे खड्डे नि गटारं, भलतीच गिचमिड सारी वस्ती मत्स्यगंधाने दरवळून गेलेली अशा वस्तीतून हिंडलो, फिरलो काही ठिकाणी राहिलो, जेवलो एक मात्र मनावर ठसलं, ते असं की, ही माणसं अत्यंत साधीभोळी आहेत गरिबीतही त्यांनी काही संस्कार जपलेले आहेत आतिथ्यशीलता फारच आहे घरात पुरुष असला तर 'गरम चहा का थंड घेणार?' म्हणून विचारणार, पाजणार बाईच असेल तर तीही 'ये बस, च्या मांडते,' म्हणणार निदान 'शहाळीचं पाणी तर घे,' म्हणणार, आग्रह करणार

'कोकणची माणसं साधीभोळी, काळजात त्यांच्या भरली शहाळी' असं जे म्हणतात त्याची प्रचीती, निदान मच्छीमाराकडं, कोळीवाड्यात

तरी येते, हे खरंच!

केळवे म्हणजे नारळीपोफळींच्या हिरव्या झावल्याच्या छत्र्यानी झाकलेल गाव! आगरवाडी, केळवे, माहिम ही गावं जवळ जवळ रस्ता असा हिरवा की बागांमधूनच चाललो आहोत अस वाटत फार फार देखण सौंदर्य या परिसराला लाभलेलं आहे

केळव्यातले एक शिक्षक धोंडू पेडणेकर हे तुळशीदासजींचे मित्र त्याच्याकडच मुक्काम तुळशीदासजींचं वैशिष्ट्य असं की, इकड त्यानी गावोगाव मित्र जोडले आहेत त्यांच्या घरात ते माझ्यासारख्या मित्रालाही, एखाद्या हक्कान घेऊन जाऊ शकतात, ही मैत्रीची ताकद मोठी आहे

धोंडू पेडणेकर हे कवी आहेत त्यांची बरीच बालगीत मी ' आनद ' मासिकात वाचली होती

केळव्यात निसर्गाच्या हिरव्या कुशीतल्या शाळेत मुलांना गोष्ट सागितली ती रगलीही छान गोष्टीलादेखील छान, रमणीय परिसर वातावरण हवं, म्हणजे ती झकास खुलते फुलते!

समुद्रही मुक्त, मोकळा, देखणा कोळीवाड्यात वैती-मांगेल्याची वस्ती अधिक पूर्वी सागरतीरी झोपडी उभारून हगामाचे चार महिने तिथ राहायचे आणि बाकीचे आठ महिने गावातल्या घरात राहायचे, अशी पद्धत कुठ कुठ होती, पण ती आता सपलेली आहे. बरीच घरही छान, टुमदार, सिमेंटच्या बाधणीची, रंगीबेरंगी झालेली आहेत फ्रीज, टी व्ही सोफा, फॅन, टाईल्सनी सजलेली आहेत अद्ययावत फॅशन, यात्रिक साधन आलेली आहेत व्यवसायात बरकत वाढली आहे समृद्धीचा तवंग दिसतो आहे हे सगळ वैभव आनद देणारंच आहे समाधानी करणारच आहे पण कुठ कुठ कानावर आलं ते धक्का देणारं, हळहळ वाटायला लावणारही आहे

पूर्वी गलबतावर काम करणारी जी दहा-पधरा माणसं असत, त्याचा धन्याशी वर्षभराचा करार असे आजही असतो मिळालेल्या मासळीचा ठराविक हिस्सा ज्याला त्याला मिळतो सगळेजण एकोप्यानं, परिवार भावनेनं राबत असतात पण जर दुर्दैवानं अपघात झाला, कुणी आजारी पडला, अपंग झाला, तर त्याचा हिस्सा काढून घरी पोचवला जात असे! आज तो लगेच बद केला जातो म्हणे! हे ऐकून, आणि एके ठिकाणी असाच एक भाजलेला खलाशी भेटला, त्याच दु ख पाहून-ऐकून फार फार हळहळलो

आधुनिक समृद्धीत सुखाची साधनं वाढली, पण मनं संकुचित झाली काय? माणुसकी हरवली काय?

ही दुर्दैवी लागण वाढू नये, पसरू नये, सार्वत्रिक होऊ नये, आणि माणस माणसापासून दूर होऊ नयेत, हीच अपेक्षा!

केळव्याला किनारपट्टीवर सुमारे साडेसातशे मच्छीमार आहेत एकानं गीत म्हणून दाखवलं

तांडेला रे आयलं तुफान
धर रे सुकाण
धर रे सुकाण!

**पालघर-वडराई: दि. २३ नोव्हेंबर १९९१**

श्री धोंडू पेडणेकराचा निरोप घेऊन भल्या सकाळीच केळव्याहून निघालो निघालो, पण पुन्हा कधी तरी परत येण्याची इच्छा मनात बाळगूनच केळव्याची हिरवी जादू! तिनं मन-वृत्ती हिरवाळून टाकली होती

केळव्याहून पालघरला आलो

'पालघर' आणि 'पालगड' या दोन गावांत पूर्वी माझा नेहमी घोटाळा व्हायचा पालगड हे साने गुरुजींचं गाव ते आहे रत्नागिरी जिल्ह्यात, दापोली तालुक्यात, नि पालघर आहे ठाणे जिल्ह्यात, तालुक्याचं गाव वारकरी संप्रदायाचे अर्वाचीन अध्वर्यु, हरिभक्तिपरायण प्राचार्य श वा दांडेकर पालघरचे सोनोपंत किंवा मामा म्हणून ते विख्यात होते दांडेकर मंडळी ही मूळची माहिमची

आजचा पालघर तालुका १९१८ पर्यंत माहिम तालुका म्हणूनच ओळखला जात होता १८७६ साली महिकावतीच्या माहिमला मामलेदार कचेरी स्थापन झाली १९१८ साली ती पालघरला हलविण्यात आली रेल्वेस्थानकामुळे पालघरला महत्त्व आलं असावं १९०५ च्या सुमारास, म्हणजे सोनोपंत दांडेकराच्या बालपणी पालघर-माहिम कसं होतं याचं वर्णन त्यानीच अशा शब्दात केलेलं आहे

"त्यावेळी माहिममध्ये श्रीमंत, गरीब, सावकार, कुळे, मालक, नोकर असे सर्व थरांतील लोक होते पण त्यांचे आज जे संबंध दिसून येतात त्यापेक्षा त्यावेळी त्यांचे संबंध फार वेगळ्या प्रकारचे होते त्यामध्ये एक

प्रकारे आपुलकीचा भाव दिसत होता श्रीमत हा श्रीमत होता, पण तो गरिबाच्या घरची काळजी करी सर्व गावावर एकप्रकारे सुखाची व शातीची पाखर होती सर्व गाव एक कुटुब म्हणूनच व्यवहार करी असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही त्यावेळी समाजात धार्मिक भावना जागृत होती गणपती, दसरा, दिवाळी हे सण मोठ्या उत्साहाने व आनदाने साजरे केले जात ''

मच्छीमाराच्या कोळीवाड्यात गणपती आणि होळीच्या वेळी त्याच्या उत्साह-आनंदाला उधाण येतं दसरा-दिवाळी साजरी होते, पण गणपती-होळीचा दणका काही वेगळाच!

पालघर आता बरच विस्तारलं आहे दाडेकरांच्याच नावाचं हायस्कूल व कॉलेज आहे सकाळी हायस्कूलमध्ये मुलाना गोष्ट सागितली, तर दुपारी कॉलेजमध्ये भाषण केल

संध्याकाळी वडरई नामक गावात मुक्कामाला गेलो सकाळी कोळीवाड्यात फिरलो सुमारे ७५० मच्छीमार येथे आहेत त्यातील सुमारे चारशे बोटींवर राबतात लहान बोटींची कव चालते

कोळीवाड्यात काही ठिकाणी खजुरीची व ताडाची लाबसडक पान-झावळ्या चिरून, पिंजून काढलेली व त्याला पीळ देऊन त्यापासून तीन पदरी दोरखंड वळण्याचा उद्योग चाललेला दिसला या वळलेल्या दोरखंडाना ऐनाच्या झाडाच्या साली कुटून, त्याचा रग देतात

बोटीवरल्या गड्यांशी गप्पा मारताना त्याच्याकडूनही आबवण्या ऐकल्या.

ऐ खडेरी डोंगर भालादी
रे माझ्या खंडोबा भालादी
तुझी सोन्याची जेजुरी भालादी!

मी विचारल, "देवाधर्माच्या जशा आबवण्या म्हणता, तशा देशाच्या काही आंबवण्या आहेत की नाहीत?"

"हैत की!"

"मग म्हणा की!"

एक जण सरसावला नि म्हणू लागला.

हाले हाल तिरंगी झेंडा
भारतमातेचा तिरंगी झेंडा
चरख्याची खूण रे तिरंगी झेंडा
बापूजीनं केला रे तिरंगी झेंडा
एकीन वागा रे तिरंगी झेंडा
सौराज्य घ्यायचं रे तिरंगी झेंडा !

बापूजी-गांधीजी आणि चरख्याचा उल्लेख आहे, त्यावरून ही आंबवणी स्वातंत्र्यपूर्व काळातली, स्वातंत्र्यलढ्याच्या वेळची कदाचित मिठाच्या सत्याग्रहाच्या समरकाळातली असण्याची शक्यता आहे गांधीजींनी १९३० साली मिठाचा कायदेभंग केला तो गुजरातमधील दांडी नामक समुद्र किनारीच्या गावीच त्यावेळी बहुतेक सगळी सागरी किनारपट्टी स्वातंत्र्याच्या जयघोषान दुमदुमून गेली होती कोळीवाड्यापर्यंत स्वातंत्र्याचे वारे पोचले होते अनेक मच्छीमारांनी सभा-मिरवणुकींतून भाग घेतला होता १९३० साली ठाणे जिल्ह्यातील पहिला मिठाचा सत्याग्रह उंबरगाव येथे झाला होता श्रीमती कमलादेवी चटोपाध्याय या प्रमुख होत्या सुमारे दहा हजाराची प्रचंड मिरवणूक हातात पाण्याची मडकी घेऊन समुद्रकिनारी निघाली होती त्या सभेत भाषण करताना कमलादेवी निर्भयपणे म्हणाल्या, '' मिरवणुकीमध्ये मला कुणी तरी विचारलं, 'तुम्ही मडकी घेऊन कुठे निघालात ? ' मी त्यांना उत्तर दिलं, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अंत्ययात्रेला आम्ही मडकी घेऊन निघालो आहोत ! ''

ठाणे जिल्ह्यातली बंदरपट्टी, म्हणजे चिंचणी ते बोर्डी स्वातंत्र्यलढ्यात फार सक्रिय झालेली होती स्वातंत्र्यभावनेनं पेटलेली होती ! सातपाटी, केळवे, माहिम, मुरबे, सफाळ, मनोर, तारापूर, चिंचली, पोफरण, उनभाट, उच्छेळी, नवापूर, आलेवाडी, नांदगाव, खारे कुरण, वडराई, माकुणसार आदी गावागावांतून लोकजागृतीचं कार्य सर्वश्री हरी दामोदर राऊत, धर्माजी पांडुरंग तांडेल, व पंडित जगन्नाथ मेहेर या मच्छीमार समाजातील मंडळींनी पुढाकार घेऊन फार प्रभावीपणानं केलं होतं पालघर तालुक्यातला मच्छीमार समाज हा आचारशील, संस्कारक्षम व भक्तिमार्गी आहे धर्माजी तांडेल यांच्यामुळे मच्छीमार समाजातील तरुणांचा मोठा वर्ग त्यावेळी व नंतरही स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झाला

ही आचारशीलता व भक्तिमार्ग अंगी बाणलेली असल्यामुळेच की काय, आज देखील श्री पांडुरगशास्त्री आठवले याच्या स्वाध्यायी अनुयायाचा भरणा व त्यांचे कार्य या भागात, या समाजात उठून दिसते ठिकठिकाणी मला 'स्वाध्यायी' मंडळी व मंडळे भेटली

**खारेकुरण-मुरवे दि २४ नोव्हेंबर १९९१**

खारेकुरण हे मच्छीमाराचच लहानसं गाव आहे ५०० मच्छीमाराची वस्ती आहे बहुतेक मांगेलेच आहेत मच्छीमारीची पद्धत कवेची, डोलाची गावात मच्छीमाराची सोसायटी आहे कालिकामातेच मदिर आहे गावाच्या नावावरून खाऱ्याशेतीचा अर्थबोध होतो मच्छीमारी म्हणजे खारी शेतीच आणि मिठागरे म्हणजेही खारी शेतीच रत्नागिरी जिल्ह्यात 'खारेपाटण' 'मालवण' 'महा-लवण मीठ, 'मिठबाव' अशी व्यवसाय किंवा उत्पन्नबोधक नावाची गाव आहेत मच्छीमारांनाही खारवी म्हणतातच

खारेकुरणाच्या कोळीवाड्यात बारकू मेहेर भेटले त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्या मेहेर सागत होते, "आमच्या मच्छीमारी धंद्यात अलीकडच्या काळात बरीच सुधारणा झाली नायलॉनची जाळी आली, यात्रिक बोटी आल्या, बर्फाच्या फॅक्टरी निघाल्या मालाला परदेशी बाजारपेठ मिळाली कमाई वाढली घरंदार सुधारली हे सगळ झालं खरं, पण पूर्वीचा सहकार गेला"

मेहेरांची खत त्याच्या शब्दातून, डोळ्यांतून जाणवली काहीतरी मोठ हरवल्याची, गमावल्याची चुकचुक त्यांच्या मनात होती मी विचारल, "सहकार गेला म्हणजे काय झाल?" मेहेर म्हणाले, "एकाची बोट असायची-शिडाची बाकीचे राबते-खलाशी असायचे पण सगळे समान त्यामुळं जी काही दौलत जाळ्यात मिळायची ती सगळ्याना सारखी असायची समान वाटे पडायचे आता ही समानता गेली एकच मालक बनला बाकीचे चाकर झाले त्याचे वाटे कराराने बांधण्यात आले एखादा कुणी आजारला, अपघाती झाला, तर त्याचा वाटा बद! यात्रिकता आली पण माणुसकी गेली सायेब, माणूस पोटाला लागंल तेवढच खातो जास्त खात नाही जास्त लागत नाही पण हाव सुटत नाही ह्या मतलबापुढं माणुसकी टिकत नाही अहो, देणार तो - समिंदर, सागर! आन् हिरावणारं कोण? धनगब्बर श्रीमंत, दलाल श्रीमत श्रीमत होत्यात, गरीब गरीबच राहत्यात दलालांच्या

हवेल्या उठतात केंबळ्या झोपड्या तशाच राहतात .माणुसकी गेली

मेहेराच दु ख मनाला चटका लावणारंच होत

दुपारी परत मुरब्याला पोचलो तुळशीदासजी तांडेलाकडेच मुक्काम आता हे घर नि घरची माणस जवळची झाली आहेत गावही एकदम परक उरलेलं नाही

सायकाळी घरापुढच्या राममदिरातच गावातील सरपच आदी प्रमुख व काही वृद्ध मडळी तुळशीदासजींनी जमा केली त्याच्याशी मनमोकळ्या गप्पागोष्टी झाल्या त्यातून कळले की, या भागात खाडीतली मच्छीमारी यात पाग, मात अशा जाळ्यांनी करता येणारी मच्छीमारी, शिंपले, चिगोरी ही हाताने करता येणारी मच्छीमारी येते दुसरी समुद्राच्या काठची मच्छीमारी यातही पाग जाळे वापरतात गळानेही मच्छीमारी करतात. ' मासा गळाला लागला असा वाकुप्रचार यावरूनच आला आहे 'एका लाब दांडीच्या टोकाला लाब दोरी बाधलेली असते दोरीच्या दुसऱ्या खालच्या टोकाला गळ लावलेला असतो गळाला आमिप लावलेल असतं आमिप म्हणजे माशाना आकर्पित करणारे किडूकमिडूक गाडूळ, आळ्या वगैरे खाद्य हे खाण्यासाठी मासा झट्ू लागला की तो गळात अडकतो त्याच्या तडफडीनं दोरी हालते, हिसकली जाते गळाला मासा लागल्याचे कळते हा ' फिशिंग ' प्रकार केवळ व्यावसायिक किंवा पोटासाठीच चालतो असं नाही, तर एक खेळ, मनोरंजन म्हणूनही काही हौशी-शौकीन मडळी हे फिशिंग करीत असतात

तिसरा प्रकार आहे समुद्राच्याजवळ काही अतरावरच चालणारी मच्छीमारी पूर्वी शिडाच्या होड्या होत्या वाऱ्याच्या तालावर चालायच्या मच्छीमार मंडळी १४-१५ जण समुद्रात जायची त्यावेळी होकायत्रं नव्हती डोंगराची रांग पुसटशी दिसते आहे तोवरच ती खूण ठेवून आत जायच

नंतर १९५५-६० च्या दरम्यान परदेशातून मशिन्स आली ती होड्यांना बसविण्यात आली होड्यांच यांत्रिकीकरण झालं ट्रॉलर्सही आले त्यांच्या साहाय्यानं लांब दूरवर समुद्रात जाता येऊ लागल मॉडिफाईड फिशिंग' सुरू झाल

असं ऐकलं की, ' काही दिवसात, भविष्यकाळात, संगणकाचा-कॉम्प्यूटरचाही उपयोग मच्छीमारी करण्यासाठी अस्तित्वात

येईल सगणकाच्या साहाय्याने समुद्रात किती अतरावर, किती खोलीवर, कोणत्या जातींची मासळी उपलब्ध आहे, हे कळून येईल त्यामुळे मच्छीमारीत सुविधा व समृद्धी येईल ' हे असभाव्य मुळीच नाही

समुद्राच्या पृष्ठभागाजवळ असणाऱ्या माशासाठी ' पर्स-सीन नामक जाळ्याचा वापर होतो, तर समुद्राच्या तळाशी असणाऱ्या मच्छीमारीसाठी ' ट्रॉल ' नामक जाळ्याचा वापर करण्यात येतो अलीकडे परदेशातील ' गिलनेटस् ' पद्धतीही सुरू झालेली आहे ' गिलनेटस्' पद्धतीची माहिती ' मत्स्यव्यवसाय ' पुस्तकात अशी दिलेली आहे

" हे एक पडद्यासारखे लाबलचक जाळे असते त्याच्यावरच्या दोरीत भेंडे-तरंगे व खालच्या दोरीस वजने बांधल्यामुळे ते पाण्यात भितीसारखे उभे राहते मासा जाळ्याच्या आसातून इकडून तिकडे जाताना कल्ल्याजवळ अडकतो म्हणून यास ' गिलनेट ' किवा ' फास जाळे ' म्हणतात ही जाळी जगभर सर्वत्र वापरात आहेत यात पॉपलेट, सरगा, सुरमई, दाला, घोळ यासारखे मोठे व चविष्ट मासे मिळतात "

या पद्धतीच्या मच्छीमारीमुळ भारताला आज पुष्कळच मच्छी परदेशात निर्यात करता येते, व पुष्कळसे परदेशी चलन मिळू शकते मच्छीमाराच्या जीवनमानातही फरक पडलेला असून सुखाचे दिवस आलेले आहेत

पॉपलेटचे उत्पन्न देणाऱ्या ' डालडा फिशिंग ' मध्ये मुरबे-सातपाटी या परिसरातील मच्छीमारांनी खूपच प्रगती केली आहे ही मडळी खाली रत्नागिरी, तिकडं गुजरातेत ओखा-पोरबदरपर्यंत लाबवर जाऊ शकतात ही प्रगती पाहून गोव्याचे तत्कालीन मुख्यमत्री श्री दयानद बादोडकर यांनी सातपाटी वगैरे भागातल्या काही अनुभवी मच्छीमाराना गोव्यात बोलावून घेतले आणि सांगितले होते की, ' आमच्या गोव्यातील मच्छीमाराना ही डालडा फिशिंगची पद्धत शिकवा त्यानुसार आत्माराम मेहेर व माधव त्र्यंबक हे तिकडं गेलेही होते सरकारी पाहुणे म्हणून त्यांनी तिथे जाऊन पाहणी वगैरे केली पण गोव्यातला मच्छीमार अजूनसुद्धा डोंगराची रांग दिसते तिथपर्यंतच जाणार, त्या पलीकडं लाब जायला तयार नाही पारपरिक मन अजून मोठ्या साहसाला धजत नाही

कोळंबी- ' प्रॉंज '- मच्छी मिळवून देणारी ट्रॉलर फिशिंग 'ची पद्धतीही आता या भागात सुरू झालेली आहे, पण रत्नागिरीकड ही पद्धत

मोठ्या प्रमाणावर सुरू आहे

या यान्त्रिक पद्धतीमुळ मच्छीमारीचं उत्पन्न घटल, पूर्वी पुष्कळ मासे मिळत असत ' अशी एक जुन्या मच्छीमाराची तक्रार आहे यासबंधी सांगताना सरपच म्हणाले, " यान्त्रिक बोटी येण्यापूर्वी आमचा हा व्यवसाय पूर्णपणान निसर्गावर अवलबून होता शिडाच्या होड्या होत्या, त्या वाऱ्याच्या व भरती-ओहोटीच्या कलान चालायच्या मच्छी पकडण्याची जाळी सुताची होती ती विणन, वाळवणं, रगवण हे काम कराव लागायच म्हणजे ७-८ दिवस फिशिंग केल की ७-८ दिवस जाळ्याची दुरुस्ती, वाळवण आणि रगवण यात जायचे त्या दिवसात फिशिंग बंद अशाप्रकारे महिन्यातून १६ दिवस याप्रमाणे ते चार महिने चालायचे म्हणजे ६४ दिवस फिशिंग व्हायचे हे चार महिने म्हणजे सप्टेंबर ते डिसेंबर परतु यांत्रिकीकरणामुळे व नायलॉन-प्लॅस्टिकच्या जाळ्यामुळे आम्ही आता वर्षातून, पावसाळ्यातले दोन महिने सोडले, तर उरलेले १० महिने ३०० दिवस मच्छीमारीचा व्यवसाय करतो जाळी पूर्वी पाच असत, आता पधरा असतात म्हणजे दिवस पाचपट जाळी तिप्पट पूर्वी क्षेत्र मर्यादित होत १० वाव आता २० वाव आत जाता येतं म्हणजे क्षेत्रवाढ झाली २०० पट होड्याची सख्याही वाढली आहे पूर्वी ५०० बोटी होत्या, आज महाराष्ट्रात १० हजार बोटींची सख्या आहे आमच्या या बदरात १००० मच्छीमार व्यक्तिश गुंतलेले आहेत त्यावर अवलंबित असे जे व्यवसाय आहेत, त्यातही बरेच लोक गुंतलेले आहेत

पूर्वी या व्यवसायाला सरकारी साहाय्य असं काहींच नव्हतं ज्यावेळी परदेशातून इजिन आली त्यावेळी ती इजिन होड्याना बसविण्यासाठी सरकारनं सबसिडी देऊन प्रोत्साहित केलं त्यानंतर फिशरीज डिपार्टमेन्टन इंजिनासाठी व बोट बाधणीसाठी अशी काही सबसिडी द्यायला सुरुवात केली पुढं बँकाचं जेव्हा राष्ट्रीयीकरण झालं तेव्हा आपल्या व्यवसायात, इतर व्यावसायिकाप्रमाणंच प्रगती करण्याची संधी मच्छीमारानाही उपलब्ध झाली २५ टक्के सबसिडी व ७५ टक्के बँकांचे कर्ज मिळू लागले त्यातून 'ग्रुप सिस्टिम' अमलात आली सबसिडीसाठी ही अटच होती उद्देशही असा होता की, सर्वांनीच बोटमालक व्हावं. त्याआधी 'नाखवा पद्धत होती नाखवा हा बोटीचा मालक, आणि त्याच्या बोटीवर राबणारे खलाशी वाट्याच्या पद्धतीन त्या प्रत्येकाची कमाई असायची मिळालेल्या एकूण

मासळींचे २४ वाटे करायचे, त्यातले ८ वाटे नाखवाला मिळायचे १६ वाटे १६ खलाशात वाटले जायचे बोटीचा खर्च दुरुस्ती वगैरे सर्व नाखवा करीत असे आजही ही पद्धत काही ठिकाणी चालू आहे ग्रुप सिस्टिम म्हणावी तेवढी यशस्वी झालेली नाही कारण सगळेच मालक! एक म्हण आहे 'सब तांडेल, तर गमत कोण सांडेल?' गमत म्हणजे बोटीत साठणार पाणी. ते बाहेर उपसून टाकावं लागत इथं सगळे मालक! मग ते पाणी कोण उपसून टाकणार?

या सर्व प्रकारच्या वाढीव प्रमाणामुळं मच्छीमारीच उत्पादन घटल आहे, विभाजित झालं आहे, पण परदेशी मागणीमुळ भाव चागला मिळतो, हेही खरं आहे

मच्छीमारीच उत्पादन वाढण्यासाठी कॉम्प्यूटर पद्धत यायला हवी, 'डीप-सी' – सखोल समुद्राचं संशोधन व्हायला हवं यापुढच्या काळात हे होईलही, पण मनुष्यबळाचा तुटवडा भासण्याचा संभव आहे आज या व्यवसायात आदिवासी लोक येतात, पण त्याच्या पुनर्वसनाच्या योजना झाल्यावर ती मडळी या व्यवसायात येणार नाहीत, राबणाऱ्याची टंचाई जाणवेल, अशी भीती आहे मच्छीमारांची काही मुलं चांगली शिकली आहेत, पण त्यातली सर्वच काही दुसऱ्या नोकरीधंद्यात जाणारी नाहीत काहींना हे कष्टाचे काम नकोसे वाटते यात कष्ट आहे, जोखीम आहे, अशाश्वती आहे, धोकाही आहे, पण काहींना हे सर्व पत्करून आपल स्वातंत्र्य टिकविण्याचीही इच्छा आहे यात काहींशी अशाश्वती असली तरी निदानीची कमाई आहेच यांत्रिक सुधारणांमुळे व परदेशी बाजारपेठ सुरू झाली असल्यामुळे कमाई भरपूर आहे सरपंच सागत होते, "माझा मुलगा इजिनियरिंगला आहे, पण तो म्हणतो, मी इजिनियर झालो तरी मच्छीमारीच करणार कारण आम्ही कुठे नोकरदार झालो, तरी काही हजारापर्यंत पगार मिळवणार, तुम्ही मात्र व्यवसायात लाखाच्या गोष्टी करणार!"

तेव्हा स्वातंत्र्य आणि कमाई हे आकर्षण आहेच शिवाय वाढत्या लोकसंख्येनं निर्माण झालेली वाढती बेकारी ही समस्या आहेच व त्यामुळ शिकलेल्या मुलांना नोकरीची शाश्वती तरी कुठ आहे?

मच्छीमारी व्यवसायात परंपरेनं नसणारी, अशी अन्य मंडळीही आता काही प्रमाणात या व्यवसायात उतरू लागली आहेत या परिसरातल्या भडारी समाजातल्या काही तरुणांनी हा व्यवसाय सुरू केला आहे आदिवासी

व काही उत्तर प्रदेशीय भैये देखील या व्यवसायाकडं वळले आहेत

समुद्रातून मिळवलेल्या माशांचा बाजार-मार्केटिंगची स्थिती सांगताना सरपंच म्हणाले, "मासळीतला टाकावू भाग जो असतो, त्याला कुटा म्हणतात या कुटाचा उपयोग खतासाठी व पशूखाद्यासाठी चांगला होतो, म्हणून ते कारखाने हा कुटा खरेदी करतात बोंबील वलांडावर सुकवलेलं देशावर-घाटावर-नगर, नाशिक, जळगाव, पुणे इत्यादी जिल्ह्यांत पुष्कळ खपत पुण्यात बोंबिलाला मागणी फार लाफ्टर-प्रॉन्झ-पॉपलेटला जागतिक बाजारपेठ आहे 'गल्फ' देशांकडून पुष्कळ मागणी आहे हाँगकाँग, सिंगापूर, जपान सगळीकडेच निर्यात होते लॉफ्टर जातीच्या माशाची सध्या ४०० रूपये किलोनं खरेदी होते त्याचं कवच वगैरे काढून नुसतं मांस १००० रूपये किलोनं जातं "

व्यवसायाव्यतिरिक्तचं जीवन विविध रीतीभातींनं, सांस्कृतिक अंगानं समृद्ध आहे या परिसरातही लग्नात हुंडापद्धती नाही ऐपतीप्रमाणं खर्च केला जातो लग्नात गाणीबजावणी चालतात

एकानं सांगितलं, "लग्नाच्या आदल्या दिवशी देवाचं जागरण असतं त्यावेळी नवऱ्या मुलाला त्याच्या मामाच्या मांडीवर बसवतात मामा त्याला लाडू किंवा गोडधोड भरवतो त्यावेळी गाणं म्हटलं जातं

सगासोयरा मामा रे, कांकण बांधू आला
कांकण बांधितो भाच्याच्या हाताला
आईचा बंधूवा आला रे, कांकण बांधू आला

लग्नाच्या वेळी वधू-वराच्या हातात जे कंकण बांधतात त्याचा हा उल्लेख आहे

**दांडी-पाम-नवापूर दि. २५ नोव्हेंबर ९१**

नवापूरची खाडी ओलांडून 'दांडी' नामक गावात पोचलो दशरथ श्रावण तांडेल नावाचे उपसरपंच भेटले म्हणाले, "एका बाजूला समुद्र आणि दुसऱ्या बाजूला खाडी यांच्यामध्ये आमचं दांडी हे गाव वसलेलं आहे उछळीमाता ही आमची ग्रामदेवता आहे खरं म्हणजे, देवलखाडी हे खाडीचं नाव व स्वयंभू उदरीमाता हे ग्रामदेवतेचं नाव, पण अपभ्रंश 'दांडी' व 'उछळी' असा झाला तांडेलांची वस्ती इथं बरीच आहे "

मुरबा-दांडी या खाड्या म्हणजे या भागाला लाभलेलं निसर्गाचं वरदान होतं पण आता माणसानं ते हिरावलं आहे या खाडीत मिळणाऱ्या वाड्या व उपल्या ह्या जातींच्या शिंपल्या व निरनिराळ्या जातींचे छोटे-मोठे मासे ह्यावर काही गरीब मच्छीमार वर्षभर आपला उदरनिर्वाह चालवीत असत कपाट व चुन्याची भट्टी म्हणून जो खाडीचा भाग आहे त्या ठिकाणी या शिंपल्या भरपूर प्रमाणात मिळत असत परंतु दिवसेंदिवस खाडीत साठणारा गाळ व खाडीजवळच बोईसर येथे उभारलेला महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहती 'तील रासायनिक व अन्य कारखान्यांतून सोडलेल्या विषारी पाण्यामुळे खाडीचे पाणीही विषारी-प्रदूषित बनलेले आहे खाडी ओलांडताना खाडीच्या पाण्याचा काळा रंग डोळ्यात भरला सगळी खाडीच काळीभोर झाली आहे या विषारी पाण्यामुळ खाडीत उत्पन्न होणाऱ्या शिंपल्यांवर, माशांवर फारच विपरीत परिणाम झालेला आहे माशाच्या काही जातीही पूर्णपणाने नष्ट झाल्या आहेत ' बोय नामक चविष्ट माशाला रॉकेलचा वास येऊ लागला आहे खाडी सुकल्यावरही जेथे पुरुषभर पाणी राहायचे तिथे आता गुडघाभर देखील पाणी ठरत नाही ज्या ठिकाणी घोलवा, वेडी, पाग इत्यादी मासे पकडण्याच्या लहान व अल्पखर्चात तयार होणाऱ्या जाळ्याने आपल्या जेवणासाठी व उरलेली मासळी विकून मीठमिरचीसाठी जी मच्छीमारी चालत असे, त्या ठिकाणी मासळी मिळणे जिकीरीचे झाले आहे खाडीतील गाळ व हे पाणी-प्रदूषण म्हणजे मच्छीमारावर आलेले मोठे संकटच आहे

वीज व शेती या विकासासाठी मोठी धरणे हवीत, पण धरणामुळे गावेच्या गावे, जंगल, शेती नष्ट होते व तिथले लोकजीवन उद्ध्वस्त होते, तशीच परिस्थिती खाडी व नदीकाठच्या औद्योगिक प्रकल्पांमुळे होते ज्या माणसाच्या सुखाच्या नावावर विकासप्रकल्प उभे राहतात, त्या माणसाच्या दुःखालाच ते कारणीभूत ठरत आहेत. मग विकास कोणासाठी ? कशासाठी ? विकास आणि मानवी हित, नैसर्गिक समतोल साधला जाणार की नाही ? असे प्रश्न या परिसरातही निर्माण झाले आहेत

एकजण तर त्राग्याने म्हणाला, " घाटावरच्या शेतीवर दुष्काळ किंवा असलं काही संकट आलं तर केवढी ओरड होते मदतीसाठी सरकार धावते, पण आम्हा मच्छीमारांवर आलेल्या या संकटाची कुठे दाद ना फिर्याद !

असं असलं तरी विशाल समुद्राच्या आधारानं माणसं राहतात,

खपतात, जगतात दु खातही सुखाचे क्षण वेचतात नाचतात, गाणी म्हणतात गोष्टी करतात शाळेत मुलाना मीही गोष्ट सागितली नतर गप्पागोष्टी करताना एका शिक्षकान मलाही एक थोडीशी चावट गोष्ट सांगितली रत्नागिरीकड अशा गोष्टींना गजाली ' म्हणतात तर ही गजाली अशी

म्होतूर-पाट लावण हे विवाहप्रकार कमी प्रतीचे मानले जातात म्हणून त्याचा गाजावाजा करत नाहीत गुपचूप करतात

तर असाच एकजण होता बायको मेलेली होती आणि अशीच एक होती, जिला नवऱ्यान सोडून दिल होत या दोघाची एकदा एका गावात गाठ पडली दोघांच सूतगूत जमल दोघांना पाट लावला

पाट लावल्यानतर त्या गड्यान या नव्या बायकोला रात्रीच गुपचूप गावी आणलं घरात ठेवलं

सकाळ झाली बाई बदरावर गेली इकडं सगळीकड बदरावर जाण्याचीच पद्धत

बाई बदरावरून परत आली, पण तिला आपल घर काही सापडेना रात्री अधारात आलेली घर सापडेना म्हणून तिन एकाला विचारल, " रात्री, पाट लावून मला आणल ते घर कोणतं हो ? "

तोही गडी रंगेल होता म्हणाला, " हेच की ! ये आत " बाई घरात गेली त्यानं दार लावून घेतल

अशा गोष्टी विरंगुळ्यासाठी, श्रम हलके करण्यासाठी तोंडोतोंडी प्रवास करीत असतात

नवापूरचा, टेकडीपलीकडचा, मुक्त-मोकळा समुद्र मला फार आवडला मुक्काम थोडाच होता, म्हणून पुन्हा कधी तरी जाण्याचे मनात आहे

नवापूरच्या सागरतटावर उभी असलेली 'मत्स्यगंधा' ही 'स्वाध्यायी' मंडळींची नौका पाहिली या गावात आणि परिसरात श्री पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या 'स्वाध्याय मंडळा'चे काम फारच छान चाललेले आहे ठिकठिकाणी स्वाध्याय मडळं आहेत मच्छीमार समाजात पू दादांनी-- शास्त्रीबुवाना ही मडळी मोठ्या प्रेमादराने 'दादा म्हणतात तर दादांनी मोठीच क्राती केलेली आहे मागे रत्नागिरी जिल्ह्यात काही

किनारपट्टीवरील गावातून मी या मडळींबरोबर फिरलो होतो त्याच्या कार्याची माहिती करून घेतली होती तिचा वृत्तान्त अन्यत्र दिलेला आहेच

' मत्स्यगधा नौका ही स्वाध्यायी मच्छीमारानी स्वकष्टार्जित निधीतून समाजऋण फेडण्याच्या उदात्त-मगल भावनेने उभारलेली आहे प्रत्येक दिवशी आळीपाळीने ही मडळी समुद्रावर जातात मिळालेली मासळी विकून तो निधी स्वाध्याय मडळालाच सामाजिक कार्यासाठी देतात श्रमदान, समयदान करतात

पुरुष मडळींचे अपूर्व दान पाहून मच्छीमार महिलानीही ' एकवीरा ' नामक ट्रक स्वकष्टार्जित निधीतून मासळी वाहण्यासाठी खरेदी केला असून, त्याचे उत्पन्नही स्वाध्याय मंडळालाच दिले जाते दादांनी ही धर्मबुद्धी, समाजहिताची दृष्टी या समाजात मुखर बनवलेली आहे एक जण म्हणाला, " पू. दादांनी आम्हाला माणूसच बनवलेलं आहे " हीच भावना एका साध्यायी बधून एका लेखाच्या स्वरूपात माझ्याजवळ व्यक्त केली त्या लेखाच शीर्षक आहे, " सागरा, पाडुरग आला ' " त्या लेखात म्हटलं आहे

" मच्छीमाराच्या गावागावात दारूच्या भट्ट्या पेटत होत्या, मच्छीमार अगदी दरिद्री राहात होता प्राण्यापेक्षा खालच्या कक्षेत जगत होता त्याच्याकडे विचार करण्याची शक्तीच राहिली नव्हती एकच विचार बाटली व पत्ते, जुगार। सागरातून कमवायचे व बाटलीच्या रूपाने पोटात भरायचे मुलांचे शिक्षण, त्याचे खाणे-पिणे, कपडे, स्वत ची पत्नी ह्याविषयी त्यांनी कधी विचारच केला नाही मुले व पत्नी उपास करून दिवस काढत येवढे करून पतीविरुद्ध पत्नी एक शब्द सुद्धा बोलत नसे उलट, पतीच्या हातचा मार मात्र रोज खात असे सणाला घरात मिष्टान्न पाहायला सुद्धा मिळत नसे सणाच्या दिवशी दोन बाटल्या जास्त घेत असे मुलांना दोन कपडे शिवावे, काही गोड खायला घालावं ही कल्पनाच त्याना येत नव्हती घरात मुलगा जन्माला आला की दारूची बाटली, कोणाचे लग्न असले की दारूची बाटली, मयतीला सुद्धा दारूची बाटली, जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगाना दारूनेच व्यापले होते दारूमुळे घराघरात भांडणे ठरलेलीच होती घरात भांडण, बाहेर भांडण, गटा-गटात भाडण, समुद्रातसुद्धा भांडण भाडणात सुरे-चाकू, तलवारी, कुऱ्हाडी असायच्या एकमेकाची जाळी चोरत असत त्यामुळे कित्येकांचा व्यवसाय बंद होऊन त्यांना घरीच बेकार बसावे लागे नंतर दारूची भट्टी सुरू करीत या सर्वांच्या जोडीला जुगार! सकाळी

जुगार खेळायला बसले की जेवायलाच उठत व परत बसले की रात्र होईपर्यंत सोबतीला सावलीप्रमाणे बाटली असायचीच काही भागात स्मगलिंग चालत असे हे असे सर्व मच्छीमार समाजात चालू होते

"मला वाटते मच्छीमार कसा जगतोय त्याचे स्वप्न पूज्य दादाना पडले असावे त्याना ते स्वप्न पाहून वाटले असेल की माणूस प्राण्यापेक्षा खालच्या कक्षेत जगत आहे त्यामुळे त्याना राहवले गेले नसेल पूज्य दादानी तत्त्वज्ञान विद्यापीठात १९६५ साली 'वर्धक शिबिर घेतले वर्धक म्हणजे ३५ ते ४० वयोगटाचे स्वाध्यायी ह्या शिबिरात दादानी या स्वाध्यायींना भक्तिफेरीसाठी वापीजवळ चिरीगाव येथे जाण्यास सागितले एक वर्षभर स्वाध्यायी नियमित जात होते एक वर्षानंतर पू. दादा तिथे गेले सुमारे ५०० लोकाचे गाव होते ते त्याप्रमाणेच सेल्वासजवळ नरोली गावात स्वाध्यायी जाऊ लागले हा वनवासी विभाग होता हे स्वाध्यायी मुंबईहून शनिवार-रविवारी येत असत तेथे सुद्धा एक वर्ष नियमित जात असत त्याच गावातून स्वाध्यायींना दमणला जाण्याची प्रेरणा मिळाली मोठी दमणला भारद्वाज आश्रम होता त्या आश्रमात ब्राह्मण राहात असत तिथे स्वाध्यायी प्रथम गेले व तीन-चार महिन्यानतर मागेला लोकामध्ये जायचे ठरविले तिथे जाणे धोक्याचेच होते कारण तिथे स्मगलिंग चाले दारूचा व्यवसाय चाले तरीसुद्धा दादाच्या प्रेरणेने व योगेश्वराच्या कृपेने निघालेले स्वाध्यायी त्या मागेला वाड्यात गेले पहिले दृश्य त्याना जुगाराचेच दिसले त्यांच्या खेळात मध्ये 'रेस्ट होत असे तेव्हा स्वाध्यायी त्याच्या जवळ गेले मच्छीमार लोकाना ते CID चीच माणसे आहेत असे वाटले त्याच्याकडे भीती नावाच काही नव्हतंच ते स्वाध्यायींनाच विचारू लागले, 'काय माल घेणार का? कारण स्मगलिंगच्या बऱ्याच चागल्या चागल्या वस्तू त्यांच्याजवळ असायच्या ते त्या वस्तू विकत व येणाऱ्या पैशातून जुगार खेळत सुरवातीला स्वाध्यायींनी महाभारतातील काही पात्रं-भीम, अर्जुन यांच्या गोष्टी सागायला सुरुवात केली त्या गोष्टी ऐकायला लहान मुले व जवानसुद्धा होते आता स्वाध्यायी भावफेरी करण्यासाठी घराघरात जाऊ लागले भावफेरी करताना समोरच्या व्यक्तीशी मिसळून जात व त्याचे कौतुकही करीत त्यामुळे त्या मच्छीमाराना स्वाध्यायींबद्दल प्रेम निर्माण झाले आजपर्यंत त्याच्याकडे, त्यांच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविणारे, प्रेमाने बोलणारे, आपला बंधु समजून त्याच्याशी वागणारे कोणी आलेच

नव्हते काही यायचे ते मतांसाठी-स्वार्थासाठी येत स्वाध्यायींना त्यांच्याकडून काही नको होते त्यांना चहाचा आग्रह होत असे परंतु स्वाध्यायी व्रत घेऊन आले होते त्यांनी पाणी मागितले पण त्यावेळी घरातून ताडीचा ग्लास भरून आला स्वाध्यायी म्हणाले, 'हे काय? हे आम्ही घेत नाही ते म्हणाले, आमच्या घरात पाणी सापडणारच नाही स्वाध्यायी तेथील दमणगंगेचे पाणी प्यायले आता स्वाध्यायींना त्यांच्या जुगाराची मध्यंतरार्ची वेळ माहीत झाली होती त्यामुळे त्या वेळेस ते येऊ लागले व त्यांच्यात बसू लागले हळूहळू महाभारतातील गोष्टी होऊ लागल्या गोष्टी ऐकताना बाजूला बाटल्या असतच दारू-ताडीच्या वासाने डोके भरून जायचे स्वाध्यायी ह्या गोष्टी दादांना सांगत तेव्हा दादा त्यांना आफ्रिकेतील जंगलातील लोकांचे उदाहरण देत ते ऐकून स्वाध्यायी पुन्हा नव्या जोमाने जाऊ लागत

मच्छीमाराचे घर खूप अस्वच्छ असे दुर्गंधी येत असे मुले आंघोळसुद्धा करीत नसत अशा मुलांना स्वाध्यायी जवळ घेऊन बसत त्यांना गोष्टी सांगत त्यांना बरोबर घेऊन भावफेरी करीत हळूहळू बालसंस्कार केंद्राची सुरुवात केली नंतर स्वाध्यायी पूर्ण रविवार तेथेच राहू लागले एक मात्र विशेष होते की, तिथे घराघरात देवाचा फोटो होता स्वाध्यायींनी त्यांना प्रश्न केला तुम्ही भगवंताला काय देता? ते म्हणाले केळी-सफरचंद देतो स्वाध्यायी म्हणाले म्हणजे तुम्ही जे खाता तेच त्याला देता ना? का? कारण भगवंत आपल्या आतच बसला आहे जर भगवंत आपल्यात आहे तर ह्या तोंडाने शिव्यासुद्धा द्यायला नकोत, ही समज हळूहळू स्वाध्यायी निर्माण करत होते

पुढे स्वाध्यायी घराघरात जाऊन वृद्धांबरोबर चर्चा करू लागले वृद्धांना शंका जास्त व आपलेपणाने त्यांच्याशी बोलणारे कुणी नाही म्हणून स्वाध्यायींबद्दल त्यांना आपुलकी वाटू लागली

आता स्वाध्यायींनी ठरविले की आपण आता लक्ष्मी-नारायण जोडीने यायचे व त्याप्रमाणे ते येऊ लागले मच्छीमाराच्या अस्वच्छ मुलांना भगिनीवर्ग स्वच्छ करू लागला त्यांचे केस विंचरू लागल्या, कपडे नीट करू लागल्या घरातील स्त्रियांशी बोलून त्यांना हळूहळू बाहेर काढू लागल्या याचा फारच परिणाम मच्छीमारावर झाला

पूज्य दादांनी दिलेला स्वाध्याय मंत्र स्वाध्यायींनी मच्छीमारांना दिला

त्यानी तो उचलला स्वत मच्छीमार उभा राहिला व आपल्याच बाधवाच्या घरात जाऊ लागला त्याने अजून पू. दादाना पाहिलेसुद्धा नव्हते तरीसुद्धा त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन त्रिकालसंध्या सागण्यासाठी घराघरात जाऊ लागला घरात मुलगा जन्माला आला की जो पूर्वी दारूची बाटली उघडत असे तो आता श्रीसूक्ताचे पठण करू लागला लग्न तर वैदिक पद्धतीने करू लागला लग्नाचे खरे महत्त्व तरुणाना समजावून देऊ लागला जे पूर्वी हजारो रुपये लग्नासाठी खर्च करीत व जीवनात काहीही चांगले करत नसत, जे कर्जात राहून ससार करीत ते आज सामूहिक विवाहामुळे, घरात सुखाने नांदू लागले झोपडीचे सुदर घरात रूपातर करू लागले त्याच्याकडे पैसा टिकू लागला, घराघरात बोट आली व असा हा मच्छीमार पू दादांचे विचार घेऊन जाण्यास सिद्ध झाला मृत्यू कोणाच्या घरात ओढवला तर १५ व्या अध्यायाचे पारायण करू लागला दुसऱ्याच्या दु खात स्वाध्यायी बधू या नात्याने सहभागी होऊ लागला व कुणी स्वाध्यायी नसला तरीही त्याच्या सुखदु खात माझा बधू म्हणून जाऊन बसू लागला अशाप्रकारे भोगजीवनातून भावजीवनाकडे वळला भक्तिफेरी भक्तियुक्त अत करणाने करू लागला

आता हजारो तरुण भक्तिफेरीसाठी दुसऱ्या राज्यातही जाऊ लागले विचार देताना विचार घेण्यासाठी पू. दादाची पुस्तके वाचू लागला मुलाकडे, त्याच्या शिक्षणाकडे लक्ष देऊ लागला मुलाना त्रिकालसध्या, निरनिराळी स्तोत्रे शिकवू लागला

ईश्वराने मानवाला मन व बुद्धी दिली आहे त्याच्याबरोबर कर्तृत्वशक्ती व इच्छाशक्ती दिली आहे त्याच्या आधाराने तो निरनिराळ्या क्षेत्रात मोठा होतो, कलाकौशल्य दाखवतो, निपुण बनतो परतु ज्याने हे दिले आहे त्यालाच तो विसरला कृतज्ञताच घालवून बसला माणूसपण हरवून बसला त्यातील माणूस परत जागा करण्यासाठी पू. दादांनी ऋषींची जीवनप्रणाली सांगायला सुरुवात केली त्यांनी सागितले की, माणसातील निपुणता-कुशलता ही ईश्वराची देणगी आहे ती जशी स्वत साठी वापरतो तशीच ईश्वरासाठीसुद्धा वापरायला हवी यामुळे एक शक्ती निर्माण होते म्हणून दादा म्हणतात, 'Bhakti is a social force '

पूजनीय दादानी मच्छीमाराच्या जीवनाला वळण दिले अनेक पिढ्या ज्यांच्या जिभेवर शिव्याच नाचत होत्या, ज्याच्या मुखाला दारूची दुर्गंधी

येत होती, सभ्यता व सस्कार याचा स्पर्शही ज्याच्या जीवनाला झाला नव्हता, त्याची जीवने पू. दादांच्या विचारस्पर्शाने व प्रेमाच्या उबेने उजळून निघाली, व्यसने गेली, असस्कारांशी नाते तुटले कुटुबातील भाडणे मिटली, प्रेमभाव वाढला आता तो मच्छीमार राहिला नाही पूजनीय दादानी त्याचे नाव बदलले-सागरपुत्र! साक्षात अगस्तींचे नातू!

त्यानी सागरपुत्र झाल्यावर जेव्हा पू. दादांकडे पाहिले तेव्हा त्याना भास झाला पू. दादा भगवताचे मत्स्यावतार तर नाहीत ना? पू. दादानी त्याच्यातील सुप्त सस्कार जागृत केले व त्यातून मत्स्यगधा अवतरली तिच्यामुळे सागरपुत्राना खऱ्या मंदिराची कल्पना समजली जिथे पूज्य भावाने काम करतो ते मंदिर! २१ डिसें १९८० रोजी पहिली मत्स्यगधा सागरात अवतरली आज अशा १८ मत्स्यगधा आहेत

मच्छीमार सागरपुत्र झाल्यावर, ज्याप्रमाणे सागर खवळतो, त्याप्रमाणे कार्यात नुसता खवळून उठला व गोव्यापासून ओखापर्यंतची सारी किनारपट्टी त्रिकालसध्या गाणारी केली. नतर तो गंगा-पुत्रांजवळसुद्धा गेला

पूर्वी सागरात बोटी-बोटींत भांडणे होत चोऱ्या होत असत आता सागरात मत्स्यगंधा आल्यावर ते थाबले एकदा पश्चिम किनाऱ्यापासून लांब सागरात एक वादळ झाले त्यावेळी ओखा बदरात घडलेली गोष्ट - एका स्वाध्यायीची बोट वादळात सापडली तिचे इजिन एकाएकी बिघडले ही गोष्ट जवळच मच्छीमारी करीत असलेल्या मत्स्यगधेच्या ताडेलाच्या लक्षात आली त्या बोटीच्या साहाय्याला थाबणे म्हणजे स्वत लाही धोक्यात घालण्यासारखे होते तरीही मस्त्यगंधेने धैर्याने पुढे जाऊन त्या बोटीला फाग दिली आणि यशस्वीपणे किनाऱ्यावर आणले एवढच करून थाबले नाही, तर त्या मच्छीमाराला सागितले की, 'तुझी जाळी आम्ही घेऊन जाऊ व त्यातून येणारे उत्पन्न तुझे!'

सागरपुत्रात सागराचा गुण दिसू लागला सागर म्हणजे लक्ष्मीचे घर सागराच्या लाटा येतात व परत जातात लाटा येतात कारण त्यांना काही सागायचे आहे पण सागण्यासारखा भगवताला जसा अर्जुन भेटला तसा कोणी भेटत नव्हता त्यामुळे लाटा परत जात सागराचे पाणी गोड असते तर सर्व प्रश्न सुटले असते पण ते पाणी खारे का? तर हा सागर आपल्या मुलांना दीन होऊ देत नाही लाचार करीत नाही तो स्वत चे पाणी सूर्याच्या तेजाने बाष्पात रूपांतर करतो व त्यापासून पाऊस देतो

सागर नकळत पाणी देतो मी दिले हे दाखवत नाही घेणारा लहान ठरतो म्हणून सागर ही वृत्तीच येऊ देत नाही हाच गुण आता सागरपुत्रात आला आहे मत्स्यगंधेतून येणारी लक्ष्मी सुद्धा सागरपुत्र आपल्यातील निराधार असेल त्याला भगवताचा प्रसाद म्हणून घरी जाऊन कोणालाही नकळत देतात.

पुढे पूज्य दादांनी मच्छीमार वयस्थसचलन करण्यास प्रेरणा दिली मुंबईला १९८१ साली मोठे वयस्थसंचलन झाले. त्यात १०,००० युवक त्रिकालसंध्या गाणारे होते

[illegible] गाव बदलून कतिभक्तीने गावात

दि. ४-७-१९८३ रोजी भगवंताचे मंदिर उभे केले- "अमृतालयम्!"

वेरावळच्या समुद्रकिनाऱ्यावर सागरपुत्राचे एक छानदार मीलन समेलन घडवून आणले हा कार्यक्रम संक्रांतिनिमित्त केला होता ज्याप्रमाणे अगस्तिऋषींनी समुद्र-प्राशन केला त्याचप्रमाणे पू. दादांनीसुद्धा समुद्र प्राशन केला सागरपुत्रांची अस्मिता जागृत केली समुद्रकिनाऱ्यावरील माणसांचे जीवन उजळ बनवले. या कार्यक्रमासाठी दीव-दमण-सातपाटी, रत्नागिरी, गोवा आदि विभागातून ४३०० बोटी सोमनाथाला नमस्कार करण्यासाठी आल्या होत्या यावेळी ४ थी मत्स्यगंधा अवतरणार होती या मत्स्यगंधेला इंजिन मिळाले नव्हते एका साहसी सागरपुत्राने स्वत.च्या बोटीला बसवलेले नवे इंजिन काढून ते न कळत मत्स्यगधेला लावून दिले त्याची बोट बंद पडली याचे त्याला दु:ख नव्हते. इतर सागरपुत्रांनी त्याची जाळी घेऊन जाऊन त्याचे उत्पन्न चालू करून दिले हा कार्यक्रम १४ जानेवारी १९८३ ला झाला

स्वाध्यायींच्या हातून घडलेले एक महत्त्वाचे कार्य म्हणजे खारवा व मेहेर या पोटजात लुप्त असलल्या [illegible]

त्यावेळी २००० सत्यनारायण-महापूजा करून त्यांनी उत्सव साजरा केला- २१ मार्च १९८४

महाराष्ट्रात ५-५-८५ ला अर्नाळा येथे चार मत्स्यगधांचे जलावतरण झाले तीर्थराज मीलनात सागरपुत्रानी सिक्युरिटीची जबाबदारी घेतली व जे पोलीस तीन तीन वर्षे ट्रेनिंग घेतात त्यांना सुद्धा शरमिंदे करील अशी सिक्युरिटी-संरक्षण, ट्रेनिंग न घेता करून दाखवले

पूज्य दादांबरोबर ओखा ते गोवा सागरपुत्रांचे वर्षामिलन के सी

कॉलेजला झाले हे १९८७ साली झाले या वर्षामिलनात पुढील पूर्ण वर्षात काय काम करणार, कोणते प्रयोग करणार याचा सकल्प केला जातो याच कार्यक्रमात पाठशाळेचा हीरक महोत्सव साजरा करण्यासाठी २ लाख सागरपुत्रांनी 'नारायणोपनिषद्' मुखोद्गत करून येण्याचा संकल्प केला १० जानेवारी १९८८ ला गिरगाव चौपाटीवर एका गणवेशात २ लाख सागरपुत्र व १ लाख भूमिपुत्र आले होते निरनिराळ्या ध्वजानी सजवलेल्या १८०० बोटी आल्या होत्या सात नवीन वस्तीमंदिरे (मत्स्यगधा) या दिवशी सागरात डोलू लागली पू. दादाच्या हस्ते जलावतरण झाले हा सोहळा बघण्यासाठी अमेरिकेतील काही निष्ठावत बधू आले होते ते पाहून थक्क झाले यावेळी मत्स्यगंधांची एकूण संख्या १८ झाली

पुढे १२ ऑगस्ट १९८८ ला ७००० सागरपुत्र भक्तिफेरीसाठी गेले व १५ ऑगस्टला पू. दादांबरोबर षण्मुखानंद सभागृहात वर्षामिलनासाठी एकत्र झाले यात पुढील वर्षात अजून ७ मत्स्यगधा तयार करण्याचा सकल्प केला तसेच परदेशात भक्तिफेरीला जाण्याचा सकल्प केला

दि २० नोव्हें १९८८ ला जागतिक कीर्तीचे शिक्षणतज्ज्ञ श्री मजिद रहेनूमान हे स्वाध्यायकार्याची पाहणी करण्यासाठी आले होते ते २५ नोव्हें ला मोठी दमणमध्ये मत्स्यगधेचा प्रयोग बघण्यासाठी गेले १० ते १५ हजार सागरपुत्राच्या सहवासात त्यांचा एक कार्यक्रम ठेवला त्यात सागरपुत्रांनी काही सास्कृतिक कार्यक्रम केले सागरपुत्राचा उत्साह पाहून ते आश्चर्यचकित झाले नंतर ते कृष्णपूर या सागरपुत्राच्या गावात गेले त्यानी विचारले, 'मी प्रत्येक घरात जाऊ शकतो का ? सागरपुत्रांनी आनदाने होकार दिला ते एका घरात गेले व घरातील भगिनीस विचारले, 'स्वाध्यायामुळे तुला काय मिळाले ?' भगिनीने उत्तर दिले, "आम्हाला 'स्वाध्याय मिळाला नव्हता तेव्हा आमचे घर म्हणजे मोडकी झोपडी होती तिला दार नव्हते घरात अस्वच्छता होती दारूच्या बाटल्या पडलेल्या असत ताडीची मडकी पडलेली असत पण स्वाध्यायामुळे आमचे घर मदिर झाले घराची झावळी जाऊन सिमेंटचे पत्रे आले सायकलच्या जागेवर मोटरसायकल आली माझ्या अगावर एकच फाटके लुगडे असे, ते आता नवीन पातळ आले पू. दादामुळे मला हे मिळाले कारण माझा खरा पती मला मिळाला जो प्रथम रागाने मारीत असे तो मला पातळ घेऊन येऊ लागला " हे सर्व ऐकल्यावर श्री रहेनुमान जवळच असलेल्या खाटेवर

थक्क होऊन बसले

अशा प्रकारे जे मच्छीमार dog पेक्षाही खालच्या पातळीचे जीवन जगत होते त्याना पू. दादांनी सागरपुत्र बनवले व अगस्तिऋषींचे नाते समजावून ते आता God च्या मार्गाने घेऊन चालले आहेत !

या सविस्तर लिखाणावरून या भागातील आठवले शास्त्रीजींचे महान कार्य, व त्याच्याविषयी मच्छीमारांच्या मनात वसत असलेली आदर-भावना ह्याचे हृद्य दर्शन घडते।

**चिचणी-तारापूर दि २६ नोव्हेंबर १९९१**

चिचणी-तारापूर ही गावे आता या परिसरात किंवा महाराष्ट्रातच नव्हे, तर परप्रांतातही दूरवर सुविख्यात झाली आहेत, ती इथ अलीकडल्या काळात भरभराटीस आलेल्या ' डाय मेकिंग ' च्या कामामुळं इथल्या बहुतेक मच्छीमारांनी हा व्यवसाय स्वीकारला आहे

तारापूरला पाचाळ समाज हा व्यवसाय पूर्वीपासूनच करीत आहे निरनिराळ्या दागदागिन्यांचे, कलाकुसरयुक्त, आकर्षक ठसे बनविण्याच्या- ' डाय मेकिंग 'च्या कामात पाचाळ समाजातील कलावंत प्रसिद्ध आहेत. त्याच्याकडे कामाला जाऊन जाऊन, पाहून पाहून, मच्छीमारानीही ठसे बनविण्याची कला आत्मसात केली व तीच आपला व्यवसाय बनवून ती वर्धिष्णूही केली आज चिंचणीमध्ये थोड्या थोड्या अतरावर, घराघरातून असे ठसे बनविण्याचे काम चाललेले पाहिले रमेश गणपत वझे, शशिकात अर्जुन तापोरे आदी तरुणाशी बोललो समजावून घेतले

या मडळींनी आपला व्यवसायच केवळ बदललेला नसून, आपल्या जीवनातही परिवर्तन घडवून आणलेले आहे जसे हे चिचणी गाव डाय मेकराचे- ठसे बनविणाराचे बनले आहे तसेच शास्त्रीजींच्या स्वाध्याय दीक्षेने दीक्षित झालेले आहे इथ प्रार्थनामंदिर आहे बालसंस्कार व महिला केन्द्र आहे भक्तीफेरी, अनाथ-अपग वृद्धसेवा अशी समाजहिताची कामे चालतात पंधरवड्यातून अर्धा दिवस ही मंडळी आपल्या व्यवसायातून वेळ काढून स्वाध्याय-मडळासाठी देतात त्याची मजूरी मडळाकडे सुपूर्द करतात स्त्रियाही आपआपली कामे संभाळून राखी बनविण्याचे काम करतात त्याचे उत्पन्न मंडळास अर्पण करतात आपले दिवसभराचे काम आटोपल्यावर

स्वाध्यायासाठी रात्री दोन-तीन तास काम करणारीही मंडळी आहेत या सुमारे ३००-३५० मंडळींचा ‘ कलारंग परिवार ’ आहे गेल्या काही वर्षांत सामूहिक विवाह लावण्याचा उपक्रमही इथे झाला या परिसरातील पाच हजार स्वाध्यायींचे ‘ कलारग स्नेहमीलन ’ झाले

चिंचणीला आता दोन-तीन बोटीच शिल्लक असून फार थोडे लोक मच्छीमार व्यवसायात आहेत अस असल तरी काही मडळी अशीही भेटली की, प्रार्थना करून किंवा त्रिकालसध्या करून समाजाच काय भलं होणार आहे, अशी त्यांनी स्वाध्यायावर टीका केली ‘ निंदकाचे घर असावे शेजारी ’

**वरोर दि. २७ नोव्हेंबर १९९१**

खंबाई देवीच वरोर सागरतटी वसलेलं आहे खंबाई ’ही वरोरची ग्रामदेवता. गावात विठ्ठल-रुक्मिणीचं देऊळ आहे चैत्र शुद्ध पौर्णिमेला खंबाई देवीची गावात जत्रा भरते गावात ब्राह्मणांची आठ-दहा घर आहेत खबाईची पूजा-अर्चा व पौरोहित्य ते करतात शेतकरीही आहेत ‘ वाडवळ ’ म्हणजे वाड्या करणारे, ते व भंडारी समाजाचीही वस्ती आहे हरिजन-गिरीजन आहेत. पण पाच हजार लोकसख्येच्या वरोर गावात अडीचतीन हजार मच्छीमार आहेत. वरोर हे प्रामुख्याने मच्छीमारांचेच गाव सगळे मांगेलच

वीस-पंचवीस वर्षांपूर्वी कव पद्धतीनं मच्छीमार करून बोंबिल माशांचा व्यापार इथं बराच भरभराटलेला होता त्यावेळी बावीस बोटी इथं होत्या. आधी शिडाच्या बोटी होत्या नंतर इजिनाच्या आल्या सहकारी पद्धतीन व्यवसाय सुरू केला इंजिनं घेतली, पण ती तेवढी चागल्या दर्जाची नव्हती शिवाय डिझेल पुरविणाऱ्या व्यापाऱ्यांनीही त्यात रॉकेल वगैरे मिसळून फसगत केली त्यामुळे ती इजिनं थोड्याच दिवसात बंद झाली मच्छीमारांची सोसायटी गावात होती दिवसभराच्या कमाईतली एक पाटी मासळी सोसायटीला द्यायची व अशा बावीस पाट्या जमलेली मासळी विकून सोसायटीनं लोकहिताची कामं करायची, असं ठरलं होतं पण प्रत्येकाचाच स्वार्थ आड येऊ लागल्यानं सोसायटी तोट्यात निघाली व बंद पडली बोंबिलाची मच्छीमारीही बंद झाली

त्यानंतर लहान लहान होड्यांनी शिवण ’ मासे पकडण्याची

शिवण-मच्छीमारी सुरू झाली ऑगस्ट-सप्टेंबर हे दोन महिने शिवणचा हंगाम जोरावर असतो मासा चविष्ट असल्याने परदेशी मागणी मोठी ४०० रुपये किलो या दराने हा मासा जातो. यालाच 'लाफ्टर म्हणतात बोंबिलाच्या मच्छीमारीपुढे त्यावेळी शिवणकड मच्छीमारांनी लक्षच दिल नव्हतं व खडकांमधून मिळणारा हा मासा खोल पाण्यातही मिळू शकतो, याचीही त्यांना कल्पना नव्हती 'तुझे आहे तुजपाशी, परि तू जागा चुकलाशी' अशातली गत झाली होती तथापि, एका वृद्धानं सांगितलं, "असं जरी असलं तरी आमच्या लहानपणी एवढी किंमत शिवणला नव्हती एक आण्याला एक किलोचा शिवण मिळायचा त्यावेळी एक आणा म्हणजेही महाग होता. त्याच एक आण्याची किंमत आज चारशे-साडेचारशे रुपये. झाली आहे एकेक मोठाला शिवण किलोभर वजनाचा असू शकतो."

दुसऱ्यानं सांगितल, "हा मासा पूर्वीही आम्ही फारसा खात नव्हतो. पाहुणारावळा आला तर त्याला शिवणचं कालवण व्हायचं आता तर तेबी बंद झालं आहे कारण त्याला पैसा पुष्कळ मिळतो. पाहुण्याला दुसरं तिसर गोडधोड केल किंवा आहे त्या मासळीतन भागवता येतं त्याच्यासाठी चारपाचशे रुपये कशाला सोडा, असा विचार आला."

"म्हणजे तुमच्या भागात तुमच्या खडकावर उत्पन्न झालेला उत्तम चवीचा शिवण मासा तुम्ही पकडणार आणि विकणार खाणारे दुसरेच."

"हां असंच झालंय."

या भागात शिवणची मच्छीमारी करणाऱ्या लहान इंजिनच्या आता ३५-३६ होड्या आहेत. एका होडीवर चार माणसं जातात दोन-दोन मैलावर जातात यासाठी वेगळ्याच प्रकारची जाळी लागते. त्याचा धागा वेगळाच असतो जाळही एकदाच वापरता येतं. ते फाटतं दुरुस्त करता येत नाही. खडकावर जाळं टाकावं लागतं. या प्रकारच्या मच्छीमारीत पैसा पुष्कळ मिळतो म्हटल्यावर या भागातले आणि गुजरातकडलेही लोक इथं येऊ लागले आहेत. हद्दी काही ठरलेल्या नाहीत त्यावर काही निर्बंध नाही. त्यामुळं मासळी पुष्कळ असूनही कमी मिळू लागली आहे कारण मच्छीमार वाढले. जाळी वाढली मिळणाऱ्या माशात वाटणी झाली आणखी एक कारण असे की, खडकावर जाऊन फार लहान, लहान कोवळी शिवण पकडली जाऊ लागली ती नीट वाढू दिली जात नाही ही वाईट प्रथा झाली आहे ती बंद केली पाहिजे कारण यामुळे चार महिने पुरणारी सुरू

मासळी दोन महिन्यातच सपते

शिवण मासा जाळ्यात सापडल्यावर व जाळे पाण्याच्या बाहेर खेचल्यावर, इतर माशाप्रमाणे लगेच मरत नाही दोन-तीन दिवस, मुबईला जाईपर्यंत जिवत राहतो, हे त्याचे वैशिष्ट्य आहे

अलीकडच्या काही वर्षांत चिंचणीप्रमाणे वरोरलाही डायमेकिंगचे काम सुरू झाले आहे इथले काही लोक चिंचणीतच कामाला जात असत कामातून ते शिकले आणि आता इथं स्वतंत्र व्यवसाय थाटला आहे गावातले काही तरुण M I D.C - औद्योगिक कारखान्यातूनही नोकरी करू लागले आहेत पूर्वी गुजरातमध्ये असलेले अनेक लोक या भागात वसलेले आहेत त्यामुळे त्याच्या बोलीभाषेतही अनेक गुजराती शब्द घुसलेले आहेत नवापूर वगैरे काही भागात तर अशा मंडळींना ‘ बारी ’, म्हणजे बाहेरून आलेले अशा अर्थी बारी म्हणतात

वरोरमध्येही स्वाध्याय केन्द्र आहे. शास्त्रीबुवांचे बरेच अनुयायी आहेत पण काहीजण असेही भेटले की ज्याना त्रिकालसध्या वगैरे पसत नाही त्यांचे म्हणणे असे की, ‘ या मडळींचा आचार विचाराप्रमाणे घडत नाही समाजाची सेवा करायला निघालात, ठीक आहे उत्तम आहे, पण घरी आई-वडिलाची सेवा करता का ? त्यांना विचारता का ? ’

वरोर-पंचक्रोशींत आजतागायत लोकपंचायत चालते गावातले तंटे-बखेडे-तक्रारी पचायतीपुढे येतात, सबधिताना आपापली बाजू मांडण्याची पूर्ण मोकळीक असते सारा गाव जमा होतो पचमडळीबद्दल लोकांत आदर व विश्वास आहे ते देतील तो निर्णय पाळला जातो खटले खोकले सरकारी कोर्टात जात नाहीत पंचायतीमार्फतच ते मिटवले जातात, ही फार चांगली प्रथा या गावाने जोपासलेली आहे

एकजण मात्र म्हणाले, “ हे चांगले आहे, पण सुधारणेच्या नावावर जे काही येत आहे, आलं आहे, ते काही तिळकंस चांगल नाही ”

“ म्हणजे ? ” मी विचारलं

तर ते म्हणाले, “ सण-समारंभ वगैरे पूर्वीप्रमाणं प्रथेप्रमाणं आम्ही पाळतो ”

“ होळी, शिमगा तुमच्यातला मोठा सण ना वर्षाचा ? ”

“ आता बारा महिन्यांचा ! ”

“ म्हणजे ? ”

"तेच सागतो गणपती असो, गोकुळअष्टमी असो, किंवा सत्यनारायणाची पूजा असो, रात्रभर धिंगाणा चालतो भजन-कीर्तन गेल नि डिस्को फिस्कोचा शिमगा आला आमच्यासारख्या जुन्या मडळींना हे बरं वाटत नाही माणसाला विरंगुळा-हौसमौज-मजा-करमणूक पाहिजेच, याबद्दल वाद नाही, पण त्याची पातळी फार घसरत चालली आहे माझ्या घरातला समारंभ, पण शेजाऱ्याला दिवसरात्र त्रास मोठ्या कर्कश आवाजाचे लाऊडस्पीकर्स-धिंगाणाच वर म्हणायचं, 'आमच स्वातंत्र्य' स्वातंत्र्याचा हा दुरुपयोग आहे अरे, तुमचं स्वातंत्र्य खर, पण दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर गदा कशासाठी?— याचा विचारच नाही सगळीकडच अस चाललंय "

"तरुणवर्ग उच्छृंखल बनत चालला आहे" एकजण म्हणाले

"कशामुळ?"

"पैसा पैसा हातात खेळू लागला"

"म्हणजे व्यवसायात पैसा मिळू लागला, कमाई चागली होऊ लागली, आर्थिक सुबत्ता आली, ही चागली गोष्ट झाली, पण हाती आलेला हा पैसा चागल्यारीतीन कसा वापरावा, हे कळेनासं झाल आहे, असच ना?"

"बरोबर पैशामुळं चैनबाजी वाढली, व्यसन वाढली हलक्या-फुलक्या गोष्टीत गोडी वाटू लागली"

"खर आहे तुकोबानी सांगितलय, जोडोनिया धन उत्तम वेव्हारे! उदास विचारे वेंच करी "

**डहाणू. दि. २८ नोव्हेंबर १९९१**

सकाळी सकाळीच डहाणूच्या बंदरावर उतरलो बदर रगीबेरंगी निशाणे फडकावीत उभ्या असलेल्या कितीतरी बोटींनी गजबजलेले होते पाठीवर सूर्य घेऊन पश्चिमेकडे चाललेल्या बोटींचा ताडा दिसत होता उन्हात पाणी चमचमत होते

डहाणू हे 'तरते' बंदर आहे म्हणजे खाडीला खोल पाणी आहे त्यामुळ मच्छीमारीसाठी जाणाऱ्या-येणाऱ्या बोटींना भरती-ओहोटीवर अवलंबून राहावे लागत नाही

त्या खाडीत अलीकडे शिवण-मच्छीमार चालते शिवणला मागणी फार. पावसाळा सपताच हगाम सुरू होतो त्यावेळी एकेका बोटवाल्यांना

२०-२२ किलो शिवण सापडतो हंगाम संपत आला म्हणजे तीन-चार किलो सापडतो या भागात ताबूस रंगाचे नक्षीदार खेकडेही पुष्कळ सापडतात खेकडे झोपाळू फार त्यामुळे चावत नाहीत शंख, शिंपले, दगडी वेलपत्ती, फुल - अशा विविध प्रकारची सागरी-सपत्ती इकडं पुष्कळ गवसते

कासा, वानगाव या भागातही जाऊन आलो पाहिले ऐकले बोललो, आणि पुण्याला परतलो महिन्यानंतर पुन्हा परतलो घाटकोपरला गेलो श्री मर्दे तिथे राहतात त्याचा मच्छीमारी या विपयाचा अभ्यास मोठा अध्यापक म्हणून अनुभवही मोठा. दि २० डिसेंबर १९२१ रोजी त्याची भेट घेतली, मुलाखत झाली त्यांच्या बोलण्यातून समजले ते असे :

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, मुंबई, रायगड अशा महाराष्ट्रातल्या ह्या पाच जिल्ह्याना ७२० किलोमीटरचा किनारा लाभलेला आहे त्या त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीनुसार मच्छीमारीच्या पध्दती वेगवेगळ्या आहेत त्यात प्रामुख्यान 'डोल' ची पध्दत सर्वत्र चालते डोलची पध्दत वसई, अर्नाळा भागात फारच मोठ्या प्रमाणावर आहे एकेका घरात १५-२० डोली मांडतात त्याची आर्थिक ताकद मोठी आहे या प्रकारच्या डोली मांडायला पन्नास-साठ हजाराचा खर्च येतो डोल जाळ्याला प्लॅस्टिकचे फ्लोट बांधून सागराच्या पृष्ठभागाजवळची पॉपलेटची मच्छीमारी करतात पॉपलेटचा थवाचा थवा असतो एक किलो वजनाची एक मादी कमीत कमी एक लाख अडी घालते. फार मोठ्या प्रमाणावर पॉपलेटचे प्रजनन चालते जून-जुलै व जानेवारी-फेब्रुवारी अशा दोन हंगामात हे प्रजनन मोठ्या प्रमाणावर होत असते.

वेगवेगळ्या प्रकारच्या माशाचे प्रजनन-हंगाम वेगवेगळे असतात. दाला नावाचा पाच फूट लांबीचा मोठा मासा जून-जुलै-ऑगस्ट या पावसाळी दिवसात गोड्या पाण्याचे प्रवाह जिथे खाऱ्या पाण्यात मिसळतात तिथे यांच्या माद्या जातात निमखाऱ्या पाण्यात अंडी टाकतात सातपाटी, शिरगाव, वडरी या गावांजवळ अशी अनुकूलता आहे खडकाळ भाग आहे पावसाळ्यामुळे खाऱ्या पाण्याचा खारटपणा कमी झालेला असतो खाऱ्या खोल समुद्रातून ती मादी उथळ खडकाळ गोड्या पाण्याकडे सरकते. ही दाला मादी एकावेळी पाच ते सात लाख अडी टाकीत असते

कोळंबी मादी असते अडीचशे ग्रॅम वजनाची तिच्या पाठीवर

असलेल्या निळसर पट्ट्यात तिची अंडी असतात ती देखील एका वेळी पाच लाख अंडी टाकीत असते तिचा प्रजनन-हंगाम जानेवारी ते मार्च असा तीन महिन्याचा असतो

भिंग आणि पाला हे दोन जातीचे मासे गोड्या पाण्यात अंडी टाकतात अंडी टाकण्यासाठी ह्या माशांच्या माद्या भरतीबरोबर नर्मदेच्या खोऱ्यात लांबपर्यंत जातात, तिथे खारे पाणी संपते व गोडे पाणी सुरू होते, तिथपर्यंत जातात.

वसई भागात काळी नदीत अशी अंडी ह्या माद्या टाकत असतात पण अलीकडे कारखान्यातील विषारी पाण्याने ह्या नद्याचे पाणीही प्रदूषित केले आहे या माशाच्या जातीच नष्ट झाल्या आहेत काही जाती अन्य ठिकाणी गेलेल्या आहेत

माणसांच्या हव्यासान एकीकडं विराट औद्योगिक स्वरूप धारण केलेलं आहे, तर त्याच स्वरूपानं निसर्गाची साथ सोडून सैतानी रूप धारण केलेलं आहे! निसर्गही सुरक्षित राहावा व विकासही साधावा असा समतोल राखण्याचा प्रयत्न होण्याची आवश्यकता फार आहे

**वरसोवा-मढ-मुंबई : दि. २८ डिसेंबर १९९३**

मुबई शहराच्या नजीकचे बृहन्मुंबईतले वरसोवा हे मच्छीमारीचे मोठे केंद्र मुंबईचे उपनगरच मोठमोठ्या अनेक मजली इमारती, संस्था, कचेऱ्या, वाहने यानी गजबजलेले शहरीपणाने नटलेले वरसोव्याला 'वेसावा' असही म्हणतात. इथला कोळीवाडाही सुखासीन दिसतो कितीतरी घरादारांनीआपलं ---- मोडलं आहे आणि नवीन रंगरूप धारण केलं आहे काही घरांतून गेलो. पुष्कळच आधुनिकता दिसली. खाडीवर गेलो आणि खंतावलो सगळी खाडी प्रदूषित पाण्यान बिघडलेली बरोबर जगन्नाथ सिद्धे हे स्थानिक मच्छीमार होते ते म्हणाले, "मोठ्या यांत्रिक होड्या खोल समुद्रात लांबवर जातात, पण गोरगरीब खाडीतली मच्छीमारी करीत असत त्यांचा धंदा पार बुडाला फार काय,आमच्या कोळ्यांच्या पोरांची हुंदडायची, खेळायची जागा म्हणजे खाडी ती अशी दूषित झाल्यान त्यांच खाडीतलं खेळणं बंद झालं कोळ्याचं पोर पोहायला केव्हा शिकायचं हे कळायचंही नाही, आता खाडीबंदीमुळं कोळ्यांच्या पोरांनाच पोहण ठाऊक नाही, अशी गत होणार आहे"

वरसोवा हे गाव राजकीय, सामाजिकदृष्ट्याही जागरूक आहे स्वातंत्र्य-लढ्यात या भागातील मंडळींनी धडाडीनं भाग घेतला होता अनेक तरुण राष्ट्रसेवादलात होते जगन्नाथ सिद्धे म्हणाले, " सेवादल, समाजवादी पक्ष याच्याशी संबंधित असल्यामुळं मधु दंडवते यांचा आमचा फार परिचय त्याचाही आमच्या गावावर लोभ त्यांनी खटपट करून डिझेल खरेदीवर आम्हाला ३५ पैसे लिटरमागे जादा सबसिडी मिळवून दिली त्यांनी आम्हा मच्छीमारांना पहिल्यापासूनच सहानुभूतीनं मदत केली "

वरसोव्याला 'केंद्रीय मच्छीमार संशोधन केंद्र' आहे सागरी संशोधनाचं काम इथं चालतं

माहीमच्या कोळीवाड्यात जाऊन आलो ही तर मुंबईच! मत्स्यगंध आणि मच्छीमारी साधनांच्या काही खाणाखुणा सोडल्या तर मुंबईत ठिकठिकाणी उठलेल्या नव्या चाळींच्या वसाहतींसारखीच ही देखील एक वसाहत सोबतीला जुन्या वस्तीचा शेजार आहेच

वरळी-कोळीवाड्यात माझे जुने मित्र श्री केसरीनाथ पाटील यांच्याकडे मुक्काम ठोकला त्यांच्याकडे मागे एक-दोनदा आलो होतो एका वर्षी होळीचा सण साधून मुद्दाम दोनतीन दिवस राहिलो होतो कोळीवाड्यातली होळी मोठ्या धामधुमीची, ती पाहण्यासाठी व त्यानिमित्ताने होळीची गाणी ऐकण्यासाठी राहिलो होतो केसरीनाथची आई, भाऊ, पत्नी, मुलं, सगळ्यांसह मी त्या घरचाच बनून गेलो होतो केसरीनाथने होळीच्या रात्री कोळीवाड्यात सगळीकडं हिंडवलं, काही घरी नेलं, ओळखी करून दिल्या गावभर धामधूम होती रस्ते गर्दीत बुडून गेले होते कानठळ्या बसतील असे संगीत दुमदुमत होते उत्साह-आनंद ओसंडत होता पण अपेक्षित पारंपरिक सांस्कृतिकपणा त्यात नव्हता वरळीची होळी आधुनिक-फिल्मी झालेली दिसली माझा काहीसा विरसच झाला वाटले, " ह्या डिस्को-डान्सच्या उडत्या फॅशनच्या आक्रमणापुढे होळीची जुनी गाणी, नृत्य, खेळ ह्या गोष्टी फक्त वृद्धांच्याच स्मरणात राहणार! "

'ससून डॉक'ला गेलो दोनशे वर्षांपूर्वी बांधलेला हा भरभक्कम दगडी धक्का आपले जुनेपण दाखवत उभा आहे पण तो आता वाढलेल्या बोटींच्या संख्येनं येण्याजाण्याच्या दृष्टीनं फार अडचणीचा बनला आहे मच्छीमारी व्यवसायाचं हे एक देशातलं मोठं, आंतरराष्ट्रीय महत्त्वाचं बंदर! इथली गजबज, धावपळ, आरडाओरडा, होड्यांची गर्दी, रंगीबेरंगी निशाणं,

मासळींच्या टोपल्या, कोळी स्त्री-पुरुषाची वेशभूषा, भाषा, सगळं वातावरणच वेगळं!

क्रॉफर्ड मार्केटमधल्या मच्छीमार बाजारातही चक्कर मारली तिथही अशीच गजबज, धावपळ, दिसली बराचसा बाजार महिलाच्याच हाती दिसला कितीतरी प्रकारची मासळी पाहायला मिळाली आपआपल्या भागात एके ठिकाणी बसून वा डोक्यावर पाटी घेऊन, फेरी करून, मासळी विकणाऱ्या किती तरी कोळणी इथं आपला माल ठोकीन खरेदी करतात मासळीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर इथ चालतो आणि काहीजणांशी बोलता बोलता असहीं कळल की इथंही चोऱ्यामाऱ्या, लुबाडणूक, दादागिरी चालते “ माणसा माणसा कधी व्हशील माणूस ? ”

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# रायगडच्या सागर-सान्निध्यात

१९९२ मार्च-एप्रिल! प्रारंभीचा मे देखील! उन्हाळ्याच सालाबादप्रमाणं आगमन झाल होतं. उन्हाचं फूल सर्वांगांनी फुलल होतं. गुलमोहर, पांगारा, बहावा, शिरिष आदी वृक्षमित्रांनी वासंतिक वेष परिधान केला होता मोगरा, चाफा, दुपारी, आदी सुगंधी सोबत्यांनी सुवासानं परिसर परिमळून टाकला होता आणि अशा रंगीत गंधित रसमय दिवसांतच पुन्हा एकदा पश्चिमतटावरून सागराचं निमंत्रण झालं! रक्तात घुसलं. रक्तातल्या समुद्राला भरती आणू लागलं पुन्हा एकदा समुद्र बोलावू लागला खुणावू लागला अस्वस्थ करू लागला

अस्वस्थ झालोच! कारण ही सागरहाक असतेच अशी प्राणाशी मिठी घालून खेळणारी! खेळवणारी!

या वेळपावेतो गेल्या काही वर्षांत, महिन्यांत रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, मुंबापुरी .. या भागातील किनारपट्टीवरील भ्रमती झाली होती समुद्राशी मैत्री जमलेली होती . समुद्राशीच केवळ नव्हे, तर समुद्र, मासा आणि समुद्रावरील माणूस याची देखील दोस्ती झाली होती त्यांच्यातलं नातं, काहीसं उमगलं होतं. सगळं नाही तरी त्यांच्यात एक सूतगूत आहे, एवढं निश्चित लक्षात आल होतं

आता जी सागरहाक होती ती कुलाब्याकडून - नव्या रायगडकडून रायगड जिल्ह्यासाठी सुमारे १६० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे १० ते १०० वाव आत समुद्रात असे २००० ते ११००० चौरस कि. मी एवढ सागरी क्षेत्र मच्छीमार व्यवसायासाठी उपलब्ध आहे

१०३ मच्छीमारांची गाव किनाऱ्यालगत आहेत आणि सुमारे ३०,००० मच्छीमार या व्यवसायात गुतलेले आहेत माशाचे प्रकार आणि आकार तरी किती! माझ्यातला भटक्या सजग झाला पायावरचा भोवरा गती घ्यायला उत्सुक बनला पण हे घडावं कस? रत्नागिरी-सिंधुदुर्गला जस्टिस देसाई भेटले ठाणे-मुंबईसाठी तुळशीदास तांडेल मिळाले आता कुलाब्यासाठी? प्रश्न होता, पण चुटकीसरशी सुटला इच्छा तिथं मार्ग!

त्याचं अस झालं · कऱ्हाडजवळ तळमावले नामक गाव आहे तिथल्या महाविद्यालयाचे प्राचार्य पुरुषोत्तम शेठ आहेत त्यांची माझी जुनी मैत्री सेवादलातली एका ध्येयान बाधलेली तर १९९१ सालच्या डिसेंबरमध्ये २४ डिसेंबरला - साने गुरुजींच्या जयंतीला तळमावल्याच निमंत्रण त्यानी मला सेवादलाच्या मेळाव्यात नोव्हेंबरातच देऊन ठेवलेलं होत मी गेलो बोलता बोलता पुरुषोत्तम सेठना म्हणालो, "तुम्ही गोरेगावचे कुलाबा जिल्ह्यातले मला तिकडल्या किनारपट्टीवर फिरायचं आहे .वगैरे" ते म्हणाले, "गोरेगावच्या दोशी वकिलांना लिहा ते सगळी व्यवस्था करतील त्याचा तिकड पुष्कळ संपर्क आहे खूप ओळखी आहेत"

दोशी वकिलांची प्रत्यक्ष गाठभेठ नव्हती, पण त्याच्या 'दक्षिणयुग' साप्ताहिकाच्या दिवाळी अंकासाठी दरवर्षी लिहीत होतो पत्रानं परिचित होतो साप्ताहिकाच्या वर्धापन-दिनासाठी दोन वेळा त्यांनी मला फोनवरून निमंत्रितही केलं होतं, पण माझ्याच अडचणीमुळ दोन्ही वेळा मला जाणं जमलं नव्हत. अशी पत्र व फोन भेट झालेली होती त्या भेटीवरूनही दोशी वकिलाच्या स्नेहशीलतेची, दिलदारीची कल्पना आलेली होती प्रत्यक्षात प्रचीतीच आली तर मी त्याना पत्र लिहिलं माझी इच्छा - अपेक्षा कळवली त्याच्याकडून 'होकार' आला मग मीही समुद्राचे निमंत्रण स्वीकारले, तयारी केली नि २५ मे १९९२ रोजी संध्याकाळी गोरेगावच्या पीतांबर बंगल्यात दोशी वकिलांपुढ हजर झालो दोशी वकील व त्यांचे चिरंजीव प्रदीप या पितापुत्रानी प्रेमळ स्वागत केलं त्यांचा पाहुणा म्हणून त्याच्याकडंच राहिलो थोडक्याच अवधीत दोशी वकिलाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या मंडळींचा, फोनचा राबता पाहिला, नि दोशी वकिलांच्या विस्तृत लोकसपर्काची व व्यवसायशीलतेची ओळख झाली दोशी पितापुत्र करविषयक व्यवसायातील उत्तम सल्लागार, वकील आहेत या वकिलीमुळे आसपासच्या परिसरातील गावागावातील व्यापारीवर्गात त्याची चागली

जानपहचान आहेच पण व्यवसायाच्या पलीकडील सामाजिक कार्यामुळेही त्याचा मित्रपरिवार विशाल आहे

संध्याकाळी बंगल्यापुढल्या प्रागणात खुर्च्या टाकून बसलो होतो गप्पागोष्टी रंगल्या होत्या नवखेपण बुजत होते दोशी वकिलांनी मग माझ्या हाती एक छोटीशी फाईल दिली त्यात मी त्याना लिहिलेल्या पत्रासह, त्यांनी माझ्या संभाव्य भ्रमतीच्या संदर्भात केलेला पत्रव्यवहार, सपर्कासाठी पत्ते, कार्यक्रमाची रूपरेखा, इत्यादी कागदपत्रे होती त्याच्या व्यवस्थेत नीटनेटकेपणाची, तत्परतेची छाप पडल्याशिवाय राहिली नाही दोशी वकिलानी सागितल, "उद्या सकाळी आपण आधी बोर्लीला जायच तिथून पुढचा कार्यक्रम सुरू होईल."

**बोर्ली - भरडखोल - श्रीवर्धन : दि. २६ मे १९९२**

सकाळी उठलो नि सर्व आटोपून काही वेळान दोशी वकिलाच्या कारनं बोर्लीला आलो वाटेवर कोकणच हिरवं वैभव भेटल बोर्लीत श्री महमद मेमन भेटले. दोशी वकिलानी ओळख करून दिली मेमन याचा व्यापार मोठा आहे कुटुबही मोठे आहे त्याच्याच एका दुकानातील परिसरात नव्यानेच उठवलेल्या बंगलीतल्या वरच्या मजल्यावरच्या एका सुसज्ज खोलीत मुक्काम ठोकला 'पर्वतपे अपना डेरा!'

बोर्लीहून आलो भरडखोलला भरडखोल हे या भागातले मच्छीमारी व्यवसायातले एक मोठे केन्द्र आहे मच्छीमाराची दीडदोनशे घरांची वस्ती आहे पाचएकशे मच्छीमार आहेत गावची ग्रामदेवता पिपळादेवी देवीचं देऊळ लहानसर पण विठ्ठलमदिर मोठ आहे आपाढीवारीला नित्यनेमाने जाणारे तिघ - चौघ वारकरी बाकीचे सोयी-सवडीन जाणारे देवळात एक वृद्ध गृहस्थ भेटले म्हणाले, "आमचा विशेपत म्हणजे विष्णूदेव त्यानंच पहिला अवतार घेतला तो माशाचा. मत्स्यावतार! त्याची भक्ती आम्ही करतो भजन गातो!"

"एखाद गाऊन दाखवा की!"

म्हातारबाबानी लगेच सुरुवात केली कापऱ्या आवजात गाऊ लागले

सावळ्या हरी मला पढरी दाव रे, पढरी दाव।
विठ्ठलरखमाय पाहू दे रे मला पढरी दाव।

देवाच दर्शन घेऊ दे रे मला पढरी दाव।
पुंडलीक दर्शन घेऊ दे रे मला पढरी दाव।
सावळ्या हरी मला पढरी दाव रे पंढरी दाव!

म्हातारबाबांनी गाण म्हणताना ‘ पुडलीक ’ शब्दावर जोर दिला होता मी विचारल, “ या भजनात पुंडलीकाचंच नाव का तुम्ही जोरात ठसक्यानं घेतलं ? ”

म्हातारबाबानी अभिमानाच्या थाटात सागितल, “ पुंडलीकानच त्याला उभ राहायला वीट दिली, अठ्ठावीस युग उभा राहा म्हणाला विठोबा उभा राहिला भक्ताचं ऐकावं लागतं देवाला साहेब, पुडलीक कोळी होता बरं का! आम्हा कोळ्यांचं भूपण! पढरीला चंद्रभागेत आचोळ झाली की पहिल वाळवटातल्या पुडलीकाच दर्शन मग महाद्वारातल्या देवळात विठ्ठल रखमाईचं! ” . म्हातारबाबांच्या सुरकुतलेल्या डोळ्यात एक चमक तरळत होती चेहरा उजळला होता हातवाऱ्यात जोश दिसत होता अभिमान! स्वाभिमान माणसाला जिवंत करतो, ठेवतो, हेच खरं असा स्वाभिमान हवाच स्वाभिमानाच रूपांतर दुरभिमानात किंवा आक्रमक आविर्भावात, परद्वेपात होऊ नये म्हणजे झाल!

पिपळादेवींची जत्रा फाल्गुनात होळीच्या वेळी भरते यावेळी मुंबईकर बनलेली गावकरी मडळी आवर्जून येतात आजूबाजूच्या गावातले लोकही जमा होतात गाव दोनचार दिवस गजबजून जातं होळीचा सण दणक्यात उत्साहान साजरा होतो तरुण मडळींचं टोळक गाऊ नाचू लागतं

नाच ग मैना, नाच ग, हिरव्या पदराची।
लालू लुगड्याची नाच ग मैना हिरव्या पदराची!
चमकीच्या बांगड्या दे रे धन्या, हौस माझ्या रे मनाची।
सोन्याच्या पुतळ्या दे रे धन्या, हौस माझ्या रे मनाची।

‘ भरडखोल मच्छीमार सहकारी सोसायटी ’ च्या ऑफिसात आम्ही दहाबारा जण जमलो मी विचारल, “ किती होड्या, बोटी आहेत या गावात ? ”

तर एकानं सागितलं, “ लहान, मोठ्या, मध्यम अशा ५०० बोटी असतील ”

दुसरा म्हणाला, "काही लहान मोठे ट्रॉलरही आहेत "

"मासळी खूप मिळते का?"

"मिळते कधी पुष्कळ मिळते, कधी फेरी फुकट जाते डिझेल तेलाचा खर्च पण निघत नाय "

"या धद्यात खात्री कसलीच नाही नशीबावर सगळं."

"मासळीचंच नाय, आमचसुद्धा समुद्रावर गेलो का, परत कवा येऊ, येऊ का नाय खात्री नाय समींदर लहरी राजा हाय त्याची मर्जी असल तसं होणार "

"मासळी आम्ही आणली आणि किनाऱ्यावर टाकली की सुटलो पुढचं ती घरोघर नेण, निवडण, खपवण, सुकवण बायांचं काम "

"आमच्याकड मासळी सुकवण्याचं मोठ काम चालत. बायाच ते करतात सुकली मासळी आसपासच्या बाजारात नेऊन विकतात बायाच "

"सगळा व्यापारधंदाच बायांच्या हातात म्हणा की!"

मी विचारलं, "पैसे बायांच्या हातात, तुम्हास खर्चाला लागले तर?"

"देत्यात की ताडीमाडी, पान-तंबाकू, बिडीकाडीला पैसं मिळत्यात."

"आणि त्या देतात?"

"हा अवो, पैशाची पिशवी जरी त्याच्या हातात असली तरी पैसे देणारी मासळी आमच्या जाळ्यात असती नव्ह!"

'महादेव कोळी' हा कोळी लोकांचा एक पोटभेद आहे, असे नमूद करून भारतीय संस्कृती कोशकार म्हणतात, "महाराष्ट्रातील पुणे, नगर आणि नासिक या जिल्ह्यांत यांची वस्ती आहे मुळात हे महादेव कोळी डोंगरात राहत होते, आणि तेथून इकडे आले, असे कॅप्टन मॅकिन टॉश याने म्हटले आहे. पण आपण मुळात पुणे जिल्ह्यातील जुन्नरचे असल्याचे त्याच्यापैकी काही लोक सागतात यांचा व्यवसाय, देवधर्म, विवाहप्रथा, प्रसूतिप्रथा, मर्तिकप्रथा, आदी गोष्टींची माहिती देऊन पुढे म्हटले आहे, "महादेव कोळ्यांचा समावेश अनुसूचित जातीत केलेला आहे सरकारकडून त्याना शिक्षणाच्या व इतर बाबतीतही सवलती मिळत आहेत" आणि याच गोष्टींसाठी मच्छीमार कोळी आपणास "महादेव कोळी" असे म्हणवून घेऊ लागले आहेत वस्तुत: हे दुसऱ्या प्रकारच्या पोटभेदातही कोळी आहेत असे म्हटले जाते अलीकडे हा एक वादविषय बनलेला आहे, असे ऐकिवात

आले

' कोळी या विपयाखाली कोशकार माहिती देतात ती अशी " कोळी - एक जात मध्यप्रदेश, द महाराष्ट्र, गुजरात व कोकण या ठिकाणी या लोकांची वस्ती आहे पश्चिम सातपुड्याच्या डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या कोळ्याना नाईक म्हणतात प्राचीन काळी हे लोक सातपुडा पर्वताच्या खिंडीत व अजंठा डोंगरावर पहारा करीत आणि लुटारू लोकांपासून गावाचे सरक्षण करीत या कामाबद्दल त्याना जमिनी नेमून दिलेल्या होत्या

" मध्यप्रदेशात याच्या पाच पोटजाती आहेत, त्या अशा - सूरजवशी (राजपूत), मल्हार किंवा पानभर्रा, भिलवफोड, सिंगाडे व मुसलमान कोळी यांपैकी मल्हार हे मल्हारी देवाला भजतात हे पाणी भरण्याचा व्यवसाय करतात, म्हणून त्यांना पानभरी हे नाव मिळाले आहे भिल्व (बिल्व) फळापासून तेल काढणाऱ्यांना भिलवफोड असे म्हणतात म्हशी मेल्यावर त्यांची शिंगे फाडणारे कोळी सिंगाडे म्हणून ओळखले जातात महाराष्ट्रात कोळ्याचे साधे कोळी व डोगरी कोळी असे प्रमुख दोन भेद असून, सोनकोळी, महादेव कोळी वगैरे पोटभेद आहेत डोंगरी कोळी हे पूर्वीच्या कोल लोकांचे वशज आहेत कोळी हे बारा बलुतेदारांपैकी एक हक्कदार आहेत कोळी लोक उच्चवर्णीयांकडे पाणी भरतात व मासे पकडून उदरनिर्वाह करतात काही लोक नदीवर होड्यातूनच वस्ती करतात, तर काही नदीकाठी झोपड्यात राहतात डोगरी कोळी सह्याद्रीतील मावळ व कोकण या भागात राहतात हे जगलातील कंदमुळे व शिकार यावर उपजीविका करतात जे लोक शेती करतात, ते आता इतर शेतकरी जातीत मिसळून गेले आहेत जे कोळी शेती करतात त्याना आगरी कोळी व जे मळे लावतात त्यांना माळी कोळी म्हणतात महाराष्ट्रातील कोळ्यांत मराठा लोकाप्रमाणेच कदम, पोवार, क्षीरसागर, दळवी, गायकवाड, जाधव इ आडनावे आहेत मराठा व कोळी लोकांत पूर्वी विवाहसंबध होत असत, असे सांगतात

" कोकणात समुद्रकिनारी राहणाऱ्या कोळ्याना समुद्रकोळी किंवा सोनकोळी असे नाव आहे सोनकोळी या नावाबद्दल ' शिवनिबंध ' नामक ग्रथात पुढील कथा आहे -

" परमेश्वराच्या सोहम् या ध्वनीपासून एक पुरुप निर्माण झाला त्याला सोहं, सोम किंवा मयात अशी नावे मिळाली त्याची अचिता नामक मुलगी कश्यपाला दिली होती तिला मार्धन नावाचा मुलगा झाला त्यालाही

सोम हे नाव मिळाले. हा तपश्चर्या सोडून हिंसेकडे वळला, म्हणून मयात ऋषींनं त्याला मासे मारून निर्वाह करायला सांगितले त्याप्रमाणे तो करू लागल्यावर त्याला व त्याच्या वशजाना सोन किंवा सोनकोळी हे नाव मिळाले

"यांची वस्ती प्रथम कुलाबा जिल्ह्यात होती तिथून ते ठाणे व रत्नागिरी जिल्ह्यात गेले आंग्र्याचे प्राबल्य असताना त्यांनी सोनकोळी स्त्रियांवर जोबनपट्टी किंवा चोळीपट्टी बसविली होती बायकांनी अंगात चोळ्या न घालता अगावरून पदर घ्यावा व ज्यांना चोळ्या घालावयाच्या असतील, त्यांनी ठराविक कर आग्रे सरकारला भरावा, अशा या कराचा प्रकार होता पण हा नियम जाचक झाल्याने कुलाबा जिल्ह्यातील थळ वगैरे गावातील लोकानी मुंबई, ठाणे, वेसावे या बाजूला स्थलांतर केले हे लोक आपल्याला थळकर सोनकोळी म्हणवितात जेजुरीचा खडोबा व कार्ल्याच्या लेण्यातील एकवीरादेवी ही यांची कुलदैवते आहेत

"सोनकोळी जातीत पचायती संघ आहेत प्रत्येक गावात एक किंवा अनेक तळ, थळे किंवा जमाती असतात त्या प्रत्येकाला गावपंचायत म्हणतात यात खाजगी निवाडे होतात

"या लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे मासे पकडणे व ते विकणे हा होय. याशिवाय शेती करणे, जाळी विणणे, व्यापार करणे, इत्यादी व्यवसायही ते करतात मच्छीमार सोनकोळी महिन्यातून वीस दिवस समुद्रावर असतात. त्यामुळे त्याच्या बायकाच सारा घरससार पाहतात "

भरडखोलच्या किनारपट्टीवर चक्कर मारली कोळी वस्तीत गेलो. पुरुष मंडळी बहुतेक समुद्रावर गेलेली होती काही बायका किनाऱ्यानजिकच्या बाधीव ओट्यावर, घराच्या अंगणात मासे सुकविण्याचे काम करीत होत्या काही घरकामात दग होत्या शाळेकडे गेलो सहावीपर्यंत शाळा आहे कोळ्याची मुलं-मुली सुद्धा शिकू लागलेली आहेत शिकून मोठीही झाली आहेत मुंबईत नोकरी-धंद्यात स्थिरावली आहेत

भरडखोल गाव समुद्राकाठी मोकळंढाकळं वसलेलं, समुद्राच्या गाजेनं व माशांच्या घमघमाटान गजबजलेलं दिसलं

दुपारी श्रीवर्धनला गेलो

श्रीवर्धन पहिल्यादा भेटले होते शाळेत असताना इतिहासाच्या पुस्तकात बाळाजी विश्वनाथ सिद्दीच्या जुलुमाला कटाळून कोकणातून

श्रीवर्धनहून निघाला, तो पुण्याला देशावर आला कर्तबगारीन पेशवा झाला श्रीवर्धनची ही पहिली भेट तशीच दुसरी आठवण येत आहे ती श्रीवर्धनी रोठ्याची श्रीवर्धनला पोफळीच्या बागा विपुल सुपारीच पीक मुबलक मोठ्या-टपोऱ्या सुपारीला श्रीवर्धनी रोठा म्हणतात मी तो पाहिलेला, खाल्लेला आहे प्रत्यक्ष श्रीवर्धनला मागे एकदा आलो होतो श्रीवर्धनच्या रमणीय निसर्गलावण्याला भुललो होतो कुणाही रसिकानं, निसर्गप्रेमिकानं मोहून जावं अस इथलं हिरव-निळं सृष्टीसौंदर्य! विशाल निळा समुद्र नि आभाळ आणि आभाळाकडंच झेपावणारी नारळी-पोफळींची अगणित झाडं! पुन्हा एकदा हे डोळे भरून पाहिल मनोमनी साठवल मत्स्यगध आस्वादला

"मूळगाव मच्छीमार सहकारी सोसायटी'च्या कचेरीत गेलो चेअरमन नारायण रघुवीर भेटले मी विचारल, हे "मूळगाव" नाव सोसायटीला कस दिलत?" ते म्हणाले, "पाच-सहाशे वर्षापूर्वी हर्णै वगैरे भागातून आमचे पूर्वज इकडे आले समुद्राकाठीच राहू लागले. कालांतरानं वस्ती वाढली सुरक्षितता व मच्छीमारीत उपयुक्त अशा खाडीच्या काठावर वस्ती हालली जागाही होती तेव्हापासूनच या कोळीवाड्याला मूळगाव नाव मिळालं"

"इथ खारवी" कोळी, दालदीही आहेत दाल्दी मुसलमान आहेत मच्छीमारीच्या व्यवसायात एका बोटीवर सगळे असतात पूर्वीच्या काळी एकमेकात विवाह होत नसत, पण आता तस राहिलेल नाही सुधारणा झाली आहे पूर्वी मुलीला हुंडा देण्याची प्रथा होती. त्याचं कारण असं होत की मच्छीमारीच्या व्यवसायात कामासाठी स्त्रियाची गरज असते सगळा व्यवहार त्याच पाहतात म्हणून पैसे देऊन मुली लग्न लावून घरी आणल्या जात असत पण आता तशी पद्धत राहिलेली नाही लग्नात कोणी कोणाला हुंडा-पैसे देत-घेत नाहीत लग्नसमारंभ साधेपणानं होतो खुपीने जो तो ऐपतीनुसार जेवणखाणाचा खर्च करतो सक्ती अशी नाही"

हे ऐकून बर वाटल, आणि असंही वाटलं, की नव्या कायदे-सुधारक, शिक्षित समाजामध्ये हुंड्याची जी लाजिरवाणी, पण खोट्या प्रतिष्ठेची बाब आढळते, त्याहून हुंडाबळीसारख्या अमानुष, क्रूर घटना घडतात त्यापेक्षा हा मागासलेला म्हणविणारा मच्छीमाराचा समाज किती प्रगतिशील! पुरोगामी!

जुन्या पद्धतीने लग्न तीन दिवस चालते लग्न ठरविल्यावर साखरपुडा होतो त्यावेळी मुलीला सजवून तिची ओटी भरतात बायका गाणे म्हणतात

गोरान गोरू गो साखर गोरु कारा
गाई याची दूध
त्या दुधीं करविली सुनदाबाई नऊरी
खेळत होती
तलीयाच्या पाली खेळता खेळता
आईनी पाहिली
लेक माजी वरा जोगी झाली।

लग्नात पहिल्या दिवशी मांडवदेवी बसवितात वधूला हळद लावून आंघोळ घालतात व देवदर्शन करवितात दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चौकाचा विधी करतात वधूला हळद लावतात व आखलेल्या चौकाचौकातून फिरवितात प्रत्येक चौकात उभी करून गाणे म्हणतात तिसऱ्या दिवशी लग्नविधी होतो

कोळीवाड्याला ज्यान जमीन दिली व जो राखण करतो त्याला सगळे कोळी इकड "जमीनदारबाबा" असं म्हणतात गावचं किंवा घरचं काही कार्य उभं राहिलं की, पहिला मान जमीनदारबाबांना द्यावा लागतो नारळ वगैरे वाहावा लागतो आषाढ महिन्यात गावकरी जमीनदारबाबाचं "जागरण" साजरं करतात या दिवशी खेकडे आणि पुऱ्या नेतात जमीनदारबाबाला खेकडे आणि पुऱ्या फार आवडतात लोकप्रसाद म्हणून सगळ्यानी तो खायचा, अशी प्रथा आहे

मच्छीमारांत शिक्षणाचा प्रसार झाला आहे, पण पाच-दहा टक्के लोकच त्यात प्रगती करू शकतात कारण मुलगा मोठा झाला की, गलबतावर कामाला त्याची गरज असते त्यामुळे शिक्षण पूर्ण होत नाही मच्छीमारी व्यवसायात मेहनती मनुष्यबळ फार लागते इथही आता बरीच गलबत झाली आहेत

नारायणराव स्वत शिकलेले आहेत त्याची चार गलबतं आहेत लहानपणी आई गेली वडिलानी गलबतावर नेलं, तर पहिल्यादा भयकर उन्हान अगावर फोड आले पुढ वडीलही आजारले उपजीविकेसाठी समुद्रावरच जाव लागल कष्ट फार ज्याचं शिक्षण झाल आहे, जे ग्रॅज्युएट

वगैरे झाले आहेत ते तरुण या कष्टाच्या व बिनभरवशाच्या व्यवसायात यावयास राजी नसतात सावलीत, पंख्याखाली मुबईसारख्या ठिकाणी चाकरी करण्यात त्याना आनंद वाटतो गावातले ७/८ टक्के लोक नोकरीधद्यात आहेत त्यातले बहुतेक मुबईतच, पण बाकी सगळे समुद्रावरच अवलबून आहेत मुलीही शिकावयास लागल्या आहेत शिकलेल्या मुलीही टोपली घेऊन उन्हातान्हात, थडीवाऱ्यात, चिखलापाण्यातून मासळी वाहायला तयार नसतात तरुण मडळींच्या शिक्षणाचा-ज्ञानाचा फायदा जो या व्यवसायातच, व्यवसायाच्या उन्नतीसाठी मिळायला हवा तो मिळत नाही शिक्षणान तो गाव, घर, व्यवसाय यापासून दुरावतो आणि त्यामुळ घरच्या चालत्या व्यवसायात अडचणच निर्माण होते

मी विचारल, " मच्छीमारीतही निरनिराळे प्रकार आहेत इथं कोणत्या पद्धतीन मच्छीमारी केली जाते ? "

नारायणरावानी सागितल, " एक प्रकार आहे " दालदी " या मच्छीमारीत हालैना, सुरमाई, पॉपलेट इत्यादी मासे मिळतात याची जाळीही मोठी असतात अगदी खोल समुद्रात पधरा-वीस वाव अतरावर चालते ही रात्री करतात दुसरा प्रकार आहे " बुडती " ही दिवसा चालते सूर्याच्या किरणांमुळे मासे समुद्राच्या तळाशी जातात तिथ अंधार असतो तो त्यांना मानवतो बुडतीची जाळी खोल समुद्रतळाशी बुडवली जाते त्यात ही मासळी मिळते " ट्रॉल " पद्धतही प्रचलित आहे ट्रालर-यंत्रचलित नौका यासाठी वापरली जाते यात जाळे समुद्रतळावरून फिरवले जाते यातही 'ऑटर ट्रॉल', 'व्ही डी ट्रॉल' असे प्रकार आहेत इकडे ऑटर ट्रॉल वापरात आहे यात जाळे लाकडी वजनदार फळ्यांच्या साहाय्याने समुद्रतळाशी जाते जाळ्याचे तोंड उघडे असते या फळ्याना " ऑटर बोर्ड " म्हणतात त्यावरून जाळ्याला ऑटर ट्रॉल म्हणतात ट्रॉल हे गतिमान जाळे आहे समुद्रप्रवाहाची याला गरज नसते लाब त्रिकोणी खोलीसारखे हे जाळे असते याला ओढजाळेही म्हणतात कोळबी-प्रॉन्जला परदेशातून खूप मागणी आहे हे मासे निर्यात केले जातात त्यापासून मोठे परदेशी चलन मिळते. कोळबी-बरोबरच समुद्राच्या तळाशी असणारी उशी, वागळी, ढोमा, पॉम्फ्रेटस, शेवड, पाथुर्डी इत्यादी प्रकारची मासळी मिळते

" कव " पद्धतही वापरात आहे पाण्याच्या प्रवाहावर ही अवलंबून असते दोन्ही बाजूच्या खुंटांवर जाळी बाधून मासळी पकडली जाते

प्रवाहाप्रमाणेच वाऱ्याची दिशाही लक्षात घेतली जाते

" परपरेन आलेल हे ज्ञान वापरात आहे का ? " मी विचारलं

" आहे तर ! वारा कसा वाहतो, त्यावरून कुठ, कशी मासळी मिळणार हे ओळखता येत पण आधुनिक यांत्रिक पद्धतीत आता यांची गरज उरलेली नाही यात्रिक पद्धतीत मासळी खूप मिळते, पण तळाशी माशांची जी अंडी असतात तीही खरवडली जातात, त्यामुळं मत्स्योत्पादनावर विपरीत परिणाम होतो "

" सरकारी सवलती, बँकाचे कर्ज घेऊन जी मंडळी सुधारित पद्धतीन हा व्यवसाय करतात, त्यांना फायदा होतो का, कर्ज फिटते का, किती काळ जातो ? "

" फायदा होतो. आमच्याकडंच एकानं इंजिन बसवल, त्याला एकाच दिवसात सत्तावीस हजारांची मासळी मिळाली कर्ज तेवढंच होतं "

" हो, पण कर्ज फेडण्याऐवजी घर बाधण, मुलाच लग्न थाटामाटात करणं, त्यासाठी ती कमाई खर्ची टाकणं, ह्या प्रवृत्तीमुळ तो शक्यता असूनही कर्जातच राहतो एकाला सतरा हजाराच कर्ज मिळवून दिल, त्यान दीड दोन लाख मिळवले पण कर्ज काही फेडल नाही. त्या प्रवृत्तीमुळे बँकांची कर्जवसुली न झाल्यामुळं नव्या योजनासाठी पैसे मिळण अवघड होतं आपणच आपली अडवणूक करून घेतो, याचा विचारच केला जात नाही पण ज्या काही थोड्या लोकांनी याचा विचार केला आणि वेळच्यावेळी कर्जफेड केली, त्यांची परिस्थिती चांगली सुधारत आहे काहींनी बारीकसारीक उद्योगधंदे सुरू केले आहेत "

संध्याकाळी श्रीवर्धन सोडलं बोर्लीला मुक्कामास आलो

**दिवे-आगर-म्हसळे-अडावद दि. २७ मे १९९२**

दोशी वकिलांचे बंधू बोर्लीतच राहतात ते व्हेटर्नरी डॉक्टर आहेत काल वकिलाचे बरोबर त्यांच्या घरी गेलो होतो. ओळख झाली होती आज सकाळी तेच आपली स्कूटर घेऊन आले आणि मला दिवे-आगरला घेऊन गेले

दिवे-आगर गावातला प्रवेश म्हणजे एखाद्या रमणीय उद्यानातला प्रवेश ! गावातून चाललो, तोच उद्यानातून चालल्यासारख्या रस्त्यानी दोन्ही बाजूनी हिरवीगार झाडंच झाडं वर आभाळातही हिरव्या पोफळी, नारळीच्या

झावळ्याची घनदाट झिप्पाडं!

झाड वाढल वाढल
उच आभाळा भिडलं!
उंच उंच झावळ हात
हात आभाळी पोचत!
झाड चांदण्या वेचत
मूळ पाय जमिनीत!

डॉ दोर्शींनी श्री तोडणकरांच्या घरी आणल. पाहुणे आलेत म्हटल्यावर देवपूजा करीत असलेले तोडणकर बाहेर आले ओळख झाली तोडणकरांची अगदी कालच दिवेआगरचे सरपच म्हणून निवड झाल्याचे थोड्यावेळापूर्वी कळले होते त्यामुळे सरपंच ही आसामी भलीभक्कम ढेरपोटी, मिशाळ असावी अशी, आपली उगाचच सांकेतिक प्रतिमा मनी उमटली होती पण समोर उभे राहिलेले तोडणकर अगदी शिडशिडीत तरुण! तरतरीतही तसेच! कारण शहाळींच पाणी घ्याल्यावर कपडे करून ते आमच्याबरोबरच निघाले! तिथच त्याचे एक गावमित्र भेटले तेही निघाले. त्याच नाव जयंत जनार्दन ठोसर ग्रॅज्युएट आहेत बागायती करतात

निघण्यापूर्वी आणि शहाळींचं पाणी पिण्याच्याही आधी सौ तोडणकरांनी घरामागची नारळी-पोफळींची हिरवीगार बाग दाखवली होती लांब-रुंद केवढी बाग! किती सुंदर! त्या म्हणाल्या, "बहुधा प्रत्येक घरामाग अशा बागा आहेत पोफळीचो झाडं पुष्कळ आहेत!"

"सुपारीच पीक भरपूर असेल?" मी विचारलं

"हो, पुष्कळच!"

बरोबरच्या ठोसरानी सांगितल, "इथला रोठा प्रसिद्ध!"

"श्रीवर्धनचा देखील ना?"

"श्रीवर्धनपेक्षा इथला दिवेआगरचा रोठा चागला नि प्रसिद्ध!"

"हो का? मी आपला श्रीवर्धनचाच ऐकून होतो."

सौ तोडणकर सुद्धा जिल्हा परिषदेवर निवडून गेलेल्या आहेत

जाता जाता गावाचं, घराचं, बागांच हिरवं रूपडं डोळ्यांनी साठवत, मी विचारलं, "दिवेआगर हे नाव जे या गावाला मिळाल आहे, त्यामागं काही आख्यायिका वगैरे आहे का?"

ठोसरानी सांगितलं, "आमच हे गाव समुद्रकाठी वसलेलं आहे पूर्वीच्या काळी फिरगी लोकाची आक्रमणं गावावर व्हायची "

' जजिन्याचा सिद्दी जवळच ना ? "

"हो तर, त्याची आक्रमण व्हायची ते लुटालूट करायचे, मारायचे, छळायचे "

"सिद्दीच्या भयकर छळाच्या हकीकती मी पढरपूरसारख्या देशावरल्या गावातसुद्धा लहानपणी ऐकलेल्या आहेत ! हे फिरगी म्हणे माणसाला पोत्यात घालून पोतं बद करून समुद्रात टाकायचे ! भयकरच हो ! किती क्रूर असतील नाही ?. माणस इतकी क्रूर, हिंस्र असतात ? "

एकजण म्हणाला, "इतक्या लाब, पढरपुराकड हे कसं पोचलं असंल, त्याकाळी वर्तमानपत्रं नव्हती "

मी सांगितलं, "छापलेली वर्तमानपत्रं नव्हती, पण बोलकी-फिरती बातमीपत्रं होतीच ! त्यातून पढरी हे क्षेत्र ! भूवैकुठक्षेत्राच्या ठिकाणी दाही दिशातून भक्तगण देवदर्शनासाठी येत असतात येताना आपआपल्या प्रदेशातल्या विविध तऱ्हेच्या बातम्या, दंतकथा, अख्यायिका, लोककथा, गाणी, म्हणी अस बरचंसं काही काही आणत असतात बर त्याचं काही ओझबिज नसत त्या असतात स्मरणात, डोक्यात बोलता बोलता, जाग्या होतात, मुखावाटे शब्दरूप घेऊन वाणीद्वारा प्रकट होतात पसरतात मुळात माणूस हाच गोष्टीवेल्हाळ प्राणी आहे ! . बरं, असो गावाच्या नावाच सागा "

"फिरग्याची ही आक्रमणं समुद्रमार्गानच व्हायची त्या चकमकीत, लढाईत इथली माणस कामाला यायची त्याच स्मारक म्हणा किंवा स्मरण म्हणून म्हणा, तिथ दिवा लावला जायचा ! त्या ठिकाणाला "वीरगळ" अस नाव पडलं जे वीर धारातीर्थी पडले त्याच्या स्मारकाला वीरगळ म्हणतात "

"हो हो खर तर हा कानडी शब्द आहे "वीर" म्हणजे वीर आणि "गळ" म्हणजे स्मारक असा आशय अन्य काही गावातूनही असे पाषाणाचे "वीरगळ" आढळतात

"तर तिथ त्या आगारात दिवा लागला जायचा, त्यावरून त्या गावाला "दिवेआगर" असं नाव पडल, अशी आख्यायिका आहे "

"अस्स ! "

"दुसरीही एक आख्यायिका सागतात ती अशी की, तिथ आपोआप

दिवा लागत असे काश्मीरमध्ये अस आपोआप दिवा लागणार किंवा ज्योत दिसणार ठिकाण आहे, अस म्हणतात मला काही त्याच नाव ठाऊक नाही ऐकलेल आहे खर-खोट माहीत नाही

"आता तिथ काही अवशेष वगैरे आहे का?"

"देऊळ आहे त्याला ' क्षेत्रपाल" म्हणतात"

"क्षेत्रपाल म्हणजे गावाचा राखणदार, सरक्षक! वीरगळाचे अवशेष, काही दगडावर खोदलेल्या योद्ध्याच्या मूर्ती, वगैरे स्वरूपात काही आहे का?"

"उद्ध्वस्त स्वरूपात आहे मात्र पांडवकालीन "स्वरूप नारायण ' आणि "सुदर नारायण" यांच्या मूर्ती असलेल एक जुन देऊळ आहे विष्णूचं देऊळ आहे दशावतार खोदलेले आहेत आणखी एक इथल वैशिष्ट्य म्हणजे मराठीतला शके ९८२ मधला, पहिला ताम्रपट दिवेआगरला मिळालेला आहे त्याची छापील फोटोप्रत माझ्याकडं आहे. मी देईन तुम्हाला"

दिवेआगरची लोकवस्ती सुमारे सहा हजारांची आहे गाव बागायती असल्यामुळं घर विरळ विरळ आहेत प्रत्येकाची बाग घराला लागून एकर दीड एकराची तरी आहे

मच्छीमाराची घर समुद्रकाठी चाळीसच्या आसपास आहेत मच्छीच्या हंगामात हे लोक भरडखोलला आठ महिने राहतात चार महिने पावसाळ्याचे इकडे राहतात भरडखोलला बंदरासारखी संरक्षक रचना आहे होड्या, गलबत सुरक्षित ठेवण सोयीच पडतं पावसाळ्यात इकडल्या खाडीतही ते मच्छीमारी करतात तिला पागणे म्हणतात बारीकसारीक मच्छीमारी, त्याची मुलं देखील करतात काही मच्छीमार मोठेच मासे पकडतात एकेका माशाची किंमत हजार हजार रुपये असते!

बोलता बोलता गावतली स्थळ, देवळं जशी पुढ आली, तशीच काही गमतीची माणसही आली. खरं तर प्रत्येक गावात अशी लकबीवरून, शरीरयष्टीवरून, स्वभावावरून लोकांनी ठेवलेल्या नावाची माणसं असतात एकानं इथल्या ' आडगपू ' चा उल्लेख केला सगळे हसले मी विचारल, "आडगंपू म्हणजे काय?"

त्यानं सांगितल, "त्याचं नाव गंपू, गावात बरेच गपू आहेत; पण हा अंगानं आडवातिडवा अजगरासारखा आहे, म्हणून म्हणतात, आडगंपू!"

"एक "आबेगोविंद" आहे। त्याच्याकडं मोठी आबराई आहे।

म्हणून आबेगोविंद ''

'' बोडकीचा पाडूही एक आहे ''

'' हलाखींच्या परिस्थितीतला '' हल्या रामा '' आहे ''

लोकजीवनातल्या ह्या गमती-विनोद!

मच्छीमाराच्या वस्तीतून फिरून आलो. लहान, लहान दाटीवाटीनं उभी राहिलेली घरं, घरात मुलं, म्हातारी माणसं, बाया होत्या तरुण, प्रौढ पुरुष सगळे समुद्रावर काही सधन मंडळींच्या घराचे प्रवेशद्वार सिमेंटचे नक्षीदार भडक रंगाने रंगविलेले घरातली जमीन शेणानं सारवलेली पण सारवल्या बोटांनी गोल गोल अर्धवर्तुळाच्या आकृत्यानं छान सजलेली दारात तुळशीवृंदावन घरात देवघर, मूर्ती, देवादिकांची चित्रं, तसबिरी संस्कृतीच्या खुणा! बाकी मच्छीमारीची साधनं- जाळी, दोर सुकत घातलेली मासळी मासळीच्या वासानं सारी वस्ती घमघमलेली! मासळीच्या व्यापारात बराच पैसा मिळतो काही जणांनी पधरा-सोळा लाखांच्या ट्रॉलर बांधलेल्या आहेत होडी घेऊन एकटा मनुष्य जरी गेला तरी तो दिवसभरात तीनचारशेची कमाई करतो बाजार-व्यवहार घरच्या बाईच्या हाती पुरुष बहुधा व्यसनी ताडीमाडी, बिडीकाडी, बाई तेही पुरवते ही मंडळी धार्मिकही फार एकजण म्हणाला, '' मी २३ वर्षं पंढरीला चालत जातो आहे ''

समुद्रावर गेलो काठावर लांबवर पसरलेलं केतकीचं बन! फारच सुरेख!

पेशमाम याची मोठी बागायत आहे मच्छी खरेदी करून ती निर्यात करण्याचा मोठा व्यापार आहे. मोठी इस्टेट आहे मुरुड-जंजिरा हे सिद्दीचे संस्थान ब्रिटिशकाळातलं त्यांच्या छळाच्या, त्रासाच्या कहाण्या जशा आहेत, तशाच त्यांच्या पदरच्या काही मोजक्याच लोकांना त्यांनी मोठ्या जमिनी इनाम दिल्याचीही उदाहरणं आहेत जुलमी राज्यकर्त्यांना असे खुपमस्करे बाळगणंही आवश्यकच असतं तो त्यांच्या राजकारणाचाच भाग असतो

मच्छीमारांचा व्यवसाय सोडला तर सुपारीचा व्यवसाय इथं मोठा चालतो इथली सुपारी नंबर एकची समजली जाते ती निर्यातही होते मुंबईला गंद्रे नावाचे सुपारीचे मोठे व्यापारी आहेत ते इथली बरीच सुपारी खरेदी करतात बागायतदार सुपारी काढल्यावर ती सोलतात, सुकवतात नि वजनावर विकतात लहान-मोठी-मध्यम अशा तऱ्हेने निवडून त्यांच्या

सातआठ तऱ्हा ठरवतात

रत्नाकर तोडणकराची गाठ पडली त्यांच्या घरीच गेलो होतो त्याच भरडखोडला माडीचं दुकान आहे गेलो तेव्हा ताजी, नुकतीच काढलेली माडी आलेली होती म्हणाले, "घ्या ही गोडी माडी आहे"

"आणि चढली तर?"

"नाही, नाही काही होणार नाही"

आम्ही सगळ्यांनीच एकेक ग्लास गोडी माडी घेतली नीरा! तशीच चव, तसाच वास! ही गोडी माडी आंबली म्हणजे, फरमेन्टेशन झाल की माडी। तोडणकर म्हणाले, "माझ्या दुकानामुळ गावातल्या सगळ्या मच्छीमारांशी माझा सबध साठ-सत्तर टक्के मच्छीमार माडी पितात उन्हाळ्यात काही कोळणीही पितात काम फार कष्टाची असतात पिण्यानं, गुंगीत कष्ट विसरायला होतं इथ मोठमोठे जे शेठ लोक आहेत त्यांच्या ट्रॉलरी आहेत बुडीतची मच्छीमारी म्हणतात मोठे मासे पकडतात कर्ली, चकला याचं जवळ जवळ पन्नास किलो वजन असतं घोळ, सावशा हे जाडे मासे असतात मुंबईला याना चांगला बाजार असतो. चिंगाला म्हणून एक मासा आहे तो टनावर जातो कोडावर जातो बावीस माशांची एक कोड असते त्याचा भाव तीनशे ते चारशे रुपये मिळतो एकेका रात्रीत दोन दोन, तीन-तीन लाखांचा माल मोठ्या कोळ्यानी पकडला होता एवढा माल किनाऱ्यावर आणायचा तर सात-आठ होड्यातून आणावा लागतो माशाचा थवाच्या थवा दिसतो त्याच्या बाजून मग जाळ पसरल जात जाळ्यातल्या एकेका माशाची शेपटी धरून त्याला होडीत टाकतात सात सात, आठ आठ ट्रक माल मिळतो हे मच्छीमार या माशांच्या थव्याचा शोध घेतच समुद्रावर फिरत असतात ते दुसरे मासे पकडत नाहीत बाणकोटपासून मुरूड-जंजिऱ्यापर्यंत त्याचा समुद्रसंचार चाललेला असतो त्या परिसरात हे मासे सापडतात याला बाहेरच्या देशात खूप मागणी आहे याच्या लिव्हरपासून तेल काढतात ते होड्याना लावायला उपयोगी पडते टॉनिक म्हणूनही त्यावर प्रक्रिया करून ते वापरले जाते

"घोल माशाच्या एका अवयवापासून, त्याला "फोक" म्हणतात, एक धागा काढतात त्याचा उपयोग ऑपरेशनच्या जखमा शिवण्यासाठी टाके घालण्यासाठी होतो माशाच्या शरीरात एक गर्भाशयासारखी पिशवी असते तिची किंमत दीडशे रुपये आज आहे बायका ती पिशवी काढून

वाळवतात हा एक मासा सातशे ते आठशे रुपयापर्यंत जातो त्याची पिशवी काढून घेऊन तो विकतात कोळबा शेवड, टायगर अशा जातींचे मासेही पकडतात, त्यानाही मोठे मार्केट आहे खडकातल्या मासेमारीसाठी रात्री पेट्रोमॅक्स घेऊन जातात त्या प्रकाशान माशाचे डोळे दिपतात ते गोंधळतात, भाबावतात आणि जाळ्यात अडकतात याला "चुडीला" मच्छीमारी म्हणतात पेट्रोमॅक्स नसेल तर चूड पेटवून त्या प्रकाशात माशाना भांबावण्यात येते कोमट, गिताडा इत्यादी प्रकारचे मासे यात मिळतात हे घरगुती खाण्याला, कालवणाला वापरतात याची चव फार चागली लागते कारण ही मासळी ताजी असते, खेकडे तर जिवतच पकडले जातात

"कोळंबीसाठी डोल जाळे लावतात त्यातली कोळबी घेतात, बाकी बारीकसारीक घरच्या कालवणासाठी घेतात सुकवतात अगदीच वाया गेलेली असते ती कोंबड्याच्या खाण्यासाठी- कुक्कुट खाद्य बनवण्यासाठी उपयोगात आणतात शेतीला खत म्हणूनही वापरतात"

माझ्याभोवती सातआठ तरुण मडळी जमली गप्पा रंगत गेल्या आठवेल तसे एकेक सांगू लागला एक कोळीण जाताना दिसली ती गावची. याच्या ओळखीची यांनी तिला हाक मारली. ती आली मी विचारलं, "तुम्ही मासे विकता काय?"

ती सागू लागली, "हां लिलावात मासे घेतो, विकतो कधी मार्केटात बसतो कधी फिरून विकतो कधी फायदा मिळतो कधी अगावर बसतो धदा हाय"

परतताना ठोसराच्या घरी गेलो दारात तोंडल्याचा हिरवा वेल दिसला फुलझाडंही दिसली चहा प्यालो त्यानी ताम्रपटाचा फोटो दिला सगळ्यांना "टाटा" करून डॉक्टरांच्या स्कूटरवरून बोर्लीला परतलो

दुपारी जेवण, विश्रांतीनतर मेमनसाहेबानी दिलेल्या तरुणाबरोबर एस् टी ने "म्हसाळा" नावाच्या गावाला आलो आज बुधवार म्हसळ्याला बाजार या आठवडे बाजारात या भागातला मोठा मासळी बाजार भरतो तो पाहण्यासाठीच आलो

"म्हसळा" म्हणताच मला या भागात १९४२ साली स्वातंत्र्य-लढ्यात घडून गेलेल्या एका पर्वाची आठवण झाली

भारत स्वतंत्र झाल्यावर ब्रिटिश भारतातली हैद्राबाद, कश्मीर, जुनागढ या मोठ्या संस्थानिकाशिवाय बाकीच्या सर्वांनी आपआपली संस्थाने

भारतात विलीन केली सरदार वल्लभभाई पटेलांनी फार मोठी मुत्सद्देगिरी दाखवली होती त्या त्या मुजोर बड्या संस्थानिकानाही या पोलादी पुरुषाने इंगा दाखविला तीही विलीन झाली कुलाबा जिल्ह्या ते मुरुड-जजिऱ्याच्या सिद्दीनेही अडेलतट्टूपणा केला होता श्रीवर्धन-जजिरा-मुरुड या बंदरामार्फत-कराचीशी संबंध प्रस्थापित करून पाकिस्तानच्या साहाय्याने आपले अस्तित्व टिकवून धरण्याचा दुबळा प्रयत्न तो करीत होता त्याच्या या कुटिल कारवायांची बित्तबातमी लागताच महाडचे प्रसिद्ध क्रांतिकारक श्री नाना पुरोहित याच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकाचा एक गट जंजिरा-मुरुडच्या मुक्तीसाठी तयार झाला सशस्त्र हल्ला करून जजिरा संस्थान कार्बीज करण्याची योजना तयार केली महाड-माणगाव तालुक्याला लागूनच असलेल्या म्हसळे या तालुक्याच्या सरहद्दीवरील खामगाव या ठिकाणी क्रांतिकारकांनी छावणी टाकली म्हसळे गावाला त्या उठावाच्या काळात बरेच महत्त्व आलेले होते क्रांतिकारकांनी संस्थान कार्बीज केले भारतात सामील करून टाकले ही आता ऐतिहासिक घटना बनली तिची आठवण यावेळी आली

म्हसळ्याचा बाजार दुपारच्या वेळी लोकगर्दीने फुलून आलेला होता ! त्यातच एका बाजूला सुक्या मासळीचा बाजार भर उन्हात भरलेला होता या बाजाराची सूत्रे कोळणींच्याच हातात होती स्त्रीराज्य होते सुका बोंबील, खेया, शिंगटी, माडेली, वाकटी, काटी, बागडा, कर्ली, सुरमई, पाळा सोडे याच्या वासाने परिसर घमघमलेला होता वजन-मापावर, नगावर विक्री चाललेली होती

सारजाबाई होत्या भरडखोलच्या आसपासच्या दहा-बारा गावातून बाजारासाठी भल मोठ मालाच ओझ घेऊन एस् टी तल्या गर्दीत धक्के खात बाया येतात सारजाबाईंनी सागितल, "बाजारात दोन-अडीच हजाराची विक्री होते अडीचशे-तीनशे सुटतात दररोज एकेका गावचा बाजार करतो ओझ्याची, गर्दीची सवयच झाली आहे रोजचंच झालय की ! "

चार-साडेचारच्या सुमाराला परत बोर्लीकड निघालो बसस्टँडवर उभे राहायला जागा नाही इतकी गर्दी बाजारकरी परतू लागले होते बाजार ओसरू लागला होता चारी रस्ते दुकानांनी, त्यापुढच्या गर्दीने भरून गेले होते बराच वेळ उन्हात तापत उभं राहिल्यावर एस्टी आली हा गर्दी ! तोबा ! मीही त्या गर्दीत घुसलो कसाबसा चढलो जागाही मिळवली

हुश्श' करून बसलो दहा-पधरा मिनिटं झाली एसटी गच्च भरलेली उकाड्यान जीव हैराण चिकचिक घाम बोलण्याचा कलकलाट, आरडाओरडा

केव्हा एकदा गाडी हालते, असे झाले होते पण कसले काय? कंडक्टरजी सांगत आले, "ही गाडी पक्चर आहे, खाली उतरा! हरे राम!"

उतरलो पंक्चर झालेल चाक काढून दुसरं बसवलं. त्यात अर्धा तास गेला पुन्हा गाडीत चढण्याच दिव्य! चढलो, पण मघाची जागा एका कोळणीनं पटकावलेली! उभ राहाण भागच होतं! उभं राहूनच कोळणीच्या कलकलाटात, बाजारगप्पात, हास्य-विनोदात बोर्लीला आलो

बोर्लीला आलो, तर मुक्कामाशी डॉ दोशी स्कूटर घेऊन प्रतीक्षेतच दिसले! म्हणाले, "चला. अडावदला जाऊन येऊ"

मी पार थकून दमून गेलो होतो, पण जाण भागच होतं काम माझंच होतं आणि डॉक्टरासारखी नव्या ओळखीची मित्रमंडळी साहाय्याचा हात देत होती! मी त्याच्या माग स्कूटरवर बसून निघालो उन्हाळ्यातला दिवस मोठा साडेपाच पावणेसहाची वेळ, पण भरपूर उजेड! ऊन कोमेजलेल होतं सुसह्य झाल होतं डॉक्टरांचा स्नेहशील सहवास, संवाद सोबतीला होता बोलण्यात वेळास हे गाव कधी आलं हे कळलंही नाही वेळास हे वाटेवरलं गाव मागं टाकून पुढ निघालो आणि चकित झालो! स्तिमित झालो! उजव्या बाजूला पोपटी उन्हाळी भातशेती. पलीकडं डोंगर तर डाव्या हाताला चक्क अथांग, निळाभोर, शात शांत समुद्र! मन हरखून गेल! आनदून गेल! समुद्राच हे दर्शन फार फार सुखदायी वाटलं वेळास-पासून ते थेट अडावदपर्यंत समुद्रानं साथ सगत दिली मी डॉक्टरांना म्हणालो, "अहो, आपण निसर्गरमणीय 'मरीन ड्राइव्हनच' चाललो आहोत! मुबईतल्या गर्दीनं घुसमटलेल्या मरीन ड्राइव्हपेक्षा ही मरीन ड्राइव्ह किती सुंदर! किती प्रसन्न! ब्यूटिफुल!

अडावदच्या राममंदिरात समुद्राचा सायंकालीन खारा वारा घेत नि त्याच "शांताकारम् गगनसदृशम्" रूपलावण्य पाहात बसलो या भागात डॉक्टराच्या ओळखी फार सकाळी दिवे-आगरच्या वाटेवर काय नि आताही येताना काय, ठिकठिकाणी त्याना ओळखीची माणसं दिसत होती रामराम करीत होती बोलत होती, अडावदलाही त्यांना पाहताच साताठजण लगेच

त्याच्याभोवतीं जमा झाले देवळात बैठक भरली रामाचं देऊळ नवीनच छान बांधलेलं आहे मूर्तीही सुंदर आहेत

सातांठजणात एक माळकरी होते पांडुरंग नारायण दोडकुलकर हे त्यांचं नाव मी विचारलं, " मच्छीमारीचा व्यवसाय करता, पण गळ्यात माळ दिसते आहे ? "

" हा अलीकडंच घातली आहे "

" पंढरपूरला कधी गेला होता का ? "

" दोन, तीन वेळा गेलो होतो "

" मग माळ घातलीत म्हणजे वारकरी झालात ! वारकऱ्यानं मांस-मच्छी खायची नसते, ताडीमाडी प्यायची नसते "

" मी ते खायचं सोडलं सगळं "

" अरे वा ! भजनी मंडळ आहे का इथं ? "

" आहे की ! पूर्वीपासूनच आहे, पण हे मंदिर झाल्यापासून जोरात चाललेलं आहे ?

" मच्छीमारीला जाता का अजून ? "

" हो तर ! मच्छी खायची सोडली पकडायचा उद्योग चालूच आहे "

" केव्हापासून मच्छीमारीला जायला लागलात ? "

" शाळा सोडली आणि समुद्रावर जायला लागलो चाळीस वर्षं झाली असतील "

" किती शिकलात ? '

" पाचवीपर्यंत "

" तुमची स्वत ची बोट आहे का ? "

" नाही दुसऱ्याच्या बोटीवर जायचं, कमाई करायची आणि परिवार चालवायचा "

" परिवारात किती लोक आहेत ? "

" आई-वडील, बहीण, भाऊ आम्ही नऊजणं आहोत "

" वडील मच्छीमारीच करीत होते का ? "

" हो मच्छीमारीच "

" दुसऱ्याच्याच बोटीवर ? "

" हो खलाशी म्हणून काम करायचे "

" समुद्रात किती लांबवर जाता ? "

" पंधरा-वीस वावपर्यंत जातो "

" कोणत्या प्रकारची मच्छी मिळते ? "

" भाद्रपद महिन्यात कोलमी, सुरमाई, हालचा, पापलेट, जशी जाळी वापराल, तशी मासळी मिळते दिवाळीपर्यंत हा सीझन चालतो मग दुसरा सीझन लागतो मच्छी तीच पण जाळी बदलतो "

" या तुमच्या गावात किती होड्या आहेत ? "

" तीस-पस्तीस आहेत "

" आणि किती लोक या व्यवसायात आहेत ? "

" चार-साडेचारशे लोक असतील "

"होडीच्या प्रमुखाला– धन्याला काय म्हणतात ? "

" नाखवा म्हणतात "

" नाखवा वल्हव वल्हव कोळीगीत प्रसिध्द आहे "

" होडीचा चालक असतो, त्याला 'तांडेल' म्हणतात त्याच्या हाताखाली छोटी होडी असेल तर तीन खलाशी असतात, मोठी असेल तर सातआठ आसतात"

" मग जी मासळी पकडता, त्याची वाटणी कशी करतात ? "

" आता आपण नाखवा आहोत तुमची होडी आहे तुम्ही डिझेल पुरवता आम्ही खलाशी आहोत अर्धा हिस्सा तुमचा तुमच्या अर्ध्यात सात आठ हिस्से टाकायचे एकेक हिस्सा खलाशाला मिळतो

" मग याच्या विक्रीची व्यवस्था काय ? "

" बर्फात घालायची, टेंपोतून श्रीवर्धनला न्यायची तिथे मोठेमोठे दलाल लोक आहेत लिलावात ते माल घेतात सुकवलेली मासळी बायका म्हसळ्याच्या, बोर्लीच्या बाजारात नेऊन विकतात "

एक तरतरीत तरुण त्या मडळीत होता मी त्याला विचारलं, " तुमच नाव काय ? "

त्यानी सागितल, " नरेंद्र महादेव पावशे "

" काय करता ? "

" मी मेडिकलला आहे " परतु लहानपणापासून म्हणजे चार वर्षांपासून मी मच्छीमारीला जातो परत याची आवडच आहे आमच्या घरी एक लॉंच आहे चार सिलिंडरची आहे वडील ऑफिसात कामाला आहेत दोन-तीन काका या व्यवसायात आहेत सुटी कधी पडते आणि

गावी जाऊन मच्छीमारी कधी करतो अस कॉलेजात असताना वाटतं ''

" चार वर्षांचे असल्यापासून जाता, तर मग समुद्राची भीती कधी वाटली नाही का ? "

" मुळीच नाही लहान मुलाना खरं म्हणजे भीती वाटत नसते मोठ्या माणसांनाच लहान मुलाबद्दल भीती वाटत असते "

" लहानपणी मग तुम्ही, तुमचे सोबती पोहायला शिकला असाल ? "

" शिकलो नाही, कुणी शिकवलंही नाही कसं आलं, केव्हा आलं, आठवत नाही "

" अवो सायेब, माशाला आनी समिंदराच्या बाळाला पवायला शिकवाव लागत नाही पाखराला उडायला शिकवाव लागत का ? त्याच तेच शिकत की हो! गायीचं वासरू जलमलकी आपल्या पायावर उभं राहात, चालाया लागत का न्हाई! तसंच हाय हे आपसुक येत! " एका पोक्तानं मला मात्र शिकवलं

" मग तुमचे खेळही समुद्रात चालत असतील ? "

" खाडीच्या पाण्यात खेळलो शिवाशिवी, लपडाव, चेंडूची फेकाफेकी, निशाणी बाधलेली वस्तू किंवा दगड टाकायचा, पाण्यात बुडी मारून तो शोधून काढायचा भरतीच्या लाटांबरोबरही धिंगामस्ती चालते '

" गाणीबिणी म्हणत असाल ? "

" म्हणतो की ! "

" म्हणा बर एखादं " अस म्हणताच मात्र 'मी नाही, तू नाही' करायला लागली लाजायला, सकोचायला लागले " अरे, लाजायचं काय ? म्हणा एकजण धिटाईत म्हणू लागला

" नाखवा मशीरी लावतोय हाय
दर्याला म्हावरा मिळतोच हाय ! "

मग दुसऱ्याला धीर आला तो देवीच गाण म्हणू लागला

आई माजी कोणाला पावली
पावली कोळिया लोकांना
आई तुजं देऊळ कुणी बांधिलंय
बांधिल पाच पाडवांनी ग, धर्मबाधवांनी

" गावची देवी कोणती ? "

" कुभारदेवी ! "

" तिची जत्रा यात्रा भरते का ? "

" हा तर ! त्या टायमाला तीन ठिकाणाहून तीन समाजाच्या पालख्या निघतात एक भडारी समाज, दुसरा कुणबी समाज, आणखी तिसरा आमचा कोळी समाज "

तोवर पाच-सहा कोळणीही देवळात आल्या त्याना गाण्याचा आग्रह केला. पण लाजून लाजून चूर झाल्या मग बऱ्याच आग्रहानतर एकीनं धिटाई दाखवली म्हणू लागली –

पालखीचे भोई रे रामा तुझ्या
पालखीचे भोई
भोई चालले ग रानी
दंडीच्या रुमालूगं भिजला घामानी
ग भिजला घामानी
रामा-लक्षुमणा बंधू
रामा-लक्षुमणा बधू
भरत शत्रूघन आले हो दारा रे
भरत शत्रूघन आले !

पहिलीची धिटाई पाहून दुसरीला कठ फुटला ती म्हणू लागली –

एक दोन तीन चार पाच सहा
सात आठ नऊ दस ग्यारा
गणपती आले घरा हो, गणपती आले घरा !
सर्व लोक येऊन गेले घरा
देवाच्या दर्शनाला,
गणपती देवाच्या दर्शनाला।
एवरे पैसे काय गं केले
पोरी, एवरे पैसे काय ग केले !
देवाला हार केले गणपती
देवाला हार केले !

तिसरी गाऊ लागली

नवरंगाच नवतऱ्हाची
छतरी झळके कोणाची
छतरी झळके कोणाची
छतरी झळके रामू देवाची
झळके रामू देवाची

लोकगीताचे-गाण्यांचे स्वर डोक्यात घोळवीतच सर्वांचा निरोप घेतला डॉक्टराच्या स्कूटरवरून बोर्लीला परतलो

"डॉक्टर, आज तुम्ही बराच वेळ माझ्यासाठी दिलात धन्यवाद!"

"अहो, मलाही थोड निराळ्या वातावरणात जायला मिळालं"

"मजा आली!"

**दिघी-एकदरा-मुरुड : दि. २८ मे १९९२**

डॉक्टरांना आज दुसऱ्या गावाला कामगिरीवर जायचं होतं, म्हणून सकाळच्या एसटीनं दिघीला जायच ठरवलं होत निघण्याच्या तयारीतच होतो इतक्यात डॉक्टर आपल्याबरोबर एका स्कूटरस्वाराला घेऊन आले म्हणाले "झाली तयारी?"

"हो, पण तुम्ही ?"

"मी नाही येऊ शकत, पण माझे हे मित्र आहेत चव्हाण दिघीच्या युनियन बँकेत काम करतात ते राहतात इथं बोर्लीला रोज दिघीला जातात ते निघाले आहेत तुम्हाला घेऊन जातील"

"वा! चांगलंच झाल!"

चव्हाणाशी त्यांनी परिचय करून दिला मी त्याच्याबरोबर दिघीला निघालो सकाळची प्रसन्न वेळ हवेत उकाडा होता पण अजून ऊन निबर झालं नव्हतं जाताना वाटेत लहान लहान गावं लागली बाया डोक्यावर भांड्याची उतरंड रचून, हातात बादल्या, कडेवर घागरी, कळशा घेऊन पाण्यासाठी विहिरीवर चाललेल्या दिसल्या विहिरीवर तर झिम्मड! भांड्यांची नि बायाची ही गर्दी! उन्हाळ्यात दरवर्षी असे पिण्याच्या पाण्याचे हाल होतात ! लांबून लांबून पाणी वाहाव लागत काटकसरीनं वापराव लागत कामाचा बराचसा वेळ पाण्यात जातो! मनात आलं, स्वातंत्र्य मिळाल, त्याला पाचसहा वर्षानं अर्धशतक पूर्ण होईल पचेचाळीस

वर्षांत गावच्या लोकांना पिण्याचं पाणी मिळेल याची सोयही झालेली नाही. देशात, महाराष्ट्रात अशी कितीतरी गाव आहेत पाण्यासाठी दाही दिशा लोकाना वणवण हिंडावं लागतं आहे तिष्ठाव लागतं आहे 'कुठे स्वातंत्र्य? कुणा स्वातंत्र्य? कुठं आहे विकास?' नको त्या, आज घडीला ज्याची गरज नाही त्या गोष्टी होताना दिसतात आणि ज्याची जगण्यासाठी किंबहुना ज्याच्याशिवाय जगता येणार नाही अशा अन्न, पाण्याची दुर्दशा वर्षोन् वर्षं चाललेली आहे निवडणुकीच्या काळात आश्वासनाचा महापूर! पण नंतर ठणठणाट! लोकांच्या सहनशक्तीच, पुढाऱ्यांच्या कोडगेपणाच नि शासनाच्या बेपर्वाईचं कौतुकच!

एका डोंगराला वळसा घालून दिर्घीत उतरलो सकाळचे आठ वाजले होते समोरच खाडी, पलीकड समुद्र! खाडी नालाच्या आकाराची

चव्हाण म्हणाले, "बर, इथले नायगावकर गुरुजीच इकडं येत आहेत त्याची तुमची गाठ घालून देतो ते तुमची सगळी व्यवस्था करतील"

नायगावकर गुरुजी आले चव्हाणांनी ओळख करून दिली नायगावकर गुरुजींनी जुन्या ओळखीनं स्वागत कराव, तसं केलं म्हणाले, "प्रत्यक्ष आज भेटतो आहोत, पण बालभारतीतले तुमचे धडे शिकवले आहेत वर्गात पुस्तकंही वाचली आहेत चला, चहा घेऊ"

बदरावरल्या हॉटेलात गेलो चहा पिता पिताच मी माझ्या येण्याचा उद्देश विस्तारानं सांगितला. म्हणालो, "गुरुजी, अशी मला तुमची मदत हवी आहे."

"अहो, तुमच्याबरोबरच राहतो की! मी निवृत्त माणूस दुसर काम नाही तुमच्या ओळखी करून देतो कोळीवाड्यात घेऊन जातो सगळ्यांनाच मी ओळखतो. मी इथलाच"

मी नि:श्वास टाकत म्हणालो, "वा! छान झालं तुम्हाला मात्र तसदी."

"त्यात कसली तसदी! अहो, माझाही वेळ तुमच्याबरोबर, एका लेखकाच्या सहवासात चागला जाईल असा योग कधी येणार! चला, राममंदिराकडं जाऊ तिथ सगळे भेटतील हा देखील योगच बरं का! काल राममदिरात आळंदीच्या महाराजांच कीर्तन झाल ते आता परत आळंदीला निघाले आहेत गावातली बहुतेक प्रमुख मंडळी तिथ जमलेली आहेत एकाच ठिकाणी भेटतील! पुष्कळशी कोळी मडळीही दिसतील

चला ''

गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली निघालो खाडीच्या कडेच्या डगरीसारख्या रस्त्यान राममदिरात गेलो हेही राममदिर नव्यानच बाधलेल होत मदिरातल्या मूर्ती तशाच सुदर! छान! दर्शनीय!

आळदीचे महाराज निघालेच होते गर्दी झाली होती स्त्रिया-पुरुप-मुल महाराजांच्या पाया पडत होती पैसे, फळ, पुढं ठेवत होती सगळ्याचे चेहरे, डोळे भक्तिभावानं ओथबलेले होते धार्मिकता ओसडत होती

महाराज आपल्या शिप्यगणासह मोटारीत बसून गेले मग गुरुजींनी चद्रकात पाटील, कावळे, बेडेकर आदी गावच्या प्रमुख मडळींशी ओळख करून दिली मी माझ्या भेटीचा उद्देश सांगितला. म्हणाले, '' ग्रामपचायतीत चला बसू. बोलू ''

सगळ्यांबरोबर ग्रामपचायतीच्या कचेरीत आलो चहा झाला चंद्रकांत पाटील हे सरपंच, त्यांच्याकडून कळलं की दिघीची लोकवस्ती आहे ३,७१३ त्यात मच्छीमार-कोळी आहेत सुमारे ८५ टक्के बाकीच्यात भडारी, मराठा, कुणबी, बौद्ध, मुस्लीम आहेत त्याचा व्यवसाय प्रामुख्यानं शेती मुस्लीम मडळींचा मोहोल्ला बदराजवळ वेगळा आहे उत्तम बाधणीची टोलेजग रगीबेरगी घर तिथं आहेत दिघीच्या मानानं ही दिघी 'पॉश' नि 'रिच' आहे मुस्लीम समाजातील कर्ती पुरुप मडळी बहुधा अरब देशात कामाला गेलेली आहेत. त्याची कमाई अर्थातच भरपूर मोठी आहे पेट्रो-डॉलर्सचा प्रभाव जाणवतो! ''

नायगावकर गुरुजीना म्हणालो, '' गुरुजी, तुम्ही बोला की! ''

गुरुजी सरसावले, सागू लागले '' दिघीचा कोळी समाज फार प्राचीन आहे स्वातंत्र्य मिळविण्याच्या आधी या समाजाची आर्थिक अवस्था शोचनीय होती शिडाच्या होड्यांतून मच्छीमारी व्हायची पण नंतरच्या काळात शासनाच्या मदतीन स्थिती सुधारली यान्त्रिक होडचा आल्या, नायलॉनची जाळी आली, परदेशी निर्यात वाढली बर्फाची सोय झाली या समाजाच्या उन्नतीसाठी चंद्रकांत पाटील, गोविंत कावळे, दत्ता बेडेकर या तरुण मंडळींनी पुढाकार घेऊन, खटपट करून पुष्कळशा सोयी-सवलती मिळवून दिल्या आहेत ''

'' या गावाला दिघी हे नाव कस मिळालं, याची काही आख्यायिका आहे का? ''

गोविंदराव म्हणाले, "आहे, आहे पूर्वी जजिरा-मुरुड हे सिद्दींच संस्थान होतं दिघी संस्थानातच होती हे बंदर आहे इथं दक्षिणेकडून येणाऱ्या-जाणाऱ्यावर देखरेख ठेवण्यासाठी सिद्दी नबाबानं टेहळणी चौकी ठेवलेली होती तर देखरेख करणारे नाके यावरून दिघी हे नाव मिळाले आहे, असे जुने लोक सांगतात दुसरं असंही सांगतात की, इथं मासळीचा मोठा व्यापार चालतो देवघेव होते या देवघेवीवरूनही दिघी म्हटलं जात याच्या आधीचं गावाचं नाव होतं कुभेड कुभेड डोंगरच आहे

"कुभेड गावचा ग्रामदेव, ग्रामदेवता कोणती?"

"आमचा ग्रामदेव काळभैरव शंकर, आम्ही मूळचे शिवभक्त आणि ग्रामदेवता 'ध्यानबाई गावाकडं ध्यान देणारी, लक्ष ठेवणारी!'

"आषाढ महिन्यात हिची जत्रा असते सगळे कोळी, कोळ्यांचे पुढारी काळोजी पाटील वगैरे मंडळी जातात देवीचा मान देवीला देतात कळा लावतात आणि मागणं मागतात की, 'आई, तुझी गावावर कृपा असावी काही चुकलं-माकलं असलं तर क्षमा करावी गावाला रोगराई होऊ देऊ नको. श्रावणातला सीझन सुरू होतो, या सीझनमध्ये कोळ्यांना पुष्कळ मासळी मिळू दे वाऱ्या-वादळापासून संकटापासून वाचव सुरक्षित ठेव' आणि देवी सुरक्षित ठेवते, कमाई देते अशी आमची श्रद्धा आहे"

"दुसरं एक नानवली म्हणून जवळच गाव आहे तिथही काळभैरवाचं स्थान आहे कोळी लोक तिथंही जातात कधी कधी समुद्रात पधरा पधरा दिवस मासळी भेटतच नाही. शार्क माशासारखे मोठे मासे जाळी तोडून टाकतात अशा वेळी गावचे पुढारी लोक तिथं जातात कळा लावतात मान देतात गाऱ्हाणं मांडतात आणि आम्हा सगळ्यांचा विश्वास आहे की, काळभैरव महादेव आपलं गाऱ्हाणं ऐकतो संकट दूर करतो" दुसऱ्या एकानं सांगितलं

"इथली मच्छीमारी खाडीतली आहे यांत्रिक होडीच्या साहाय्यानं भरती-ओहोटीच्या अनुरोधानं डोल पद्धतीत ही मच्छीमारी चालते सुमारे पाच-सहाशे लोक या व्यवसायात इथं आहेत होड्या, जाळी, इंजिन, यासाठी शासनानं सवलती दिल्या बँकेने कर्जपुरवठा केला पण मच्छीमारांची सहकारी सोसायटी मात्र अव्यवहारीपणामुळं डबघाईला आलेली आहे" एकानं आणखी एक तक्रारीच्या सुरात सांगितलं की, "आम्हाला आजवर महादेव कोळी-मागासलेल्या जागात अनुसूचित म्हणून ज्या काही

सोयी-सवलती मिळत होत्या व त्यामुळे आमची चार पावलं प्रगतीच्या वाटेनं पडू लागली होती, ती आमची सवलत बंद केल्यामुळं फार हाल होत आहेत. प्रगतीच्या ऐवजी आमची आर्थिकदृष्ट्या अवनती चाललेली आहे."

"इथल्या होड्या एक सिलिंडरवर चालणाऱ्या असल्यामुळं त्या लांबवर नेता येत नाहीत. त्यामुळं बाहेरची मासळी मिळत नाही. इथं कोळंबी, जावळी व थोडीफार बोंबील या जातीची मासळी मिळते. मार्केटिंगची इथं सोय नाही. इथली मासळी घेऊन मुरूडच्या बाजारात जातात, विकतात. मच्छी सुकविण्यासाठी सिमेंटचे ओटेही नाहीत. बायामाणसं शेणानं सारवलेल्याच जागेवर मासळी सुकत घालतात. दिघीचा 'जवळा' मासा फार चवदार म्हणून प्रसिद्ध आहे. सातारा, कोल्हापूर, सोलापूर... लांबून मागणी असते. इथं बर्फाची फॅक्टरीही नाही. त्यामुळे मासळी टिकवता येत नाही. नाशवंत मासा सुकवावा लागतो. म्हसळ्याच्या बाजारात बायका विकायला घेऊन जातात." आणखी एकानं माहिती दिली.

गुरुजी शिक्षणाबद्दल सांगताना म्हणाले, "संस्थान होतं तेव्हा इथं १ ते ४ इयत्तापर्यंत शाळा होती. उर्दू आणि अरबीबरोबरच मराठीचं शिक्षण दिलं जायचं. उर्दू-मराठी शाळा एकत्रच होती. पूर्वी मोडीही शिकवली जायची. आता ती कोणाला येत नाही..."

"मोडी मोडीत निघाली!"

"हां, मोडीत निघाली. संस्थान विलीन झाल्यानंतर उर्दू व मराठी शाळा वेगवेगळ्या करण्यात आल्या. मी इथं आलो तेव्हा मराठी शाळेत, एवढा मोठा कोळीवाडा असूनसुद्धा ४५ मुलं होती. मी खटपट केली, ग्रामपंचायतीच्या सभासदांना भेटलो. एकत्र आणलं. तीही नीट चालत नव्हती. सहस्रबुद्धे नावाचे शिक्षणाधिकारी होते, त्यांची परवानगी घेऊन मी इथला सर्व्हे केला. तेवीस मुलं मिळाली. म्हणजे ६८ मुलं झाली. आता एक शिक्षक काय करणार? मी दोन शिक्षकांची मागणी केली. ताबडतोब दोन शिक्षक मिळाले. परिस्थिती फार वाईट. गरीब मुलांच्या अंगावर कपडे नसायचे. लंगोटी लावून मुले शाळेत यायची. इथल्या मंडळींनी मात्र मला पुष्कळ मदत केली. सहकार्य दिलं. मग आम्ही पाचवीचा वर्ग सुरू केला. १९७२ पर्यंत सहावी, सातवी काढली. पुढं हायस्कूल नव्हतं. माझी बदली दिवे-आगरला झाली. तर मी सातवी झालेली मुलं तिथं नेऊन हायस्कूलमध्ये

दाखल केली कारण मला ठाऊक होतं, शिक्षणाशिवाय प्रगती नाही ही मुलं शिकली तर माझ्या दिघी गावाची प्रगती होईल म्हणून मी ही मुल शिकवली त्यांनीच पुढ शाळा टिकवली मुलाना गोडी लागली होती पालकानी दुर्लक्षच केल १९७३ सालापासून इथं हायस्कूल सुरू झाल आता सुमारे ४०० मुल शिक्षण घेत आहेत हायस्कूलला नवीन इमारत आहे दहावीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे काही पुढ कॉलेजात गेली बी ए , एम.ए झाली कुणी मुख्याध्यापक झाले, वेगवेगळ्या ठिकाणी नोकरीला लागले. शिक्षणाचा अशारीतीने प्रसार झाला सोय झाली, तरी पण या कोळी समाजाला आदर्श नेतृत्व लाभलेल नाही समाजासाठी आपण काय केल पाहिजे, कसं वागल पाहिजे हे सांगणारा, करून घेणारा नेता भेटला तर हा कोळीसमाज निश्चित पुढ जाईल, प्रगती करील, असा माझा विश्वास आहे ''

"गुरुजी, शिक्षण वाढलं तर मग इतरं ठिकाणी नवऱ्यामुलाचे भावही वाढलेत जबरदस्त हुंडा मुलीच्या बापाकड मागतात जितका जास्त शिकलेला मुलगा, तितका त्याचा हुंडा जास्त किंवा हुंड्याच्या रूपात, सोनं, मोटार, स्कूटर, फ्लॅट, फ्रीज, आणि त्यासाठी लग्नानतर मुलींचा छळ, जाळपोळ, मारझोड, हुडाबळीच्या बातम्या वाचतो, ऐकतो आपण स्वातंत्र्यापूर्वी अशी समजूत होती की, स्वातंत्र्यात सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध होईल सर्व शिकतील शहाणी होतील सुधारतील जुन्या रूढींना मूठमाती देतील त्या गाडून टाकतील पण या चाळीस वर्षांत उलटंच झालेलं दिसतय. हुंड्याचा राक्षस पूर्वीपेक्षा वाढलाय रावणच बनलाय! तस इथं, या कोळी समाजात झालेलं आहे का ? ''

" मुळीच नाही या समाजात हुंडा शब्दच नाही देणं नाही, घेणही नाही मुलीच्या पित्यानं ऐपतीप्रमाण मुलीला कराव किंवा करू नये कसलीही सक्ती नाही लग्नानिमित्त होणारा जेवणखाणाचा पसारा व खर्च ऐपतीप्रमाणं करताना त्याबद्दलही सक्ती नाही ''

" अरे वा! म्हणजे ही मोठीच सुधारणा आहे

" आजची नाही पूर्वीपासूनची आहे पण एक आहे ''

" काय ? ''

" गणपतीच वेड फार एका घरात दोन घर असतील, भावा-भावांची तर दोन गणपती बसणार! आरास करणार, खर्च करणार! गणपतीप्रमाण

होळीचा सण एक मोठा परगावी राहणारे गावी येणार खूप उत्साहात होळी करणार नाच-गाणी म्हणणार, पण अचकट-विचकट कोणी बोलणार नाही गाणी बायामंडळी फार छान म्हणतात आता त्याना बोलावून म्हणायला लावली असती, पण पाणी भरण्यात बाया गुतलेल्या आहेत आमच्या इथं पिण्याच्या पाण्याची फार अडचण आहे दोन-दोन तीन-तीन तास मोडतात जगलातन दीड-दोन मैलावरनं पाणी आणाव लागत फार त्रास आहे पण गाणी चागली असतात, गणपतीची, होळीची तसाच गणपतीचा नाच, होळीचा नाच असतो कोळ्यांच्या कष्टाच्या जीवनात हे सण विरगुळ्याचे, मनोरंजनाचे असतात!"

खाडीच्या पलीकड राजापुरी, तिथ जवळच समुद्रातला जलदुर्ग, जजिरा, मुरुड दिघीहून लाँचनं जावं लागतं लाँचची वेळ झाली उठलो, जेट्टीवर आलो लाँच पकडली पधरा-वीस मिनिटांत राजापुरीला आलो लाँचमधून खाडीची नालाकृती अधिक स्पष्ट दिसली दिघी हे बदर म्हणून विकसित करून मुंबईशी जोडण्याची योजना मुख्यमत्री असताना अतुले यानी आखली होती ती अमलात आली असती तर या भागाला फार मोठी उर्जितावस्था प्राप्त झाली असती भरभराट झाली असती, पण राजकारण नडले! योजना बारगळली

राजापुरीला जेट्टीवर उतरलो नि दुसऱ्या लाँचने समोरच दिसणाऱ्या जंजिरा जलदुर्गात गेलो याआधी मालवणचा सिंधुदूर्ग पाहिला होता जलदुर्ग म्हणजेच 'जंजिरा' पाणकिल्ला!

सुरक्षिततेच्या दृष्टीने राजनीतीमध्ये किल्लेकोटाना प्राचीनकाळी फारच महत्त्व होते किल्लेकोट यासबधी माहिती देताना भारतीय संस्कृतिकोशात लिहिले आहे सभोवती तटबदी करून म्हणजे मजबूत भिंती बाधून जे सुरक्षित स्थान निर्माण केले जाते, त्याला किल्ला म्हणतात. जमिनीवर बाधलेला तो भुईकोट, व डोंगरावर बांधलेला तो किल्ला किंवा गड होय पाण्यात बाधलेल्या किल्ल्याला जजिरा म्हणतात देशाच्या रक्षणार्थ किल्ले बाधण्याची चाल फार प्राचीन आहे वेदामध्ये गड या अर्थी पुर शब्द योजलेला आढळतो ऋग्वेदात अश्मन्य (दगडी) पुराचा उल्लेख आहे आर्यांच्या पूर्वी जे लोक भारतात वसले होते त्यानी अशी पुरे बांधली होती आणि ती वैदिक आर्यांनी उद्ध्वस्त केली असे काही सशोधकांना वाटते रामायणात लंकेची तटबंदी, बुरुज, वेशी इ बाधकामाचे वर्णन केलेले आहे

सुवेळा, निकुंभिलो, किष्किंधा या ठिकाणीही मजबूद तटबंदी होती हे रामायणावरून कळते महाभारतातील कूट-युद्धाच्या वर्णनात किल्ल्याची व्यवस्था कशी ठेवावी व त्याचा उपयोग कसा करावा हे सांगितले आहे श्रीकृष्णाच्या द्वारकेला उत्कृष्ट तटबंदी होती

राज्याच्या सात अंगात दुर्ग हे एक अंग आहे चाणक्याच्या अर्थशास्त्रात किल्लेकोटांचे महत्त्व खूप वर्णिलेले असून औदक म्हणजे जंजिरा (समुद्रातला) पर्व म्हणजे डोंगरी, धान्वन म्हणजे भुईकोट आणि वनदुर्ग असे त्याचे चार प्रकार सांगितले आहेत त्यापुढे चाणक्य सांगतो, राज्याच्या सीमेवर प्रत्येक दिशेस मजबूत किल्ले असावेत त्याभोवती खंदक खणून त्यात सुसरी, मगरी व कमळाचे वेल सोडावेत तट व खंदक यात २४ फूट अंतर ठेवून तटाची उंची ७२ फूट व रुंदी ३६ फूट ठेवावी पायथ्याशी निवडुंग व काटेरी झुडपांची लागवड करावी तटाचे बुरूज चौकोनी असावेत व त्यातील अंतर १८० फूट असावे तटावर इंद्रकोश म्हणजे झाकलेल्या बैठका असाव्यात (बहुधा तिथून तोफांचा किंवा बाणाचा मारा करण्यासाठी) किल्ल्याच्या महाद्वाराला २४ अंगुळांचे टोकदार इंद्रकील (खिळे) असावेत याशिवाय किल्ल्याची आतील रचना व व्यवस्था, शस्त्र संग्रह व इतर सामग्री यांचेही तपशीलवार वर्णन कौटिल्याच्या अर्थशास्त्रात आहे शिवाजीमहाराजांनीही अनेक किल्ले बांधले याशिवाय मराठ्यांनी अर्नाळा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, अलिबाग येथील किल्ले व हशबाने जंजिरा हा पाणकिल्ला बांधला

जंजिऱ्याचे दगडी मजबूत बांधकाम समुद्राच्या उसळत्या लाटांचे तडाखे खात अद्याप उभे आहे।

जंजिऱ्याचे भव्यपण समुद्राच्या भव्यपणावर अधिकच मनात ठसले! सारा किल्ला फिरून पाहिला अनेक पर्यटकही आलेले होते

लाँचने परत राजापुरीला आलो गाव लहान, पण हबशीसिद्दीच्या राजवटीच्या काळातील खाणाखुणा दिसल्या मशीदी मोठ्या चांगल्या स्थितीत आहेत देवळे पडकीझडकी झाली आहेत हिंदू-मुस्लीम तणाव इथं नाही हे मच्छीमारांचंच गाव आहे गावच्या अड्ड्यावर कोळणी मासळीच्या टोपल्या घेऊन विक्रीसाठी बसलेल्या होत्या दिघीहून लाँचने येताना इथं, एसटीत पुढं एकदरा, मुरुड या भागात बुरखाधारी मुस्लिम स्त्रिया बऱ्याच आढळल्या

एकदऱ्याला 'हनुमान मच्छीमार सहकारी सोसायटी'त गेलो कोळीवाड्यात चक्कर मारली सुक्या माशाच्या वासाने परिसर दरवळला होता कोळणी कामात मग्न होत्या हजार-बाराशे वस्तीचं हे गाव आहे मच्छीमारांच्या तीस होड्या आहेत एक ट्रॉलर आहे गावाच्या पुढे खाडी, मागे समुद्र

खाडीवरला पूल ओलांडून गेलो, तो मुरूडमध्ये पोचलो लांबून हे गाव हिरव्या नारळी-पोफळीच्या झावळ्यात दडून बसल्यासारखे दिसत होते गावातून, कोळीवाड्यातून फेरी मारली इथही पुरुषमंडळी समुद्रावर गेलेली, म्हणून फारशी कोणी भेटली नाहीत चार-पाच जण भेटले त्यांच्या बरोबर गप्पागोष्टी करून परतलो लाँचने दिघीपर्यंत व पुढे बोर्लीपर्यंत एस् टीने आलो सध्याकाळ झाली होती आजची रात्र ही या मुक्कामातली शेवटची रात्र होती उद्या सकाळी लौकरच्या एसटीने गोरेगावला जायचे होते म्हणून सलीमभाई मेमन यांचा निरोप घेतला सहकार्याबद्दल धन्यवाद दिले महमदभाई म्हसळ्यास गेले होते त्यांची भेट झाली नाही

## गोरेगाव दि. २९ मे १९९२

सकाळी सकाळी सामान घेऊन मेमनाच्या वास्तूला 'खुदाहाफिज' देऊन एस टी स्टँडवर आलो सुदैवानं लगेच बस मिळाली गर्दी नव्हती जागाही खिडकीजवळची झकास मिळाली कोकणातल्या कुलाब्याचं हिरव सौंदर्य पाहात पाहात, तीन दिवसातल्या त्या गावच्या माणसांच, समुद्राच्या आठवणीचं रवंथ करीत करीत निघालो

आठच्या सुमारास दोन तासानीच गोरेगावात पोचलो थोड्या वेळाने दोशी वकील म्हणाले, 'थकला दमला नसाल आणि चढण शक्य असेल तर समोरच्या मल्लिकार्जुनाच्या टेकडीवर जाऊन या सोबत हे दोन तरुण देतो ''

मी म्हणालो, ''जाऊन, पाहून येतो, चला मित्रानो!''

त्या दोघांबरोबर निघालो गावाबाहेर टेकडीच्या पायथ्याशी आलो टेकडीवर जायला दोशी वकिलांनीच पुढाकार घेऊन चांगल्या ऐसपैस अशा ३४० पायऱ्या या तीन-चार वर्षांतच बांधून काढल्या आहेत आजूबाजूला झाडं लावली आहेत ओकीबोकी टेकडी हिरवळली आहे

गावात देवीचं देऊळ आहे मल्लिकार्जुनाचं देऊळ टेकडीवर आहे

आख्यायिका अशी सांगतात की, एका भक्तासाठी तो आजारला, वृद्ध झाला होता टेकडी चढून जाण अशक्य झालं होतं म्हणून एके दिवशी मल्लिकार्जुन त्याला दर्शन देण्यासाठी खाली, गावात त्या भक्ताच्या घरी आला देवीला याचा राग आला मल्लिकार्जुन एकला आला म्हणून देवी रागारागानं वर टेकडीकडं निघाली अस सांगतात की, देवी वर्षातून एकेक गहू अतर चालून जाते

टेकडीवरून सार गोरेगाव नि आसपासचा विस्तीर्ण प्रदेश दिसला! फार छान अस हे विहगम दृश्य आहे! मल्लिकार्जुनाच देऊळ, आसपासचा परिसरही सुदर आहे

गोरेगाव म्हटल की मला वामन मल्हार, नारायण मल्हार व माधव मल्हार या तीन प्रसिद्ध जोशीबंधूंची आठवण येते वामन मल्हारांच्या 'रागिणी', 'सुशिलेचा देव', 'आश्रमहिरणी' या कादंबऱ्या आणि साहित्यविषयक वैचारिक लेख मी वाचलेले आहेत महाराष्ट्राचे तत्त्वज्ञ, कादबरीकार म्हणून त्याची ख्याती होती पुण्यात महर्षी कर्व्यांच्या विद्यालयात ते प्रोफेसर होते नारायण मल्हार हे एन्. एम जोशी म्हणून भारतीय मजूर चळवळीत प्रसिद्ध होते मुबईतील कामगार सघटनेतील ते एक जनक मानले जातात माधव मल्हार हे सस्कृतचे गाढे अभ्यासक-प्राध्यापक होते

गोरेगावातील त्याच्या राहत्या जागेतच, सध्या वाचनालय आहे वामन मल्हारांच्या नावाचा हॉल आहे रात्री याच हॉलमध्ये दोशी वकिलाच्या 'दक्षिणयुग' साप्ताहिकाच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त माझ्या भाषणाचा कार्यक्रम झाला

त्या आधी सध्याकाळी दोशी वकील व त्याचे काही मित्र याच्यासह आबेत या गावी जाऊन आलो होतो. आबेत हे अंतुलेंचे गाजलेले गाव बाणकोटच्या खाडीत तटावरच त्यांचा भव्य बगला, बगीचा आहे बाणकोटच्या खाडीवर त्याच्यात खटपटीने मोठा, झकास पूल रचलेला आहे पुलाच्या पलीकडे रत्नागिरी जिल्हा कुलाबा-रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा हा सेतूच! या पुलामुळे दोन जिल्हे जवळ आले, जोडले गेले आणि केवढे तरी अंतर कापायचे वाचले लोकाची सोय झाली पूलावरच एकजण भेटला त्याच्याशी बोलताना तो म्हणाला, 'पूल नव्हता तेव्हा अडलेली बाळंतीण दवाखान्यात होडीतून नेताना फार त्रास पडायचा पुलामुळ आमचा केवढा तरी त्रास वाचला ''

पलीकड पुलाखाली म्हाप्रळ बंदर, बोटी उभ्या होत्या मासळीची वाहतूक चालली होती वर दोनतीन हॉटेलं, दुकानं आहेत झकास भेळ खाल्ली, चहा प्यालो पुलावरून चालत गप्पा मारीत आंबेतला आलो नि गाडीन गोरेगावला पोचलो ही छोटीशी सहल आनंददायी वाटली!

या भागात फिरताना एक जाणवल की अंतुलेंनी पुष्कळ काम केलेल आहे हे रस्ते किती तरी आणि चांगल्या स्थितीत झाले आहेत मच्छीमारासाठी मासळी सुकवण्याकरता प्रत्येक ठिकाणी सिमेंटचे ओटे केलेले आहेत रत्नागिरी-ठाणे जिल्ह्यात फिरताना असे ओटे दिसले नव्हते आणखीही सुधारणा, साहाय्याची व्यवस्था केलेली आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकात त्याच्याविषयी आदराची भावना आहे

**तळा-रहाटाड-मादाड दि ३० मे १९९२**

सकाळच्या बसने इंदापूर व तेथून पुन्हा दुसऱ्या बसने तळा या गावी गेलो अकराच्या सुमारास पोचलो दोशी वकिलाच्या सागण्यावरून दोन-तिघ तरुण मित्र व श्री रणदिवे स्टँडवर आले होते रणदिवे आपल्या घरी मुक्कामाला घेऊन गेले रणदिवे मूळचे इथले, पण ठाण्याचे झालेले मुख्याध्यापक होते निवृत्त झाले नाटकाचे हौशी, नाट्यविषयक अभ्यासू, त्यांनी नाट्यशिक्षणाची अनेक शिबिरे घेतलेली. त्याच्या पत्नीलाही ही आवड रणदिव्यांना दम्यासारखा त्रास सुरू झाला ठाण्याची हवा मानवेनाशी झाली म्हणून ते गावाकड आले इथ वडिलार्जित जमीन होती गावाबाहेर टेकाडावर असलेल्या जमिनीत 'कलाश्री' नामक छान, टुमदार बगला बाधला पती-पत्नी दोघं इथंच राहू लागली मी गेलो तेव्हा मनाली - छोटी नात आलेली होती. शनिवारी-रविवारी ठाण्याहून अधूनमधून मुलगा, सूनबाई, मुलगी वगैरे येतात रणदिव्यांना इथली हवा मानवते मलाही दोन दिवस मानवली!

कलाश्रीचा प्लॉट झकास आहे पुढच्या बाजूस भातशेती, तिला लागून डोंगर अंतरावर किल्ला झाडी बऱ्यापैकी मागच्या बाजूला खोल खोऱ्यासारखा भाग भातशेतीपासून रस्ता नि पलीकडं पुन्हा भातशेती डोंगराच्या पायथ्याशी हवा मोकळीढाकळी खेळती उन्हाळा असूनही पंख्याची गरज नव्हती अशी डाव्या उजव्या बाजूला फुलझाडं व्हराड्यात बसायला झोपाळा कलाश्रीवर अतर्बाह्य कलात्मक हात फिरलेला लक्षात

येतो रसिकता, सौंदर्यदृष्टी जाणवते

रणदिव्याशी ही पहिलीच भेट ओळख पण कसे कुणास ठाऊक काहीशा थोडक्या वेळातच आमच्या वेव्हलेंग्थ' जुळाल्या आवडीनिवडी जमल्या आणि खूप दिवसाच्या जुन्या मैत्रीसारखे वागू-बोलू लागलो खूप गप्पा-गोष्टी झाल्या व्यक्तिगत भेटीगाठी नसल्या तरी नावागावान आणि त्याहीपेक्षा त्या एका आवडीच्या क्षेत्रातल्या विचार-सदर्भानं अशी जवळीच अल्पावधीत जमून जाते

दुपारी जयत राजे हा विद्यार्थी-मित्र मोटारसायकल घेऊन आला, त्याच्यामाग बसून जवळच्या 'रहाटाड' नामक छोट्याशा गावात गेलो खाडीच्या काठी बसलेल हे मच्छीमाराच गाव निरुंद रस्त्यान कोळीवाड्यात गेलो मोठे कोळी मच्छीमारीला गेलेले छोटे कोळी शाळेत रस्त्यावर खेळात रमलेले काही घर साधीसुधी, तर काही आधुनिक धर्तीची, रगरंगोटीन सजलेली दिसली चौकशी करता कळलं की ती घरं मुस्लीम बाधवाची आहेत त्याचा उद्योगसबध परदेशाशी त्यामुळं कमाई बख्खळ घरदार, राहाणीवर समृद्धीचा प्रभाव दिसतो तशी इथली मच्छीमारी अन्य ठिकाणापेक्षा लहान आहे साध्या होड्यातून खाडीतल्या खाडीत चालते रहाटाडचे खेकडे चविष्ट म्हणून प्रसिद्ध आहेत

गावातून चक्कर मारताना राधाकृष्णाच्या मदिराजवळ पोचलो मंदिर चागले, मोठे, स्वच्छ दिसले तिथच दोन वृद्ध बसले होते त्याच्याशी गोष्टी सुरू केल्या एकाच नाव होत पद्मा रामा मुकाटी, दुसऱ्याचं होत रामा हरी पाटील दोघही सत्तरीच्या घरातले किंवा पलीकडले दोघेही कोळी मच्छीमार आता निवृत्त म्हातारपणामुळ होत नाहीस झाल झेपेनासं झालं घरी बसू लागले पद्मा मुकाटी म्हणाले, कळत नव्हत तेव्हापासूनच मच्छीमारीला जाऊ लागलो रामा पाटलांचे तसेच दोघानीही जवळ जवळ पन्नास-पंचावन्न वर्षं मच्छीमारी केली म्हणाले, " आमची सगळी वंशावळीच मच्छीमारीची आमची मच्छीमारी चालते लहानग्या होड्यातून हातान वल्ही मारून होडी चालवायची खाडीतली मच्छीमारी करायची राजापुरीपर्यंत जायच मोकळ्या दर्यात जात नाही होडी लहान त्याला सिलिंडरची मोठी होडी लागते त्या त्या सीझनप्रमाण मासळी मिळते आता कोलमीचा सीझन चाललाय ज्याच त्यानं जाळ घेऊन जायच एका होडीत तीन-चारजण असतात मिळालेली मासळी तळ्याला नेऊन विकायची आमच्या बाया

विकतात व्यापाऱ्याला देत नाहीत लिलाव घालत नाहीं मासळी थोडीच असते विकायची, धान्य, तेल, मिरची, डाळ, भाजी घ्यायची ''

शे-दीडशे कोळ्याची घर, तीनचारशे कोळी मच्छीमारीच्या धद्यात तीसपस्तीस होड्या उधाणाच्या वेळी होड्या पाण्यात लोटायच्या आणि उधाणाच्या पाण्याबरोबरच परतायच्या बारा-तेरा तास दर्यावरच काढायचे खाडी लहान, मरतुक कमी कमाई कमीच पोटापुरती कोळणी मच्छीच्या टोपल्या घेऊन एसटीन तळ्याला जातात घरोघर फिरत मासळी विकतात नाक्यावर, बाजारातही माल घेऊन बसतात एस टी मिळाली नाहीं तर टोपल्या डोक्यावर घेऊन चालत तळ्याला जातात कष्टाचं काम शिल्लक राहिलेली मासळी सुकवतात सिमेंटचे ओटे बांधलेले आहेत खडक आहे, माळाची जमीन आहे त्यावरही बाया मासळी सुकवतात. तीही तळ्याला नेऊन विकतात

होड्या लहान, तशी जाळीही पूर्वी सुताची असायची ती विणायची पाण्यान वर्षभरातच कुजायची तुटायची पण अलीकड नॉयलॉनच्या सुताची जाळी आल्यान बर झाल ही जाळी तीन-चार वर्षं टिकतात

गावची देवी कालेश्री जवळच टेकडीवर देऊळ आहे दोन वेळा जत्रा भरते भातलावणीच्या आधी आणि कापणीनतर गावात तीस-पस्तीस घर मुसलमानांची आहेत पण ते कोणी मच्छीमारी करीत नाहीत बाहेर उद्योगधद्यात आहेत

बहुतेक लोक पढरीला जाऊन आलेले आहेत एकजण दरसाल कार्तिकीच्या यात्रेला जातो दोघेजण काशीला जाऊन आलेले आहेत गणपती, होळी हे सण जोरात गाणी-नाच करतात

चांग्या तरणा तेवढ्यात टपकला त्यान गाणं सुरू केल

व्हलव रे नाखवा व्हलव रे
लखलख दरिया व्हलव रे
तुरुतुरु तारू व्हलव रे
गेले रे तारु दरियावरी
व्हलव रे झपझप व्हलव रे
फेसाळ दरिया फेसाखाली फेका जाळ
जोमानं वडा, खेचा, वडा जाळं,

व्हलव रे व्हलव रे
चमचमत्या मासळीन नाव भरी रे
व्हलव रे व्हलव रे!

खाडीवर गेलो फिरून पाहिल मोटारसायकलवरून तळ्याला परतलो साहित्य परिषदेची शाखा काढली आहे. तिच्यावतीने रात्री गप्पाचा कार्यक्रम झाला

दुसरे दिवशी, दि ३१ मे रोजी, सकाळी जयत राजे मोटारसायकल घेऊन आला मांदाड नावाच्या मच्छीमारांच्या गावाकड निघालो वाटेत कुडा गाव लागले गावाच्या अलीकडेच डोंगरात लेणी खोदलेली आहे ती पाहायला गेलो पूर्वेला डोंगरात लेणी, त्यासमोर पश्चिमेला समुद्र! सुंदर दृश्य! सुरेख ठिकाण! पर्यटन केंद्राची योजना

कुडाची बौद्ध लेणी अर्धवट स्थितीतली आहेत दोन चैत्य आहेत दोन शिलालेख आहेत भव्य हस्तिद्वार आहे पद्मपाणी बुद्धाची मूर्ती आहे सात-आठ गुहा तप साधनेसाठी खादेलेल्या आहेत अर्धवट स्थितीत लेणी असली, तरी शिल्पसौंदर्य दिसते! भावते!

मांदाड गाव लहानच आहे दीडशे घरं मच्छीमारांची असतील बाकी इतरांची त्यात काही घर आधुनिक नवीन बांधणीची रंगरगोटी केलेली लक्ष वेधणारी आहेत ती मुंबैकरानी बांधलेली आहेत कोळीवाडा खाडीच्या काठावर आहे राडाटाडप्रमाणच वल्ही मारून होडग्या चालवतात खाडीतल्या खाडीत मच्छीमारी करतात. तीस-पस्तीस होडग्या आहेत रोज ४-५ किलो मच्छी एकेकाला मिळते गावातच खपते काही तळ्यालाही नेतात नथू पाटील, सहदेव पाटील भेटले लक्ष्मीनारायणाच्या देवळात बसलो गप्पागोष्टी केल्या इथंही खेकडे चविष्ट मिळतात कोल्हापूरपर्यंत जातात सुक्या मासळीचा धंदा इथं नाही भात-मासळीच कालवण, तांदळाची भाकरी, हे जेवण जेवणात रोज मासळी पाहिजेच

लाकडाच्या होड्या बनविणारे खास सुतार आहेत पावसाळ्यात धदा नसतो त्यावेळी होड्याची डागडुजी चालते

शाळा आहे मुलं-मुली शिकतात थोडंफार शिकलेली मुल धद्यात येतात जास्त शिकलेली मुलं नोकरी-चाकरीवर जातात ते धंद्यात येत नाहीत तशी फार मिळकत नाही म्हणून त्यांना धंद्याच आकर्षण वाटत

नाही  शिवाय कष्ट भरपूर करावे लागतात  रात्री-दिवसा केव्हाही समेप्रमाण होड्या खाडीत ढकलाव्या लागतात  भरवसा कसलाच नाही  इतर ठिकाणच्या मानानं रहाटाड, मादाड, इथला मच्छीमारी व्यवसाय लहान आणि मागासलेल्या अवस्थेतच आहे

खेकड्याना मागणी आहे  तळा, माजगाव, इंदापूरपर्यंत कोळणी जाऊन विकतात  सध्या भाव दोन मोठ्या नगाला पाच रुपये आहे  लहान जोडीला तीन रुपये पडतात

ग्रामदेवीचा गोंधळ वर्षातून एकदा होतो  एक वर्ष कोळी समाज त्याचा खर्च करतो, तर एक वर्ष कुणबी समाज करतो  आलटून-पालटून खर्च केला जातो  गोंधळाला सगळा गाव जमतो  देवीच्या दर्शनाचंही असंच आहे  एका रविवारी कोळी समाजातील माणसं जातात, दुसऱ्या रविवारी कुणबी समाजातली जातात  पंधरा दिवसांतून एकदा देवीची पूजा होते  कळा-कौल लावला जातो  पूर्वी कुणाकुणाच्या अंगात देवी यायची  पण आता तो प्रकार बंद झाला आहे

पाटील मुंबईलाच कामाला होते  ३०-३५ वर्षे मुंबईत काढली  चार वर्षांपूर्वी गावी परत आले  मी विचारलं, "इतकी वर्षं मुंबईत काढल्यावर आता इथं करमत का?"

तर त्यांनी सांगितलं, "मुंबैचा कंटाळा आलाय. हिथं बरं वाटतं. सगळं मोकळं हाय  मोकळी हवा  बरं वाटतं."

"करता काय इथं?"

"मच्छीमारी  थोडफार मिळवतो  वेळही जातो"

"शेवटी समुद्राकडं आलात!"

माणसाचं जीवन कसं वैविध्यपूर्ण असतं! गावोगावच्या तऱ्हा, रूढी, रीतीरिवाज, उपजीविकेच्या, उपासनेच्या, करमणुकीच्या, अर्थार्जनाच्या, श्रद्धेच्या किती तऱ्हा! किती प्रकार!

तळा गाव सोडण्यापूर्वी डॉ  जोशींकडे गेलो  डॉ  जोशींची गोरेगावला दोशी वकिलांकडं भेट झाली  'दक्षिणयुग" वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षही डॉ  जोशी होते  चहा, गप्पागोष्टी झाल्या  सायकाळी बसने निघून गोरेगावला मुक्कामाला आलो  दोशी वकिलांनी माझ्या कामाची, प्रवासाची अन्य व्यवस्थेची आस्थापूर्वक चौकशी केली  म्हणाले, "हे पी बी  मेधा तुमच्याबरोबर अलिबागला येतील  पनवेलपर्यंत राहतील  पनवेलला

रमणभाई म्हणून सी ए आहेत त्याच्याकड सोडतील तिथून पुढची व्यवस्था रमणभाई करतील मी निरोप पाठवले आहेत चिठ्ठ्या दिलेल्या आहेत सर्व व्यवस्था होईल ''

**अलिबाग-पनवेल · दि. १ जून १९९२**

सकाळी दोशी वकिलाचा आभारपूर्वक निरोप घेतला पी बी मेथाच्याबरोबर निघालो अकराच्या सुमारास अलिबागला पोचलो दोशी वकिलांचे दुसरे बधू डॉ एम एम दोशी यांच्या 'निसर्ग'' बगल्यावर गेलो. डॉक्टर आणि त्याच्या पत्नी या उभयतानी हार्दिक स्वागत केले ओळख झाली मी म्हणालो, 'तुमच्या बंगल्याचं तुम्ही छान नाव ठेवल आहे 'निसर्ग'' ''मी निसर्गमित्र आहे '' निसर्गमधली साधी पण कलात्मक सजावटही मला आवडली त्या उभयताच्या रसिकतेची साक्ष पटली

त्याहून मोठी साक्ष पटली ती दुपारी त्याच्या दुसऱ्या निवासस्थानी गेलो तेव्हा त्यांचा हा नवा फ्लॅट आहे समुद्रकाठी ! चौपाटीजवळ, गर्दीपासून बाजूला, अलग असा बसताच केवढा तरी समुद्रभाग दृष्टीपुढ आला खान्देरी-उन्देरी किल्ले दिसत होते तापत्या उन्हात समुद्र चमचमत होता ! सुकती होती संथ-शांत होता वामकुक्षीचा 'मूड'' असावा !

मी फार खूष होऊन गेलो !

अलिबागला मध्यतरी एकदा, या बाजूला एका गावच्या शाळेत स्नेहसंमेलनासाठी आलो होतो तेव्हा परत जाताना ओझरता आलो होतो पण पक्की-चांगली आठवण आहे ती १४ जानेवारी १९४७, सक्रांतीच्या दिवशी साने गुरुजी व सेनापती बापट याच्याबरोबर अलिबागला आलो होतो याची

साने गुरुजींनी सेनापती बापट यांच्यासह पढरपूरचे विठ्ठल मदिर हरिजन बाधवाना खुले व्हावे म्हणून प्राणातिक उपोषणाचा संकल्प केला होता त्यापूर्वी आपले हे म्हणणे आमजनतेला समजून सागून जनमताचा पाठिबा मिळविण्याकरिता हा महाराष्ट्रव्यापी दौरा काढलेला होता या दौऱ्यात प्रचाराची गाणी, पोवाडे म्हणणारे, नाट्कली सादर करणारे राष्ट्रसेवादलाचे 'महाराष्ट्र शाहीर'' नामक कलापथकही गुरुजींच्या इच्छेने सामील झालेले होते त्या पथकात मीही एक होतो . पुण्यातल्या मंडईत मोठी सभा झाली नि दौऱ्याचा शुभारंभ झाला पुण्याहून आम्ही कुलाबा जिल्ह्याच्या दौऱ्यासाठी

अलिबागला आलो होतो त्यावेळी धरमतरचा पूल नव्हता तरीतून खाडी पार केल्याच आठवतं सध्याकाळी चौपाटीवरच गुरुजींची सभा झाली होती गुरुजीनी हरिजन बांधवाना तिळगूळ देऊन प्रेमभराने मिठ्या मारल्या होत्या! ती अलिबागची माझी पहिली भेट पण त्या भेटीतच मला अलिबाग फार आवडले होते चौपाटी तर लक्षात राहिली होती पुढे गणपती पुळ्याला गेलो व विस्तीर्ण मोकळीढाकळी चौपाटी पाहिली, तेव्हा अलिबागच्याच चौपाटीची आठवण झाली होती फार सुदर!

डॉक्टरानी आपली गाडी व ड्रायव्हर देऊन मला कोळीवाड्यात वगैरे फिरवून आणण्यास सागितले मी व मेधा निघालो कोळीवाड्यात गेलो परशुराम शकर सारग हे तरुण मच्छीमार भेटले वयाच्या बारातेराव्या वर्षापासून ते मच्छीमारीसाठी समुद्रावर जाऊ लागले त्याच्या दोन बोटी आहेत एक दोन सिलिंडरवाली आहे दुसरी एक सिलिंडरवाली आहे बोटीवर सहाजण असतात तांडेल, सहाय्यक तांडेल, जेवण्या किंवा हडीवाला, म्हणजे भाताची हंडी लावणारा, बाकी खपणार या भागात दीडशे होड्या आहेत ट्रॉलर्स कमी आहेत बुडीची मच्छीमारी लांबवर समुद्रात ट्रॉलरवाले करतात तर होडीवाले डोल पध्दतीने करतात कवची पध्दत इकडे नाही भरती-ओहोटीवर फिशिंगला जाण-येण अवलंबून आहे पहिल्या हगामातली ताजी मासळी मुंबईला फार जाते सुक्या मासळीला गिऱ्हाईक पार हैद्राबादपर्यंत असते सोलापूर, कोल्हापूर, इकड जळगाव, धुळ व्यापारी खरेदी करून नेतात सोडेही बनवतात कोळी, दालदी याच्याबरोबरच आता कातकरी, भैये हे लोकही मच्छीमारी करू लागले आहेत

गंमत अशी झाली की, शिक्षणाचा प्रसार झाला आहे, कोळ्याची मुलं-मुली शिकू लागली आहेत पन्नास-साठ पदवीधरही बनले आहेत होडीसाठी इजिन घ्यायला कर्जाची सोय झाली आहे पण त्याबरोबर बँकेचा हप्ताही चालू झाला आहे! तो फेडण्यासाठी जास्तीत जास्त मच्छी पकडणं, विकणं, पैसा करण भाग पडल आहे ह्यासाठी माणसाची गरज आहे मग मुलांना शिक्षणातून काढाव लागतं घरची माणस असली म्हणजे बरं पडत बाहेरची लावली की, ती म्हणतील तेवढी मजुरी वेळेकाळेला द्यावी लागते

नवगावला कोळीवाड्यातल्या एका घराच्या ओटीवर बैठक चागली जमली पाचसहा कोळणी व सातआठ कोळी होते बरीच माहिती सागत होते पण गेल्या ६-७ दिवसात ऐकलेलीच माहिती पुन्हा कळत होती

आणि अशी पुनरावृत्ती होणे स्वभाविकच आहे स्थानिक स्वरूपाचा थोडाफार फरक सोडला तर मच्छीमारीच्या पध्दती, मासळी, जाळी, बाजार आदी गोष्टी एकसारख्याच असणार

एका कोळीण आजीला मी पुन्हा इथं त्यांच्या साडी नेसण्याच्या पध्दतीबद्दल विचारले, " या गुडघ्यापर्यंतच्या घट्ट कासोटयाच्या नेसण्याला काही विशिष्ट नाव आहे का, आजी ? "

" कोळणीची साडी म्हणतात पाण्या-चिखलात राबाव लागत त्याला हे नेसणं सोयीस्कर पडत "

" तुमच्या कानात जे घातलेलं आहे त्याला काय म्हणतात ? "

" त्याला ताटे म्हणतात चार-चार पाच-पाच तोळ्याचे घालतात कानाच्या पाळ्या ओघळतात "

" गळ्यात घालायचे दागिने कोणते ? "

" आमचे जुने दागिने म्हणजे वजरटीक, चिटपट्टी, हातात पाटल्या, गोट, नाकात नथ, पायात साखळ्या, कंबरपट्टा "

" लग्नात गाणी म्हणत असाल ? "

" म्हणतो की "

नवरानवरी कशा न्हाती
तेज पानी गं बने जाती
बनेज पानी गं मोर पेती
तरून मोर गं उदयीला
आंब्या चाफ्यावर बसईला
आंबा चाफा हिरवागार
उठ ग नवरी भागीवंता
दारी आला ग तुझा कंथा

आजीनं थरथरत्या, पण सुरेख आवाजात गाणं म्हणून दाखवलं इतर कोळणींनी साथ दिली

तेवढ्यात सुनबाईनं घरातून गोल गरगरीत पाढरी शुभ्र भली मोठी जाडसर भाकरी आणून दाखवली म्हणाली, " न्याहारीला अशा तीन भाकऱ्या न् माशाचं कालवण, तळवण समिंदरावर जाताना बरूबर देतो. खाताय काय ? "

" नको नको मला भाकरीसुध्दा सरायची नाही "

" काम कष्टाच आसतंय, जाळं वडून वडून आतडी गोळा होत्यात भुका लागत्यात "

" खर आहे त्यान पचवण्याची शक्ती पण मिळते "

" नवगावचा ग्रामदेव कोणता ? "

" बोरेश्वर " एका कोळ्यानं सागितल

" शकराच देवस्थान ! "

" हो, शिवरात्रीला मोठी जत्रा भरते मुंबैकर येतात आसपासच्या गावातून लोक जमतात त्यावेळी इथं पध्दत अशी आहे की, सगळ्या कोळ्यानी एक दिवसाची मिळकत देवाला द्यायची त्या दिवशी जर त्याला जाळ्यात लाख दोन लाखाची मासळी गावली तर त्यान ती दिर्ली पायजे एका साध्या मच्छीमारांन एक लाख रुपये दिले। मुबैकर दिवसाचा पगार देतात "

" गणपती-शिमगा जोरात का ? "

" शिमग्याचा सण जोरात, गणपतीचा तेवढा नाही कारण तो बोंबिलाचा सीझन असतो म्हणून इकडे सगळे कोळी समुद्रावर जातात होळीच्या टायमाला नाखवाच्या घरी कोळी-खलाशी ४-५ दिवस जाणारच नाय मज्जेत सण साजरा करणार नाचणार, गाणार, बेहोश होणार !. "

" नाच-गाण्यान असं बेहोश होणं, देहात-मनात उत्साह, आनंद भरून घेणं हे पुढ करायच्या कष्टासाठी उपयोगी पडत असेल, नाही ? "

" तर हो ! साहेब, आमच्या कोळ्यांच्या जीवनात दोन सण, जत्रा याशिवाय आनंदाला, मन रमवायला दुसरं काय साधन आहे हो ? काहीच नाही रात्रंदिवस कष्ट आमच तरी बर जातं दहाबारा तास दर्यावर पण आमच्या बायकांचं जिणं फार फार त्रासाच कष्टाचं आम्ही एकदा का मासळी आणून टाकली की, पुढली व्यवस्था त्यांना करावी लागते "

" तुम्ही जाता का मासळी विकायला ? "

" हो तर ! सुकी मासळी घेऊन जातो, वडखळ, पोयनाडच्या बाजाराला " कोळणींनी सांगितलं

" काय हो कारखानदारी वाढली पण तिच्यामुळं हवा बिघडली पाणी बिघडलं याचा काही परिणाम मच्छीमारीवर झालाय का ? "

" फार वाईट परिणाम झालाय विषारी पाणी कारखानावाले

बिनदिक्कत खाडीत सोडून देतात त्यामुळं खाडीच पाणी विषारी होत काळं-ताबड दिसत माशाना रॉकेलसारखा वास मारतो माशांच्या काही जाती नष्ट झाल्या आहेत खाडीतली मच्छीमारी प्रदूषणाच्या धोक्यात, संकटात आहे

"याविरुध्द आवाज नाही का ?"

"कोण ऐकणार साहेब गरिबाच श्रीमतांच्या स्वार्थापुढं आमच कोण ऐकणार ? पुढारी सांगत्यात, देशाचं उत्पादन वाढल पाहिजे परकी चलन मिळाल पायजे ते खर हाय, पण आमच्या अन्नात माती कालवून का रं बाबानो घडवताय ? प्रदूषणाच्या विषाचा बदोबस्त आधी करायला पायजे " एक तरुण शिकलेला तावातावान बोलला

"खर आहे तुमचं आधळं दळतं नि कुत्र पीठ खातं, अशी आपल्या विकासाची तऱ्हा झालेली आहे तुम्हा गरिबांनांच नव्हे तर जाणत्या तज्ञाना सुध्दा कोणी विचारीत नाहीत कारण त्याचा शहाणा सल्ला याच्या स्वार्थाच्या विरोधात जातो, म्हणून हे त्याला गुंडाळून ठेवतात त्याना त्याच्या स्वार्थाचा सल्ला देणाऱ्याला डोक्यावर घेतात . अस चाललय आज !"

मी पाहिल होतं, ठाण्याकडं हिंडताना काही खाड्याचं पाणी काळं काळ झालं आहे माशाना आणि मच्छीमाराना काळ्या पाण्याची ही कठोर शिक्षाच ! देशावर साखर कारखान्याचं मळीचं पाणी नद्यात, ओढ्यात सोडून दिल, नदीकाठच्या गावांचं जीवन धोक्यात आणल, तर इकड खाड्या नासवल्या ! समुद्रे सर्व तीर्थांनी ' "समुद्रात सर्व तीर्थ विलीन होतात" - असं संस्कृत सुभाषित आहे आता ' समुद्रात सर्व पाप नि हलाहल मिसळली जातात ' - असं म्हणावं लागेल काका कालेलकरानीं नद्याना "लोकमाता" म्हटलं आहे कारखानदारीन त्या नद्यांना "लोकशत्रू" बनवून टाकल आहे नद्यांच नदीपण घालवून टाकल आहे खाड्या भ्रष्ट केल्या आहेत माणसाचा सुखाचा हव्यास, ज्या माणसासाठी चाललेला आहे, त्यालाच तो कुठ नेणार आहे, कुणास ठाऊक ! हे सगळं अघोरी, निसर्गाच्या विरोधी, सृष्टीचा समतोल बिघडविणारं दृश्य पाहिलं, ऐकलं किंवा वाचलं की, अस्वस्थ व्हायला होतं मन बेचैन बनतं आपल असहाय्यपणही जाणवतं

नवगावहून मांडा, रेवसपर्यंत जाऊन आलो, अलिबागला आल्यावर दोशी पतीपत्नींचा, मुलांचा निरोप घेतला आणि सायंकाळच्या बसने मेथाच्या बरोबर पनवेलला आलो पनवेलला श्री रमणभाई शेठ आपल्या ऑफिसात

माझी वाटच पाहात होते  मित्रवर्य प्राचार्य पुरुषोत्तम शेठ याचे हे चुलत बधूच  याच ऑफिस पनवेलला आहे  राहतात नव्या मुबईत - वाशीत रमणभाईबरोबरच त्यांच्या घरी आलो  त्यांच्या पत्नी, मुलगी, मुलगे याची ओळख भेट झाली  थोड्याच वेळात मी त्यांच्या कुटुंबात मिसळून गेलो

रमणभाईंनी उद्याचा कार्यक्रम असा सांगितला होता, " उद्या सकाळी पनवेलला गेल्यावर तेथील कॉलेजमधील एक प्राध्यापक मोरे याना भेटू त्यांनी तुमच्याबरोबर राहायच कबूल केल आहे  ते तुम्हाला उरण व नतर करजवणे येथे घेऊन जातील "

" ठीक आहे ! " म्हणालो, आणि दुसरे दिवशी पनवेलकडं निघालो

**उरण-करजवणे  दि  २ जून १९९२**

प्रा  मोरे यांच्याबरोबर बसने उरणला आलो  पनवेल व उरण या भागात आणि उरणला तर अधिक प्रमाणात गावांचं, माणसांचं, उद्योगधंद्याच शहरीकरण होत असल्याचं दिसल  मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभे झाले आहेत, होत आहेत  थळचा रासायनिक खताचा कारखाना या परिसरातच आहे

उरणला मच्छीमाराची वस्ती बरीच आहे  ट्रॉलर्सही बरेच आहेत.

उरणहून पुन्हा बस बदलून करंजवण्याला आलो  समुद्राच्या काठीच कोळीवाडा  घरांच्या अगणातच समुद्र !

इथला कोळीवाडा इतरत्र पाहिलेल्या कोळीवाड्यापेक्षा निराळा - मोठा शानदार दिसला ! लहानमोठी मजल्याची घर, आधुनिक ढंगाची नि रंगाची वाटली  कोळी मंडळींना भडक रगाची आवड जास्ती असावी, अस वाटतं कोळीवाड्यातही मोटरसायकल्स, स्कूटर्स आणि फियाट कार्स देखील दिसल्या  माणसही रुबाबदार कपड्यातली दिसली

खंडू नाखवाच्या घरी गेलो  दोन मजल्यांचे सुरेख बांधणीने छान रंगवलेले व आकर्षक इंटेरियर डेकोरेशनने सजविलेले दिसले  कोच, खुर्च्या, टी  व्ही , फ्रीज सर्व साधनं होती  खडू नाखवा मात्र कोळी पद्धतीचा रुमाल कमरेला लावून बसले होते  गेल्याबरोबर त्यांनी विचारलं, " काय, थड घेणार की गरम ? "

उकाड्यानं, घामान हैराण झालो होतो  सांगितल, " थंड "

फ्रीजमधली गार गार गोल्डस्पॉटची बाटली पुढं आली  गप्पागोष्टी

सुरू झाल्या म्हणाले, "आम्ही बहुतेक सगळे कोळीच इथं आहोत मच्छीमारीचा धंदा करतो पाच पाडे मिळून इथली लोकवस्ती सुमारे दहा हजार असेल नवा पाडा, सुळकी पाडा, नामदेव पाडा, कोलबी पाडा आणि कासवल पाडा असे पाच पाडे कोळ्यांचे आहेत. वरला व खालचा आग्रीपाडा हे दोन आग्री लोकांचे आहेत "

"आग्री मंडळी शेती करत असणार!"

"शेती करतात काही मच्छीमारीही करतात "

"मच्छीमारीच्या व्यवसायात या भागात किती लोक असतील?"

"सहाशे - सातशे असतील अंदाजानं "

"त्यांच्या त्यांच्या होड्या असणार?"

"नाही, नाही आता होड्या फार कमी झाल्या, ट्रॉलर वाढले!"

"किती ट्रॉलर असतील इकडं?"

"हजार तरी असतील!"

"अरे बापरे! हजार! . अहो, एका ट्रॉलरला बारा-तेरा-पधरा लाख रुपये खर्च येतो म्हणतात! म्हणजे इथले लोक श्रीमतच आहेत म्हणायचे! आणि एवढा खर्च ज्या अर्थी करतात, त्या अर्थी त्याचं मासळीच उत्पन्नही तसंच मोठं असणार!"

"आहे पुष्कळ मासळी मिळते ट्रॉलर असल्यामुळं दर्यात लांब साठ-साठ वावपर्यंत जातात पार गोव्यापर्यंत पोचतात ट्रॉलरसाठी बँकेकडून, फिशरीज डिपार्टमेंटकडून कर्ज मिळतं ते फेडायचं असतं रात्रदिवस कष्ट करतात इथं नोकरशाही नाही सगळे आपले आपले मालकच - भागीदार!"

"या भागीदारीची इथली काय पद्धत आहे?"

"ट्रॉलरवर आठजण असतात नाखवा शेठ घरी असतो समुद्रावर जात नाही आठजणात एक तांडेल, दुसरा तांडेल, एक जेवण्या, बाकीचे जाळ टाकणार, वरती घेणार जी काय मिळकत होईल त्यात दोन भाग, एक भाग नाखवाला, त्यातून डिझेल, कर्जफेड, दुरुस्ती वगैरे खर्च करतो दुसऱ्या वाट्यात दोन वाटे तांडेल, दीड वाटा दुसरा तांडेल, मग बाकीच्यात सारखे वाटे नफा-नुकसान जे काही होईल त्याला सगळे जबाबदार! या मच्छीमारीला ट्रॉलरची, बुडीची किंवा जपानी पद्धतीची मच्छीमारी म्हणतात "

"मच्छी किती मिळेल, नियम नाही कधी कधी तीस हजाराची,

पन्नास हजाराची सुद्धा मिळते, आणि कधी काहीच मिळत नाही डिझेलचा खर्च भागत नाही ''

"ही मिळालेली मच्छी विकायला कुठ नेतात ? "

"ससून डाकला - मुंबैला तिथं दलाल मंडळी लिलाव करून माल घेतात परदेशी पाठवतात "

"हे सगळ कोळ्याच्या बायाच करतात का ? "

"नाही, नाही यात बायाचा संबंध नाही पुरुषच करतात बारीक-सारीक मासळी, सुकी मासळी बाया विकतात इथ आमच्या बाया काही करत नाहीत "

"कुठल्या माशाना परदेशातून जास्तीची मागणी असते ?

"प्रॉन्ज, लाफ्टर्स, टायगर "

"आता जून सुरू झाला पाऊस येईल पावसाळ्यात मग मच्छीमारी बंद ठेवताल ना ? "

"नाही, नाही आम्ही बद ठेवत नाही बारा महिने सुरूच धदा सुट्टी नाही पावसाळ्याच्या दोन महिन्यांत जेवढी मिळकत होते, तेवढी बाकीच्या दहा महिन्याच्या बरोबर ठरते ! "

"हो का ? "

"हो, तर ! ८९ साली वादळ झालं. होड्या बुडाल्या माणस मेली तेव्हापासून सरकारने पावसाळ्यातली मच्छीमारी बंद केली पण आम्ही जातोच एवढी मिळकत कोण सोडंल ? "

शकरभाऊ कोळी इथले पुढारी कोळ्यांची अडलीनडली कामं करणं, मदत मिळवून देणं, सल्ला सांगणं असे समाजसेवक त्याच्या घरी जेवलो गावात निघालो चौपाटीच्या कडेला नव्या ट्रॉलर्सची बांधणी चाललेली दिसली अशी या धद्याची उर्जितावस्था दिसली नवीन शिक्षणानं, नव्या जगाच्या दर्शनानं, नव्या टेक्नॉलॉजिन प्रभावित झालेले तरुण या व्यवसायाच्या पारंपरिकतेपलीकडं जाऊन विचार करू लागल्याचं दिसतं मधुकर नाखवांनी लेथ टाकून कारखाना काढला आहे फौंड्री चालवलेली आहे आणखी कुणी पेंटिंग तर कुणी मच्छीमारीला लागणाऱ्या वस्तूंची दुकानं काढली आहेत मधुकर नाखवाशी बोलताना ते म्हणाले, " आमच्या मच्छीमारीच्या व्यवसायातही तांत्रिक स्वरूपाच्या अडचणी उद्‌भवतात वेळेवर पार्टस् मिळत नाहीत. मेकॅनिक भेटत नाही, वेळ तर महत्त्वाचा

असतो अशावेळी आत्मनिर्भर असणं फार गरजेचं झालेलं आहे अशा विचारातून मी हा मुख्य धंद्याला पूरक असा उद्योग उभारलेला या व्यवसायाचा व्यापही दिवसेंदिवस वाढत आहे परदेशाशी संबध आलेले आहेत निर्यात वाढली आहे मुंबई हे याचे केंद्र आहे मुंबई आम्हाला जवळ आहे अशा परिस्थितीत उच्च शिक्षण घेतलेली घरातलीच मुलं, दुसरीकड कुठ नोकरी करण्यापेक्षा, याच व्यवसायात आली तर फायदाच होणार आहे म्हणून माझा नंबर दोनचा मुलगा जो बी एस्सी आहे, धाकटा भाऊ बी ए आहे त्यांना मी फिशिंगमध्येच ठेवलेल आहे बोट जर रिपेअरिंगला आली तर त्याच दिवशी रिपेअर होऊन ती फिशिंगला गेली पाहिजे यासाठी या सुशिक्षित मुलाचा फार उपयोग आहे बरं, आम्हाला आठ माणस लागतातच त्यात हा एक नववा -सुपरवायझर बरं, दुसरीकडं जेवढा त्याला पगार मिळणार तेवढा इथही मिळणार जास्तीच मिळणार. कधी कधी मुलानाही वाटत की, दुसऱ्याकड राबण्यापेक्षा या घरच्या धंद्यात राबणंच चागल आमच्या चार ट्रॉलर्स आहेत आम्हाला माणसं लागतातच ''

"मुंबईच्या जवळ आहोत, सापत्तिकदृष्ट्या समृद्ध आहोत, स्थिरावलेले आहोत तेव्हा वाचन, पर्यटन, प्रबोधन यादृष्टीनेही सास्कृतिक विकास व्हावा, अस नाही का वाटत ? तुमच्या आणि तुमच्या सारख्यांच्या घरात मला सर्व तऱ्हेची अत्याधुनिक साधनं दिसली घर तर सुरेख, वेलफर्निशड् दिसल हे सर्व पाहून बरं वाटलं पण मला कुठ ग्रंथ-पुस्तक, त्यासाठी जागा दिसली नाही याची गरज वाटत नाही का ? किंवा याबाबतीतलं मागासलेपणही घालवल पाहिजे, याची जाणीव नाही का ? ''

"जाणीव होती, पण हा धदाच असा आहे की वेळ मिळत नाही केव्हा वाचणार ? आणि पैसा मिळू लागल्यावर त्याला आज बरीच मासळी मिळाली, मला का नाही मिळाली काय चुकलं, काय कमी पडल याचाच विचार सुरू असतो कधी कधी कुठ कुठं जातो पण वेळ नसतो हे खरच ''

मच्छीमारीच्याच काय, कुठल्याही धंद्यात त्यांच्या त्याच्या दृष्टीनं वेळ नसतो ही सबब ऐकायला मिळते त्यात तथ्यही आहे पण नसणारा वेळ कटाक्षानं काढावा लागतो हेही खरच आहे मग मच्छीमार काय, समुद्र काय, मासळी काय - सारीच पैसा- केवळ पैसा उत्पन्न करणारी यंत्र ठरतील ! समुद्रावर पंधरा-सोळा तास काढून, समुद्राच्या सान्निध्यात रात्रंदिवस राहूनही

समुद्राचं सौंदर्य, समुद्राचे लोभस विभ्रम, समुद्राचे वेगळेपण, त्याचे वेगवेगळे "मूडस्" जर कळले नाहीत त्यातून आनंद मिळवता आला नाही, तर जीवनात एकप्रकारची मोठी उणीव नाही का राहून जाणार? समुद्र, मच्छी, मच्छीमार याच्या सबधी लिहिले आहे, म्हणून हे लिहिल, पण विविध व्यवसाय व व्यावसायिक यांच्या संदर्भातही मला अस वाटत! तुकोबाच आदरणीय निराळेपण मला जाणवत ते त्यांनी भक्तीत व परमार्थातही "आनदाचा डोह" शोधला आणि आनदमय बनून गेले, याचे तुकोबा म्हणाले, "आनदाचे डोही आनद तरंग! आनदाचे अग आनंदचि।। वृक्षवल्लरींना आणि वनचरानाही त्यानी सोयरीधायरी मानल त्याच्याशी नात जोडल पारपरिक व्यवसायात आजच्या संदर्भात मागासलेपण होत पण हा जिव्हाळा ओतप्रोत होता अस जुन्या कोळीगीतातल्या, सण-समारंभावरून दिसत यात्रिकतेत हा जिव्हाळा आहे का? समुद्र, मासा आणि माणूस यातला ऋणानुबध जपला जातो का? जाईल का? - असे प्रश्न डोक्यात घोळू लागले

बाळू विठ्ठल नाखवा याच्या घरी गेलो हे एक साधेसुधे, सज्जन नम्र गृहस्थ भेटले यानी आयुष्यभर समाजसेवा केली त्यांना अलीकडेच राज्यपालाच्या हस्ते "दलितमित्र हा पुरस्कार मिळालेला आहे शाळा, सोसायटी, ग्रामपचायत, मंदिर अशा गावसस्थांमध्ये भाग घेऊन लोकहितासाठी झटले कोळी असूनही हे स्वत मासळी खात नाहीत तीर्थयात्रा केल्या आहेत पंढरपूरची वारी आज सत्तेचाळीस वर्षं नियमान करीत आहेत त्यांचं वय आज सत्त्याऐंशी आहे शिडाच्या बोटीवर मच्छीमारी केली परिस्थिती गरिबीची होती आता ट्रॉलर्स आहेत, पण मुलगा व्यवसाय पाहतो हे पूर्णतया निवृत्त आहेत

शकरभाऊ कोळी हे देखील एक समाजसवेकच, पण देवदेव, तीर्थयात्रा, धार्मिक, आध्यात्मिकता यावर भर न देता शासकीय सुधारणा, सवलती यांचा लाभ समाजाला कसा होईल, या दृष्टीने धडपड करणारे आहेत शकरभाऊनी सोनकोळी - महादेव कोळी, कोळी आणि आग्री, होड्यांचे यात्रिकीकरण, सोसायट्या, बँका, डायरेक्टर ऑफ फिशरीज याच्याकडून होणारे अर्थसहाय्य, हँड ट्रॉलिंग आणि गियर ट्रॉलिंग, निरनिराळ्या इजिनाची क्षमता, मच्छीमार धंद्याची व्याप्ती, अनुषंगिक उद्योग, कामाची उपलब्धता यांचे अर्थकारण, मत्स्योत्पादन, निर्यात अशा विविध अंगांची माहिती

दिली शिकलेल्या तरुण मच्छीमारांकडून त्यांची अशी अपेक्षा आहे की, आपल्या उत्पादित मालाला जगात कुठे कुठे व कशी कशी मागणी आहे याचा शोधअभ्यास त्यांनी केला पाहिजे व हा माल दलालांच्या हाती न देता आपल्या सहकारी सोसायट्यांच्या मार्फत निर्यात केला पाहिजे उत्पादकाने आपला धंदा आपल्या हातात ठेवला पाहिजे, नाहीतर मोठमोठे दलालच यातील नफा खाऊन जाताना दिसतात

मच्छीमारांच्या अडीअडचणी, त्यांचे निवारण याविषयी शंकरभाऊंनी "महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती"च्या कार्याची माहिती दिली मुंबईत जी कोळ्यांची गावं आहेत त्यांवर पैसेवाले, बिल्डर यांचे कसे आक्रमण होत आहे हे सांगून कफ परेड येथील भरावाच्या संदर्भात केलेल्या आंदोलनाची हकीकत सांगितली अभ्यासू, कष्टाळू व समाजहिताची कळकळ असणारे शंकरभाऊंचे व्यक्तिमत्त्व आवडले रमणलाल शेठ दुसऱ्या दिवशी बरोबर होते शंकरभाऊही होते करजवण्याहून तरीने खाडी ओलांडून आम्ही पलीकडे रेवसला गेलो धुक्यात हरवलेली मुंबई समोरच होती रेवसचा मच्छीमार व्यवसायही मोठा आहे.

भाऊ नाखवांची मत्स्यशेती पाहिली, हे मोठे प्रयोगशील नाखवा आहेत त्यांनी खाडीजवळ दहा एकर जमिनीत बांधबंदिस्ती करून चार तळीच निर्माण केली आहेत त्यात मत्स्यबीज टाकून मत्स्य उत्पादन काढले आहे त्यातल्या लाफ्टरला जपानमधून फार मागणी आहे

अशा तऱ्हेच्या मच्छीमारी व्यवसायातल्या प्रगतीच्या, विकासाच्या वाटा खुल्या होत असतानाच लक्ष्मण नाखवासारखी मंडळी यात पुन्हा गुंतवणूक करावी की नाही याविषयी विचार करतानाही आढळली ते तर म्हणाले, "हा व्यवसाय शंभर टक्के फुगा आहे, पाण्यात पैसा आहे" त्यांच्याही ट्रॉलर्स आहेत, समृद्ध आहेत उत्तम स्थिरावलेले आहेत समुद्रकाठावरले त्यांचे घर छानच आहे

रात्री रमणलाल शेठ बरोबर त्यांच्या घरी परतलो सकाळच्या बसने पुण्यास निघालो आठ-नऊ दिवस एका वेगळ्या जगात, पुन्हा भ्रमंती केली समुद्र, मासा नि माणस यांच्या सान्निध्यात पुन्हा एकदा राहिलो

■ ■ ■



वा. क्र. ८०५८ २८७६२

REFBK-0027172